# तेरी चुनरिया दिल ले गयी

## प्रा. श्रीराम काळे



ई साहित्य प्रतिष्ठान

◙ www .esahity,com ◙ esahity@ gmail.com
◙ whats app 9987737237
◙ फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा

तेरी चुनरिया दिल ले गयी (कथासंग्रह)

◙या पुस्तकाची प्रथम ई आवृत्ती जुलै 24 मध्ये ईसाहित्य प्रतिष्ठान
ठाणे यांचे मार्फत प्रसिद्ध झाली.

◙लेखक प्रा.श्रीराम विनायक काळे
एम्.ए.एम्.एड्.एम्.फिल्.
shriramkale.sk@gmail.com 876676464

◙मुखपृष्ठ- जत्रा दिवाळी अंकात कथेसोबत दिलेले
रेखाटन रंगीत रुपात

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

# अर्पण पत्रिका



**माझा जिवलग मित्र कै. आर. डी. प्रभु ,**
**मुख्याध्यापक श्री भगवती हायस्कुल,**
**मुणगे, ता. देवगड याला सस्नेह समर्पण!**

**प्रा. श्रीराम काळे**

# ई आवृत्तीच्या निमित्ताने......

माझा पहिला ई कथा संग्रह "रुजवातीच्या गोष्टी" ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे जानेवारी २४ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यानंतर "पाखरांची भाषा' आणि " बॅड कमांड" हे कथासंग्रह सुद्धा ई बुक रुपाने प्रसिद्ध झाले.

ई साहित्य प्रतिष्ठान च्या वाचक वर्गाची संख्या खुप मोठी आहे. मला वाचकवर्गा कडून आलेल्या प्रतिक्रिया उर्जा देणाऱ्या आहेत.

या आधी प्रकशित कथासंग्रहा पेक्षा या संग्रहातल्या कथा थोड्या विनोदी धाटणीच्या आणि समजातल्या ईरसाल नमुन्यांचे दर्शन घडविणाऱ्या आहेत. वाचकवर्गाकडून या संग्रहाचे नक्की स्वगत होईल असा विश्वास आहे.

प्रा . श्रीराम विनायक काळे.

# तेरी चुनरिया दिल ले गयी
## ( कथा संग्रह )

## अनुक्रमणिका


0१. मियाँ बिबी राजी

0२. इंग्रजीची गजाल

0३. जय गुरूदेव

0४. बांडगूळ

0५. स्वर आले जुळूनी

0६. तेरी चुनरिया दिल ले गयी

0७. अस्मानची चाँदनी

# १. मियाँ बिबी राजी

चवेड रत्नागिरी रस्त्याच्या डांबरीकरणाचं काम सुरू झालं अन् साप्ताहिक रत्नदुर्ग प्रेसच्या मागे वडारांची पालं पडली. मटांगे कॉन्ट्रक्टरकडे खडी फोडणारा कल्लाप्पा अलिकडे चांगलाच वधारलेला... चवेड रस्त्याचं टेंडर शेट्टी कॉन्ट्रक्टरला मिळालं. त्याला काळवत्री खडी पुरविण्याचा मक्ता कलाप्पाकडे. स्वतः कल्लाप्पा, त्याचे तीन भाऊ भिमु, भरमु, नामु आणि त्यांचे कुटुंबीय... अठरा माणसांचं टोळकं होतं... अधिक कर्नाटकातुन चाळीस जोड्या कलाप्पाने आणल्या. स्वतःचा क्रशर टाकला आणि रात्रंदिवस खडीच्या कामाला सुरवात झाली. आता स्वतः कल्लाप्पा, त्याची बायको सुंद्री आणि पोरगी ईमली याचे कष्ट बंद झाले.

कल्लाप्पा स्वच्छ धोतर नेसुन बंडीच्या खिशात नोटांची बंडले सांभाळीत कामगारांवर डाफरत राहायचा. त्याची बायको नी पोरगी पान खाऊन लालबुंद झालेल्या तोंडाने नुसती हिंडत रहात. कल्लाप्पा नी सुंद्री दिवसाचा बहुतांश वेळ साईटवर राहायची. इमलीला मुळी मोकळं रान. ती रत्नदुर्ग प्रेसच्या

व्हरांडयात बसुन राहायची. इमलीचा वावर प्रेसच्या अवती भवती सुरू झाला त्याच दरम्याने कंपोझिटर बाबा भुत्यांचा मुलगा सुऱ्या बाबा बरोबर नेमानं कामावर यायला लागला.

सुऱ्या दहावीत नापास झाला. त्यानंतर तीन वर्ष तो आबा भोगल्यांच्या माडी दुकानात कॅश वर बसायचा. सुरवातीला बाबा भुत्यांनी दुर्लक्ष केल पण तीन वर्ष मागे पडली तरी महिना अडीजशे रूपया पुढे मिळकत होईना तेव्हा मात्र त्यानी सुऱ्याला चांगला खडसावला. अलिकडे रत्नदुर्गचा पसारा वाढत चालल्लेला. तीन पानांचा अंक सहापानी झाला. गुमास्ता कायदा लागु झाला. प्रेसमध्ये नोकरांसाठी मस्टर सुरू झालं, फंड कापला जाऊ लागला. तेव्हा "काही तरी मगजमारी करण्यापेक्षा कंपोझिंग शिकलास तर कामाला तोटा नाही" अशी समजूत घालून सुऱ्याला ते आपल्या सोबत प्रेसमध्ये नेऊ लागले.

पाच महिन्यात सुऱ्या कंपोझिंग शिकला. प्रेसचे मालक भाऊ रायकर यांची स्कुटर घेऊन जाहिराती आणणे, बँकेतली कामे इथ पासुन तो कोल्हापूरहून न्युज प्रिंट रोल आणण्यापर्यंत त्याची मजल गेली. उमेदवारीच्या काळात रायकर सुऱ्याला महिना तिनशे देत. शिवाय सटर फटर कामांचे कधी पंचवीस कधी पन्नास अलाहिदा देत. वर्षभरानंतर त्याचा मगदुर बघून भाऊंनी त्याला मस्टरवर घेतले अन् महिना बाराशे पगार सुरू केला. प्रेसची बाहेरची कामे करण्यात तो सराईत झाला. भाऊ

रायकर अगदी अडेल तेव्हाच प्रेस बाहेर पडायचे. हल्लीतर प्रेसची डुप्लीकेट चावी सुऱ्याकडे असायची. प्रेसची वेळ सकाळी ६ ते १२ आणि दुपारी ३ ते ६ अशी असायची. पण साप्ताहिकाचे अंक पोस्ट करणे, एस. टी पार्सले करणे, सभासद वर्गणी जमा करणे यामुळे वेळ व्हायचा. बाबा भुते प्रेस बंद झाल्यावर जेवायला घरी जात पण सुऱ्या मात्र जेवणाचा डबा घेऊन यायचा.

गावातली कामे उरकुन तो प्रेसवर यायचा. डबा खाऊन तिथेच ताणुन द्यायचा. टाईमपास करायला ईमलीची संगत होती. किंबहुना त्याच कारणासाठी त्याने डबा आणणे सुरू केलेले. ईमली मात्र चार भावंडं घेऊन पडवीत गपचीप बसुन असायची. धोतर नेसणाऱ्या कळकट वडारांच्या तुलनेत कमावलेल्या भरदार बांध्याचा छानछोकीत राहणारा सुऱ्या तिला आवडायचाही पण जात पंचायतीची अन् त्यापेक्षाही हुमदांडग्या बापाची दशहत वाटायची तिला. वडाराच्या पोरीची काय हिम्मंत की परजातीच्या बाप्याकडे वर डोळे करून बघील तर... डोळेच काढले असते ना वडारांनी ! शिवाय इमलीचं चार सालामागेच लग्न झालेलं... न्हाण आल्यावर दोन सालापाठी ती दादल्याकडे नांदायला गेलेली पण सुरूंगाचं काम करताना जिलेटीनचा स्फोट झाला. त्यात तिचा दादला गमावला. सासु सासरे इमलीचा छळ करायला लागले. मग कलाप्पाने तिला

सासरहून काढून आणलेली... सुऱ्याला हे कळले असते तर तीचा स्वीकार तो करणार नाही अशा विचारानेही इमली गप्प राहीलेली.

सुऱ्या मात्र इमलीसाठी पागल झालेला. कोपरापर्यंत हातावर गोंदण केलेली वडार समाजात न होण्याइतपत गोरी, टॉमेटो सारखी रसरशीत आणि मुख्य म्हणजे झुळझुळीत साड्या नेसून स्वच्छ राहणारी इमली त्याच्या मनातच भरलेली. बरेच दिवस प्रयत्न करूनही इमली त्याला काही प्रतिसाद देईना पण सुऱ्याने चिकाटी सोडली नाही. हळुहळु गप्पा सुरू झाल्या. इमलीच्या भावंडाना चॉकलेट्स दे ... गोळया दे करताना त्याने इमलीला सेंटची बाटली दिली अन् एक दिवस तीन ते सहाच्या शोचे सिनेमाचे तिकीट ईमलीला देऊन तु परस्पर थेटरात जाऊन बस... पिक्चर सुरू झाल्यावर मागाहून मी येईन सुऱ्या म्हणाला. ईमलीने नाही म्हटले पण पालवर जाऊन साडी बदलून ती बाहेर पडली.

दोन तीन दिवसांनी वरचेवर दोघेही पिक्चरला जाऊ लागली. कुणालाच काही संशय आला नाही. येण्याची शक्यताही नव्हती. तशी पुरेपुर खबरदारी दोघंही घ्यायची. सुऱ्याचे मित्र थेटरवर भेटायचे पण त्यांचा या गोष्टीत आक्षेप कशाला असेल? पिक्चरला जाणे सुरू झाले नि त्यांच्यातला दुरावा संपला. ईमली विधवा आहे हे कळूनही सुऱ्याने माघार

घेतली नाही. एवढेच नव्हे ईमलीशी लग्न करायला तो तयार झाला. त्याच्या घरात विरोध होण्याचा प्रश्न नव्हता... तसा आई वडिलांचा विरोध झाला असता पण सुऱ्याने जुमानला नसता. प्रश्न फक्त ईमलीच्या आई बाबांनी होय म्हणण्याचा होता. सुऱ्या लग्न करणार म्हणताना त्यांची परवानगी मिळेल अशी ईमलीला आशा वाटत होती.

थोडे दिवस गेले आणि ईमलीने ही गोष्ट आईच्या कानावर घातली. ती कलाप्पाला बोलली मात्र ... त्याने आकाशपाताळ एक केले. ईमलीला गुरासारखे बदडले. जातीबाहेर पोरगी द्यायला जात पंचायतीची परवानगी मिळणार नाही. एवढे कशाला ही गोष्ट त्याने पंचायतीपुढे नुसती सांगितली असती तरी पंचानी त्याला मिशी उतरून ठेवायला लावली असती. वडारांच्या पंचायतीचे या संबधातले कायदेकानुन भलतेच कडक... कलाप्पाला जिता गाडलाच असता की त्याच्या भावकीने. त्याने ईमलीला सक्त ताकिद दिली.

जवळजवळ पंधरावडाभर ईमली प्रेसच्या आसपास फिरकलीसुध्दा नाही.सुऱ्या डोळयात प्राण आणून वाट बघायचा. प्रेस भोवती चक्कर टाकायचा पण ईमलीची आई पालावर थांबलेली असायची. त्याचे काही चालेना. थोडे दिवस गेले. सुंद्री पूर्ववत दिवस दिवस बाहेर रहायला लागली. एक दिवस दुपारची ईमली प्रेसच्या व्हरांडयात येऊन बसली. झाला

प्रकार तिने सुऱ्याला सांगितला.

यापुढे दोघांचे बोलणे झाल्याचे कळले तरी कलाप्पा सुऱ्याला ठार मारील अशी भिती तिने व्यक्त केली. पण सुऱ्या असल्या धमकीला डरणारा नव्हता. तो राहायचा त्या शिवरे वठारात भंडारी मराठा समाजची जवळजवळ शंभर सव्वाशे घरे. वठारातले सगळे पोरगे नित्य नेमाने व्यायाम शाळेत जाणारे. एकजुटीने रहाणारे. एवढा मोठा स्मगलर फकीर कासम त्याचे नुसते नाव घेतले तरी रत्नदुर्गातले लोक चळाचळा कापायचे.शिवरे वठारातल्या कोणीतरी पोरगा सायकलवरून जात असताना फकीर कासमच्या गाडीने त्याला ठोकले. पोराला काही लागले नव्हते. सायकलचा चिमटा मात्र मोडला. पोरगा नुकसान भरपाई मागायला लागला.

फकीर कासमचे बॉडीगार्ड गाडी बाहेर पडले अन् त्यानी पोराची धुलाई केली. वठारात ही गोष्ट कळल्यावर लोक चिडले. स्मगलिंगचा माल भरून नेणारे फकीरचे तीन ट्रक त्याच रात्री लोकांनी अडवले.फकीरला कळताच गाडी घेऊन तो शिवरे वठारात आला. वठारातल्या लोकांनी त्याच्यासकट गाडीतल्या सगळ्यांना बेदम चोप दिलाच पण पोलिस आणुन ट्रक जप्त करायला लावले. असा वठार पाठीशी असताना सुऱ्या कशाला गडबडेल ? ईमलीचा विश्वास पटेल अशा शब्दात त्याने तिची समजुत काढली. चांगले मध्यस्त घालून कलाप्पाकडूनच

परवानगी घेईन. वेळ आल्यावर तु मात्र कच खाऊन मला तोंडघशी पाडू नको. माझे मी बघून घेईन. मी एकदा ठरवले म्हणजे ठरवले. सुऱ्याने शपथ घेतली.

ही गोष्ट सुऱ्याने मित्र मंडळीच्या कानावर घातली. सगळ्यानी त्याला मदत करायचे वचन दिले. आधी कलाप्पाला समजूतीने सांगून बघायचे. तरीही तो ऐकला नाही तर सरळ पोरगी काढायची नी रजिस्टर लग्न करायचे असे ठरले. सुऱ्याच्या मित्रांचे टोळके कलाप्पाचा क्रशर खडीचा डेपो असायचा तिथे जाऊन त्याला भेटले. त्यांचे सांगणे ऐकल्यावर कलाप्पा गरम झाला पण शिवरे वठाराशी वैर त्याला पत्करणारे नव्हते. शिवाय घडी बसलेला धंदाही विस्कळीत होऊ द्यायचा नव्हता. कलाप्पाने पोरांच्या पायाला हात लावला. हात जोडून अजीजी केली. माझी जात पंचायत मला जिवंत ठेवणार नाही, आमच्या जातीत हे निर्बंध कडक आहेत असे विनवले.

भेटायला गेलेल्या पोरानी कलाप्पाचे ऐकुन घेतले. मग विचार करून एकजण म्हणाला, “आम्ही समजुतीने तुला सांगितले एकतर पोरीला इथून बाहेर काढ. नाहीतर काय होईल ते तुझे तू सहन कर. मात्र कोणत्याही परिस्थितीत सुऱ्याच्या केसालाही धक्का लागला तर याद राख. क्रशर सकट वडाऱ्यांची सगळी पाले आम्ही पेटवून देऊ." त्या रात्री कलाप्पाच्या पालावर पुन्हा शिमगा झाला. ईमलीला मार बसला. कलाप्पाचे

भाऊ मधे पडले. त्यानी तोडगा काढला. त्याचा भाऊ नामु ह्याने चवेडच्या अलिकडे कोतवड्यात कामगारांची पाले पडली होती तिथे पाल टाकायचे नी ईमलीला रत्नागिरीतुन हलवून तिथे कायम ठेवायचे असा बेत ठरला. दुसऱ्या दिवशी प्रेस उघडण्या पूर्वीच नामुचे पाल उठले अन् ईमलीसह कोतवड्यात रवाना झाला.



आठ दिवस उलटले तरी ईमलीचा पत्ता लागत नाही म्हणताना सुऱ्याचा जीव कासावीस झाला. त्याला काहीच तर्क करता येईना. विचार करून करून त्याचे डोके फिरायची वेळ

आली. चार दिवस गेले आणि ईमलीची भावंडे पुन्हा प्रेसच्या व्हारांडयात बसायला लागली. सुऱ्याने त्यांना भजी खायला घातली नी ईमलीची चौकशी केली. “त्ये रोजाला बानी लई हानलं बगा त्येला मंग नामुकाका संगट त्येला आमच्या लोकाच्या वस्तीवर धाडली की बाऽनं” मग सुऱ्याने खोदून खोदून चौकशी केली. पोराना ठिकाण नेमके सांगता येईना पण “रस्त्याच्या कामावरच्या लोकांची पाले आहेत त्या ठिकाणी” हा धागा पकडून सुऱ्याचे मित्र शोध काढायला लागले.

कोतवड्यात पञ्चा जवळच्या मैदानात वडारांची पाले पडलेली होती. ईमलीचा शोध घ्यायला गेलेल्या मित्राला तिथे इमली दिसली. मग पुढचा मार्ग सोपा होता. कोतवड्यातला मंगेश साळवी रत्नागिरीच्या व्यायामशाळेत यायचा. त्याची नी सुऱ्याची चांगली ओळख. सुऱ्या मंगेशच्या घरी गेला. मंगेशच्या घराजवळ त्यांची माडाची बाग, उन्हाळी भाजी करायचे मळे, त्यालगतच वडारांची पाले पडलेली. मंगेश सोबत बागेत फिरताना सुऱ्याला बघितल्यावर ईमली लगबगीने पुढे आली. खुप दिवसानी दोघांच्या मनमुराद गप्पा रंगल्या. मंगेश जरा दूर जाऊन थांबला. सुऱ्या नी ईमली गप्पा मारीत असताना अचानक मंगेशचा अल्सेशियन कुत्रा बादशहा धावत आला. मळ्याची राखण करण्यासाठी तो सोडलेला असायचा. कुत्रा भुंकत आल्यावर दोघांची पाचावर धारण बसली. मंगेश धावत

आला आणि त्याने बादशाला आवरले म्हणून ठीक नाहीतर कुत्र्याने दोघांना फाडून खाल्ले असते.

ईमलीचा ठिकाणा कळला आणि सुऱ्याच्या कोतवड्याच्या चकरा व्हायला लागल्या. पालावर दिवसभर कुणीच नसायचे त्यामुळे अडचण नव्हती... फक्त मंगेशचा कुत्रा असायचा. सुऱ्या दरवेळी न चुकता कुत्र्यासाठी पाव बटर घेऊन जायचा. सवय झाली तसा कुत्राही दोघांना ओळखायला लागला. उलट त्याचा पहारा असल्यामुळे दोघांना निर्वेधपणे गाठी भेटी घेणे सुलभ व्हायचे. काहीही झाले तरी एकमेकांची साथ सोडायची नाही अशा आणाभाका झाल्या. मित्रांशी सल्ला मसलत करून कल्लाप्पाला बरोबर कात्रीत पकडायची नामी युक्ती सुऱ्याने शोधुन काढली. ईमलीनेही होकार दिला. युक्ती एवढी नंबरबाज की, कल्लाप्पाने आपल्या हाताने ईमलीचे सुऱ्याशी लग्न लावुन दिले असते.

सुऱ्याच्या मित्रांनी सांगितलेली हिकमत दोघनी लढवली आणि कल्लाप्पा कधी येतो या गोष्टीची सुऱ्या वाट पाहु लागला. त्या दिवशी हप्त्याची सुट्टी होती. कामगार मंडळी, बाप्ये बायका पालावरच थांबलेली,सगळी दारू पिऊन तर्रर्र...चुलीवर बोकडाचे कोंबडयाचे मटण रटमटत! मटण शिजले की जेवायला बसायचे. इतक्यात पालात वाकळीवर लोळणारी ईमली उठून बसली. सावरून उठण्यापूर्वी बसल्या जागीच तिला

कोरडया वांत्या व्हायला लागल्या. पाण्याचा तांब्या घेऊन चुलती धावली... असेल काहीतरी असे आधी वाटले. पण अर्ध्या तासाने पुन्हा तोच प्रकार. चुलता चुलती घाबरली. नामुची दारू खाड्ङ्कन उतरली. त्याने जोशी डॉक्टरांना बोलवायला कामगार पिटाळला.

घंटाभराने जोशी डॉक्टर आले. ईमलीला त्यांनी तपासले. चौकशी करता खरा प्रकार ईमलीने हळूच सांगितला. आपण विधवा असुन खरा प्रकार आईबापाला सांगितला तर ते मला जीती गाडतील, तेव्हा दोन दिवस तरी या प्रकाराची वाच्यता करू नका मग काय सांगायचे कसे सांगायचे ते बघता येईल... तुम्ही मला आई वडिलांकडे पाठवायचायचा सल्ला द्या... अशी डॉक्टरांना गळ घातली. डॉक्टरांनी मान डोलावली. डॉक्टरांनी बी कॉम्प्लेक्सचे इंजेक्शन टोचून दोन तीन टॉनिक वजा गोळ्या, सिरप प्रिस्क्राईब केले. दरम्याने बीलाचे १०० रूपये खिशात टाकताना "तुम्ही हिला रत्नागिरीतल्या चांगल्या डॉक्टरला दाखवा, काळजी करायचे कारण नाही मी इंजेक्शन गोळ्या दिल्या आहेत. एकदोन दिवस काही काळजी करायला नको." असे मोघमात बोलून डॉक्टर निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच चुलतीने ईमलीला गाठली. "काल हप्त्याची सुट्टी म्हंताना बोकड रांदीत हुतो न्हाई ते ईमलीला भडाडा वकाऱ्या व्हाय लागल्या की कुठ काय बादलं का

पोटात काय ग्येलं हयाचं भ्येव वाटायं लागलं की आमास्नं, त्ये बामनाचं डागतर हाय न्हवं त्येला बलिवलं की दादल्यानं... टचाचा दोन सुया मारल्यान.. शंबर रूप्पय घेतलं की डागतरानं... पर कसली भावना काय सांगाय यीना त्याला आनी म्हनालं का मोटया डागतराला दावाय फाजे.... फाटंला पुन्यांदा योक वक्कारी झाली की ईमलीला ----- तरी राच्च्याला मटान न्हाई खाल्लं गां ईमलीनं वाईच रस्स्यात कुसकरून दोन कोर भाकर तवडी खाल्ली-"

सुंद्री ईमलीची आय हे ऐकून गडबडलीच. "आस्सं ७७ कां—तरीच म्या म्हनलं की इतक्या सकाळच्या पारी तुमी आनि ईमलीला घ्येऊन कस्काय आल्यात ? तु घाबरू नगं इमला.. हत मोठ्ठ डागतर हाईत त्यास्न दावूया की... चुलती निघुन गेली. ईमलीला झोपाय सांगुन सुंद्री झाल्या गोष्टीची कलाप्पाला खबर द्यायला क्रशरकडे निघाली. माय बाहेर पडली आणि ईमलीने तडक प्रेस गाठली. तिला गेटात बघितल्या बघितल्या सुऱ्या बाहेर आला. ईमलीने सांगितलेली वार्ता ऐकून सुऱ्या जाम खुलला. कल्लाप्पाला पध्दतशीर कचाट्यात धरण्यासाठी त्याने ईमलीला सगळा बेत नीट समजावुन सांगितला.

खाजगी डॉक्टर गाठला तर तो गपाचुपीत गर्भपात करून ईमलीला मोकळी करील आणि सुऱ्या ईमलीचा बेत धुळीला मिळेल, त्यापेक्षा सिव्हील हॉस्पीटलला ॲडमिट व्हायचं...

आपल्याला सुऱ्यापासुन दिवस गेलेयत्, तो आपल्याशी लग्न करायला तयार आहे, मात्र आईबाबाचा याला विरोध आहे. ते जातपंचायतीला घाबरून आपल्याला जीवे मारतील. तेव्हा सरळ पोलिस केस करा नी सुऱ्याशी माझे लग्न लावून द्यायला आईबापाला भाग पाडा... असे सिव्हील हॉस्पीटल मधल्या डॉक्टरांना सांगायचे पण या प्रकाराची मिटवा मिटवी करू द्यायची नाही असे त्याने ईमलीला बजावले.

कल्लाप्पा नाना भाव्यांची टॅक्सी घेऊनच बिऱ्हाडी आला. ईमली, तिची आई टॅक्सीत बसल्या. “आपून सिविल हॉस्पिटलमदी जाऊया” असं ईमलीने आईला अगोदरच पटवून सांगितलेलं. कल्लाप्पाच्या मनाने चव्हाण किंवा औरंगाबादकर डॉक्टरांकडे जायचं होत पण सिव्हिलमध्ये कमी पैशात सोय असताना “उग आनी मोटा डागतर गाटून हज्जार रूप्पय कस्याला वाया घालवायचं?" हे सुंद्रिच म्हणणं त्यालाही पटलं. टॅक्सी सिव्हिल हॉस्पिटलच्या आवारात शिरली, माणसं खाली उतरत असताना मटांगे कॉन्ट्रक्टर समोर दिसले. कल्लाप्पा हात जोडीत “राम राम सायब म्हणत त्यांच्या समोर गेला. सगळे सोपस्कार केस पेपर वगैरे झटपट उरकले आणि ईमली तपासणीसाठी आर. एम. ओ. च्या केबिन बाहेर रांगेत बसली. आर. एम. ओ. नी ईमलीला तपासलं. ईमलीने खरा प्रकार त्यांच्या कानी घालून सुऱ्याने सांगितल्याप्रमाणे डॉक्टरांना

विनंती केली. ही केस मटांगे कॉन्ट्रॅक्टर मॉर्फत आलेली या केसमधील गांभीर्य लक्षात घेता ईमलीला बाहेर बसायला सांगून आर. एम. ओ. नी मटांग्याना फोन लावला.

मटांग्यानी कल्लाप्पाला बाजुला घेऊन ईमली गरोदर असल्याचे सांगितले. कलाप्पा त्यांच्या खास ठेवणीतला माणुस, १०/१५ वर्षे त्यांची घसट. सुऱ्या ईमलीच्या प्रेमाची गोष्ट त्यांच्या कानी गेलेली. त्यांनी कलाप्पाला सल्ला दिला. पोरगा भंडारी समाजाचा आहे. तुझ्या पेक्षा उच्च जातीतला... रायकरशेठच्या खास मर्जीतला... तुझी पोरगी नवरा मेलेली---- तुझ्या जातीतला कोण उमेदवार पोरगा ईमलीला पत्करणार नाही मिळालाच तर अर्ध्या वयाचा एखादा बिजवर... तीन चार पोरांचं लेंढार असलेला एखादा दारूडा... तोच तुझ्या पैशावर डोळा ठेवून ईमलीशी म्होतूर लावील आणि सोन्याची कोंबडी देणारी म्हणुन ईमलीला हाताशी धरून तुला धुवील. त्यापेक्षा सरळ तिचे सुऱ्याशी लग्न लावुन दे...

कल्लाप्पा अजिजीच्या सुरात म्हणाला, “मटांगेशेट, तुम्ही म्हंतासा त्ये पटतय गा मला बी सुऱ्या वडराचं पोरगं आस्त तर ईमलीला देवून आनी दोन डंपर बी दिलं आस्तं की जावायाला. माज्या धंधात बी भागीनं घेतलं आस्तं. पर आमची वडराची जात पंचायत अक्षी बेकार बगा.” त्यावर मटांगे म्हणाले, “त्याचीबी धास्ती सोड रे. मल्लूला व्हिस्कीचा खम्बा देऊन

पटवतोकी त्यालाबी. तू कायतरी खूळ डोक्यात घेऊन आडवं लावाय बघतोएस ईमलीला अन सुऱ्याला ! पण प्रकरण जड जाईल कलाप्पा गाठ भंडाऱ्याशी आहे !” मग कल्लाप्पा बोलला, “मटांगे शेट, पोरगी जाती भाईर ग्येली म्हंजे नाकच कापलं म्हंतील गा समदं... माझं हागणं मुतणं बंद झालं म्हंतील गा त्ये.... शेट तुमच्या पाया पडतो पर ह्या भानगडीत तुम्ही पडू नगासा... माजं म्या निस्तारतो कसतरी" ईमली आणि बायको दोघींना घेऊन कल्लाप्पा बाहेर पडला.आपल्या बेताचा ईमलीलाच नव्हे आपल्या बायकोला सुंद्रीला सुध्दा पत्ता लागू नये अशा खबरदारीने कल्लाप्पाने पुढच्या हालचाली केल्या. ईमलीला टॅक्सीत घालून कलाप्पाने तिला कोतवड्यात नेली. तिला नामुच्या हवाली करून झाली गोष्ट त्याने कानावर घातली. चार दिवसांनी ईमलीला सांगली कोल्हापूरकडे नेऊन मोकळी करीपर्यंत तिला पालाबाहेर पडु द्यायचे नाही असा बेत ठरला.

सुऱ्या संध्याकाळपर्यंत ईमलीची वाट बघीत राहीला . ती भेटल्यावर पुढे कसे काय करायचे हा बेत ठरवायचा होता. प्रेस बंद करून सुऱ्या बाहेर पडला. नाक्यावरच्या पानपट्टी समोर ईमलीचा भाऊ ईराप्पा दिसला. सुऱ्याने काही विचारण्या पूर्वीच ईराप्पा म्हणाला, “सुऱ्यादा आज सकाळच्याला ईमली आलती मंग आय नी बाबा ट्याकशीतून डागदरकडे गेलती ईमलीला कायतर झालंया. दुप्पारी भाकरी खावुन बा ईमलीला

कोतवड्यात घालवाय ग्येला. त्यो आजून आल्याला न्हाय घरला..." एवढी बातमी पुरेशी होती. दुसऱ्या दिवशी सकाळीच सुऱ्याने कोतवडे गाठले.

मंगेशाच्या बागेत संकेत स्थळी जाऊन सुऱ्या वाट बघीत थांबला. अर्धा तास गेला आणि सुऱ्याच्या पायाशी बसलेला बादशा कान ताठ करीत भुंकायला लागला. गडग्या बाहेरून दोन वडारांचे पोरगे सुऱ्याला खुणावीत होते. सुऱ्या गडग्यापर्यंत गेला. 'तुमी सुऱ्यादा न्हवं?' सुऱ्या मानेनेच हो म्हणाला. आमाला नामुदानं धाडलया. ईमली त्येच्या पालवर हाई. तुमाला संगट घ्येऊन यायला सांगितलया... मनोमन हरखलेल्या सुऱ्याने छलांग मारून गडग्यापलिकडे उडी ठोकली. वडारांच्या पोरांसोबत तो नामुच्या पालाकडे जाऊ लागला.

नामु पालाबाहेर वाट बघीत उभा राहीलेला. सुऱ्या समोर येताच हात जोडीत, यावा सुऱ्यादा . असं म्हणून त्याने सुऱ्याला पालात नेलं. सुऱ्याने पालात प्रवेश केला मात्र काय होतेय हे समजण्यापूर्वीच तीन दांडगे वडार त्याच्यावर तुटून पडले. दोन कापडाच्या पटकुराने त्याचे तोंड. करकचुन बांधल्यामुळे सुऱ्याला ‘ऊं’ करायचीही सवड मिळाली नाही. लाथा बुक्क्यानी यथेच्छ तुडवून काढल्यावर हात पाय दोरीने करचुन बांधून त्यानी सुऱ्याला पालातच खांबाला डांबून टाकले त्याला... सुऱ्याच्या मागोमाग आलेला बादशा सुऱ्याला आत मारहाण सुरू

झाली हे ओळखुन तो दात विचकुन गुरगुरत पालाच्या कवाडीकडे सरकु लागला. बाहेर आडोसा धरून राहिलेल्या वडारानी दगडधोंडयाचा असा मारा केला की घाबरलेला बादशा माघारी वळला. एक दोन धोंडे अगदी वर्मी लागल्यामुळे धुम पळत मान्या बाहेर सावध अंतरावर जाऊन पालाकडे तोंड करीत तो भुंकत राहील. दोन चार गडी पुन्हा दगड घेऊन त्याच्या दिशेने आलेले दिसताच बादशहाने पळ काढीत तडक घर गाठले. अंगणाच्या पेळेवर बसून आकाशाकडे तोंड करून तो अवलक्षणी ओरडु लागला.

बादशाचे भेसूर रडणे ऐकुन मंगेशची आई-बहिण दोघी बाहेर आल्या. मंगेशच्या बहिणीने आजुबाजुला नजर टाकली. तिला काहीच अर्थबोध होईना. मग तिने बादशहाला साखळीने बांधले अन् ती पुन्हा कामाला घरात गेली. दहा पंधरा मिनिटे बादशा भीषण रडत राहीला तेव्हा मात्र काहीतरी अघटीत घडल्याची चाहुल मंगेशच्या बहिणीला लागली. घरात पुरूष मनुष्य कोणीच नव्हते. तिने मागीलदारी जाऊन शेजारच्या भाईला हाक मारली. भाई आला. भाई समोर दिसताच बादशा दोन पायांवर उभा रहात भुंकायला लागला. भाईने बादशाची साखळी हातात पकडून त्याला मोकळं केल मात्र... साखळीला ओढ देत बादशा बागेकडे निघाला.

बागेच्या गेट बाहेर सुऱ्याची बजाज सुपर भाईने ओळखली.

सुऱ्या ईमलीला भेटायला आला असेल असा तर्क त्याने केला. बादशा भाईला त्या जागेपर्यंत घेऊन गेला. तिथे गेल्यावर वडारांच्या पालाच्या दिशेने मोहरा वळवीत भुंकायला लागला. भाईने बारकाईने निरिक्षण केले. पाला बाहेर नेहमीप्रमाणे वडारांची पाले खेळताना दिसली... एक दोन बाया चुली फुंकीत असलेल्या दिसल्या. बाकी सगळीकडे सामसुम. बहुदा सुऱ्या ईमलीला भेटायला वडारांच्या पालात गेलेला असेल – तो तासाभरात येईल. असा अंदाज करीत भाई बादशाला ओढीत घराकडे निघाला. बादशहा पाय नेटाने रोवीत परत फिरायला विरोध करीत राहीला.

दीड दोन घंटे उलटले तरी सुऱ्या आला नाही की बादशाचे भुंकणे, रडणे सुध्दा थांबले नाही. मग मंगेशाच्या बहिणीने पुन्हा आईला हाक मारली. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून भाईने वठारातले आठ-दहा पोरगे जमा केले. बादशाची साखळी धरून भाई अन् त्याच्या पाठी वठारातले पोरगे असे लटांबर वडारांच्या पालाकडे निघाले. सुऱ्या गेला त्या वाटेने माग काढीत जोरदार भुंकत बादशा निघाला. आता वडारांची पालं दिसायला लागली. दहा बारा माणसांचा जमाव पालांच्या दिशेने येताना बघितल्यावर पाच सहा वडार पाला बाहेर पडले आणि सगळ्या मंडळींना त्यांनी अध्र्यावर गाठले.

भाईने सुऱ्याची चौकशी केली त्यावर समोरच्या वडारानी गळ्याची चामडी चिमटीत पकडून शपथ खात म्हटले "नाय् बा तुमचा कर्ता मानुस हिकडं यायला न्हाई... ईमलीचा बा तकड रत्नागिरीला ऱ्हातोय की... हिकडल्या मान्सांशी त्येचा काय संबंध न्हाई" बादशा तर गुरगुराट करीत साखळीला ओढ द्यायला लागलेला. वडार लपवा छपवी करतायत् याचा भाईला अंदाज आला. जरबेच्या सुरात तो म्हणाला, "तुम्ही आम्हांला फसवशीला पन बादशा काय फसायचा नाय. बादशा माग काढील त्या पालाची आमी झडती घेणार काय व्हायचं असेल ते होऊन जाऊदे" भाईने अशी दटावती केल्यावर मात्र वडार संतापले. पाच दहा मिनिट हमरातुमरी झाली. त्यांचा गलका वाढल्यावर पाला कडून आणखी १०/१२ वडार पुढे आले.

वडारांचा जोर वाढला. "आमी काय कोणाची चोरी केल्याली न्हाई- तुमच पोरगं आमच्या पोरीचं प्वॉट वाढवाय लागलं आनी आमी काय गप बसाव काय ? आता गुमान परत जावा न्हायतर येकेकाला पालातच जित्त गाडतु की आमी... आमी काय मेल्याल्या आयच दुद न्हाई पेलो ! आमी सांगतु तेच्यावर ईस्वास ठेवा. काय झालं तरी पालाची झडती घियाला देणार न्हाई!" वडारांची गुर्मीची भाषा ऐकल्यावर मात्र साळवी मंडळी चवताळली. भाईच्या बरोबर आलेल्यापैकी एक पोरगा छाती पुढे काढीत म्हणाला, "बऱ्या बोलानी आमचा पोरगा

आमच्या ताब्यात द्या. नायतर तुमची पालं उभी पेटवून देऊ..." झालं काडी पडली... अन् वडारांनी हाणामारीला सुरवात केली भाईच्या हाताला हिसडा देऊन बादशा मोकळा झाला अन् हाणामारीला करणा-या एका वडाराच्या पोटरीचा लचका त्याने तोडला.

मंडळीची हाणामारी जुंपलेली बघताच वडारांच्या पालांमधून घण पहारी घेऊन बापये पोरगे धावतच पुढे यायला निघाले. प्रसंगाच गांभीर्य ओळखून भाईने सोबतच्या पोराना माघारी फिरायला सांगितलं. साळवी मंडळी आरडा ओरडा करीत, कुकारे घालीत वाडीच्या दिशेने माघारी धावायला लागली. त्यांच्या मागे दगड धोंड्याचा मारा करीत वडारांचे बापये बाया यानी साळवी मंडळीना पिटाळून लावले. बादशाने मात्र त्या धुमश्चक्रीत आणखी दोन तीन वडारांच्या पायाचे लचके तोडले अन् त्यांचा जोर वाढलेला बघून पळणाऱ्या मंडळी सोबत त्यानेही माघार घेतली.

माणसांची आरडा ओरड ऐकून साळवी वठारातली बायका माणसे/पुरूष हातातले काम टाकुन धावतच निघाली. मंगेशाच्या बागेपर्यंत पळणाऱ्या मंडळींचा ताणपट्टा काढून वडार माघारी फिरले. पळणारी मंडळी मंगेशाच्या घरासमोर अंगणात पोहोचली. जाणत्यानी विचार विनिमय करून झाली गोष्ट सुऱ्याच्या वडिलांना बाबा भुत्यांना सांगायची असा बेत

ठरत असतानाच मंगेश साळवी आला. मंगेशला झालेल्या प्रकाराची कल्पना आल्यावर तो आणि भाई साळवी दोघेही सायकल घेऊन रत्नागिरीकडे रवाना झाले. दोघेही परटवण्यापर्यंत पोहोचले अन् जकात नाक्या समोरच बाबा भुते उभे असलेले दिसले.

बाबा भुत्यांबरोबर मंगेश अन् भाई शिवरे वठरात पोहोचले. शिवरे वठारातले भाऊ शिवरे रिटायर्ड पी. एस. आय. हे जाणते माणुस, शिवरे वठरात त्यांच्या घराला मोठा मान. झाली गोष्ट ऐकल्यावर भाऊ शिवऱ्यामधला पोलिस जागा झाला. “वडारानी सुऱ्याला पालात डांबुन ठेवलेले असणार हे नक्की... ही जात भलती इब्लिस चेहऱ्यावरची सुरकती सुध्दा न हलवता थंड काळजाने समोरच्या माणसाचा गळा चिरणारी क्रूर औलाद ती. पोर जीवंत हाताला लागला तरी पुरे... गोष्ट बरीच पुढे गेली, पार हाताबाहेर गेली!”असे म्हणत त्यांनी भिंतीवरच्या शोकेसमधली डबल बॅरल बाहेर काढली. काडतुसाचा पट्टा कमरेला बांधीत शिवरे वठारातल्या तरण्याताठ्या पोरांना चौकात जमायचा हुकुम दिला. खन्ना कॉन्ट्रॅक्टर कडून दोन डंपर आले. उत्साही पोरे धडा धडा उड्या मारून हौदात चढली. आधी समजुतीने सांगुन बघा. दम देऊन बघा... मी येईपर्यंत हातघाई करू नका. अजुन दोन ट्रक मधुन मी येतो... मंगेशाच्या घराजवळ दम धरून रहा... उत्साहाच्या भरात कोणी

आगाऊपणा करायचा नाही असा खास पोलिसी आवाजात भाऊ शिवऱ्यानी दम भरला नी डंपर सुटले.

डंपर मंगेशाच्या घरासमोर उभे राहिले. पोरे धडाधड खाली उतरली. साळवी वठारातली मंडळी रागाने बेभान झालेली. कुणीतरी तावातावाने सांगायला लागला. आम्ही समजुतीने सांगण्याचा प्रयत्न केला पण वडारानां भलतीच चरबी आहे. आमची जमात अपुरी आहे असे बघून त्यानी हाणामारीला सुरवात केली. आम्हाला शेपुट घालून माघार घ्यावी लागली. आता किती दम आहे वडारांचा तेच बघूया ! शिवरे मंडळीनी भाऊंची सुचना असतानाही ट्रक मधुन येणाऱ्या मंडळीची वाट नबघताच वडारांच्या पालावर जायचा निर्णय घेतला. हाणामारीची खुमखुमी असणारी तरणी पोरे धावतच पालांच्या दिशेने निघाली.

साळवी मंडळी माघारी पळाली ती जमात करून चाल करणार हे वडारानी ओळखलेले होते. मंगेशाच्या घरासमोर दोन डंपर थांबले त्यातून ५०/६० मंडळी उतरली साळवी वाडीतले वीस पंचवीस लोक सगळे पालाकडे निघाले याची वर्दी वडाराना मिळालेली, ते दबा धरून राहिलेले. मंगेशाच्या बागेतुन माणसे गडग्या बाहेर पडून वडारांच्या पालांकडे जायला लागली अन् अकस्मात दगड धोंडयाचा बेदम मारा सुरू झाला. जमात बघून वडार हातघाई करायचे नाहीत असे सगळ्यांनी

मनोमन गृहित धरलेले पण उलटेच घडले. बऱ्याच माणसांना दगड धोंड्यांचा चांगलाच खुराक मिळाला. खुमखुमी असणारे पोरगे चेन फिरवीत चॉपर सांभाळीत दगड धोंडे चुकवीत बेताबेताने पालांच्या दिशेने पुढे सरकु लागले. पालं अगदी नजिकच आली. आता मात्र घण पहारी सावरीत वडार सरळ पुढे आले.. चेन चॉपर यांचा काहीच उपयोग झाला नाही. वडारांचा हल्ला एवढा तिखट होता की, हाणामारीची सवय असलेली शिवरे मंडळीही अवाक् झाली. पुरूषांच्या बरोबरीने वडारणीसुध्दा पिकाव खोरी असली नामांकित हत्यारे घेऊन चाल करून आली. वडारांच्या केसालाही धक्का लागला नाही. शिवरे, साळव्यांच्या पोराना बेदम मार खावा लागला. पंचवीस तीस तरणेताठे पोरगे जायबंदी झाले. एकच हलकल्लोळ माजला. जिगरबाज शिवरे मंडळीना माघार घेणे नामुष्कीचे वाटले पण परिस्थिती हाताबाहेर जात चालली तेव्हा मात्र काही विचारी माणसानी मागे फिरा मागे फिरा अशी हाकाटी सुरू केली.

वर्मी मार खाल्लेली पोरे ओरडून, किंचाळून राहीली शाबुत होते ते जीव वाचवण्यासाठी माघार घेऊ लागले. नेमक्या त्याच वेळी ट्रकांचा घरघराट ऐकायला आला. पळणाऱ्यानी जीवाच्या आकांताने हाकारायला सुरवात केली. शिवऱ्यांची नवीन कुमक आल्याचा सुगावा लागल्यावर मात्र वडार हादरले आता चिडलेली मंडळी नक्की एकुण एक पाल पेटवून देणार हे

ओळखुन म्हातारे वडार, बायका तरण्या वडारांना आवरायला धावले. भाऊ शिवरे आणि इतर मंडळी बंदुका सरसावीत येताना बघितल्यावर मात्र गळाठलेल्या वडारांनी हात जोडीत भुईवर बसकण मारली.

दोन म्हातारे वडार पागोटी काखेत दाबुन भाऊंना सामोरे गेले. भाऊंच्या पायावर डोके ठेवून, “मालक चुक झाली, आमाला जिवानिशी मारू नगासा तुमच्या मुलकात भीक मागुन, खडी फोडून, रगात गाळून पोट भरतूया आमी झालं तर चेपलीनी हाना आमाला पर जिवं मारू नगासा अशा विनवण्या सुरू झाल्या. आया बाया पुढे धावल्या. समोर दिसेल त्याचे पाय धरून दणदणा छातीवर मुटके मारीत रडत ओरडत त्यानी विनवण्या सुरू केल्या. आता बाजु पलटलेली बघून मार खाऊन माघार घेण्याची नामुष्की करणारी मंडळी चिडून पुढे सरसावली.आधी हल्ला करून जमात बघितल्यावर मानभावी पणा करणाऱ्या वडारांची त्यांना चीड आली. मगाचच्या मारामारीचा वचपा काढण्यासाठी त्यानी हात धुवून घ्यायला सुरवात केली.

वडार पक्के बिलंदर यावेळी आगळीक झाली तर पळून मुलूख गाठायचीही सवड होणार नाही हे ओळखुन काही प्रतिकार न करता मार खाणं त्यांनी पत्करल. मगाशी हल्ला करणाऱ्यांपैकी पालात दडून राहीलेल्या वडारांना माणसानी

पालात शिरून बाहेर खेचीत लाथा बुक्क्यानी तुडवायला सुरवात केली. मगाचच्या हाणामारीत जायबंदी झालेल्या पोरांना उचलून घेऊन काही मंडळी मंगेशच्या घराकडे निघाली. भाऊ शिवरे हाडाचे पोलिस ! सोबतच्या मंडळीना थोडे हात धुवायची संधी दिल्या नंतरच त्यानी आवरते घेऊन परिस्थती ताव्यावर आणली.

बेफाट मार खाऊन अर्धवट शुध्दीत असलेला सुऱ्या आणि ईमली भिमुच्या पालात सापडली. जाणत्यानी त्याचे हातपाय सोडून बसते करून पाणी पाजल्यावर सुऱ्या सावध झाला. दरम्याने दडुन राहीलेला कल्लाप्पा सुध्दा पुढे आला. त्याला जरबेत घेत भाऊ शिवरे म्हणाले, “कल्लाप्पा, क्रशरचा पैसा खाऊन भारी माज आला काय रे ? तुझ्या विधवा पोरीला असा कोण मोठा तालेवार जावाय मिळवणार होतास रे? सुऱ्या काय तुझ्या पेक्षा खालच्या जातीचा समजलास काय रे बेलदारा?” तशी फडा फडा थोबाडीत मारून घेत कल्लप्पा अजीजीच्या सुरात म्हणाला, “चुकल आमचं .... येक वार माफी करा गरीबाला. झाला पर्कार हितंच मिटुं द्या सायेब.... तुमच्या समाजाशी दुस्मनी निभवनार न्हाई आम्हांसी......”

त्याने डोईचा पटका सोडून तो शिवरेभाऊंच्या पायावर ठेवला. “माजी चुकी भक्षीस करा जी...आता लई तानू नका जी....” कल्लप्पा पुरता जेरीला आला हे ओळखून शिवरे भाऊनी

तडजोडीची भाषा सुरु केली,“ठीक आहे, आधी सुऱ्या नी ईमलीला चव्हाण डॉक्टरांकडे ॲडमिट करा. आठ पंधरा दिवस आराम करून पोरं हिंडती फिरती होऊद्यात मग साळव्याच्या कार्यालयात धूमधडाक्यात लग्नाचाबार देऊया उडवून. कल्लाप्पा कॉन्ट्रक्टरच्या इतमामाला शोभेल असा लग्नाचा धडाका झाला पायजेल... काय मंजूर आहे ना?" “जी सायेब, बगाच तुमी..... धा बकरं तोडून जेवणावळी घालतु की आख्ख्या भण्डार वाड्याला.पन आमच्या जात पंचायतीला जरा समजावा तुमी.” एक म्हातारा वडार पुढे येत म्हणाला,“शिवरेभाऊ,त्येची काळजी अजाबात करू नगासा म्या पंचायतीत हायी की. बाकीचं काय मज्या शब्दाभाईर न्हायीत गा... काय धा पंधरा हजाराचा जुर्माना व्हयील तो भर नी हो की मोकळा तू कल्लपा आन्ना. आता व्हा बिनघोर.आरं बाबा म्हन हाय न्हवं. मियाँ बिबि राजी तर काय करतूया काजी" नी सगळी मंडळी गडगडा हासली.

*********

# २. इंग्रजीची गजाल

सोशालॉजीच्या चव्हाण सरांच लेक्चर सुरु झाल्यावर पंधरा मिनीटानी प्यून शिंदे लेक्चर हॉल बाहेर आला. "यसकुज मी, सर " म्हणून आत आल्यावर "मिश्टर बापट श्टुडंट, युवर रजिष्टर कमिंग. पोश्ट्म्यान वेटिंग, डुइंग शिग्नेचर टेक लेटर अर्जंट." आमच्या कॉलेजचे प्राचार्य ख्रिश्चन असल्यामुळे सगळा व्यवहार इंग्रजीतून चालायचा. शिंदे प्युन जेमतेम सही करण्यापुरतं शिकलेला, पण सरावाने तोही उभं आडवं कसही इंग्रजी फाडायचा. प्रत्येक क्रियापदाला आयएन्जी लावून बोलायचं ही त्याची खास लकब होती. पोस्टमन दुपारी बाराच्या दरम्याने कॉलेजचं टपाल आणायचा. प्रशिक्षणार्थींची साधी पत्रं प्यून लोक ऑफिसच्या नोटिस बोर्डवर लावीत. क्वचित कोणाची मनिऑर्डर किंवा रजिस्टर आलं तर कॉलेजचा प्यून संबंधिताला बोलवायला येत असे. आमच्या गावापासून 10/12 मैल दूर खाडी पलिकडे राजापुर तालुक्यातल्या जुवाटी गावच्या माध्यमिक शाळेचा शिक्का असलेलं ते पत्र बघून मला आश्चर्यच वाटलं. मी उत्सुकतेने लिफाफा फोडला.

हायस्कूलच्या मुख्याध्यापकानी नवीन वर्षी त्यांच्या

शाळेत इंग्रजी शिक्षक म्हणून मला ऑफर दिली होती. बावीस शिक्षक असलेल्या त्यांच्या स्टाफवर इंग्रजी चा पदवीधर नव्हता. त्यावेळी इंग्लिश आणि मॅथ्स विषयाची माणसं दुर्मिळ असायची. मी इंग्लिश प्रिंसिपल घेवून बी.ए. झालोय ही माहिती त्याना कुठून कशी समजली देव जाणे. पत्रात आणखीही एक ऑफर त्यानी दिलेली. संस्था मला परतफेडीच्या बोलीने लागेल तितकी आर्थिक मदत करायला तयार होती. पत्र आलं ती तारीख होती सतरा डिसेंबर. मी बी.एड.ला येण्यापूर्वी दहा महिने देवगड तालुक्यात मुणगे हायस्कूलला होतो. त्या वेळी अत्यंत काटकसरीत माझा दरमहाचा खर्च भागवून सोळाशे रुपये शिलकीला होते. मला मुंबईत सरकारी कॉलेजला ऍडमिशन मिळाल्यामुळे फी माफ होती. मात्र होस्टेल, मेस आणि इतर खर्च वर्षभर भागवण्या इतकीही पुरेशी पुंजी माझ्याकडे नव्हती.वडिल सेवा निवृत्त शिक्षक, त्याना एकशे नव्वद रुपये तुटपुंजी पेन्शन मिळायची. पण माझे काका आणि लग्न झालेली मोठी बहीण पुष्पा ताई यानी पाठबळ दिल्यामुळे मी निर्धास्त होतो. आज मितीला पुढच्या महिन्याची मेस जेमेतेम भागेल इतकी एकशे अठरा रुपये रक्कम शिलकी असताना देवासारखे जुवाटीचे हेडमास्तर माझ्या सहाय्याला आले. मी नाताळ सुटीत भेट घेतो, आर्थिक मदतीची गरज आहे, समक्ष भेटीत बोलेन, असं मी उलट टपाली कळवलं.

तेवीस डिसेंबरला शनिवारी अर्धवेळ कॉलेज करून संध्याकाळच्या गाडीने मी घरी गेलो. जुवाटीच्या हेडमास्तरांचे पोस्ट कार्ड घरच्या पत्त्यावर आलेले होते. त्यानी अठ्ठावीस तारखेला मला भेटायला बोलावले होते . आई अण्णाना खूपच आनंद झालेला. कोणापुढे हात न पसरता माझ्या पतीवर नोकरीची हमी आणि अर्थ सहाय्य..... साक्षात देवाचीच कृपा! ठरल्या दिवशी सकाळच्या गाडीने मी आणि अण्णा निघालो. विजयदुर्ग हून तरळा, कणकवली , कोल्हापुर आणि रत्नागिरी जाणाऱ्या कोणत्याही गाडीने वाघोटणला उतरून होडीने खाडी पलिकडे गेल्यावर जेमेतेम दहा मिनिटांत हायस्कूल गाठता येई. आम्ही साडेआठला हेडमास्तर पुजारी सरांच्या बिऱ्हाडी पोहोचलो. सरांच्या मिसेस पुष्पाताईच्या बी. एड. क्लासमेट. त्याही हायस्कूलला नोकरी करायच्या. त्यानी माहेरच्या माणसांसारखे आमचे स्वागत केले. चहा नाष्टा करून दहा वाजता मी सरांबरोबर हायस्कूलला गेलो.संस्थेचे चेअरमन भाऊ देसाई आल्यावर सरानी त्यांच्याशी परिचय करून दिल्यावर मला किती रक्कम पाहिजे ? अशी सरानी विचारणा केली. पुढच्या तीन महिन्यांसाठी मला पाचशे रुपये हवे होते. सरानी विनाव्याज उसनवार अशा आशयाची सहाशे रुपयाची पावती घेवून सहाशे रुपये मला दिले.

माझी इच्छा असेल तर दहावी एस. एस. सी. च्या वर्गांवर पत्र लेखना संदर्भात तास दोन तास मार्गदर्शन करण्याची विनंती सरानी केली. मी  आनंदाने होकार दिला. प्रार्थनेच्या वेळी येत्या जून पासून हायस्कूलला मिळालेले स्पेशल इंग्रजीचे शिक्षक  असा माझा  परिचय करून दिला. दहावीच्या दोन्ही तुकड्यांची मुले कॉमन हॉल मध्ये बसवून मी लेटर रायटिंग वर लेसन सुरु केला. स्वत: हेडमास्तर , चेअरमन आणि  स्टाफ वरचे दोन तीन शिक्षक तास बघायला निघालेले बघून पुजारी मॅडम म्हणाल्या, “ इतकी सगळी फौज बघून सराना अवघडायला होईल. तेंव्हा सगळ्यानी वर्ग़ात न बसता बाहेरून ऐका.” त्यावर मी म्हणालो कि, “मला सवय आहे, लेसनच्या वेळी निरिक्षक प्राध्यापक, सराव शाळेतले स्टाफ मेंबर आणि आमचे सहाध्यायी अशी दहा बारा निरिक्षकांची फौज असते. माझ्यावर दडपण येणार नाही . सर्वाना खुशालपणी बसू देत.”

इंग्रजी आणि मराठी संमिश्र वापर करीत मी इन्फॉर्मल लेटर लिहिण्याचे तंत्र हळू हळू उलगडित गेलो. सलग दोन पिरियड झाल्यावर मधली सुट्टी झाली. निरिक्षण करायला बसलेली बुजुर्ग मंडळी जाम खुश झालेली. सर्वानी मुक्तकंठाने स्तुती सुमनांचा वर्षाव केला. इतक्या सर्व लोकांसमोर कसलेही दडपण न घेता मी मोकळेपणी शिकवले याचे भलतेच अप्रूप

वाटले सर्वांना. मी अत्यंत कौशल्याने पत्र लेखनाचे अवघड तंत्र मुलाना समजावून दिले ही गोष्ट सगळ्यानी एकमुखाने मान्य केली. या कौतुकाच्या माऱ्याने मी अगदी अवघडून गेलो. चहा झाल्यावर मी पुन्हा वर्गावर जावून मुलांकडून दोन तीन विषयांवर पत्र लेखनाचा सराव करून घेतला. मी तास पूर्ण करून स्टाफरूम मध्ये परत आल्यावर माझी हरकत नसेल तर पुढचे दोन तीन दिवस थांबून प्रश्नपत्रिकेतल्या ट्रान्स्फॉर्मेशनच्या भागाची थोडी तयारी करून घ्यायची हेड मास्तर आणि संबंधित विषयाचे शिक्षक यानीही गळ घातली. मी रहाण्याच्या तयारीने गेलेलो नव्हतो. दुसरे दिवशी परत यायचं कबूल करून संध्याकाळी मी आणि अण्णा घरी गेलो.

दुसरे दिवशी दोन तीन दिवस रहायच्या तयारीने मी पुन्हा जुवाटीला गेलो. त्या दिवशी सलग आठ पिरियड मी जुन्या प्रश्न पत्रिकांमधल्या ट्रान्स्फॉर्मेशनच्या वाक्यांचा सराव करून घेतला. नंतरचे दोन दिवस डायरेक्ट इंडायरेक्ट स्पीच हा प्रश्नपत्रिकेत सहा मार्कांसाठी असलेला भाग, त्यातले स्टेटमेंट आणि प्रश्नार्थक वाक्ये हे दोन प्रकार घटवून घेतले. सत्तर मुलांपैकी पंधरासोळा मुलाना बिनचूक जमायला लागले. तीन दिवस कसे गेले कळलंच नाही. हेडसर तर भलतेच खूष झाले. मी तीन दिवस घेतलेल्या कष्टांचा भरभक्कम मोबदला शंभर रुपये मी नको नको म्हणत असतानाही सरानी मला घ्यायला

लावला. एप्रिल मध्ये विद्यापीठाची परीक्षा देवून गावी आल्यावर नववीतुन दहावीत जाणाऱ्या मुलांसाठी मे महिन्यात जादा वर्ग घ्यायला यायची गळ सरानी घातली. "त्या साठी योग्य मोबदला संस्था देईल" असं ते बोलले. केवळ इंग्रजी विषयात अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्यांचा दहावीचा निकाल कमी लागायचा. किंबहूना इंग्रजी आणि गणित या विषयांचा जेवढा निकाल तेवढा शाळेचा निकाल असे समिकरण असल्याची खंत त्यानी व्यक्त केली. माझी आर्थिक चिंता मिटली आणि नोकरी पक्की झाली या आनंदावर तरंगतच मी नाताळ सुटी संपवून मुंबईत कॉलेजमध्ये रुजु झालो. साधारण पंधरा दिवसानी पुजारी सरांचे पत्र यायचे. दर पत्रात दहावीची मुले तुमची आठवण काढतात , आर्थिक मदत पाहिजे असेल तर नि:संकोच कळवा ही वाक्ये हुकमी असायची.

अप्रिलच्या पहिल्या आठवड्यात आमची वार्षिक परीक्षा झाली आणि बी. एड . पूर्ण करून चंबू गबाळं आवरून मी घर गाठले. दहा बारा दिवस आराम केल्यावर जुवाटीला जावून पुजारी सरांची भेट घेतली. माझ्यासाठी सरांच्या बिऱ्हाडापासून जवळच दाजी सोनारांच्या घराला लागून त्यांच्या गणपतीच्या शाळेत दोन ऐसपैस खोल्या ठरवलेल्या होत्या. मागच्या बाजूला पडवीत आंघोळीसाठी बंदिस्त बाथरूम बनवून घेतलेले होते. दाजी आणि त्यांचे दोन भाऊ

यांची चार शाळकरी मुलं मुली असल्यामुळे त्यानी मुद्दाम आपल्या घरात माझी व्यवस्था बिना मोबदला करून दिली. त्यांच्या शाळकरी मुलांकडे मी लक्ष द्यावे अशी अपेक्षा दाजीनी बोलून दाखवली. “ हे बघा बापट सर, आम्हांस भाड्याच्या पैशाची काय्येक गरज नाय. आम्ही तिन्ही भाऊ सोनार काम करून मिळवतो ते खायस सुद्धा फावत नाय इतके काम असते आमच्याकडे. जरा मुलांवर तुमचे लक्ष राहिले नी पोरें दहावी उद्धरली तर तुमचे मोठे उपकार होतील.... आम्ही शिकलो नाय पण तुमच्या सावलीत मुले शिकून मोठी व्हावी एवढीच आमची अपेक्षा. तुम्ही ब्राह्मण..... आमच्याकडचे जेवण खाण तुम्हास पटेल न पटेल ... पण कधि काहीही लागलें सवरलें तर हक्काने सांगा!”सोनारांच्या आतिथ्याने मी अक्षरश: भारावून गेलो. एक मे रोजी वार्षिक परीक्षेचे रिझल्ट लागल्यावर दोन दिवसानी दहावी चे जादा तास सुरु करायचे ठरले. मी तीन तारखेला बिऱ्हाडाचे सामान घेवून जुवाटीला यायचा वायदा केला.

तीन मे च्या दिवशी जेवणाची भांडी, स्टोव्ह आणि अंथरूण पांघरूण असे चार बोजे घेवून अण्णा , आई , मी आणि आमच्या घसणीतला गडी भानु पुजारी सकाळच्या रत्नागिरी टपाल गाडीने वाघोटणला उतरलो. होडीवाल्याला बहुतेक पूर्वसुचना दिलेली असावी. भानूने सामानाचे बोजे ठेवल्यावर होडीवाल्याने पलिकडच्या दिशेने तोंड करून ,

“होय्यतSSS होय्यत .... सर इले हत ...” असे कुकारे घातले. होडी पलिकडच्या काठावर पोहोचली तेंव्हा दाजी सोनार नी त्यांचे दोन्ही भाऊ दोन गडी घेवून हजर होते. शिवाय शाळेचे दोन शिपाई सुद्धा हजर होते. आमच्या हात पिशव्यासुद्धा माणसानी आम्हाला घेवू दिल्या नाहीत. आम्ही दाजींच्या घरी गेलो. खोलीची जमिन लक्ख सारवून चुन्याची सुंदर रांगोळी काढलेली होती. मला झोपण्यासाठी दाजीनी आपल्या कडची लोखंडी कॉट आणि गादी, उशी, नवीन बेडशीट आणि सोलापुरी चादर ठेवलेली. लाकडी टेबल, दोन खुर्च्या आणि एक चटई दादा देसाईनी कालच आणून ठेवल्या आहेत असं दाजी बोलले. सगळ्यांसाठी चहा आणि बिस्किट पुडे आले. आमचा चहा होईतो दादा देसाई आणि देसाईN काकू दोघही आले. दुपारी जेवायला देसाईंकडेच जायचे होते. दरम्याने आम्ही पुजारी सरांकडे गेलो.

दुपारी जेवून बिऱ्हाडी आल्यावर आईने आणलेले बोजे सोडून सामान लावले. मदतीला तीन्ही सोनारीण काकू - मोठ्या माई. मधल्या सरिता काकी आणि धाकट्या राधा काकी होत्या. आम्ही रात्री जेवायला पुजारी सरांकडे गेलो. आम्ही सकाळी उठल्यावर तोंड धुवून होईस्तोवर माई चहा घेवून आल्या. चहा घेत असता माई म्हणाल्या, “तुम्हाला आमचे सोनारांकडचे खाणे चालत असेल तर फोडणीचे फोवे

नाष्ट्याला आणते ” त्यावर आई बोलली, “आम्ही जातीभेद मानीत नाही. तुम्ही तर दैवज्ञ ब्राह्मण, आमची काहीही हरकत नाही.” आमच्या आंघोळी उरकल्यावर नाष्टा करून आई अण्णा घरी जायला बाहेर पडले. माईनी आईला आपल्या घरात नेवून तिची ओटी भरली. दाजींसह घरातल्या सर्वांनी आई अण्णाना नमस्कार केला. दाजी समक्ष त्याना तरी पलिकडे जावून विजयदुर्ग गाडीत बसवून आले.

मला दोन्ही वेळचा डबा दादा देसाईंच्या घरून आणि सकाळचा चहा. नाष्टा, शाळेतून आल्यावर चहा खाणं दाजींच्या घरातून देत. माई किंवा त्यांच्या दोन्ही जावांपैकी कुणीतरी समक्ष येवून मला चहा खाणं आणून देत. सकाळी दहा ते संध्याकाळी चार दहावीच्या बॅचचे जादा वर्ग सुरु झाले. दुपारी एक ते दोन जेवणाची सुटी असे. मुलं डबे घेवून येत. देसाईंचं घर जवळच असल्यामुळे मी त्यांच्या घरीच जेवायला जाई. क्लास सुरू झाले आणि दोन दिवसानी सर आणि मॅडम गावी गेले. क्लास सुटल्यावर घरी गेलो की मी बिऱ्हाडी न जाता दाजी नी त्यांचे दोन्ही भाऊ ओटीवर सोनार काम करीत तिथेच बसत असे. चहा खाणं झाल्यावर रात्री जेवण वेळे पर्यंत मी ओटीवर रेडिओ लावून ऐकत बसे. कधी तरी बंदरावर किंवा गावात , देवळात चक्कर मारीत असे त्या वेळी सुरुवातीला दाजी, बापू किंवा भाई पैकी कुणीतरी सोबत येत. थोड्या

दिवसानंतर मी त्यांचे मुलगे राजू - प्रसाद याना घेवून जायला लागलो. रविवारी क्लास बंद ठेवून मी घरी जावून येत असे.

सात जूनला शाळा सुरु व्हायची होती, तीन जूनला क्लास बंद करून सरानी मला घरी जावून यायला सांगितले. मी महिनाभर केलेल्या कामाचे मानधन म्हणून 400 रुपये पुजारीसरनी मला दिले. मी संस्थेकडून उचल घेतली होती त्याची परतफेड म्हणून सगळी रक्कम मी परत केली. पण सर म्हणाले की, तुमचे ॲप्रूव्हल होवून रितसर पगार सुरू झाला की नंतर सावकाशपणे मासिक हप्तेबंदिने परतफेड करा. पहिली कमाई खिशात टाकून मी आनंदात बाहेर पडलो. दादांच्या घरी जावून मी सहा तारीखपर्यंत घरी जात असल्याचे सांगून महिनाभरची खानावळ घेण्याची पृच्छा केली. त्यावर दादा म्हणाले, "तुम्ही आमच्या मुलांसाठी महिनाभर कष्ट घेतलात. आम्ही तुमच्यासाठी वेगळं काहीच केलेलं नाही. आम्ही पाच जणं जेवलो त्यात सहावे तुम्ही....आज आधी तुम्ही घरी जा. शाळा सुरु झाली की महिनाभरानंतर तुमची मान्यता आली, नियमित पगार सुरु झाले की नंतर हिशोब करुया."

सात जूनला शाळा सुरु झाली. माझ्याकडे दहावीच्या दोन आणि नववीच्या दोन तुकड्यांचे इंग्रजी आणि ९अ ची क्लास टिचरशिप आली. शाळा सुरु झाल्यावर आठवडा भरातच रत्नागिरीला दहावीच्या इंग्रजी शिक्षकांसाठी दहा

दिवसांच्या वर्कशॉपचं परिपत्रक आलं. मी कृतीसत्रासाठी रत्नागिरीला दाखल झालो. मंडणगड ते बांदा सगळ्या हायस्कूल मधले सुमारे सत्तर लोक आलेले होते. आरंभी परिचय सत्रात एक गोष्ट लक्षात आली की, एवढ्या लोकांमध्ये इंग्रजीचे पदवीधर फक्त आठच होते. अर्थात बहुसंख्य शिक्षक इंग्रजीचे पदवीधर नसले तरी त्यांच्याकडे वीस- बावीस वर्षं अध्यापनाचा अनुभव होता. संयोजकानी आमचे दहा गट पाडले. माझ्या गटात देवरुखचे भागवत, दापोलीचे नरवणे, पालीचे बोरकर आणि बांद्याचे नाडकर्णी ही वयोवृध्द मंडळी होती. बाकी आजीवलीचे मलुष्टे, वैभववाडीचे रावराणे हे पाच सहा वर्ष सेवा झालेले अन मी पूर्ण अननुभवी. मला जरा दडपण आलं पण सिनियर मंडळी मनमिळावू असल्यामुळे आमचा ग्रूप चांगला जमला. बुजुर्ग मंडळींकडून मला अध्यापनातली खूप तंत्र नी मख्ख्या आकळल्या. मुलांकडून नेमका सराव कसा करून घ्यायचा ही दृष्टी बुजुर्गानी मला दिली. गटातर्फे सादरीकरण असे तेंव्हा सगळे जण मलाच पुढे करीत असत त्यामुळे माझा आत्मविश्वास अधिकच वाढला.

वर्कशॉप उरकून मी शाळेत हजर झालो नी दुसऱ्याच दिवशी दहावीचा बोर्डाचा निकाल जाहीर झाला. इंग्रजीत 68 पैकी १३मुलं पास झाली, तेवढाच १९% शाळेचाही निकाल ठरला. ७ मुलं ज्याना इंग्रजीत २० ते २५ गुण मिळाले त्याना

आणखी ५ ते ७ गुण वाढीव मिळाले असते तर मॉडरेशन मध्ये त्याना २८ ते ३० गुणांचे ३५ गुण देवून पास करण्यात आले असते आणि शाळेचा निकालही ३०% लागला असता. २०% पेक्षा कमी निकाल असलेल्या शाळाना शिक्षण विभागाकडून सतत टोचणी सहन करावी लागे. अनुत्तीर्ण मुलांमध्ये दाजी सोनारांची मुलगी सुशिला होती. तिचे गुणपत्रक घरी नेवून द्यायची कटू कामगिरी नाईलाजाने मला पार पडावी लागली. घरी जावून दाजींकडे मार्कलिस्ट देण्यापूर्वीच सुशा 'नपास' झाल्याचे वृत्त कळल्यामुळे रडारड सुरु होती. तिला २५गुण मिळाले..... नशिबाने आणखी चार -पाच मार्क मिळते असते तर ३० चे ३५ करून ती पास होणार असती. तसेही तिला ५६% म्हणजे चांगले मार्क आहेत.अशी सारवा सारवी मी केली. दाजी उद्वेगाने म्हणाले, “सर, आपलांच नाणां बद्द.... भंडाऱ्याचा चंपू, गाबताचा रेखा पास झालाच ना?”

विषय थांबवण्यासाठी मी म्हणालो, “दाजी , हा सगळा नशिबाचा भाग आहे. तुम्ही नावं घेतलात त्या दोघीना फक्त ३५ गुण मिळालेत नी त्यांना टक्केवारीत बेचाळीस त्रेचाळीस टक्के मार्कच आहेत. ते जावूदे ...... उद्यापासून मी सुशाची शिकवणी सुरु करतो. ऑक्टोबर मध्ये ती ५०% गुण मिळवून ती सगळ्याना पेढे वाटील . हे माझे शब्द आज लिहून ठेवा. आता हा विषय इथेच बंद!” मग तो विषय तिथेच

थांबला. दहा मिनिटानी माई चहा घेवून आल्या. “उद्यापासून सकाळी आठ ते नऊ सुशाची ट्युशन सुरु..... ” मी बोलल्यावर माई म्हणाल्या, “तुमी माज्या मनातलाच बोल्लात....पुढचे सा म्हयने पोरगी तुमच्या स्वाधीन..... देव करो नी तुमच्या कृपेन पोरगी माझी येसेस्सी होवूने.....” सुशाची ट्युशन सुरु झाली आणि आठवडाभरात आणखी सहा रिपिटर्स यात चार मुलगे आणि दोन मुली होत्या यायला लागले. मी पुस्तकातले निम्मी धडे आणि निम्मे कविता एवढाच पोर्शन घेतला. धडे कविता यांची सोप्या शब्दात नी मर्यादित ओळींमध्ये समरी लिहून काढली.

रोज एका पाठाची उजळणी त्यावरच्या प्रश्नांची उत्तरे लिहिण्याचा सराव मी देई. प्रश्न वाचून त्याची विधान रुपात मांडणी करायची नी त्यात उत्तराचा नेमका शब्द म्हणजे आन्सरवर्ड घालून बिनचूक उत्तर लिहिण्याचा सराव घेतला. ट्रान्सफॉर्मेशन आणि सिंथेसीस मधले सोपे प्रकार, पत्र लेखन यांची उजळणी करून घेतली. कॉम्प्रिहेन्शन ला दिलेला उतारा न वाचताच त्यावरच्या प्रश्नांचे विधानात रुपांतर करून मग उतारा वाचायचा नी त्यातून आन्सरवर्ड शोधून उत्तरे कशी पूर्ण करायची ही युक्ति शिकवली. दोनेक महिने हा सराव झाल्यावर पुढे ऑक्टोबर मध्ये पेपरला जाई पर्यंत रोज जुन्या प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या. त्यावेळी इंग्रजीची पाच

पानांची प्रश्न पत्रिका हातात आल्यावरच मुलं गर्भगळित व्हायची. पण प्रश्नपत्रिका सोडवायचा सराव झाल्यावर मुलांच्या मनातली भिती दूर झाली. मी माझ्या मुलांसाठी जो मर्यादित पोर्शन करून घेतला होता त्यावर आधारित दहा प्रश्नपत्रिका मी सेट केल्या. याकामी त्यांच्या सायक्लोस्टाईल प्रती सरानी शाळेच्या मार्फत काढून दिल्या. मी प्रत्येकाला वेगेवेगळी प्रश्नपत्रिका देत असे त्यामुळे एकमेकांशी चर्चा वगैरे प्रकार आपसूकच बंद झाले.

माझी सात मुलं ऑक्टोबर मध्ये पेपर देवून हसतमुखाने मला भेटायला आली. या परीक्षासत्रात रिपिटर्स असल्यामुळे पर्यवेक्षण लुज असे. कुणीही गैरप्रकार करायचा नाही, तुम्ही आपल्या प्रयत्नाने पास होणार अहात. पर्यवेक्षकानी सांगितले तरी आपल्याला त्यांचे न ऐकता आपल्याला बरोबर वाटते तेच उत्तर लिहायचे.असे मी बजावून ठेवले होते. माझ्या सांगण्याचे प्रत्यंतर मुलाना आले. प्रश्नपत्रिका वाचल्यावर आपल्याला यातला बराचसा भाग येतो आहे असा कॉन्फिडन्स माझ्या मुलाना वाटला. त्यानी शांतचित्ताने उत्तरे लिहिली. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात निकाल आला. माझे सातही विद्यार्थी पास झाले. सगळ्याना ४४ ते ५२ या रेंजमध्ये गुण मिळाले. सुशा ५४गुण मिळवून पहिली आली. माईनी रातोरात पेढे बनविले. दुसऱ्या दिवशी

सकाळी लौकर आंघोळी उरकून सगळी मंडळी ओट्यावर जमल्यावर माईनी मला हाक मारली.

मी ओट्यावर माझ्या नेहमीच्या खुर्चीत बसल्यावर माई म्हणाल्या, “ मागच्या खेपी सुशाच्या मार्काचा कागद सरानी आणलेनी तेव्हा सर बोलले होते, की ऑक्टोबर मध्ये सुशा ५० मार्कानी पास होवून सगळ्याना पेढे वाटील. सरांचा शब्द खरा झाला.सुशाला ५४ मार्क मिळाले ते सरांच्या आशिर्वादाने....सुशा सराना पहिला पेढा दे. ” सुशाने मुठ भरून पेढे दिले आणि मला नमस्कार करताना तिला आनंदाश्रू आवरले नाहीत.मी नको नको म्हणत असतानाही घरातली सगळी जणं माझ्या पाया पडली. दाजीनी ५०० रुपयाचे पाकिट देवू केले ते मात्र मी निग्रह पूर्वक परत केले.“ मी इथे तुमच्या कुटुंबातलाच एक म्हणून रहातो. सगळ्याना माझ्याबद्दल जी आपुलकी आहे ती तशीच राहूदे. पैसे घेतले तर ती माझ्या कामाची ती किंमत झाली. त्या पेक्षा आपण बटाटे वड्याची पार्टी करुया.....”सगळ्यानी माझी सुचना उचलून धरली. ऑक्टोबर सत्रात सात रिपिटर्स पास झाल्यामुळे शाळेचा निकाल २९ %झाला. आता शिक्षण विभागाचा ससेमिरा टळणार होता. प्रार्थनेच्या वेळी माझा पुष्पगुच्छ देवून सत्कार झाला.त्या नंतर सरानी शाळेच्या नोटिस बोर्डवर ठळक

अक्षरात १९७९च्या एस.एस.सी.बॅचचा निकाल २९.४१% अशी नोंद करून घेतली.

मी इंग्रजीचा शिक्षक म्हणून गावातल्या लोकाना माझ्याबद्दल भारी कौतुक होतं.आजूबाजुच्या  गावातली कोर्ट कज्जे खेळणारी कोण कोण जमिनदार माणसं कोर्टाच्या तीस तीस चाळीस चाळीस पानी जजमेंट मराठी तर्जुमा करायला घेवून यायची. त्यात शेवटच्या पृष्टावर न्यायाधिशानी निवाडा लिहिलेला असे तेवढा भाग महत्वाचा असतो बाकी सगळा फापट पसारा असतो. हे संबंधिताला पटवून देताना माझी पुरेवाट व्हायची.एवढ्या सगळ्या पानांचा अनुवाद केलाही तरी तो वाचून सामान्य माणासाला काहीच उलगडा झाला नसता. संपूर्ण निकालपत्राचा तर्जुमा  हे किती जिकिरीचे काम आहे याची कल्पना काम आणणाराला नसे. मग मी त्याला हेडसरांकडे नेत असे. ते सुज्ञ भाषेत  त्याला वाटेला लावीत. मुंबईत वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम करुन माणसं  निवृत्ती नंतर गावी आली की कंपनी कडून आलेली पत्रे घेवून येत. त्याना मात्र मी पत्राचा आशय अनुवाद करून देई, माहिती मागवलेली असेल  तर ते फॉर्म मी भरून देई. कोणी कोणी या कामाबद्दल दहा - पाच रुपये पुढे करीत ते मात्र मी घेत नसे. मग काही जण उपकृततेच्या जाणीवेने  भाजी पाला, आंबे, फणस, काय काय भेटी आणून देत.

त्या दिवशी शाळा सुटायच्या वेळेला मी आणि धुमाळ शिपाई शाळे बाहेर कलमाच्या मुळात बसून पान खात असताना चाळिशीच्या उमरीचा लेंगा टी शर्ट घातलेला टीपटॉप गृहस्थ ऑफिस समोर उभे असलेल्या स्टाफशी काहीतरी बोलू लागल्यावर सगळे हसू लागले. आम्ही दूर असल्यामुळे त्यांचे संभाषण आम्हाला ऐकू येत नव्हते. तेवढ्यात कोणीतरी सर .... सर करून मला हाक मारल्यावर धुमाळ शिपायाचे तिकडे लक्ष गेले. फिस्सकन हसून धुमाळ म्हणाला, " चला सर... तुमका बोलावत ते." "कोणरे तो?"असं विचारल्यावर धुमाळ म्हणाला,"तो सर्कट झालेलो परसो मयेकार.पुर्वी हुंबैत हुतो नोकरीक.... कोन भेटात तेका तो इंग्लीस झाडून दाकवता. तेका इंग्लीस बोलनारो मयेकार म्हंतत..."कधितरी दाजी त्याच्या बद्दल मला बोललेले.... त्याच्या डोक्यावर परिणाम झाला नी तो मुंबई सोडून गावी आला, तो सगळ्यांशी फाड फाड इंग्लिश बोलतो. मी ऑफिस जवळ पोचताच माझ्याकडे निर्देश करीत किनरे सर म्हणाले, "हे आमच्या शाळेत इलेले इंग्लीसचे नवे सर हत.... तेंच्याफुडे तुजी इंग्लीस झाडून दाकवलस तर तू खरो" दरम्याने आठ टोल झाले नी शाळा सुटली.

माझ्या समोर इंग्लीश बोलणारा मयेकर उभा राहिलेला बधितल्यावर वर्गाबाहेर आलेले सर, मुले यानी आमच्या भोवती कोंढाळे केले. बघ्यांमध्ये हेडसर आणि मॅडमही होते.

"गुड एवनिंग बापटसर, आय व्हेरि हॅपी मिटिंग यू " माझ्याशी शेक हॅण्ड करीत मयेकर बोलला. त्यावर "गुड एव्हिनिंग मिस्टर मयेकर, आ एम आल्सो व्हेरी हॅपी टू मीट यू , आय हॅव हर्ड मच रुमर्स अबौट यू. माय कलिग्स ॲज वेल ॲज मेनी व्हिलेजर्स नेमली दाजी देवरुखकर, आबा वालम, सखाजी तांबे ऑफन टॉक अबॉउट यू . दे से दॅट यू स्पीक फाड् फाड् इंग्लिश. विथ फिअर ऑफ़ युवर स्पीच सम ऑबव्हिएट देम सेल्वज फ्रॉम यु.... सम ट्राय टू फर्फ़ेंड..... यू आर रियली ग्रेट.....सो आय वाज वेटिंग इगर्ली टू मीट यू" मी एका दमात अशी सरबत्ती केल्यावर मयेकर चांगलाच वरमला. ओशाळं हसत तो म्हणाला, "सर, आय नॉट अंड्स्टॅंड सम युवर टॉक. सम वर्डस रुमर्स, फर्फेंड, ऑबव्हिएट आय नॉट नो मिनिंग़. " खो खो हसत पुजारी सर म्हणाले, " सरानी रुमर्स, फर्फेंड, ऑबव्हिएट हे शब्द वापरले ना त्यांचा अर्थ मयेकराना कळला नाही . अरे वसंता माझ्या टेबलावरची डिक्शनरी आणून दे रे त्याना " मी हसत म्हणालो,"डोण्ट बॉदर मिस्टर मयेकर....रुमर्स मिन्स इंटरेस्टींग इन्फर्मेशन, फर्फेंड मिन्स प्रोटेक्ट ऑर सेक्युअर, ऑबव्हिएट मिन्स हाइंडर . ॲक्च्युअली मोस्ट ऑफ द पिपल कांट अंडस्टॅंड इंग्लिश. इन युवर लॅंगवेज पीपल डोंट कम इंग्लीश सो दे फियर यु मिस्टर मयेकर. ॲंड सो दे गो अवे फ्रॉम यु.... "

मयेकराच्या इंग्रजीची लेव्हल आता मी अचूक ओळखली होती. त्याला पुरता उघडा पाडीत मी म्हणालो, “यु कम इंग्लिश बट पिपल नॉट कम इंग्लिश. ” त्यावर मान डोलावीत मयेकर म्हणाला, “ओके ओके ”आता मी योजुन गुगली टाकीत म्हणालो “व्हेन यु बर्स्ट इन इंग्लिश, लिसनर गेट्स बॅफल्ड ” आता मराठीत उतरत मयेकर बोलला, “तुम्ही काय म्हणता ते समजलं नाही मला ” तो चीतपट झालेला बघून मी हसत हसत बोललो “म्हंजे तुमी इंग्लीस झाडूक लागलास ना , काय ल्वॉक भियातत कारण दे नॉट कम इंग्लिश ” आता माझ्या बोलण्यातली खोच हेडसराना आणि थोडफार इंग्रजी जाणणारानाही कळली . खिक्क खिक्क हसत किनरे सर म्हणाले, “ ओ फाड फाड वाले ...आदीच तुमी भंडारी, भंडार बढाई कोणाक जमणार नाय. तुमी आमच्या सारक्यांकाच शायनिंग मारून दाकवूचा, बापट सरांच्या सामनी तुमचा पिताळ उगडा पडला. पयल्या दोन वाक्यातच सरानी तुजी कशी फाडून टाकल्यानी, ” शिपाई वसंत गुरव फिस्स फिस्स हसत म्हणाला, “शेवटी तुजा विमान मराटीवर उतारला .... ” हेडसरही आगीत तेल ओतीत बोलले, “ यांच्या इंग्रजीला घाबरून आम्ही पण साईड काढित असू.यांचा नेमका विक पॉइंट आज सरानी दाखवलेनी..... आय कम इंग्लीश यू नॉट कम इंग्लीश..... वाघाचं कातडं पांघरून घाबरवणाऱ्या गाढवा

सारखी  गत झाली ” मयेकर बापडा ओशाळं हसला.त्याच्या खांद्यावर थोपटीत मी बोललो  , “ डोंट गेट अपसेट  मिस्टर मयेकर. लिव्ह दिस हंबग... हे लोक जरा गंमत करताहेत. पण मी तुमचं मनापासून  कौतुक करतो. जे शब्द माहिती आहेत ते उभे आडवे कसेही वापरून कां होईना  तुम्ही इंग्लिश झाडून समोरच्याला  गार करता एवढं तर  नक्की. मी मानलं तुम्हाला. ” मयेकर मान डोलावीत बोलला, “मी फ्रेंच कांसुलेट मदे  होतो. तिते इंग्रजीत सगळी वार्ता चालायची म्हणून मला पण तशी आदत पडली. पन सर तुमची इंग्लीश मात्र एकदम पावरफुल हां,  एवढी आपली  पन हिम्मत  नाय ” बघ्यानी टाळ्या वाजवल्या.

त्यानंतरही अधून मधून मयेकर भेटायचे. मी त्याना इंग्रजीत बोलायला प्रोत्साहित करण्यासाठी काही वाक्यं त्यांच्या स्टाईल मध्ये फेकित असे. अवघड शब्द न वापरता कॉमन, सोपे शब्द वापरायचो. ते मला काजुगर, चारोळी, काप्या फणसाचे गरे काहीना काही घेवून येत नी मी सक्तीने त्यांच्या खिशात पाच दहा रुपयाची नोट कोंबित असे. एकदा एका माणसाला ते घेवून आले. तो माणूस अमेरिकन कॉन्सुलेट मध्ये माळी म्हणून जॉब करायचा. जुवाटी नी आसपासच्या दत्तवाडी, हसोळ, हरचली, प्रिंदावण  या भागातली बरीच माणसं मुंबईला वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये माळी आणि सिक्युरिटी म्हणून काम

करायची. मयेकरांसोबतचा माणूस झिलू भोवतळी याने मुंड्याच्या खिशातून एक लिफाफा काढला. ते अमेरिकन कॉन्सुलेटने पाठवलेलं पत्र होतं. मयेकर इंग्रजी झाडी म्हणून झिलूने त्याला गाठला. पण पत्र वाचण्या एवढं इंग्रजी त्याला कुठलं यायला म्हणून तो माझ्याकडेआला.

झिलु चार वर्षामागे रिटायर झाला तेंव्हा १७/१२/१९७५ ला त्याला फंडा पैकी अकरा हजार रुपये रक्कमेचा क्रॉस चेक दिलेला होता. त्यानंतर ऑफिसच्या ऑडिट मध्ये असे निदर्शनाला आले की हा हिशोब चुकीचा केलेला असून बाविसशे कमी दिले गेले. सबब सोबतच्या नमुन्यात पोचपावती सादर केल्यावर सदरील बाविसशे रकमेचा चेक रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात येईल. प्रथम मी काय सांगतो ही झिलुची समजच पडेना. तो म्हणाला, “कायतरी चुकताहा.... अकराशे नी वर वीस रुपाये फंड दिलानी. तवा आबा खोत ना तेका मी पत्र दाकवलय. आता तेका तरी विंग्रजी खैसना समाजनार? तेना राजापुरात वकिलाकडे जावन म्हायती काडलान. कायतरी कागद लिवलेले तेच्यार माजो आंगटो घितलान. मगे उतारात थय ब्यांक हा ना तेतू माजा बुक काडलान. मग्ये दीड म्हयन्यान तेनाच बेंकेसून पैसं हानलान नी अकराशे नी वर इस रुपाये माका दिलान. तेना एवडी दलामालकी केलान म्हनू मी तेका इस रुपाये खर्ची म्हनू देय हुतय पन बापड्यान ते दुकु घितलान नाय.

आबा देव मानुस तो काय ख़ोटा बोलनार हा ?” आता या प्रकराणातली मेख मी ओळखली. या भावरथी कुळवाड्याचा आबा खोतावर नितांत विश्वास आहे , मी कितीही कंठशोष केला तरी हा माझ्यावर विश्वास ठेवणार नाही हे ओळखून मी त्याला बॅंक बुक आणायाला सांगितल्यावर तो बोलला, “ तां आबाकडेनच हा, तो सांगलीत गेलो हा... आता कदवा येयत काय दकल....म्हणून मी मयेकाराक हटकलय..... ”

मी हा सगळा विषय पुजारीसरांच्या कानी घातला. “आता आबा खोत आला तरी आधी ही गोष्ट त्याच्या कानी घालू नको, तू परभारे आम्हाला भेटलास हे त्याना आवडणार नाही. नी ते मुंबईत उलट सुलट कायतरी कळवून तुझी रक्कम अडकवून ठेवतील.तसंच मुदत टळली तर ऑफिसवाले तुला पैसे देणार नाय, तेव्हा ह्या गोष्टीचा लगेच फैसला करून आम्ही तुझी रक्कम मिळवून देतो. ” सर त्याला बोलले. ही मात्रा लागू पडली. “व्हय व्हय तुमका इचारला ना.... ता तेका आवडणार नाय.... नी तो खयतरी गोटो फिरवून माज्ये पैशे लटकावून ठेयीत....मी नाय बोलणार तेका. तो आता हय नाय... तो येय सर मुदत टळली तर हुंबयचो सायब पैशे देवचो नाय.... माका तेना काय तुमी काय काम केल्याशी मतलब. ” सरानी दुसरे दिवशी त्याला राजापुरला नेवून स्टेट बॅंकेत अर्जकरून नवीन पास बूक काढले. त्यात जुन्या एंट्री भरून घेतल्यावर जानेवारी ७६ मध्ये

११००० रुपये चेकने जमा झाल्याची आणि १०० रुपये शिल्लक ठेवून १०९००रुपये काढल्याची अशा दोन्ही नोंदी मिळाल्या.

नवीन चेक येईतो ही गोष्ट झिलूला सांगितली नाही. पत्राप्रमाणे कॉन्सुलेटकडे रसिट पाठवल्यावर बारा दिवसानी बाविसशे रुपयाचा चेक आल्यावर तो जमा करून ती रक्कम काढून आणल्यावर दादा देसाई , दाजी सोनार , मी यांच्या समोर सरानी सगळा घोळ स्पष्ट करून सांगितला. “तरीच .... फंड इल्यार मी म्हणय की पैसे कमी कशे केल्यानी..... कारण मी लिटायर झालय ना तवा सायबा वांगडा किरिस्ताव पोरगी आस्ता ना ती माका बोललेली की, तुमका कमीच तरी धायेक हजार रुपाये तरी फंड भेटात.... ” चितागती होत झिलू म्हणाला. त्याला समजावीत दादा देसाई म्हणाले, “तु काय भिया नुको.... ही काय मोगलाय लागोन गेली हा? बारा पाचाचो मेळ बसवून आबाक जाब विचारू आमी. सगळो पुरावो आमच्या हातीत आसा... ह्या बूकात फंडाचे अकरा हजार जमा झालेले आणि तेतूसून धा हजार नवशे रुपाये काडलेल्याची नोंद हा.... बाकीच्ये पैशे खाय ग्येले तां गाव इचारीत ना आबा बामणाक... ” आता झिलू पुरा हादरला. “ पन आबा इल्यार तो काय म्हंता बगुया”

आठवडाभरानंतर आबा खोत आले. झिलु त्याला भेटला आणि त्याने सगळा विषय इत्थंभूत आबाना सांगितला.

आता हा विषय गुपाचुपीत मिटवल्याशिवाय गत्यंतर नाही हे त्यानी ओळखलं. तरीही अडाणी झिलुला त्यानी पध्दतशीर गुंडाळला. “फंड मिळाल्यावर तुका शक इलो म्हटल्यार मी हे गोष्ट वकिलांच्या कानार घतली. तेनी तुज्या सायबावर केस केलानी. दोन तीन पावट् वकिलांनी हुंबयच्या कोर्टात खेपा घतलानी . म्हणून ती केस तुज्या बाजून झाली नी तुजो सगळो फंड भरपाय करून मिळालो. तुका आदी सांगोन आशेर ठेवायचो नी केस हरली तर तू निरूस होनार म्हनान मी आदी ह्यो इषय तुका बोललय नाय. मी सांगलीत जाताना वकिलांका भेटलय तवा केस तुज्यासारी झाली ह्यां बोलले ते माका....मी तिकडे गेलय नी इकडे तुका कंपनीचा पत्र इला. म्हणान बेंकेन तुका नया बुक दिला. ह्यां तुजा पयला बुक.....ह्येतु पयले पैसे जमा झालले आसती. दोन दिवसान आपुन राजापुराक जावन पैशे काडून हानुया. तुजो मज्यार इस्वास नाय? तु काष्टी वालो कुळवाडी माज्या वादी दुस्मनांच्या नादाक लागोन माका बारा पाचा सामनी हटकणार? मी गोटो फिरवलय ना तर तुजा हगणां मुतणां बंद करीन...”

आबा खोतांच्या देवस्कीची त्या अडाणी गावातल्या कुळवाड माळवाडात भलतीच दहशत असायची .गर्भ गळीत होत आबांच्या पायावर डोकं टेकित आपल्या मुस्काटीत मारून घेत झिलू म्हणाला , “आबानु अशे रागा जाव नुको....

बारापाचाची वार्ता दादा देसायानी केल्यानी आता तुमी इलास, ह्येचो फैसलो तुमी करशा तो माका मान्य. मी गुवात बुडवलेली काडी तोंडात धरून गप ऱ्हवनार ” आबा दोन दिवसानी झिलुला घेवून राजापुरात गेले. त्याला वकिलाच्या ऑफिस बाहेर बसवून आत गेले. इकडच्या तिकडच्या गपा करुन बाहेर आल्यावर त्यानी पिशवीतुन स्टॅंप पॅड काढून दोन कागदांवर त्याचे आंगठे घेतलेनी आणि त्याला म्हणाले, “तुका रक्कम पोच केल्याच्यो ह्यो पावत्यो, तेच्यार तुजो आंगटो घितलो हा. तर मी तुका ह्येच्या आदी अकराशे आणि वीस रुपाये दिले. नंतर बाविसशे पुजारी सरानी बेंकेसून काडून तुका दिलानी म्हंजे तीन हजार आनी दोनशे आनी वर वीस एवडे तुका पोच झाले बरोबर? ” त्यावर झिलु म्हणाला, “आता मी येडझवो मानुस ... माका काय समजता हा .. तुमी म्हनतास मगे तां बरोबरच आसनार.”

आपली मात्रा बरोबर लागू पडली हे आबानी ओळखलं. “ तर अकरा हजारातले एवडे तुका पोच. तुजी केस चलवलानी तेची फी पाच हजार मागत हुते पण मी हजार कमी करून चार हजारावर तोड केली. म्हंजे आता मुदलात तुजे तीन हजार आनी वर आटशे शिल्लक ऱ्हवती..... बरोबर हा ना? काय चुक माक आसात तर आताच सांग नायतर उद्या परत दादाक नायतर पुजारी सराक भेटशी आनी माका बारा पाचात घेवचो भाय

दाकवशी.... ” रंजीस होत खाड् खाड्  थोबाड फोडून घेत झिलू म्हणाला, “ ह्या आदी  काय नुको ता बोलतास तुमी... आता ह्या इषयात   कोनाचा काय्येक माका आयकोचा नाय... मी गांगेश्वराची   आण घेवन् सांगतय.... ह्येतू बदल झालो तर तुमची  व्हाण नी माजा त्वाण्ड ”  आबा खुशीत  येवून म्हणाले, “  माजी खात्री हुती की  तू माज्या शब्दाभायर जावसच नाय. बरां तां असो  . तुजे तीन हजार आनी  आटशे  देवचे. ह्या दलामालकीत  माजो फायदो काय? ” त्यावर झिलू  म्हणाला , “छा छा....असा कसा  व्हयत... तुमका  काय दीड दोन हजार काय ते घेवा” आबानी  खिशात हात घालीत  नोटा काढल्या. झिलु बोलल्या प्रमाणे  आपले दोन हजार  कापून घेवून अठराशे म्हणजे  एक हजार नी  वर आठशे  झिलूच्या हातावर टेकवून हिशोब पुरा केला.

********

# ३. जय गुरुदेव

आरत्या म्हणून झाल्या अन् भक्तगणानी दोन्ही हात जुळवून मस्तकाला टेकवीत डोळे मिटून घेतले. नेहमीच्या सेवेकऱ्यानी नित्यनेमाप्रमाणे 'दिगंबरा दिगंबरा' हे भजन हलक्या टाळीच्या साथीवर म्हणायला सुरुवात केली. नवख्यांनी सरसावून त्यांच्या सुरात सूर मिळविले. हळू हळू भजनाची लय वाढत गेली. अन् अकस्मात "अवधूत चिंतन श्री बालमुकुंद गुरुदेव दत्त" किनऱ्या स्वरात उच्चारीत महाराज उठले. जवळजवळ तास दीड तास पादुकांसमोर, चांदीच्या चौरंगावर बसून राहिल्यामुळे पायात मुंग्या आलेल्या... उठून उभे राहताचक्षणी त्यांची पावले लटपटली... महत् प्रयासाने देह सावरीत महाराज गाभाऱ्याच्या द्वारापाशी पोहोचले. डावा खांदा शिसवी चौकटीला रेटून सरसे होत झारीतलं गुलाबपाणी हातात घेऊन भक्तगणांच्या दिशेने सपासप उडवायला सुरुवात केली. पाणी संपल्यावर झारी ठेवून महाराज हाताने आधार घेत बाहेर आले आणि पाय पसरुन उंबऱ्यावर बसकण मारली.

केळी-सफरचंदाचेकाप,डाळिंबाचे दाणे,खोबऱ्याचे तुकडे संत्र्या-मोसंबीच्या फाका, आणि खडीसाखर मिसळलेले

चांदीचे तबक घेऊन हरीअण्णा पुढे सरसावला. भजनकऱ्यांना इशारा करुन भजन बंद केले. मग एक-एक भक्त नमस्कार करायला पुढे येऊ लागला. महाराजाना नमस्कार करायची एक विशिष्ट पद्धती रुढ झालेली. त्यांच्या चरणावर मस्तक ठेवायचे अन् हाताची ओंजळ पसरायची. महाराजांच्या मनात आले तर भक्ताच्या मस्तकावर हाताने थोपटीत.'बाळऽऽ काय अडचण आहे बोलऽ' असे विचारायचे. त्यांनी विचारले तरच भक्ताने आपले गाऱ्हाणे सांगायची मुभा. क्वचितच प्रसंगी काही महनीय-मालदार भक्तगणांसाठी हरीअण्णा मध्यस्थी करायचे. 'महाराज, भक्त अडचणीत आहे.... कृपा असावी.' मग त्याचे गाऱ्हाणे महाराज ऐकायचे.

महिला वर्गाने डोकीवर पदर घेऊन पदराचे टोक उजव्या हाती पकडून मस्तक झुकवीत महाराजांच्या डाव्या-उजव्या पायाच्या अंगठ्यांना स्पर्श करावयाचा रिवाज असे. महाराजांच्या मनात असेल तर पृच्छा व्हायची. मात्र प्रत्येक भक्ताच्या ओंजळीत महाराज स्वहस्ते बचकभर प्रसाद टाकायचे. क्वचित एखाद्याच्या ओंजळीत तुलसीदल, बिल्वपत्र, महिला भक्तांना सोनचाफ्याचे, गुलाबाचे फूल मिळायचे. अशा वेळी महाराजांचा प्रसाद झाला. आपण गाऱ्हाणे न सांगताच महाराजांनी अंतर्ज्ञानाने ते जाणून कृपा केली असे मानण्याची रुढी असायची.

महाराजांच्या दरबारात मध्यान्ही आणि सायंकाळी आरत्या व्हायच्या. त्यावेळी महाराजांच्या अंगात बालमुकुंद गुरुदेवांचा संचार असायचा. अशावेळीच गाऱ्हाणी सांगण्याची प्रथा असायची. म्हणून अडले नडलेले प्रायः आरतीचा मोका साधून यायचे. एखाद्या नवागताने अधीरपणाने हा संकेत भंग केला... म्हणजे महाराजांनी पृच्छा न करताच त्याने गाऱ्हाणे सांगायला सुरुवात केली, अगर आरत्यांच्या वेळा सोडून दिवसभरात अधेमधे महाराजांकडे पृच्छा केली तर, तेथे कायम वावरणारे सेवेकरी हरीअण्णा, मधुभाऊ, भालू काका, महाराजांची मानलेली बहीण आऊताई अगर नित्यनेमाने येणारी मंडळी दरबारातले रिवाज नवागताला सांगून त्याला थोपवायचे.प्रतिवर्षी नित्यनेमाने येऊन सेवा करणारी काही मंडळी असायची. काही उच्चभ्रू भक्तगण २-४ दिवस त्यांना आपल्या बिऱ्हाडी पाचारण करायचे. अशा वेळी तिथे दरबार भरायचा. मठातल्या गाभाऱ्याबाहेर पीठावर पादुका ठेवलेल्या दिसल्या तर महाराज मठात नाहीत असे समजायचे.

महाराजांचा भक्तपरिवार मोठा अन् सर्वदूर पसरलेला. दत्तवाडीचे बिल्डर बियाणीशेठ, सोसायटीचे चेअरमन भोबे, नगराध्यक्ष सेठी, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. साळी... किती नावे घ्यायची. संपूर्ण भारतभर कुठे कुठे महाराजांचे उच्चपदस्थ भक्त होते आणि परदेशातही. सगळे महाराजांना भरभरुन द्यायचे.

कोणताही महत्वाचा निर्णय महाराजांचा सल्ला घेऊनच व्हायचा. दर आठवडा-पंधरवडयात असे अतिमहनीय भक्त कुटुंब-कबिल्यासह आश्रमातल्या 'गुरुधामात' वावरताना दिसायचे.

एवढी उच्च पदस्थ मंडळी... आश्रमातल्या आवाराचा कचरा काढणे, दरबारातली फरशी पुसणे, महाराजांच्या शयनकक्षाची सफाई, त्यांना स्नान घालणे, पाय चेपायचे असली कामे मन लावून करताना दिसायची. स्थानिक लोकांपैकी काही प्रतिष्ठित मंडळी त्यांच्या नित्यदर्शनाला येणारी असायची. एका विशिष्ठ वर्तुळात महाराजांना मोठा लौकीक. गोरगरीब-सामान्य माणसे आश्रमातले चकाचक वातावरण बघून काही पृच्छा न करताच बाहेर पडायचे. एखाद्याने चिकटपणा दाखविलाच तरी आठ-पंधरा दिवस दरबारात हजेरी लावूनही त्याला अनुग्रहच प्राप्त व्हायचा नाही. महाराजांचा हा लौकीकही सर्वश्रुतच !

गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टमध्ये तोट्यात आलेले बियाणी शेठ... महाराजानी त्यांच्यावर अनुग्रह केला. पहिलेच हौसिंग सोसायटीचे काम त्यांना मिळाले. कामाचा आरंभ करण्यापुर्वी शेठनी महाराजांना फ्लॉटवर नेऊन त्यांची पुजा केली. त्यावेळपासून बियाणी शेठ वधारत चालले. सध्याचे आश्रमातले गुरुधाम. तिथे पूर्वी चारखणी घर होते. ते पाडून आताची भव्य दिव्य वास्तू बियाणी शेठनी बांधून दिलेली. महाराजांची

शोव्हरलेट डॉ. साळींनी दिलेली. मठातले इंटीरियर डेकोरेशन मध्यपूर्वेत स्थायिक झालेल्या कुलकर्णींनी करुन दिलेले. मठात महाराजांच्या बडदास्तीसाठी राबणाऱ्या काही नोकरवर्गाला भरभक्कम मासिक वेतनही असेच त्यांचे कोणी सेवेकरी दरमहा न चुकता द्यायचे.

महाराज म्हणजे पूर्वाश्रमीचे बखले... कोर्टात टायपिस्ट... नोकरीवर रुजू झाल्यावर दोन अडीच वर्षांनी त्यांच्या सर्वांगावर पुरळ उठला. प्रचंड कंड सुटायचा. औषधे, मंत्राचे पाणी सगळे सगळे झाले... कंटाळलेला बखले काही पत्ता लागू न देता परागंदा झाला. सहा वर्षे झाली. या काळात त्यांनी नर्मदेची परिक्रमा केली. कुणा साधूचा त्याच्यावर अनुग्रह झाला अन् त्याला दिव्यदृष्टी प्राप्त झाली. तीन वर्षे अन्नपाणी त्याग करुन ते समाधी अवस्थेत होते. जागृतावस्थेत आले तेव्हा आकाशवाणी झाली... 'तुझी साधना पूर्ण झाली आहे. आता अडले नडलेल्या माणसांचे संकट निवारण करण्याचे कार्य कर. बालमुकुंद ही उपाधी घेऊन जनकल्याणाचे कार्य हा आता तुझा धर्म आहे... जा... तुला अष्टसिध्दी प्राप्त आहेत... त्यांचा जपून वापर कर....' अशी कथा त्यांनीच सांगितलेली.

जागृत झालेले बालमुकुंद अंतःप्रेरणेचे स्फुरले त्या दिशेला चालत राहिले. परागंदा झालेल्या बखलेना प्रथम ओळखले ते त्यांच्या इंदूरस्थित आतेभावाने. त्यांनीच त्यांना मूळग्रामी

दत्तवाडीला आणून सोडले. गावात एस.टी.तून उतरले तेव्हा अच्यूतराव भोबे तिथे होते. कौपिनधारी, जटा-दाढी वाढलेल्या महाराजांना पाहून भोब्यांचे अष्टसात्विक भाव जागृत झाले. त्या ठिकाणीच त्यांनी महाराजांच्या पायावर लोटांगण घातले. 'एक सप्ताहात तुझी पीडा संपेल' महाराजांनी आशीर्वाद दिला. भोब्यांचे सोसायटीच्या निवडणुकीला उभे रहाण्याचे प्रयत्न तेव्हा सुरु कशी चक्रे फिरली कोण जाणे... भोबे बिनविरोध निवडले गेलेच पण मेंबरशीपसाठी धडपडणारे भोबे 'डायरेक्टर ऑफ बोर्ड' झाले. साक्षात्कारी बाबा म्हणून ख्याती झाली ती भोब्यांमुळेच. महाराजांनी परिस्थिती व्यवस्थित हाताळीत चांगले बस्तान जमविले.

एका व्यापारी पेढीवर कारकूनी करणारे त्यांचे बंधू हरिअण्णा... नोकरी सोडून पूर्ण वेळ महाराजांना वैभवाच्या शिखरावर नेऊन पोहचविले. आश्रमाच्या शाश्वत योगक्षेमाची चोख व्यवस्था त्यांनी लावून घेतली. महाराजांची नर्मदा परिक्रमा, साक्षात्कार, अष्टसिद्धी प्राप्तीच्या कथा हरिअण्णांनीच रुढ केल्या. स्वतः महाराज आपल्या परागंदा काळाबाबत चुकूनही भाष्य करीत नसत. अगदी क्वचित 'संचार' असलेल्या अवस्थेत असंबद्ध वाक्ये उच्चारली जायची. त्यांचा अन्वयार्थ लावून महाराजांच्या योगसिद्धी कथा हरिअण्णांनी गठीत केलेली.महाराजांची दिनचर्या, गुरुधामाचा

दिनक्रम हरिअण्णांनी नियोजनबद्ध आखलेला. महाराज सुद्धा त्यांच्या नियोजनात फारसा बदल करायचे नाहीत. हरिअण्णांना महाराजांची एवढी काळजी की, प्रत्यक्ष स्वर्गातसुद्धा अशी सुखे महाराजांपुढे हात जोडून उभी राहिली नसती.

महाराजांचा नित्यसाधनेचा कक्ष, अस्सल काश्मिरी बिछायत, वारा घालायचे मोरपिसाचे पंखे,चंदनी पलंग, भोजनाचेसुवर्णपात्र हा शाही थाटमाट हरिअण्णांनी जमवलेला. दिवसातून दोन वेळा खास फलाहार, केशरी दूध, पंच पक्वान्नांचे सुग्रास भोजन...मुख शुद्धीसाठी सुकामेवा.... महिनाभराच्या रसोईचे दिवसभर पद्धतशीर नियोजन हे हरिअण्णांचे नियोजन चातुर्य ! इतकेच कशाला, महाराजांच्या ‘त्या’ सुखाची शाश्वत सोयही हरिअण्णांनी मोठ्या कौशल्याने केलेली. आश्रमात भगिनी म्हणून वावरणाऱ्या आऊताई.... वास्तवात ती हरिअण्णांची दूरची मेव्हणी. अकाली वैधव्य येऊन चार घरी भाजीपोळी करुन तिच्या आणि महाराजांच्या शाश्वत कल्याणाची व्यवस्था हरिअण्णांनी केलेली. अगदी निकटच्या चार-दोन सेवेक-यांशिवाय ही अंदरकी बात कोणाली ज्ञात नव्हती. अधून मधून महाराजांची भेट घडवून दिली जायची. हरिअण्णा या बाबतीत फार दक्षतेने वागायचे. म्हणूनच महाराजांच्या ‘या’ किर्तीचा डंका दत्तवाडीत पसरला नाही.



महाराज पूर्वाश्रमी इंटर आर्टस् पर्यंत शिकलेले. भ्रमण करुन बारा गावचे पाणी पिऊन समयसूचक हजरजबाबी भाष्य करण्याच्या कौशल्यात चांगले पारंगत झालेले. योगायोग असा की, भविष्यात बालमुकुंद म्हणून त्यांचा पुनर्जन्म व्हावा यासाठीच असेल बहुधा पण त्यांना बासरी वादनाचाही नाद ! अगदी जाणकार संगीतप्रेमीसुद्धा महाराजानी बासरीत फूंक टाकली तर कान देत तल्लीन व्हावा असे कसब महाराजांच्या

बोटांत ! कोर्टाच्या नोकरीत इंग्रजी डिक्टेशन्स घेऊन आंग्ल भाषेवर बऱ्यापैकी प्रभुत्व प्राप्त झालेले. बालपणी पाठ केलेली संस्कृत सुभाषिते... इंटरला तत्वज्ञानाच्या अभ्यासात द्वैत-अद्वैत... आत्मा असले कानावरुन गेलेले शब्द... भक्त कितीही उच्च पदस्थ असला तरी त्याच्यावर छाप पाडायला पुरेसे भांडवल महाराजांकडे असायचे. अगदीच काही न जमले तर बासरीवर थोडा वेणूरव छेडला की भक्त त्यांच्या कच्छपी लागला म्हणून समजा.

महाराजांचे घनिष्ट भक्त मटांगे कॉन्ट्रॅक्टर सा. बां. विभागात साधे रस्ता कारकून. कुठल्यातरी कामात लाच खाल्ली म्हणून ॲटीकरप्शनवाल्यांनी रंगे हाथ पकडलेले. महाराज तेव्हा नुकते नावारुपास येत असलेले. धास्तावलेली त्यांची पत्नी महाराजांच्या दर्शनाला आली. आठवडाभर त्यांची सेवा केली... झरझर चक्रे फिरली. भोबे यांना महाराजांनी तंबी दिली... भोबेंचा साडू डी.एस.पी.! दत्तवाडी पोलीसठाण्यात वायरलेस गेला अन् मटांगे सुटले... महाराजांच्या कृपेने नगरपालिकेची कंत्राटे मिळत गेली अन् मटांगे वधारले.

आऊताईंचा एक भाचा अनंता अधून मधून आश्रमात यायचा. तो एस.एस.सी. ला नापास झाला. तशी पन्नास टक्के मार्क मिळविण्या इतपत बुद्धी त्याला नक्कीच होती पण नापास झाला अन् त्याचे डोके फिरले. महाराजांचा लौकिक ऐकून त्याचे

वडील त्याला घेऊन आश्रमात आले. आऊताईंनी महाराजांना खास विनंती केली. डॉ. साळींच्या ओळखीने अनंतावर उपचार सुरु झाले. त्यानिमित्ताने अनंता आश्रमातच राहू लागला. सटरफटर काम करायचे. दोन वेळा सुग्रास भोजन... अनंता चांगला रमला.

महिनाभर आश्रमात राहून, उपचार घेऊन अनंता ताळ्यावर आला. एक दिवस गिचमिड अक्षरात काहीतरी लिहिलेला कागद घेऊन महाराजांसमोर उभा राहीला, “महाराज, मला हे गाणे आले बघा.” खुळा मुलगा, त्याला नाराज कशाला करा, म्हणून महाराजांनी कागद घेतला, “मी सवडीने वाचून बघतो. थोडे चंदन उगाळून आण. माझे डोके रसरसते आहे." अनंता गेला अन् महाराजांनी कागदावरुन नजर फिरविली. अनंताला आलेले ते गाणे अप्रतिमच होते.

सद्‌गुरुनी बाग लावियली । तेथला मी असे माळी ॥धृ.॥
हलनिष्ठा शेत नांगरिले । किल्मिष तणा उपटियले ॥
सद्भावे बीज पेरियले । भक्ती अंकुर रुजला वेळी ॥
दृढ श्रद्धा खता घालूया । सत्वभाव जला शिंपूया ॥
प्रेमानंद फला चाखूया । बालमुकुंद गुरु सांभाळी ॥

चंदन घेऊन आलेल्या अनंताला महाराज म्हणाले, “अनंता, कसले रे हे तुझे गाणे...! बरे असू दे. मी बघ कसे सुधारुन घेतले. तुला चालीवर म्हणता येते का बघ. मला म्हणून दाखव. बरे

लागले कानाला तर आरत झाल्यावर म्हणायला सांगेन.” अनंताचे गाणे फक्त आपल्या हस्ताक्षरात उतरुन तो कागद महाराजांनी त्याच्या हाती दिला. अनंताने तासभर प्रयत्न करुन चांगली चाल लावली आणि महाराजांनी अनंताला हाक मारली. “मगाशी आम्ही गाणे दिले ना ते म्हणून दाखव. मधूभाऊ तू जरा पेटी घे.”

अनंताने पेटीच्या साथीवर गीत म्हटले. भक्तगण स्तिमित झाले. ज्ञानेश्वराने रेडयामुखे वेद वदविला तद्वत या खुळ्या अनंताला महाराजांनी गायला लावले. सगळे काही एवढे अवचित घडले की, महाराजांच्या चमत्कारांमध्ये नवीन प्रसंगाची भर पडली. संध्याकाळी महाराज अनंताला घेऊन फिरायला बाहेर पडले. “अनंता, मॅट्रिकला नापास झालास नी, तुझे डोके फिरले, लोकांनी टिंगल केलेनी. पण आज पहा... आमचा वरदहस्त लाभला आणि सगळ्यानी तुझी कशी तारीफ केलेनी... हे बघ.. कधी काही असले कवन बिवन सुचले तर माझ्या खोलीत येत जा... आपण तुझे कवन सुधरुन घेऊ. अशी दहाबारा कवने मिळाली तर तुझी फैनाबाज क्यासेटच काढू की रे... एक मात्र लक्षात ठेव. कवन तुला सुचले म्हणून सांगायचे नाही... नायतर तुझे डोके फिरले अशी टिंगल करतील लोक... मी सांगतो त्यात तुझे हितच आहे....”

महाराज कवने करु लागल्याची द्वाही फिरली. इतकेच नाही

तर खुळ्या अनंताकडून त्यांनी गाऊन घेतले हे नवलही प्रसूत झाले. संध्याकाळच्या आरतीला तर सगळे स्थानिक भक्त गोळा झाले. आरती झाल्यावर अनंताने कवन म्हटले... भक्तांनी माना डोलावल्या. त्या रात्री महाराजांचा डोळा लागायला आला असता अनंता खोलीत आला. महाराजांच्या मेजावरच्या डायरीत नवीन गीताची भर पडली....

"सांजवेळ झाली धेनू हंबरली ।
वत्साच्या ओढीने घराकडे आली ॥....."

आठ पंधरा दिवसांच्या अवधीत अशी पंचवीस गीते तयार झाली. प्रत्येक गीतामध्ये काहीही करुन 'बालमुकुंद गुरु' हे शब्द घालायला महाराज विसरले नाहीत. पुढे पुढे तर ही गोष्ट लक्षात आल्यावर अनंता स्वतःहून ते शब्द पद्यात गोवूनच गीत रचू लागला. नवनवीन पदे होऊ लागली तशी महाराजांच्या एका भक्ताने स्फूर्ती घेतली. नामवंत गायकांच्या संचात त्या गीतांच्या दोन कॅसेट निघल्या.महाराजांच्या रचनांचा 'उपदेश गीतामृत' काव्य संग्रह सुद्धा प्रसिद्ध झाला. प्रत्येक गीताला साजेसे रंगीत चित्र, गुळगुळीत कागद, बियाणी शेठनी सगळा भार उचलला. महाराजांच्या दरबारात कॅसेट अन् पुस्तक विक्रीचा नवीन विभाग सुरु झाला. महाराजांचे निस्सिम भक्त कॅसेट, पुस्तक खरेदी करायचेच पण त्याचे छापील मूल्यही महाराजांची किंमत

होईल म्हणून खिशात हात घालून येतील तेवढ्या नोटा काऊंटरवर ठेवायचे !

सगळे काही एवढे बेमालूम झाले की आता प्रत्यक्ष अनंताने या रहस्याचा भेद करायचा प्रयत्न केला असता तर भक्तांनी खोटारडा म्हणून त्याची पाद्यपूजा केली असती. गुरुधामात अनंताची वट मात्र भलतीच वाढली. महाराज त्याला जातीनिशी आपल्या खोलीत बोलावून घ्यायचे. अनंता आता गुरुधामातला अविभाज्य घटक बनला.पाच सहा वर्षे मागे पडली. अनंताच्या सेवेचे चीज झाले. महिना दीड, दोन हजार रुपये त्याच्या गाठीला जमायचे. घरची मंडळी निर्धास्त झाली.दरम्यानच्या काळात आवडाक्काना काही आजार झाला. गर्भाशयाचा मोठी शस्त्रक्रीया झाली. खर्च अर्थातच महाराजांनी भक्तांकरवी करविला. दगदग सोसत नाही म्हणून आवडाक्का गुरुधाम सोडून भावाकडे... अनंताच्या वडिलांकडे रहायला गेल्या.

त्या जाऊन ७-८ दिवस झाले अन् महाराजांचे स्वास्थ्य बिघडले. म्हणजे तब्बेतीने ते ठणठणीत... पण नित्य देहभोग भागेना म्हणताना त्यांची तळमळ वाढली. आडून आडून ही गोष्ट त्यांनी हरिअण्णांच्या कानी घातली पण त्यांच्याकडूनही काही हालचाल दिसेना.महाराज मोठे हिकमती... दीर्घ चिंतन करुन त्यांनी नामी उपाय योजला. अनंताच्या लग्नाचा घाट त्यांनी घातला. निकटवर्ती भक्तांना ते अनंतासाठी मुलगी

शोधायची गळ घालू लागले. अनंताच्या निरंतन चरितार्थाची सोय म्हणून मोठी रक्कम त्याच्या नावे आपण ठेवू अशी तयारीही दाखविली. महाराजांचे काम... पण अडचण मोठी होती. अधून मधून डोके फिरणाऱ्या या पोराला कोणता बाप मुलगी देणार? पण योग जुळून आला. दूर कर्नाटकातला वधूपिता पैशाच्या आमिषाला बळी पडला. मोठा दणका उडाला अन् अनंता चतुर्भुज झाला. अनंताच्या कार्याला झाडून सगळे भक्त हजर झाले. अहेराचा ढीग बघून अनंताचे आईवडिलही चाट पडले. अनंताची पत्नी कमला काही रुपसुंदरी नव्हती पण अनंताला साजेशी होती.... वैगुण्य एकच कमला मुकी होती !

गुरुधामातल्या एका खोलीत अनंताचा संसार सुरु झाला. कमला गुरुधामातल्या झगमगाटाने दिपून गेली. महाराज जातिनिशी तिची वास्तपुस्त करायचे. कमला सुद्धा आदराने त्यांची सेवा करायची, त्यांच्या पूजेअर्चेची तयारी, फराळाची थाळी नेऊन देणे, बैठकीची खोली नीटनेटकी ठेवणे... अर्थात तिचा हेतू मात्र निर्व्याज.... पित्याएवढ्या आदराने ती सारे काही करायची. महाराजांचा हेतू हरिअण्णांनी ओळखलेला... कमला महाराजांच्या आसपास वावरत असली की ते कटाक्षाने दूर रहायचे. इतर माणसांनाही तिकडे फिरकू द्यायचे नाहीत. महाराजांचा मार्ग निर्वेध... ते फक्त संधीची वाट पहात राहीले.

दोन महिने उलटले अन् अचानक अनंताचे सर्कटच

चाळवले. तो घुम्यासारखा रहायला लागला. मध्येच हातवारे काय करायचा... काहीबाही पुटपुटत रहायचा.... कमलेला काहीच समजेना. तिने रडत रडत खाणाखुणा करुन महाराजांना विचारायचा प्रयत्न केला. महाराजांनी तिच्या डोक्यावर थोपटून गाभाऱ्याकडे बोट दाखविले. कमला पादुकांच्या पाया पडून आली. महाराजांपुढे संधी चालून आलेली पण भक्तांची वर्दळ जरा अधिक झालेली म्हणताना ते गप्प होते. दोन तीन दिवसांनतरची गोष्ट. महाराज मंचकावर तक्ताला रेलून बसले असता अवचित हरिअण्णा आले. "महाराज, अनंताची तब्बेत आज ठीक नाही. त्याला दोन झोपेच्या गोळ्या दिल्यायत. पाचदहा मिनिटात तो गाढ झोपेल...." नेमके बोलून ते निघून गेले. महाराज मनात काय ते उमजले.

थोड्या वेळाने महाराजांसाठी आटीव दूध भरलेला चांदीचा पेला घेऊन कमला खोलीत आली. पेला ठेवून कमला माघारी वळणावर एवढ्यात महाराज उठले. तिला बसायची खूण करुन ते दाराकडे निघाले. दाराला आतून कडी लावून महाराज मागे वळले... काहीच अर्थबोध न होऊन कमला विस्फारीत नेत्रांनी पहातच राहिली. आता मार्ग निर्वेध झालेला... महाराज मंद मंद पावले टाकीत कमलेच्या दिशेने निघाले. कमलाचा काय प्रतिसाद मिळेल, काहीच अंदाज त्यांना नव्हता. हरिअण्णांनी सगळा बेत जुळवून आणलेला आहे म्हणून ते निर्धास्त. तरीही

आतला आवाज बाहेर जाऊ नये म्हणून भक्तिमहिमा कॅसेट लावून त्यांनी व्हॉल्यूमचा नॉब फिरविला.

ओशाळे हसत लघळपणाने कमलेचा हात धरायला महाराज सरसावले... त्यांची नजर... बंद दरवाजा... महाराजांचा हेतू कमलेने पुरता ओळखला...हात जोडीत गयावया केल्यासारख्या खुणा करीत ती दरवाजाकडे जाऊ लागली. आता महाराज चवताळले... त्यांनी तिचा पदर खेचला मात्र.... संस्कारीत वातावरणात वाढलेल्या कमलेला त्यांची मनस्वी घृणा आली... चवताळलेल्या वाघिणीप्रमाणे तिने महाराजांवर हल्ला केला. दोन्ही हातानी त्यांचा गळा आवळीत तिने असा झटका दिला की महाराज तोल जाऊन मेजावर कोसळले. मग तिने टेपरेकॉर्डर उचलला अन् महाराजांच्या डोक्यावर दोनतीन फटके मारले.

कमला दार उघडून बाहेर पडली अन् आपल्या खोलीच्या दिशेने धावत सुटली. महाराजांच्या खोलीसमोर कॅरिडॉरच्या कोपऱ्यात दबा धरुन राहिलेल्या हरिअण्णांनी तिला पाहिले. ते धावतच महाराजांच्या खोलीत गेले. महाराजांच्या मंचका शेजारी रॅकमध्ये ठेवलेली पुस्तके, सटरफटर सामान त्यांनी खाली टाकले अन् बोंबाबोंब सुरु केली. मिनिटभरातच सेवेकरी मंडळी, नोकर धावत आले. कमला चोरी करायला महाराजांच्या खोलीत आली... महाराज झोपलेले. खुडखुडते काय म्हणून

पहातात तर हिची उसका उसकी चाललेली... त्यांनी रोखले तर त्यांनाच ढकलून ती बाहेर पळाली... हरिअण्णांचे बोलणे सर्वांना खरे वाटले.

सगळी माणसे कमलेच्या खोलीकडे धावली. दारावर ठोठावूनही दार उघडेना म्हणताना कुणीतरी पहार आणून झडपाच्या बिजागरी उचकटल्या अन् दार उघडले. अनंता निःश्चेष्ट पडलेला अन् त्याच्या उशाशी दोन्ही हातानी तोंड झाकून कमला रडत बसलेली. डॉ. साळींना फोन केला. महाराजांच्या डोक्यावर पडलेली खोक स्वच्छ करुन बँडेज केल्यावर त्यांनी अनंताला तपासले. त्याने अफू वा तत्सम अंमली पदार्थ घेतला असेल असे निदान त्यांनी केले.

नवऱ्याने डोके फिरले म्हणून डल्ला मारुन माहेरी पळायचा कमलेचा बेत असावा असा काही-बाही निष्कर्ष निघाला. काही जणांनी पोलिसांना बोलवायचा सल्लाही दिला. धूर्त हरिअण्णा म्हणाले, "किती झाले तरी अनंता महाराजांना मुलासारखा. हौसेने त्याचे लग्नही केले त्यांनी. ही बया उलट्या काळजाची निघाली. असो... उगाच गावभर अब्रूचे धिंडवडे नको. त्यापेक्षा उद्या सकाळी नवरा बायकोला गुरुधामाबाहेर पिटाळून लावूया. नस्ता बैदा नको..." सकाळी खूप उशीराने अनंता उठला. तो आपल्याच तंद्रीत... कुणीतरी त्याला चंबूगबाळे आवरुन

'चालता हो' असे फर्मान सोडले. बॅगा भरुन झाल्यावर कमला त्याला हात धरुन ओढू लागली. अनंता तिच्यासोबत निघाला.

महाराज मात्र खरेच दयाळू... “हरिअण्णा, झाले गेले जाऊंदे... कसाही असला तरी अनंता माझा सेवेकरी... त्याला पाच हजार रुपये द्या... तो भोंदलेला आहे... उगाच कुठेतरी भरकटत गेला तर नसती आफत. दोघांनाही गाडीत घालून घरापर्यंत सोडून या....” नोकरानी तत्परतेने महाराजांच्या हुकूमाची अंमलबजावणी केली अन् अनंता कमलेसह मठातून बाहेर पडला. झाल्या प्रकाराचा महाराजांनी मात्र चांगलाच धसका घेतला. स्त्रीचा प्रतिकार इतका तीव्र असू शकेल अशी महाराजांना कल्पनाही नव्हती. कमलेची आठवण झाली तरी त्यांच्या छातीत कळ उठायची...

महिनाभराने अनंताने गाडे रुळावर आले. तो चांगला नॉर्मल झाला. एकाच दिवसात त्याला घरचा कंटाळा आला. गुरुधामात जायची इच्छा अनावर झाली. त्याने आईकडे हा विषय काढला. कमलेने गुरुधामात केलेली आगळीक आईने त्याच्या कानी घातली. अनंताचा पारा चढला. तो खाणाखुणा करुन कमलेला जाब विचारु लागला. खूप वेळ नवरा बायकोची वादावादी झाली. महाराजांची आगळीक, त्यांनी केलेली अगोचरी मागणी सारे काही व्यक्त करण्याचा तिने प्रयत्न केला. कसे कोण जाणे पण काय प्रसंग तिच्यावर गुदरला याचे दृष्य अनंताच्या

अंतःचक्षूसमोर साकार झाले.

गुरुधामातल्या पाच-सहा वर्षांच्या त्याच्या रहिवासामध्ये महाराजांचा लंपट स्त्रैण स्वभाव त्यालाही उमगलेला... पण पुत्रासमान मानलेल्या अनंताच्या बाबतीत अशी काही आगळीक ते करु धजावतील अशी शंकाही त्याला का यावी? तसेच त्यांचे वय पाहता वासनेची जागृतीच कशी झाली याचे आश्चर्य त्याला वाटले. कमलेचे व्यंग, तिची असहाय्यता यांचा गैरफायदा घेणारा हा नराधम... नीच... महाराज.... अनंताची कानशिले गरम झाली. हाताच्या मुठी वळू लागल्या. पण खूप संयमाने भावनावेग आवरुन त्याने एक बेत योजला.

दोन दिवसानी सकाळीच अनंता अन् कमला घराबाहेर पडली. "आम्ही गुरुधामात जाऊन येतो... मला इथे चैन पडायची नाही." असे आईला सांगून अनंता स्टॅंडकडे चालू लागला. नवरा कुठे जाणार कमलेला माहित नव्हते. एक दोन वेळा तिने खाणाखुणा केल्या पण डोळे वटारुन अनंताने तिला गप्प बसविले. दत्तवाडी स्टॅंडवर गाडी थांबली. कमलेला खूण करुन अनंता खाली उतरला. खाली उतरुन आजूबाजूला पाहिल्यावर नवरा आपल्याला कुठे घेऊन जाणार आहे कमलेने ओळखले. त्याच्या खांद्याला स्पर्श करुन तिने हात जोडले. कृपा करुन गुरुधामात जाऊया नको... वाटेल ते कष्ट मी काढीन... उपाशी राहीन पण महाराजाचे तोंड पहाणे नको... अनंताला

कसे पटवून द्यावे तिला कळेनासे झाले.

कमलेच्या हातावर थोपटल्यासारखे करुन त्याने काय खाणाखुणा केल्या ते कमलाच जाणे. पण ओठ आवळून तिने पावले उचलली. दोघे गुरुधामात पोहोचली तेव्हा आरत्या सुरु झाल्या होत्या. दत्ताची आरती, पंचायतनाची आती झाली अन् ‘घालिन लोटांगण’ सुरु झाले. आरत्या संपल्या आणि रिवाजाप्रमाणे हलक्या टाळ्यांच्या गजरात “दिगंबरा दिगंबरा’ भजन सुरु झाले. भजनाची लय हळूहळू वाढत चालली. “अवधूत चिंतन श्री बालमुकुंद गुरुदेव दत्त” किनऱ्या स्वरात आरोळी ठोकीत महाराज उठले. डुलत डुलत ते गाभाऱ्याच्या द्वारापाशी आले. चौकटीला रेलून तोल सावरीत चांदीच्या झारीतील पाणी भक्तांवर सपासपा शिंपडू लागले. नेमक्या त्याचवेळी ‘सद्गुरुंनी बाग लावियली’ हे महाराजांचे आवडते गीत अनंताने सुरु केले. महाराज दचकले अन् भुवया उंचावीत त्यांनी अनंताकडे पाहिले. तो तल्लीन होऊन पद आळवू लागला. महाराजांनी हात उंचावल्यासारखे करुन डोळे मिटून घेतले. दोन चरण म्हटल्यावर अनंता भक्तगणाना बाजूला सारीत महाराजांच्या सन्मुख ठाकला. त्याने तिसरे कडवे नवीनच जुळवले...

“वासनेचे बीज रोवियले
अनीतीच्या जले शिंपियले

विषवल्ली कोंब बघ फुटले
छेदी अनंत हा तत्काळी...."

ओळींचा अर्थ ध्यानी येऊन भक्तगण चमकून एकमेकांकडे पाहू लागले. धृपद आळवून महाराजांना अभिवादन करीत अनंताने पॅटच्या खिशात हात घातला. काय होतेय हे कळण्यापूर्वीच चाकूचे पाते उघडून चौकटीला ओठंगलेल्या महाराजांच्या छातीत-पोटात त्याने सपासप वार केले. महाराज केळीच्या खांबासारखे धाडकन आडवे झाले. त्यांच्या छाताडावर पाय ठेवून अनंता खाली वाकला आणि त्यांच्या गळ्यात चाकूचे पाते रुतवीत निम्मा कंठ भाग चराचरा कापून काढला. शांतपणे चाकू उपसून पॅटवर पुसून पाते स्वच्छ करीत तो पादुकांसमोर गेला. पादुकांवर चाकू ठेवून समोरच्या तबकातली ओंजळभर फुले त्यावर टाकली आणि विनम्रभावाने तो नतमस्तक झाला.

# ४. बांडगूळ

गडमठ पंचक्रोशी शिक्षण प्रसारण मंडळाची अटी तटीची निवडणूक दोन तासांवर येऊन ठेपली. धर्मदाय आयुक्तांनी नेमलेल्या प्रशासकाला डोणग्यांनी मॅनेज केलेले.... इलेक्शन प्रोग्रॅम डिक्लेअर होण्यापूर्वी एक दिवस डोणग्यांनी त्यांच्या वगीतले ६० मेंबर्स नव्याने दाखल करुन घेतलेले. जुन्या मेंबर्सपैकी जवळपास निम्मे लोक आतुन पैसे देऊन खरेदी केलेले.... आबा दळवी चारीमुंड्या चीत होणार याची हेडमास्तर आणि संस्था अध्यक्ष ज्ये. वाय्. डोणग्यांना शंभर टक्के खात्री.... तरीही खबरदारीचा उपाय म्हणून ज्ये. वाय्. डोणग्यांचा भाऊ..... संस्थेचा सेक्रेटरी आणि हायस्कुलचा क्लार्क क्रिष्णा डोणग्याने प्लॅन आखला....प्लॅनची कार्यवाही अखेरच्या क्षणाला करायची.... ती वेळ येऊन ठेपली.... के. वाय. उर्फ कृष्णा डोणगेनी झिप्रेसरांना खूण करुन ते स्वतः ज्ये. वाय्. डोणग्यांच्या केबिनमध्ये शिरले.... !

अवचितपणे के. वाय्. आलेला बघून धास्तावलेल्या ज्ये. वाय्. नी विचारणा केली, “समदं येवस्तित हाय न्हवं.... किस्ना?

तू आनी कस्काय आला रं?" ज्ये. वाय्. च्या कानाशी लागत किस्ना म्हणाल, "दाजी... परस्थिती जरा गंभीर हाय पर काळजी करायच काय कारन न्हाई.... समदं बैजवार मागनं आनी सांगतोय... त्या फकस्त बगीत ऱ्हा गपगुमान... आता एवड्यात आबा दळव्याला फुडं घालून डुंबरं येतंय् बघ.... काय बोलायच.... कस करायच म्या बगतु, त्वा फक्त मुंडी हलवायचं काम कर...." एवढ बोलणं होतय तवर आबा दळवी भेटायला आल्याची खबर द्यायला डुंबरे शिपाई आत आला.

त्याला हो नाही सांगण्यापूर्वीच आबा दळवी दमदार पावले टाकीत केबिन मध्ये प्रवेश करते झाले.... अनवधानाने ज्ये. वाय्. खुर्चीतून उठून उभे राहीले.... खरंतर या क्षणी तरी आबा दळवी संस्थेचे पदाधिकारी नव्हते.... त्यांनी स्वेच्छेने चेअरमन पदाचा राजीनामा देऊन मंडळाचा कारभार ज्ये. वाय्. के. वाय् बंधु यांना कुरण म्हणून मोकळा सोडला त्या गोष्टीला चवदा वर्ष उलटलेली.... आजच्या इलेक्शन लागल्या... धर्मादाय आयुक्तानी प्रशासक नेमला या कारस्थानाचे सूत्रधार आबा दळवी.....

आबांचा दराराच तसा होता. स्वतःला उच्च शहाण्णव कुळी मराठा म्हणविणारे..... कोकणात शहाण्णव कुळी मराठ्यांची चार नामांकीत कुळे.... सावंत, साळवी, निकम, दळवी असा अभिमानाने उल्लेख आबा करायचे. तांबुस गौरवर्ण, भव्य

भालप्रदेश, पिढीजात खानदान प्रत्ययाला यावे असे उंचपुरे, धिप्पाड शरीर यष्टी असलेले..... समोरच्या इसमाकडे नजर रोखुन बघितल्यावर समोरचा इसम अदबीने नजर झुकवून चपापलाच पाहीजे असं संपन्न, प्रभावी व्यक्तिमत्व निसर्गानेच आबाना बहाल केलेलं. आबांचा लौकीकही त्यांच्या खानदानाला शोभणारा..... धुतल्या तांदळासारखे निर्मळ स्वच्छ चारित्र्य.... दातृत्व तर असं की दाराशी आलेला कोणीही याचक विन्मुख जाता नये याकडे त्यांचा कटाक्ष.... आसमंतातल्या दहा गावच्या लोकांचा उल्लेख आबा 'रयत' असा करायचे अन् रयत आबांचा उल्लेख सरदार दळवी असा करायचे.

गडमठ पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडाळाची स्थापना १९६८ साली आबांनी केलेली...... मुंबई गोवा महामार्गापासुन ६ मैल अंतरावर असलेले गडमठ! त्याच्या शेजारचे आवळेगाव, गिसणगाव, पांग्रड, दुकानवाड, कट्टा, कुसगाव, पियाळी, कुंभवडे, शिरगाव या उर्वरीत नऊ गावात तेव्हा माध्यमिक शाळाच नव्हती. सातवीपर्यंत पूर्ण प्राथमिक शाळा पूर्ण करुन पी.एस्.सी. परीक्षा पास झाल्यावर मुलं पणदुर, कुडाळ हायस्कुल मध्ये जायची.... दोन्ही ठिकाणच्या हायस्कुल मध्ये जायला या दशक्रोशीतल्या मुलांना ८ ते १० मैल अंतर पायी काटावं लागत असे. अर्थात बरीच मुलं पी.एस्.सी./ सातवी झाल्यावर घरीच बसायची.... तरीही दोन्ही ठिकाणच्या जवळ

जवळ एका वर्गाचा पट म्हणजे ३५ ते ४० मुलं गडमठसह पंचक्रोशीतली असायची.

आबांची तीन नंबरची मुलगी कुसुम सहावी पास झाली.... मुलगी अत्यंत हुशार पी.एस्.सी. परीक्षेला कुडाळ तालुक्यात गडमठचा झेंडा ती फडकवणार असं मुख्याध्यापक नरे गुरुजींनी आबाना छातीठोक सांगितलं अन् आबा विचारात मग्न झाले. कुसुमचे मोठे भाऊ प्रशांत, अशोक यांनी सहा मैलाची रोजची चाल झेपवून माध्यमिक शिक्षण सुरु ठेवल खरं पण कुसुमला हे कसं काय झेपेल याचा घोरच आबांना लागला. त्याच वर्षी मे महिन्यात आबांचे साडभाऊ बापर्ड्यातले भगवंतराव नाईकधुरे गडमठला आले. भगवंतराव राजभवनामध्ये सेक्शन ऑफिसर.... वर्ष दोन वर्षांनी त्यांची कोकण खेप व्हायची त्यावेळी ते आवर्जुन आबांकडे खेप करायचे.... या शिरस्त्याप्रमाणे नाईकधुरी आले. रात्री जेवण खाण झाल्यावर गप्पांच्या ओघात कुसुमच्या सातवी नंतरच्या शिक्षणाचा विषय निघाला. भगवंतराव सहजपणे बोलुन गेले.... "तुमचं एवढं तालेवार घराणं.... दशक्रोशीत तुम्हाला राजघराणं म्हणुन मान आहे.... तुम्ही मनात आणलत तर एक उत्तम संस्था तुम्ही पेलू शकता....

दुकानवाडची तुमची वखार तर रिकामीच आहे. थोडीशी डागडुजी केलात तरी पुरेशी आहे. शासन मान्यतेचे काम

आमच्यावर सोपवा...." भगवंतरावांच म्हणणं आबांनी मनावर घेतलं. रात्री उशीरापर्यंत पाव्हण्या पाव्हण्यांचे बेत ठरले. दुसऱ्या दिवशी सकाळी नरे गुरुजींना वाड्यावर बोलवून संस्थेची घटना, नियामक मंडळ अशा कागदपत्रांची तयारी सुरु झाली. भगवंतरावांचा मुक्काम चार दिवस लांबला. गडमठ पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्या नोंदणीचा प्रस्ताव करूनच भगवंतराव रवाना झाले. महिनाभरातच रजिस्ट्रेशनचं काम पूर्ण झालं. हायस्कुलला मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करुन आबा दळवी समक्ष मुंबईला गेले.

भगवंतरावांनी दिला शब्द पाळला. दिवाळीपूर्वी दोन दिवस ग्रँट इन एड् बेसिसवर हायस्कुलच्या मान्यतेची ऑर्डर आबांच्या हाती आली. आबांनी आता मोठ्या हुरुपाने कंबर कसली. वखारीची नऊ खणांची प्रशस्त इमारत, सभोवतीच्या तीन एकर जागेसह आबांनी बक्षिसपत्राने संस्थेकडे वर्ग केली. पंचक्रोशीतली तालेवार माणसं मंडळाच्या सभासद यादीत समाविष्ट झाली. महिन्या महिन्याला मिटींगा झडायला लागल्या. आबा अन् नरे गुरुजींच्या रत्नागिरीला शिक्षणाधिकारी कार्यालयात चकरा झाल्या. फेब्रुवारीमध्ये शिक्षणाधिकारी शास्त्री साहेबांनी समक्ष व्हिजीट दिली. शाळेची नियोजीत इमारत आणि परिसर बघून शास्त्री साहेब बेहद खुश झाले.

आबा, नरे गुरुजी, बाबा कुसगावकर, बाप्पा मर्गज, दाजी राऊळ, दिवाकर दिक्षीत अशी संस्थेची पदाधिकारी मंडळी दशक्रोशीत फिरली. सातवीत शिकणाऱ्या मुलांच्या पालकांच्या समक्ष भेटी घेतल्या. जूनमध्ये शाळा सुरु झाली.

त्या दिवशी आठवीचा पट सत्तरच्या पुढे गेला. त्यावेळी शिक्षक मंडळी सगळी घाटावरची असायची. कोकणातले संस्था चालक चेष्टेने म्हणायचे, "पावसाळा सुरु झाला की कोकणातले लोक दोन कारणांसाठी घाटावर जातात, शेतीसाठी घाटी पाडे (बैल) आणायला आणि हायस्कूलसाठी शिक्षक आणायला." शिक्षकांसाठीच्या जाहिराती बहुसंख्येने पुढारीमध्ये दिल्या जायच्या. इंटरव्ह्यू कोल्हापूरात मन्याबापू पडळकरांच्या सेरेकन गेस्ट हाऊसमध्ये नाहीतर शाळांना सायन्स मटेरियल पुरवणाऱ्या सरमळकरांच्या शाहुपुरीतल्या दुकानात व्हायचे. संस्था चालक मंडळी चार चार दिवस कोल्हापूरला तळ ठोकून रहायची अन् शिक्षकांना सोबत घेऊनच यायची.

कुणीतरी स्थानिक, किमानपक्षी कोकणातले शिक्षक उमेदवार असावेत असं गडमठच्या संस्था पदाधिकाऱ्यांना वाटायचं ! येणाऱ्या पन्नास साठ विनंती अर्जात दोन तीन अर्जसुद्धा कोकणातल्या स्थायिकांचे नसायचे. यष्टीशी (STC), सी.पी.एड्. (C.P.Ed.), यफ.डी.शी.ये.टी.डी. (FDC/ATD)

आणि शिकस्त इंटर आर्टस् असली बिरुद मिरवणाऱ्या, विद्वत्तेच्या नावानं सो-सो असणाऱ्यांची, शुद्ध मराठी बोलायला लिहायला न येणाऱ्या, पदवी सोडाच मॅट्रिक बद्दलही शंका वाटावी असं सुमार ज्ञान असणाऱ्यांची खोगीर भरती बहुसंख्येने असायची. मुलाखतीसाठी आलेले उमेदवार कुणाकुणाच्या ओळखी, मध्यस्ती घेऊन यायचे. नेमणूक मिळण्यासाठी अक्षरशः हांजी हांजी करायचे. कुडाळ, सावंतवाडी, कणकवली मधल्या हायस्कूल शिक्षकांकडे गावाकडच्या इच्छुक उमेदवारांचा डेरा पडायचा. त्यांच्या बिऱ्हाडी पाच-पाच सहा-सहा उमेदवार तळ ठोकून रहायचे. नोकरदार शिक्षक नाना खटपटी करुन त्यांना कुठे कुठे चिकटवून द्यायचे.

हुशार कष्टाळू शिक्षकांची वानवा असायची. आबांची कुसुम शिकत असल्यामुळे शाळेतली इत्थंभूत माहिती आबांकडे असायची. आरंभीच्या दोन वर्षात कायम करण्या जोगा एकही शिक्षक लाभला नाही. हेडमास्तर पोस्टसाठी बी.एड्. उमेदवारच मिळाला नव्हता. हायस्कूलमध्ये दहावीचा वर्ग सुरु झाला त्यावर्षी सालाबादप्रमाणे संस्थेने जाहिरात प्रसिद्ध केली. जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर चौथ्याच दिवशी कसालच्या हिरेमठ सरांसोबत जे. वाय्. डोणगे समक्ष आबांना भेटायला आले. हिरेमठ सरांचा मोठा लौकिक. आबाही त्यांचं

नाव ऐकून असलेले. खेरीज डोणग्यांनी शिक्षणाधिकारी शास्त्री साहेबांचं खाजगी शिफारस पत्रही आबांना दिलं. डोणग्यांचं बोलणं अशुद्ध.... रत्नागिरीत शिर्के हायस्कूलमध्ये चार-पाच वर्ष अनुभव घेऊनही त्यांचं बोलणं गावरान राहिलेलं.... स्वतःचा उल्लेख खुद्द तेच ज्ये.वाय्. डोनगे असा करायचे. पण मनुष्य बी.एस्सी.बी.एड्.... त्यावेळी बी.एस्सी. क्वालिफिकेशन दुर्लभ मानलं जायचं. गणित, सायन्स आणि इंग्रजी या विषयांची क्वालिफाईड माणसं मोठ्या नामांकित हायस्कूलमध्येही नसायची.

ज्ये.वाय्.डोनग्यानी हेडमास्तर म्हणून पदभार स्वीकारला अन् आबांचा ताप बराचसा कमी झाला. गेली दोन वर्ष शाळेतल्या शिक्षकांची काहीना काही खेकटी सुरु असायची. पहिल्या वर्षीच आठवीच्या दोन तुकड्या कराव्या लागल्या. तीन ठिकाणचे तीन लोक.... प्रत्येक जण एकमेकावर कुरघोडया करायला बघायचे. संस्थेच्या लोकांना भेटून एकमेकांच्या कागाळ्या सांगायचे. सगळ्याच संस्था पदाधिकाऱ्याना या गोष्टी नविन होत्या. कुणाचं खरं आणि कुणाचं खोटं काहीच समजायला पत्ता नाही. दुसऱ्या वर्षी पी.टी. शिक्षक शिवपुत्र मठपती आणि ड्राईंग शिक्षक भुजबळे यानी भलताच प्रकार केला. दोघेही अविवाहित....९अ मध्ये आबांची कुसुम असायची..... तो वर्ग वगळता इतर तीन वर्गातल्या मुलींशी

दोघेही लगट करायचे. काहीना काही कारण काढून दिसायला बऱ्यापैकी असणाऱ्या मुलींना स्टाफरूममध्ये बोलावून घ्यायचे.

मठपती-भुजबळे यांचा आंबटशोक मुलांच्याही लक्षात आला. एका टारगट पोराने 'मठपती-भुजबळे बोर्डावर आले' असं मुतारीतल्या भिंतीवर लिहीलं.... शाळाभर त्याची चर्चा झाली. दोघानी बोर्ड लिहीणाऱ्याचा शोध सुरु केला. लिहीणारं बिलंदर टोळकं बाजूला आणि भलत्याच मुलांची नावे संशयितांच्या यादीत गेली. ही घटना झाली आणि आठवडाभराने मर्गजांचा विश्वनाथ, दिवाकर कुलकर्णी, सतीश कुसगावकर या नववीतल्या तीन मुलांना मठपती भुजबळे जोडगोळीने खोलीवर बोलावून घेतले. खोदून खोदून विचारले तरी मुलं आपण लिहील्याचं कबूल करीनात. मुळात संशयित म्हणून बोलावलेली तीनही मुलं घरंदाज कुटुंबातली. सरांनी आपला सशंय घेतला यामुळेच तिघेही हादरलेले.... त्यांचं त-त-प-प झाल्यावर मठपतींचा संशय अधिकच दुणावला. रागाने बेभान झालेल्या त्या पी.टी. शिक्षकाने तिघांनाही बेदम मार दिला. गुन्हा मात्र कुणीच कबुल केला नाही. इतका मार खाऊनही मुलं हो म्हणेनात तेव्हा मात्र भुजबळे भानावर आले. त्यांनी मठपतींना आवरल. आपलं कर्म बाहेर फुटु नये म्हणून दोघानीही अगदी खालच्या पातळीवर जाऊन 'जित्त गाडून टाकू' असा सज्जड दम दिला. हादरलेली मुलं

चोरासाखी घरी गेली.

घरी गेल्यावर तिघानाही सणकून ताप भरला. मुलं जेवली नाहीत.... कुणी काही सांगे ना.... दुसऱ्या दिवशी मर्गजांचा विश्वनाथ आंघोळ करीत असताना त्याच्या चुलतीने त्याच्या अंगावरचे माराचे वळ बघितले. ही गोष्ट तिने विश्वनाथच्या आईला सांगितली. तो आंघोळ करुन शर्ट पँट घालून घरात आला तेव्हा आईने त्याला शर्ट काढायला सांगितला. विश्वनाथ शर्ट काढायला तयार होईना. जावा-जावांनी जबरदस्तीने त्याचा शर्ट काढला.... पाठीवर काळे निळे वळ बघून विश्वनाथच्या आईला चक्कर आली. गोष्ट पुरुष माणसांच्या कानी गेली. खुप चौकशी केल्यावर भीतीने लटा-लटा कापत विश्वनाथने झाली गोष्ट सांगितली आणि आपण इतःपर शाळेत जाणार नाही असे जाहीर केले.

मर्गज आणि कुलकर्णी दोघेही कुसगावकरांच्या घरी गेले. कुसगावकरांचा सतीश मार पचवूनही शाळेत गेलेला. दिवाकर मात्र तापाने फणफणून घरी झोपून राहीलेला. एक एक गोष्ट उजेडात आली. माणसं आबा दळवीना भेटली. मर्गज आणि कुलकर्णी दोन्ही मुलांची स्थिती बघून आबा हादरले. चिडलेले दहा बारा ग्रामस्थ आणि आबा दुपारी दोन वाजता शाळेत पोहोचले. सतीश कुसगावकरला स्टाफरुममध्ये बोलावून घेऊन आबांनी शिक्षकांना शाळा सोडून द्यायचा हुकुम दिला. मुलं

निघून गेल्यावर मठपती, भुजबळ दुक्कलीची चौकशी सुरु झाली. भुजबळ बधले पण मठपती मात्र अद्वातद्वा करायला लागले. मुलांनी गुन्हा कबूल केला असाच ठेका त्यांनी धरला. आपण केले ते योग्यच आहे.कोणाच्या बापाला भीत नाही.... कुडाळचे पोलिस इन्स्पेक्टर ओळखीचे आहेत.अशी भाषा त्यांनी सुरु केल्यावर मात्र आबांचा पारा चढला "आधी आवाज खाली."आबा गरजले,"तुम्ही शिक्षक अहात की गुंड-मवाली ?"

"शिस्तीसाठी शिक्षा करणं मी मान्य करतो. आधी हा प्रकार कुणीच आमच्या कानावर का घातला नाही? आम्ही जातीनिशी चौकशी करुन टवाळखोर मुलं शोधून काढली असती. दुसरी गोष्ट तुमचं वागणं सभ्य नाही या गोष्टी आमच्याही कानावर आलेल्या आहेत...." आबा दळवीनी हे बोलल्यावर गुडघ्यात मेंदू असणारा मठपती दात ओठ खात मुठी वळून गरजला, "कोन रांडचा हरामजादा हे सांगतोय् त्येला फुडं आना न्हाई जित्ता गाडला तर...." मठपतींचे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच त्यांच्या तोंडून अर्वाच्य शब्द उच्चारले जाताच संतापलेल्या आबा दळवींनी मठपती सरांच्या झिंज्या पकडून कानाखाली अशी सणसणीत थप्पड लगावली की आबांच्या पंज्याचा नकाशा त्यांच्या गालफडावर उमटला. बसल्या बैठकीत दोघांचेही राजिनामे घेऊन त्यांना संध्याकाळी पाच वाजताच्या कुडाळ गाडीने गाव सोडून जायची समज आबांनी दिली.

शाळेला अनुदान तत्त्वावर मान्यता मिळालेली असली तरी प्रत्यक्ष ग्रँट एकवर्ष पूर्ण झाल्यावर मिळायची.... दरम्यानच्या काळात संपूर्ण खर्चाची जबाबदारी एकट्या आबांच्या शिरावर. कार्यकारणीत काही सधन सभासद होते पण प्रत्यक्ष खिशात हात घालताना सगळेच काचकूच करायचे. कर्मचारी वर्गाला ठराविक वेतन द्यायचे आणि पगार बीलावर मात्र पूर्ण वेतनासाठी सही घ्यायची असे सल्लेही काही विस्थापितानी दिले. पण हे पापकर्म आबा दळवींना जमणारे नव्हते. आपल्या पायाखाली काय जळत आहे ते बघून जगाला बोध द्यायचा असा त्यांचा खाक्या.... दहाक्रोशीतल्या लोकांना आबा रयत म्हणायचे. स्वतःचाच नव्हे तर कुटुंबीयांचाही उल्लेख 'आम्ही' 'तुम्ही' असा ते करायचे पण हा देखावा बेगडी नसायचा..... शास्त्याची निस्पृहता आणि दातृत्व हे त्यांचे स्वभाव विशेष.... शुद्ध चारित्र्य आणि स्वच्छ नीती हा ते कुटुंब धर्म मानायचे.

आबांचा कुटुंब कबिलाही मोठा ! त्यांचे तीन भाऊ मुंबई इंदूर सुरत या ठिकाणी व्यवसाय करायचे. आबानी हायस्कूल सुरु केल्यावर त्यांचे भाऊ भक्कमपणे त्यांच्या पाठीशी उभे राहीले.... हायस्कूल हे दळवी खानदानाचे राज्य संस्थान आहे. या धारणेने शाळेच्या व्यवहारात काटकसर कुठेच नसायची. कर्मचारी त्यांच्या या स्वभावाचा पुरेपुर फायदा घ्यायचे. आबा पाण्यासारखा पैसा खर्च करायचे पण एकूण शाळेचा कारभार

मात्र मनाजोगता होत नव्हता. सदैव नाना कटकटी सुरु असायच्या. या साऱ्या पार्श्वभूमीवर ज्ये.वाय्. डोणगेंणी मुख्याध्यापक पदाची सूत्रं स्वीकारली. आठवडाभरात शाळेला शिस्त लागली. ऐतखाऊ शिपाई, बेमुर्वतखोर शिक्षक सगळ्यांना ज्ये.वाय्. नी पध्दतशीर सरळ केले.

डोणगे येण्यापूर्वी कधिही शाळेत गेलं तर कायम पोरांचा गलका नी कालवा मासळी बाजारा सारखा सुरु असायचा. आबा दळवी शाळेकडे येताना बघितल्यावर नाईलाजाने वर्गावर जाणारे महाभागही होते. डोणग्यांनी सूत्रं हाती घेतल्यावर बजबजपूरी बंद झाली. ते हजर झाल्यावर आठवडाभराने संध्याकाळी चारच्या सुमाराला आबा हायस्कूलकडे गेले. ग्राऊंडवर संपूर्ण शाळेची मुलं रांगेत उभी राहून सामुदायिक कवायत करताना दिसली. विशेष म्हणजे ज्ये.वाय्. ग्राऊंडवर नव्हते. जरा पुढे गेल्यावर बाहेरच्या भिंतींवर सुविचार, बातम्या, पंचांग लिहिलेले दिसले. मुख्याध्यापकांच्या खोलीकडे जाईपर्यंत दोन वर्गात आबा डोकावले.... भिंतीवर नकाशे, चित्रे, तक्ते व्यवस्थित लावलेले. फलकावर त्या दिवसाचा पट लिहीलेला. आबाना खूपच हुरुप आला.

महिनाभर गेला आणि एक दोन शिक्षक हेडमास्तरांविरुद्ध काही बाही कागाळ्या सांगायला दळव्यांच्या वाड्यावर गेले. त्यांच्या कागाळ्या तक्रारीमध्ये काहीच दम नव्हता. पाच मिनिटं

उशीर झाला म्हणून ज्ये.वाय्. अद्वातद्वा बोलले.... गृहपाठ तपासायचे राहीले म्हणून मेमो दिला... भर वर्गात मुलांसमोर डोणगेसर मास्तरांच्या चुका काढून त्यांची कान उघडणी करतात. ह्या आणि असल्या तक्रारी सांगून तलवारीच्या धारेवर चालणारा कायदा पाळून शाळा चालत नसतात.... मंडळी अनुभवी आहे.... एकतर आडखेड्यात यायला मास्तर राजी नसतात.... हम करेसो कायद्याने शिक्षक टिकणार नाहीत आणि एकदा बभ्रा झाला तर नवीन माणूस इकडे वळायचाही नाही.

या तक्रारी ऐकून आबा चुचकारुन घेतील.... मी हेडमास्तराना सांगतो.... तुम्ही काही काळजी करु नका असा दिलासा देतील अशा या अपेक्षेने आलेली मंडळी.... त्याना पुरते बोलू देण्यापूर्वीच आबा कडाडले, "आम्ही शाळा काढली ती या दशक्रोशीतल्या रयतेची मुले शिकावीत, पुढे यावीत यासाठी, मास्तरांची पोटे भरण्यासाठी नाही.... इतर संस्थामधून काय प्रकार चालतात ते जरा बघा.... तीन-तीन महिने कर्मचाऱ्यांना पै सुद्धा देत नाहीत. सही करायची एका आकड्यावर आणि घेतानाचा आकडा वेगळा असे प्रकार सर्रास सुरु आहेत. आम्ही दर महिन्याची पाच तारीख उलटायला देत नाही. मी दोन वर्ष बारकाईने पहातोय.... सगळी खोगीर भरती.... हायस्कूल सुरु करण्यापेक्षा कुडाळात किराणा भुसारी दुकान नाहीतर हॉटेल टाकले असते तरी बरे झाले असते असे लाखवेळा आमच्या

मनात यायचे. पण डोणगे आले आणि शाळेत शिस्त आली, रांबाडपणा बंद झाला शाळेत फिरावे, वर्गात डोकावून पहावे असे वाटते...."

मग माजघराकडे मोहरा वळवीत आबानी ऑर्डर सोडली, "हायस्कूलमधली शिक्षक मंडळी आली आहेत...." त्यांचे बोलणे पूर्ण होण्यापूर्वी मुगाच्या लाडवांचे ताट आणि केशरी दुधाचे पेले घेऊन कामवाली बैठकीच्या खोलीत आली. "घ्या.... लाडू घ्या, दूध प्या.... आम्ही सर्व अधिकारांसह शाळा डोणगेसाहेबांकडे सुपूर्त केली आहे याचा अर्थ आम्ही डोळे मिटून आहोत असा नाही. काही आगळीक गैरप्रकार घडला तर तो आमच्यापर्यंत दखल होईल.... त्याचा जाब आम्ही आमच्या पद्धतीने विचारु पण शिस्तीच्या बाबतीत तडजोड नाही. एक शिक्षक गेला तर दुसरा आणू.... जादा पगार देऊन आणू पण इथे हेडमास्तरांच्या शिस्तीतच वागावे लागेल. तुमच्या सहकारी वर्गाला जरा समज द्या. अंतर्गत बारीकसारीक गोष्टी आमच्या पर्यंत आणू नका.... आम्हाला सावध करायचाही प्रयत्न करु नका, आम्ही बेसावध नाही. ज्याने त्याने आपले काम चोख करा."

आबांकडे डाळ शिजली नाही तेव्हा आलेल्या मंडळीपैकी मतलबी शिक्षक डोणग्यांना भेटले. आबांकडे कोण काय चुगल्या सांगतो ते समजण्यासाठी आम्ही त्यांच्यातलेच आहोत असे आम्ही भासवले अशी मल्लीनाथी करत आबांकडे झालेल्या

गोष्टींची बित्तंबातमी आणखी तिखट-मीठ, हिंग-जिरे लावून त्यांनी डोणग्यांना दिली. आपली नीती यशस्वी होणार हे उमजून डोणगे हरखले. त्यानी हळू हळू सगळा कारभार आपल्या कवजात घेतला आणि ब्रिटीशी नीतीने हातपाय पसरायला सुरुवात केली. वक्तशीरपणा, शिस्त हे डोणग्यांचे दाखवायचे दात, गनिमी कावा होता! त्याना अपेक्षा होती स्वतःचं निरंकुश एकछत्री साम्राज्य निर्माण करायची. त्यानी रणनीतीची एक एक तंत्र वापरायला सुरुवात केली.

हायस्कूलचा क्लार्क म्हणजे जणू नाक ! ते नेमकं आबांच्या कबजात. शिस्तीचा देखावा करताना ज्ये.वाय्. संधीची वाट बघत टपलेले. डोणगे रोजची डायरी ठेवायचे. त्यात बारीक सारीक दैनंदिन गोष्टींची नोंद रहायची. काम करताना चुका दिरंगाई ही होतच असते. क्लार्क लोकाना तर काम आवरता आवरत नाही. सगळं काम पूर्ण करुन आज मोकळा श्वास टाकला हा क्षण हायस्कूलमधल्या क्लार्कच्या भाग्यातच नसतो. किर्द पुष्कळदा अपुरी असायची, टपाल इनवर्ड आऊट वर्डला नोंदलेलं नसायचं, पाठवावयाच्या कागदपत्रांचे रकाने पूर्ण करताना तर असंख्य चुका, एक एक कागदपत्राचे तीन-तीनदा फेर लेखन करावे लागे. अशा चुकलेल्या कागदांची फाईलच डोणग्यांनी ठेवलेली कामपूर्ण करण्यासाठी तारीखवार दिलेल्या तोंडी सूचनांची नोंद ठेवलेली. सापळा रचून तयार झालेला अन्

एका गाफिल क्षणी साधले क्लार्क डोणग्यांच्या कचाट्यात सापडले.

भाच्याच्या मुंजीसाठी साधले क्लार्कनी रजा अर्ज दिला. डोणग्यांनी शेरा मारला "जा.नं. ३९२ दिनांक अमूक अमूक ची माहिती अर्जंट पाठवायची असल्याने रजा नामंजूर" खरं तर एवढी गंभीर बाब नव्हतीच ती. डोणगे आल्यापासून सव्वावर्षाच्या काळात साधल्यानी फक्त दोनच रजा घेतलेल्या. उलट रविवार आणि अन्य सुट्यांच्यावेळी सुद्धा दिवस दिवस थांबून ते काम ओढायचे. ऑफिस अवर्स तर काम पूर्ण होईल त्या वेळपर्यंत. हेडमास्तरांचा शेरा वाचून साधले चिडले.... 'काय करायचे असेल ते करा.... बिनपगारी रजा झाली तरी मी फिकीर करीत नाही.' अशी मुक्ताफळं उधळून साधल्यांनी अर्ज मस्टरमध्ये टाकला. ते दोन दिवसांच्या रजेवर गेले.

साधले कार्य उरकून तिसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता शाळेत आले. शिपायांची काम सुरु होती. पण ऑफिस बंद.... साधल्यांनी ऑफिस उघडायला सांगितलं तर 'किल्ली साहेबांकडे आहे' असं गोविंद शिपायाने उत्तर दिलं. रोज १०.३० ला शाळा भरायची. डोणगे सव्वादहाला आले. गोविंद शिपाई ऑफिसची चावी मागायला सायबांकडे गेला. 'नवीन कलारक् हाजर व्हईल तवाच हापिस उघडायचं.... तवर च्यावी आमापशी हाईल. आमाला काय कागूद लागतील तवा आमी सांगू" डोणगे उत्तरले.

त्यावर साधले क्लार्क ऑफिस उघडायला सांगताहेत असं गोविंद म्हणाला. त्यावर उसळून डोणगे म्हणाले, "कंचं साधलं म्हनायचं?" आम्ही वळकत न्हाई साधल नी फादल.... त्वा दीड दमडीचा पिऊन आणि मला शानपन शिकवितोस व्हय रे भाडया.... जा गुमान आपल काम कर... आज हापिस न्हाई उघडायच...."

साधलेंच्या पायाखालची जमिनच सरकली. ते तडक आबा दळवींच्या वाड्यावर गेले. साधले रजा नामंजूर असताना विनापरवानगी अनुपस्थित राहिले त्याच दिवशी साधलेंवर ठेवलेलं चार पानी चार्जशीट आणि वर्षभराची डायरी चुकलेल्या कागदपत्रांची फाईल घेऊन डोणगे समक्ष आबांना भेटून गेलेले. हजार वेळा तोंडी सुचना देऊनही साधले सुधारले नाहीत. कारकूनाचं काम तर त्यांना बिल्कुल येत नाही. वर आणि बेमुर्वतखोरपणा असंच सगळं चित्र डोणग्यांनी आबांसमोर उभं केलेलं. निस्पृह आबा दळवींना साधलेंच समर्थन करता आलं नाही. डोणग्यांच थोडसं अति होतंयू हे त्यांना कळत होतं पण परिस्थिती साधल्यांच्या विरोधात होती. साधले दिवाणखान्यात आबांसमोर उभे राहिले. त्यांनी काही सांगण्यापूर्वीच आबा म्हणाले "साधले.... तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती. तुम्ही चुका केल्यात ते खंडीभर कागद हेडमास्तरांनी दाखवले. ही चार्जशीट वाचा तुम्हाला दिलेल्या तोंडी सूचनांची तारीखवार नोंद आहे."

साधले मट्कन खाली बसले. त्यांना समजावीत आबा म्हणाले, "डोणग्यांनी रजा नामंजूर केली. तुमची एवढी निकड होती तर आम्हाला भेटायचं होतं. तुम्ही बेमुर्वतखोरपणे परभारे निघून गेलात. आज नाका तोंडात पाणी गेल्यावर इथे कशाला आलात? फार मोठी चूक केलात तुम्ही. इकडे आलात ते हेडमास्तरांना सांगून तरी आलात ना? की परस्परच?" साधले काय बोलणार ते भवितव्य समजून चुकले. डोळ्यातलं पाणी निग्रहाने थोपवीत तो मानी मनुष्य बोलला, "आबा संस्थेच्या पहिल्या सभेचं प्रोसेडिंग मी लिहीलं.... त्यानंतर हायस्कूल सुरु होईतो सगळं दप्तर मी सांभाळलं. माझीसुध्दा उमेदवारीच सुरु आहे. कारकून काही गर्भात शिकून जन्माला येत नाहीत. नोकरीला लागून साडेतीन वर्ष झाली. मी फक्त पाच वेळा रजा घेतल्यायत्.... रविवार सुटी.... सणवार काही न बघता कामाला वाहून घेतलं.... माझी चूक झाली.... हेडमास्तरांच्या अधिकाराला मी चॅलेंज केलं.... रजा मंजूर नसताना रजा घेतली..... माझ्या माघारी गंभीर राजकारण सुरु आहे. हे मात्र मला कळलं नव्हतं.... ठीक आहे.... मी सरांना सांगून पहातो." असं मोघमात बोलून साधले वाड्याबाहेर पडले.

साधले आबांकडून निघाले ते तडक बिऱ्हाडी गेले. राजिनामा खरडला तो रजिस्टर पोस्टाने पाठवून त्यांनी बिहाड आवरलं आणि संध्याकाळच्या कुडाळ गाडीने साधल्यांनी

गडमठ सोडलं. दुसऱ्या दिवशी साधलेला चार्जशीट देऊन पोच घेण्यासाठी गोविंद शिपाई त्यांच्या बिहऱ्हाडी गेला तेव्हा साधले गाव सोडून निघून गेल्याचं बाहेर फुटलं. साधलेंचा अध्याय संपला आणि दोन महिन्यांनी त्यांच्या रिकाम्या जागी ज्येवाय्चा भाऊ क्रिष्णा उर्फ क्येवाय् लिपिक म्हणून हायस्कूलच्या सेवेत रुजू झाला. स्टाफवर शिपाई तीन स्थानिक आणि तेही हायस्कूल सुरु झाल्यापासूनचे आणि शिक्षकांपैकी मराठीच्या मुंडले बाई एवढी स्थानिक मंडळी सोडली तर बाकीचा सगळा स्टाफ डोणग्यांनी आपल्या वर्गीच्या प्यादी फर्जदानी भरला.

मुंडले बाई अलिप्त होती, ना कुणाच्या अध्यात न मध्यात म्हणून टिकली. काही ना काही निमित्ताने रेकॉर्ड ठेऊन, चार्जशीट भरुन तीन शिपायांपैकी दोघांना बळीचे बकरे बनवले गेले. त्यांच्या ऐवजी के.वाय्. नी गावाकडं 'रामुशाचं पोर्ग-शिरपा' आणि घरच्या शेतीच्या वाटेल्याच्या मुलगा तम्मान्ना यांची भर्ती केली. दोन्ही शिपायांना निम्मा पगार मिळायचा, तशाच बोलीवर त्यांना भरती केलेलं! ज्ये.वाय्. आला आणि शाळेत शिस्त आली.शाळेच्या अंतर्गत कुरबुरी कमी झाल्यामुळे आबांचा ताप कमी झालेला. त्यामुळे काही बाबींकडे दुर्लक्ष करुन त्यांनी ज्ये.वाय्. ला पूर्ण स्वायत्तता दिली इतकंच.

हायस्कूलचा पट दिवसेंदिवस वाढतच चालला. आठवी,

नववी, दहावीच्या चार-पाच तुकड्या आणि पाचवी सहावी सातवीच्या दोन-दोन तुकड्या एवढा पसारा वाढलेला. वखारीच्या डाव्या-उजव्या अंगानी इमारत विस्तारत चालली. अनुदानाची पैन् पै शाळेसाठी खर्च व्हायला हवी याकडे आबांचा कटाक्ष असायचा. पण ज्ये.वाय्.-के.वाय्. संगनमताने शाळेच्या हिशोबातून खावडी काढायचे. विज्ञान साहित्य, क्रीडा साहित्य, स्टेशनरी सगळी खरेदी कोल्हापूर-सांगली इकडून केली जायची. बीलातले २०% ते २५% कमिशन ज्ये.वाय्. परस्पर खिशात टाकायचा. काही-काही साहित्याच्या तर नुसत्या पावत्या हिशोबाला लावल्या जात. प्रत्यक्ष सामान येतच नसे. तो पैसा ज्ये.वाय्. के.वाय्. परभारे हडप करायचे. स्कूल कमिटीच्या सभेत हिशोब सादर व्हायचा.... मेंबर मंजूरी द्यायचे, बस्स अधिक खोलात कोण कशाला शिरतो?

पाचसहा वर्ष बिनबोभाट गेली आणि मग मात्र ज्ये.वाय्. के.वाय्. नी गुण उधळायला सुरुवात केली. हायस्कूल नजिकच बाबु सुताराचं घर आणि परडं परसू.... त्याला हाताशी धरुन ज्ये.वाय्. नी भाडेकरूंसाठी इमारत बांधली. १४/१५ बिऱ्हाडकरूंसाठी तीन तीन खोल्यांची सोय केली. स्टाफवरचे आठ शिक्षक आणि खुद्द ज्ये.वाय्. के.वाय्. यानी आपली बिऱ्हाडं नव्या जागेत हलवली. जमिन विक्रीचे अगदी अल्प पैसे बाबूला मिळाले. सगळा व्यवहार के.वाय्. च्या बायकोच्या नावे

झालेला. पण सुतार मात्र इमारत माझी आहे असं सांगायचा. ज्ये.वाय्.-के.वाय्. नी गावाकडनं आणलेले शिपाई.... त्याना त्याच इमारतीत एकेक खोली दिलेली. हेडमास्तरांच्या घरी पाणी भरणे, भांडी घासणे, कपडे धुणे-सगळी कामं ते बिनबोभाट करायचे. लोकं या गोष्टींची चर्चा करायचे.... पण कुणाची काही तक्रार नसल्यामुळे सगळ्या गोष्टी खपून गेल्या.

आठवीची चौथी तुकडी वाढली त्या वर्षी दोन शिक्षकांची पदं निर्माण झाली. जाहिरात प्रसिद्ध झाली आणि कुणाकुणाचे अर्ज आले. यावेळी आबा दळवींनी सगळ्या गोष्टींमध्ये जातीनिशी लक्ष घातलेलं. आलेल्या अर्जात आठ उमेदवार स्थानिक बाकी पन्नास साठ अर्ज झाडून सगळे जिल्ह्याबाहेरचे. इंटरव्ह्यू झाले. आबांनी दोन स्थानिक उमेदवारांची निवड केली. एक सावंत नावाचे बी.ए. बीएड्. उमेदवार आणि दुसऱ्या ड्राईंग टीचर पाटकर बाई. नवीन आलेली दोन्ही माणसं शाळेनजिक सुताराच्या घराजवळच्या इमारतीतच खोल्या घेऊन राहिली. पाटकर बाई हजर झाल्या आणि महिनाभरातच त्यांचं ज्येवायूशी सूत जमलं. ज्येवाय्नी बायको मुलं यांना गावाकडे रवाना केलं. आता सगळं मैदान मोकळं.... ज्येवायू अन् पाटकरबाई यांचे प्रच्छन्न व्यवहार राजरोस सुरु झाले.

ज्येवायची राजरोस उठबस पाटकर बाईकडे असायची. बिऱ्हाडकरु म्हणजे ताटाखालची मांजरं.... सगळे डोळ्यावर

पडदा ओढून रहायचे. तरीही या गोष्टी गावात फुटल्याच. पण ज्येवाय्च्या दबदबा असा की तोंडावर विचारण्याची कुणाची हिम्मत झाली नसती. थोडीफार कुणकुण आबांच्या कानावरही गेली. गावातल्या बायकांमध्ये या गोष्टीची गांभिर्याने चर्चा व्हायची कुणीतरी आबा दळवींच्या मंडळींच्या कानावर या गोष्टी घातल्या. त्यांनी आबाना विचारल. असले प्रकार तत्काळ बंद व्हायला हवे असं खुद्द आबांच्या पत्नीनेच त्यांना बजावलं. आबानी खाजगीत ज्येवायू ना कानपिचक्या दिल्या. ज्ये.वाय्. नी मात्र उडवूनच लावलं. "हे इरोदकांच काम हाय.... येका चाळीत हातो म्हंताना कदीतरी येणंजाणं- च्या पाणी व्हतयच की.... आता समदं बिऱ्हाडकरु ष्टापवरचं.... आमी कुनाकडं बी बसतूया की.... बघनाऱ्यांच्या नदरेतच पाप.... तुम्ही ष्टापवरच्या मास्तरास्नी आमच्या मागारी विचरा की...." ज्येवाय्नी स्पष्टीकरण दिलं.

पाटकर बाईचे संबंध ज्ये.वाय्. पुरते मर्यादितच नव्हते. केवायू सुद्धा बाईशी सूत जुळवून राहिलेला. अर्थात केवाय नी पाटकर बाईच सूत गूत शाळेत चालायच. केवायूची बायको असल्यामुळे घराकडे तो सांभाळून वागायचा. शाळेत मात्र दोघांचं हसणं खिदळणं- गप्पाष्टकं राजरोस सुरु असायची. ज्येवायच्या अनुपस्थितीत तर दोघांना भलताच ऊत यायचा. मुलांमध्येही या संबंधाची बातमी फुटली. या गोष्टी ज्ये.वाय्.

समजून होता. पण त्याची काहीच आडकाठी नसायची. शाळा ही ज्ये.वाय्. केवायची को ऑपरेटीव सोसायटी.... तशी भागेदारी पाटकर बाईच्या संबंधातही दोघांनी मान्य केलेली.

शाळेत राजरोस हे प्रच्छन्न व्यवहार सुरु झाले. मुलांमध्ये चर्चा व्हायला लागल्या. आबांच्या मंडळींकडून तर भलतंच प्रेशर यायला लागलं. या सगळ्या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावायचं त्यानी पक्क केलं. गाठ ज्ये.वाय्. सारख्या बेरकी माणसाशी आहे. आबा ज्येवाय्ला पुरते ओळखून असलेले. भक्कम पुरावा हाती येईल तेव्हाच काय ती कारवाई करायची असं त्यानी योजलेलं त्यादृष्टीने त्यांची मोर्चे बांधणी झाली. आणि महिनाभरातच तशी संधी चालून आला. ज्ये.वाय्. शाळेच्या कामासाठी रत्नागिरीला गेलेले असतानाची गोष्ट. मधली जेवणाची सुट्टी संपून मुलं वर्गात गेली. तो मोका साधून के.वाय्. आणि पाटकरबाई लॅबोरेटरीत गेली. लक्ष ठेवायला दाराबाहेर रामुश्याचा शिरपा थांबलेला. खबर गेली अन् तीनचार नेमकी मंडळी घेऊन बाप्पा मर्गजानी शाळा गाठली.

बाप्पा आणि सोबतची मंडळी शाळेकडे पोहोचली. सगळे लॅबोरेटरीच्या बंद दरवाजा समोर थांबले. मंडळीना तिथे थांबायची खूण करुन आबानी ऑफिस गाठलं. इनचार्ज कोळी आबाना पाहताच सटपटले. बाप्पा जरबेच्या सुरात म्हणाले, "हेडमास्तर कुठे आहेत?" त्यांच्या नजरेला नजर देणं टाळीत

कोळी म्हणाले, "हेडसर, शिक्षणाधिकारी कार्यालयात रत्नागिरीला गेल्यात.... चार्ज माज्याकडं हाय...." मग बाप्पा कडाडले, "क्लार्क कुठे आहे? पाटकर बाई कुठे आहेत? बोलवा त्यांना...." कोळीसरांना झाल्या प्रकाराची कल्पनाच नव्हती. त्यानी शिरपाला बोलावलं. "अरे केवायू डोणगे सराना आणि पाटकर मॅडमना इकडे यायला सांग...." त्याना थांबवीत बाप्पा म्हणाले, "कोळी सर.... केवायू डोणगे आणि पाटकर बाई कुठे आहेत अशी तुमची कल्पना आहे? जावा.... सोबत आणखी दोन तीन शिक्षक मंडळी घेऊन लॅबोरेटरीकडे जावा.... लॅबोरेटरीबाहेर आमच्या सोबतची माणसं थांबली आहेत."

कोळीसर जायला निघाले. त्याना थांबवीत बाप्पा म्हणाले, "लॅबोरेटरीचा दरवाजा बंद असेल. धक्के मारुन दरवाजा उघडायला लावा आणि जे जे काही घडेल ते डोळे उघडे ठेऊन बघा.... त्या सगळ्याचा पंचनामा करायचा आहे." कोळीसर स्टाफमधले शिक्षक सोबत घेऊन लॅबोरेटरीकडे निघाले. दरम्यानच्या काळात तम्मान्ना शिपाई लॅबोरेटरीच्या मागील बाजूने खिडकीपाशी गेला. खूप वेळ टकटक केल्यावर खिडकीचे झडप किल किले करुन केवायू डोकावला, "म्या हाय न्हव हितं.... तू आनी कशापाय मराय् लागलाईस?" त्यावर माणसं घेऊन बाप्पा मर्गज आल्याची वार्ता तम्मान्नाने सांगितली. केवायुच्या तोंडच पाणीच पळालं. प्रसंगावधान

राखीत तो म्हणाला. "त्वा आसंच फुड जा आनि झिप्रसराला सांगून माणसास्नी बाजूला बलवून घे.... म्या गपचूप भाईर पडतो...." त्यावर या गोष्टीचा उपयोग नाही अस तम्मान्ना म्हणाला.

दारावर टक् टक् झाल. आतून काहीच प्रतिसाद मिळेना. कोळी सरानी जोरजोराने दरवाजावर थापा मारल्या. "आत कोण हाय.... दार उगडा पाट् किनी.... बाप्पा साब, स्कूल कमिटीचं मेंबरं साळंत आल्याती.... दार उघडा आदी...." दार उघडल.... पाटकर बाई दारात उभ्या राहिल्या त्यानी आवाज चढवीत म्हटलं, "कोळीसर ss हा काय तमाशा चाल्लाय .... ही माणस इथे काय करतायत् ? सगळ्यानी बाजूला व्हा आधी.... ही काय पद्धत झाली कां?" त्या सरशी माणसं थोडी मागे सरकली. बाई दरवाजातून चार पावल पुढे आल्या. माणसं अवाक् होऊन बघित राहिलेली अन् के.वाय्. पाठमोरा दाराच्या फटीतून बाहेर पडला अन् डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोवर धूम पळत सुटला. बघणाऱ्यांना घटनेचा बोध होईपर्यंत केवायु नजरेच्या टप्प्याआड नाहिसा झाला.

कोळीसरानी झाला प्रकार बाप्पांना जाऊन सांगितला बाप्पा हतबुद्ध झाले. मिनिटभर गप्प राहून त्यानी मनात काही जुळणी केली. मग सगळी मंडळी कोळीसरांसह चार-पाच शिक्षकांना घेऊन लॅबोरेटरीत गेली. लॅबमध्ये कोपऱ्यात

कपाटांच्या आडोशाला दोन बाके जोडून त्यावर सतरंजी चादर अंथरुन केलेला बेड दिसला. कपाळाला हात लावून बाप्पा म्हणाले, "हा तिढा आता आबा दळवीच सोडवू जाणेत. काय प्रकार झाला, हे तुम्हा सर्वांना माहिती आहेच. आबांना सगळं काही न घाबरता सांगा, तूर्त झाल्या गोष्टींची फार चर्चा नको." संध्याकाळी आबा कुडाळहून आल्या आल्या बाप्पा मर्गजानी झाली गोष्ट त्यांच्या कानावर घातली, सगळं ऐकल्यावर ते शांतपणे म्हणाले, "मी बघतो काय ते.... उद्या सोक्षमोक्ष लावूया या प्रकरणाचा." दुसरे दिवशी दुपारी अकरा वाजता आबा शाळेत गेले. कोळीसर हात जोडीत पुढे आले. आबा दबक्या आवाजात म्हणाले, "कोळीसर आधी नोटीस काढून शाळा सोडून द्या. स्टाफ मेंबर्सची सभा आयोजित करा. सगळे जमले की आम्हाला वर्दी द्या." कोळीसर नोटीस काढायला रवाना झाले अन् आबा ऑफिसमध्ये जाऊन हेडमास्तरांच्या केबिनमध्ये नेहमीच्या खुर्चीत बसले. कोळीसरांनी शाळा सोडून दिली.

स्टाफरूममध्ये मिटींगची तयारी केली आणि आबाना निरोप द्यायला शिपाई पाठवला. आबा स्टाफरूममध्ये प्रवेशले. शिक्षक खाली माना घालून उभे राहिले. आबा रुबाबदार पावल टाकीत खुर्चीपाशी येऊन थांबले. "आमच्या चारित्र्याबद्दल तुम्हाला काय माहिती आहे?" अजूनही शिक्षक मानाखाली घालून उभेच

राहिलेले. आबा पुन्हा कडाडले, "मी तुम्हा शिक्षकाना विचारतोय.... मला उत्तर पाहिजे...." काय बोलावं कुणालाच काही समजेना. दोन मिनिटं गेली.... मग आवाज उतरीत आबा म्हणाले, "सांगा मुंडले बाई.... शाळा सुरु झाल्यावर दुसऱ्या वर्षीच तुम्ही आलात. पाच सहा वर्ष आम्हाला ओळखता.... माझं चारित्र्य तुम्हाला माहिती असेल. जे काही तुमच्या कानी आलं असेल ते परमेश्वराला स्मरुन सांगा." बाई धैर्याने उभ्या राहिल्या. शाळेत सुरु असलेल्या प्रकारांची त्यांना चीड होतीच.

“आबा, आम्ही सगळी शिक्षक मंडळी तुम्हाला देवतुल्य मानतो. तुमचं चारित्र्य, तुमची नीतीमत्ता तुळशीपत्रा इतकी पवित्र आहे. पण.... हा प्रश्न तुम्ही कां विचारता अहात ते मला समजत नाही.” मुंडलेबाई शांतपणे म्हणाल्या. घडल्या प्रकाराची गंधवार्ताच त्याना नव्हती. “बाई, बसा खाली.... आमच्याशी, शाळेशी ईमान राखून निष्ठेने काम करताहात तुम्ही. आम्ही तुमच्याबद्दल आदर बाळगून आहोत. आमच्या चारित्र्याबद्दल तुम्हाला शंका नाही हे ऐकून समाधान वाटल आम्हाला. आता तुम्हीच सांगा.... तुमच्या स्टाफपैकी कुणी बदफैलीपणा करीत असेल तर त्याला जाब विचारायचा नैतिक हक्क आम्हाला आहे ना? मी चेअरमन आहे.... तो अधिकार खड्ड्यात जाऊ दे.... स्टाफ मध्ये इतके अश्लाघ्य प्रकार सुरु आहेत की, या शाळेचा चेअरमन आहे अस सांगायची मलाच

लाज वाटते....

आता आमच्या चारित्र्याबद्दल जे काढलात तसे उद्‌गार स्टाफवरच्या प्रत्येक कर्मचाऱ्याबद्दल काढाल का?” मुंडले बाईंनी मान खाली घातली.... अगदी हळू आवाजात त्या म्हणाल्या, “आबा या दशक्रोशीत तुम्हाला शास्त्रे म्हणून मानतात... माझ्या घरची परिस्थिती ओळखता तुम्ही.... माझी भावंडं शिकताहेत मला कुटुंब वर काढायचं आहे.... मला नोकरी करायची आहे.... इथे दिवस काढायचे आहेत.... माझ काही चुकलं असेल तर वडिलकीच्या नात्याने कान पिळा.... पण असला अडचणीत टाकणारा प्रश्न जाहिरपणे विचारु नका....”

मग कोळी सरांकडे निर्देश करीत आबा म्हणाले, “कोळीसर.... बाप्पांच्या हुकुमाप्रमाणे तुम्ही लॅबोरेटरी पर्यंत गेलात.... पुढे काय काय झाल.... कसं घडलं ते थोडक्यात.... मुद्देसूद सांगा....” कोळीसर उठले, हात जोडीत अजिजी करीत म्हणाले, “आमा सोबत पाटील वडार, येनेचवंडी, मकदूम सर बी व्हती नव्ह कां? आदी त्यास्नी ईचारा.... त्ये काय सांगतेत बगूया की.... मंग शेवटला बोलतू की म्या.... माजी गत लई अवघड झालीया की सायेब.... म्या मान खाली घालून कान-डोळं त्वांड बंद करुन नोकरी करतूया.... माजं हात तोकडं हाईत हो सायेब.... कां आनी मला तोफंच्या तोंडी द्याया लागलात....”

त्यांच्या या बोलण्याने आबा संतापले. मिशीवरुन पालखी मूठ फिरवीत भेदक कटाक्ष टाकीत ते गरजले.

“भेकड, नामर्द.... कसले शिक्षक म्हणायचे तुम्ही! बांदेकर, जोशी, बापट एकेक शिक्षक आठवतात मला. तुटपुंज्या पगारात अनुदारपणे संसार चालवणारे, फाटक्या धोतराला गाठी घालून राहणारे आमचे शिक्षक.... आम्ही सातवीपर्यंत शिकलो. पण जे ज्ञान त्यावेळच्या आमच्या शिक्षकांनी दिलं ती शिदोरी आयुष्यभर पुरली आम्हाला. सगळा गाव घाबरायचा आमच्या गुरुजीना ! आमचं खोतांचं, प्रतिष्ठीत घराणं.... येणारी रयत दिंडी दरवाजात थांबून मुजरा करायची अन् या म्हटल्यावरच पुढे यायची. पण कधी काही कामानिमित्त गुरुजी आमच्या वाड्यावर यायचे. गुरुजी येतायत् ही वर्दी मिळाल्यावर एवढे तालेवार आमचे वडिल, पलंगावरुन उठून दरवाजा पर्यंत गुरुजींचं स्वागत करायला जायचे. भीरुता परिस्थितीमूळे येत नसते ती स्वभावतःच असते.... म्हणून अयोग्य संबोधन आलं आमच्या तोंडून.... माफ करा....”

“कोळीसर तुम्ही आज इन् चार्ज हेडमास्तर आहात. चेअरमन म्हणून मी जाब विचारतोय.... तुम्ही काय पाहिलात ते स्टाफवरची सुशिक्षीत, जबाबदार माणसं ऐकू देत. वेळ आली तर शाळा बंद पडली तरी चालेल.... चेअरमन पद आमचं खड्डयात जाऊदे, पर्वा नाही करत आम्ही, जे अयोग्य आहे ते

सुधारायचं आहे आम्हाला. आमच्या प्रश्नाचं नीट उत्तर द्या नाहीतर इथे बसल्या बैठकीत नोकरीचा राजिनामा द्या अन् बाहेर पडा....!" त्यानंतर मात्र कोळी सरांनी कसलाही आड पडदा न ठेवता सांगायला सुरुवात केली. पाटकर बाई दार उघडून बाहेर आल्या हे त्यांनी सांगताच पाटकर बाई उठल्या, "मला पित्त झालं.... चक्कर आल्यासारखी वाटायला लागली म्हणून मी आराम करण्यासाठी लॅबमध्ये गेल्ये होत्ये...." त्यांना थांबवीत आबा कडाडले, "पाटकरबाई ! आम्ही तुम्हाला काहीही विचारलेलं नाही. मध्येच कारण नसताना बोलणं आम्हाला आवडत नाही.... जरा गप्प बसा.... आम्हाला वाटेल तेंव्हा, आम्ही विचारु त्यावेळी, विचारलेल्या प्रश्नापुरतंच बोला. सांगा हो कोळीसर.... चालूद्या तुमचं....!"

कोळींच कथन सुरु राहिलं. पाटकर बाई दार उघडून बाहेर आल्या. त्यांनी काय म्हटलं ते कोळीसरांनी सांगितलं. मग आपण आबांबरोबर लॅबोरेटरीत फिरुन आल्याचं ते म्हणाले. पाटकरबाई बोलत असताना के.वाय्. पाठमोरा दाराबाहेर येऊन पळून गेल्याचं तसेच लॅबमध्ये कपाटांच्या आडोशाला असलेला बेड वगैरे तपशील त्यानी गाळला. ते खाली बसले आणि आबांसोबत आलेले, लॅबोरेटरी बाहेर थांबून राहिलेल्यांपैकी काका नाडकर्णी म्हणाले, "कोळीसर पाटकबाईंच्या पाठोपाठ डोणगे क्लार्क बाहेर पडले अन् पळून

गेले..... ते नाही पाहिलंत? आणि लॅबोरेटरीत कपाटांच्या आडोशाला सजवलेला बाकांचा बिछाना...."

गरीब चेहेरा करीत मुरब्बीपणे कोळीसर म्हणाले.... "आसल्.... आसल्.... बाप्पा कमिटीचे मेंबर ते आसं आवचित आल्यालं म्हंताना मी घाबारलो.... माजं चित्त ठिकानावर कुटलं असायला.... पाटकर बायच्या मागनं ल्याबोरेटरीत कोन भाईर आल्याल माला दिसल न्हाई.... माज लक्ष न्हवतं...." मग कोळींच्या सोबत गेलेल्या वडार, येनेचवंडी, मगदूम या शिक्षकांना काका नाडकर्णींनी विचारलं. ते तिघेही काकांच्या जवळच थांबलेले पण त्यांनीही नरोऽवा कुंजरोवा असं सांगून कानावर हात ठेवले.

"शाळेत काय काय गैरप्रकार सुरु आहेत ते आमच्या कानावर आले आहेत. आम्ही सगळ्या गोष्टींची जातीने चौकशी करणार आहोत. झाल्या गोष्टींचा बभ्रा करु नका. शाळेचा लौकिक सांभाळून आपल्याला सगळं काही सुधारायचं आहे. याचं भान ठेवा. गुरांवर गोचीड-पिसवा पडल्या म्हणून कुणी गोठ्याला आग लावीत नाही. तव्दत आपण भान ठेऊन वागायचं आहे. कोळीसर, केवाऱ्ना मेमो द्या, संध्याकाळपर्यंत ते येतात का पहा नाहीतर अनुपस्थितीची कारणं द्यायला सांगा त्यांना. या पाटकर बाईंकडूनही लेखी खुलासा घ्या. पत्राच्या प्रती संस्थेकडे पाठवा.आम्ही निघतो आता. हेडमास्तर

आल्यावर त्यांना ताबडतोब वाड्यावर यायचा निरोप द्या.” सभा बरखास्त करुन आबा दळवी बाहेर पडले.

हा प्रकार घडला अन् दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ज्ये.वाय्. रत्नागिरीहून आले. के.वाय्. लॅबमधून पळाला तो दडी मारुन राहिलेला. संध्याकाळी झिप्रे, मगदूम सराना सांगून गावाबाहेर निघून गेला. रात्री जेवण वगैरे उरकून सोबत दोन शिक्षकांना घेऊन ज्येवायूनी शाळा उघडली मस्टर काढला. घटना घडली त्या दिवशी केवायची सही झालेली नव्हती. ज्येवायूनी सगळ्या गोष्टी समजून घेऊन पध्दतशीर सुटकेचा मार्ग शोधला. साधक बाधक विचार विनिमय झाला. आबा दळवीनी पुन्हा विचारीपर्यंत या गोष्टीचे बोलणे काढायचेच नाही असा बेत ठरला. आबांची पुढची चाल समजेपर्यंत क्रिष्णाला रजेवर ठेवायचा. क्रिष्णा तीन चार दिवस रजेवर आहे, प्रकार घडला तेव्हा तो शाळेतच नव्हता असा स्टँड घ्यायचे ज्येवायूनी ठरवले.

आबा दळवीनी चार दिवस वाट बघितली. पण कोळी सरांकडून पत्राच्या प्रती आल्या नाहीत की ज्येवाय भेटायला सुध्दा गेले नाहीत. आबानी कार्यकारणीतल्या लोकांची वाड्यावरच बैठक बोलवली. ज्येवाय्ना ही ही मिटींग असल्याचा निरोप गेला. सगळी मंडळी बैठकीला जमला. सगळं ऐकून घेतल्यावर ज्येवायनी कानावर हात ठवले. केवायु रजेवर असल्याचं स्पष्टीकरण त्यांनी दिलं. तेव्हा मात्र आबा दळवींचा

तोल गेला. "निर्लज्ज.... बेशरम.... निमक हराम.... ज्ये.वाय्. तुम्ही या थराला जाल अशी मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. किती धादांत खोटं बोलता तुम्ही. प्रत्यक्ष मला खोटं ठरवण्यापर्यंत तुमची मजल गेली.... आता तुम्हाला दळव्यांचा हिसकाच दाखवायला हवा."

ज्येवायूनी शांतपणे आदबीने उत्तर दिले, "साहेब तुम्ही आमचं पोशींदं..... तुमां म्होरं म्यां कुठलं किसपाट म्यां काय पुरं पडतुय तुमास्नी.... तुमी जल्मातून उठवशिला मला गरिबाला.... माजी बायकापोर माती खात्याल.... क्रिस्नाच्या साटनं म्यां पाय धरतू तुमचं.... येक पावट माफी करा.... ह्येच्या म्होरं चुकी व्हनार नाय.... तुमी समाजताय तसलं काय वंगाळ न्हाय.... कोनतरी तुमचं कान भराय लागल्यात.... म्या समदी चवकशी क्येली..... किसना त्या रोज साळंत आल्याला न्हाई असं समदे सांगतेत.... म्या हतं नवतो.... आता काय झालं? कसं झाल? मला काय दकल नाय.... तुमी साळत येऊन ग्येला त्या रोज सांच्याला किस्ना आल्ता घरी.... घडल्याला परकार त्येला समाजला आनी भिरमिटला की गडी आता कुट भूमिगत झाला काय दकल.... बाईल त्येची ऊर बडवून घ्यायलीया.... तुमी आनी जीवं मारता काय किस्नाला आस भ्याव वाटायलय् की तिला.... आम्ही कुटलं तुमच्या पासंगाल पुरतोया.... लोक एकाचं दोन करत्यात.... ..परतेक्ष घटना तुमी आपल्या नदरनं

काय बगितल्याली न्हाई...."

मिटींगला जमलेल्यांपैकी बाप्पांशिवाय कोणताच मेंबर घटनेच्या वेळी नव्हता. ज्येवायूनी प्रसंगाला बगल दिल्यावर ते सुध्दा बुचकळ्यात पडले. आबा दळवी हुशार पण पाताळयंत्री कारस्थानीपणा त्यांच्या वृत्तीतच नव्हता. कायद्याचा बडगा दाखवून ज्ये.वाय्. बधणार नाही हे त्यांनी ओळखलं. पूर्ण विचार करुन ते एवढंच बोलले, "कायद्यात पळवाटा पुष्कळ. तुम्ही कायदेबाज अहात.... घरात शिरुन घरमालकालाच त्रयस्थ ठरवलात तुम्ही.... आम्ही एकमार्गी आहोत. छक्केपंजे आम्हाला माहिती नाहीत. मी एकच सांगतो. तुम्ही आणि तुमचे बंधू दोघेही राजिनामा देऊन बाहेर पडा नाहीतर आम्हीच पदत्याग करुन संस्था मोडून टाकतो.... बस्स संपली मिटींग. मी चार दिवसाची मुदत देतो." मंडळी उठून निघून गेली.

आबांनी दिलेल्या मुदतीत ज्ये.वाय्. गप्प राहीले. आबाना मात्र त्यांची सद्सद्विवेक बुध्दी, निस्पृहबाणा स्वस्थ बसू देईना. त्यानी चेअरमन पदाचा राजिनामा खरडला आणि रजिस्टर पोस्टाने कार्याध्यक्ष दुकानवाडचे तातु सावंत यांच्याकडे रवाना केला. तातु सावंत राजिनामा पत्र घेऊन ज्येवाय्ना भेटले. संस्थेचे दप्तर ज्ये.वाय्. सांभाळायचे. त्यांनी राजिनामा इनवर्ड केला. आपण आबांची समजूत घालूया असं गुळमुळीत सांगून कार्यकारणीच्या सभेचा अजेंडा तयार केला. त्यावर तातूंची सही

घेऊन सभेची पत्रं कार्यकारिणी सदस्यांना पाठविली. ठरल्या दिवशी हायस्कूलमध्ये मिटींगसाठी सगळे पदाधिकारी जमले. आबा येतील म्हणून खूप वाट बघितली. तास दीड तासानंतर उलट सुलट चर्चा झाली. सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या कारभारात सगळेच अनभिज्ञ, गुंता कसा सोडवायचा कुणालाच ज्ञात नव्हते. ठंडा करके खाओ या नीतीने ज्येवायूनी बाजी मारली. आबा दळवी, त्यांच्या मागोमाग बाप्पा मर्गजही बाहेर पडले, संस्थेतून बाजूला झाले.

आठ पंधरा दिवस कुणाकुणाच्या भेटी घेऊन आबानी सल्ला मसलत केली. पण वाकडा मार्ग अवलंबून काही करायचे त्यांच्या वृत्तीतच नव्हते. ते जाहीर विरोध करते, दशक्रोशीतली माणसं जमवून प्रकरणाची चर्चा त्यांनी केली असती तर जमलेल्या लोकांनी ज्ये.वाय्.-केवायूची गाढवावरुन धिंड काढली असती. पण आबांना हा मार्ग सुचला नाही. स्वतः सुरु केलेल्या संस्थेतून आबा बाजूला फेकले गेले. संस्था ज्येवाय्च्या कबजात गेली. पुढच्या साताठ वर्षात आहे तीच कार्यकारिणी ठेऊन जनरल मिटींग न घेताच संस्थेचा कारभार ज्येवायूनी रेटला. तातु सावंत अध्यक्ष बनले. कार्यकारिणीत खांदे पालट झाली. ती मंडळी ज्येवाय्ची मिंधी झाली. संस्थेचे अधिकृत सभासद पन्नास ते साठ असतील नसतील. निम्मे शिम्मे लोकांच्या गुपचूप सह्या घेऊन खोट्या सर्वसाधारण सभांचे

रेकॉर्ड चोख ठेवले गेले.

संस्थेतून बाजूला गेल्यावर मात्र आबा दळवी तालुक्याच्या राजकारणात सक्रिय बनले. महिनाभरानंतर आलेल्या निवडणूकांमध्ये ते पंचायत समितीचे अध्यक्ष झाले. नव्या कार्यक्षेत्रात कामाचा आवाका एवढा की संस्था-शाळा हा कारभार आबाना पोरखेळ वाटायला लागला. त्यांच्या कुटूंबीयांच्या उरात मात्र हे शल्य खुपायचे. पण कधी विषय निघालाच तर आबा जरबेने गप्प करायचे. "जे झालं ते झालं.... शैक्षणिक संस्था हे साठमारीचं मैदान नाही. आम्ही जे केलं ते विद्या देवीच्या प्रेरणेने केलं.... तिची इच्छा होती तोवर तिची सेवा केली. मी स्वेच्छेने बाहेर पडलो. आज तालुक्यात माझा लौकिक आहे. क्षुल्लक राजकारण करुन मी माझी किंमत कमी करुन घेणार नाही.माझी झेप गरुडाची आहे. कावळ्याबरोबर मी स्पर्धा नाही करणार....!"त्यांनी असं म्हटल्यावर कोण काय बोलणार ?

दहा बारा वर्षाचा कालखंड मागे पडला. आबा दळवी कर्तृत्वाच्या जोरावर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदापर्यंत पोहोचले. या कालावधीत कोकणात सुध्दा खूप स्थित्यंतरं झाली. जिल्हा विभाजन होऊन स्वतंत्र सिंधुदुर्ग जिल्हा अस्तित्वात आला. दुकानवाड गडमठ हा खरंतर दुर्गम भाग पण बॉम्बे गोवा हायवेमूळे या भागालाही महत्त्व आलं. आबांची मुलं

उच्चपदापर्यंत पोहोचली. मोठा मुलगा जिल्हा पोलिस अधिक्षक म्हणून सिंधुदुर्गात हजर झाला. मधला मुलगा एम्.एस्. सर्जन झालेला, त्याची पत्नी सुद्धा डॉक्टर.... आबानी त्यांना दुकानवाड फाट्यावर हॉस्पिटल बांधून दिलं. आजपर्यंत हार्टपेशंट कोल्हापूर-मुंबई गाठायचे.... आता कुडाळ नजिक हायवेवर आबांच्या मुलाचं सुसज्ज हॉस्पिटल झाल्यामुळे जिल्हाभरचे आणि गोव्यातून सुद्धा पेशंट यायला लागले.

सुरुवातीला ज्येवाच्या हो ला हो म्हणणारी कार्यकारिणी.... हळू हळू सगळ्या मेंबरना व्यवहार नी धोरणं कळायला लागली. ज्येवाय्ची खाबुगिरी, दडपशाही याना माणसं विटली. कार्यवाह सावजी वारंग खजिनदार दाजी राऊळ उघड उघड विरोध करायला लागले. पण कायद्याची बाजू त्याना न उलगडणारी. ज्ये.वाय्. त्यांच्या तोंडाला पद्धतशीर पानं पुसायचा. दर पाच वर्षानी जनरल सभा बोलावून कार्यकारिणी नियुक्त करायची अशी घटनेत तरतूद होती. पण ती धाब्यावर बसवून सभासदांच्या घरी जावून त्यांच्या सह्या घेऊन आपल्याला पाहिजे तसे ठराव लिहून कार्यकारिणीत क्येवाय्ला खजिनदार पदी नेमून नवीन कार्यकारिणी नेमी पर्यंत ज्येवाय् ची मजल गेली. भडकलेल्या दाजी राऊळानी आबांचा वाडा गाठला.

संस्थांच्या कारभाराची आबाना आता पूर्ण माहिती झालेली. त्यानी सूत्र फिरवली. दाजी राऊळांसह संस्थेच्या

बावीस सभासदांचा अर्ज धर्मादाय आयुक्तांकडे सादर झाला. कार्यकारिणी बरखास्त करुन प्रशासकाची नेमणूक झाली. आणि नव्याने कार्यकारिणीच्या निवडणूकीची प्रक्रिया जाहीर झाली. आता सभासद संख्या वाढवून बाजी मारायचे मनसुबे उभयपक्षी सुरु झाले. मध्यंतरी सभासद संख्या वाढून डोकेदुखी होऊ नये म्हणून ज्येवाय-क्येवाय्नी मखलाशी करुन सभासद वर्गणी शंभर ऐवजी एक हजार रुपये इतकी वाढवलेली. त्यामुळे नवीन सभासद नोंदणी हा आता पैशाचा खेळ झाला. ज्येवायने स्टाफ मधले आपले पित्त्ये, ग्रामस्थांपैकी आपल्या संबंधामुळे आबाना विरोध करणारे ग्रामस्थ सभासद म्हणून नोंदून घेतले.

आबा सुद्धा गप्प नव्हते. ज्याची सदस्य संख्या जास्त तो विजयी हे लोकशाहीचे सूत्र त्यानाही अवगत असलेलं. त्यानीसुद्धा धूमधडाक्यात सभासद नोंदणी सुरु केली. पण आबांच्या कारवाईवर ज्ये.वाय्. क्येवाय् डोळा ठेऊन राहिलेले. त्यांचा सभासदांचा आकडा वाढला की आपले आणखी सभासद नोंदून बाजू भक्कम करायची रणनीती त्यांनी अवलंबिली. धर्मादाय आयुक्तानी नेमलेला प्रशासक सुद्धा ज्ये.वाय्. क्येवाय्चा मिंधा. एकूणात ज्ये.वाय्. ची सरशी होणार अशीच सगळी चिन्हं. या गदारोळात निवडणूकीचा दिवस येऊन ठेपला. घटनेप्रमाणे सर्व सभासदांनी कार्यकारिणीतले

सगळेच सदस्य आणि पदाधिकारी यांची निवड करायची असल्यामुळे निर्धारीत वेळेला सभासद मंडळी शाळेच्या सभागृहात जमू लागली.

सगळीकडून भक्कम मोर्चेबांधणी झालेली. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून ज्येवाय्च्या नकळत क्येवाय्ने खास व्यवस्था केली. निवडणूकीच्या दिवशी आबांच्या डॉक्टर सुनेला किडनॅप करुन निवडणूक प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी तासभर आबाना ह्या गोष्टीची कल्पना देऊन माघार घ्यायला लावायची असा त्याचा बेत ! साताऱ्याहून खास पार्टी या कामासाठी क्येवाय् नी मागवलेली. निवडणूकीच्या आदल्या दिवशी संध्याकाळी भाडोत्री गुंडांची गाडी घेऊन क्येवाय्चा खास दोस्त स्टाफवरचा झिप्रेमास्तर शाळेत आला. शाळेच्या आवारात मुतारीच्या आडोशाला झिप्रे क्येवाय् यांची दबक्या आवाजात मसलत झाली. निवडणूकीच्या सकाळी आठ वाजता डॉक्टरणीला उचलायची असा बेत ठरला.

डॉक्टरणीला गाडीत घातल्यावर झिप्रे मास्तरने शाळेत यायचं आणि मिशीवर पंजा फिरवून संकेत करायचा अस पक्कं ठरलं. निवडणूकीचा दिवस उजाडला. बेत ठरल्याप्रमाणे आठ वाजता हॉस्पिटल समोर ट्रॅक्स थांबली. ट्रॅक्समधून उतरलेली बाई हॉस्पिटलमध्ये शिरली. डॉक्टरीणबाई हॉस्पिटलमध्ये दुसऱ्या मजल्यावर रहायची. अर्जंट व्हिजीटचा कॉल आला

म्हणून डॉक्टरीणबाई काऊंटरला आल्या. बोलायला आलेल्या बाईशी जुजबी बोलणं झाल्यावर व्हिजीटिंग बॅग घेऊन डॉक्टरीणबाई बाहेर पडल्या. त्यांनी ट्रॅक्समध्ये पाय ठेवला आणि आडोशाला राहून टेहळणी करणाऱ्या झिप्रेमास्तराने मोटर सायकल स्टार्ट केली.



झिप्रेमास्तरची मोटर सायकल आत वळवताना

दिसल्यावर क्येवाय् ऑफिसच्या बाहेर पडून व्हरांड्यात उभा राहिला. मोटर सायकल स्टैंड करुन मिशीवर पंजा फिरवीत झिप्रेमास्तर व्हरांड्याच्या दिशेने येताना दिसल्यावर निर्धास्त मनाने क्येवाय्ने ज्येवाय्ची केबिन गाठली अन् आबा दळवीना बोलवायचं फर्मान सोडलं. डुंबरे शिपायाच्या मागोमाग आबा दळवी आले. आबानी केबिनमध्ये प्रवेश केला त्या क्षणी मनात नसूनही ज्येवायू उभे राहिले. आधी उभे राहिल्यावर मग आपली चूक त्यांच्या लक्षात आली. ओशाळं हसून ज्ये.वाय्. म्हणाले. "बसा की दळवी सरकार.... निवडणुका व्हत्याल की, पर पर तुमी आमचं पोशिंदं होची जाण हाय न्हवं आमाला.... काय च्या पाणी घेणार न्हवं....?" भेदक नजरेने ज्येवाय्कडे नखाशिखांत कटाक्ष टाकून आबा म्हणाले, "चहा आता निवडणूक जिंकल्यावरच.... आम्ही तुम्हाला पाजू.... ! ते जाऊ दे.... मला बोलावलं कशासाठी ?" क्येवाय् कडे प्रश्नार्थक नजरेने पहात ज्ये.वाय्. म्हणाले, "किस्ना.... काय म्हणतो रं तू? सांग म्हनं पटाटा...."

आबांच्या नजरेला नजर देणं टाळीत क्येवायु म्हणाला, "दळवी सरकार, जरा शिस्तीत इच्यार करा.... मेंबरं आमची जास्त हैती.... लोकशाहीत सत्ता भौमतानी मिळवायची आस्ती..... तुम्ही पार जिल्ह्याच राजकारण करनारी नामजद असामी.... या संवस्थेच्या येवारात आनी कशापाय पडलेत.....

तसं हावंतर सल्लागार म्हनून तुमास्नी ध्येतो की...... पर विलेकशन तुमच्या इरोदात ग्येली तर जिल्ह्यात तुमची काय पत हायली हो?......" किस्नाने पुढे तारे तोडण्यापूर्वीच, काय होतय हे समजण्यापूर्वीच आबा दळवी ताड्दिद्दशी खुर्चीतून उठले. के.वाय्. च्या झिंज्या पकडून त्याला पुढे ओढीत त्यांनी फाडदिशी त्याच्या कानफटीत लगावली. रागाने थरथरत आबा बोलले, "अरे दीड दमडीच्या पेंद्या माझ्या पायताणाजवळ उभं रहायची तरी लायकी आहे का तुझी....? माझी पत तू टिनपाट काय मोजणार ?"

"हे विद्यादेवीच मंदिर..... तुम्ही भावाभावांनी इथे कुंटण खाने चालवलेत.... ज्या ताटात अन्न खायचं त्या ताटात हगलात की तुम्ही.... तुम्हाला भिऊन मी बाजूला झालो असं वाटलं काय रे सोद्यानो तुम्हाला.... तुमची ही हिंमत...? तु काय धमकी देणारेस ते माहिती आहे मला.... लक्ष्मीसारख्या माझ्या कुलवंत सुनेला किडनॅप करुन आबा दळव्याला नमवणार काय तुम्ही...? हे कोकण आहे... इथे माणसं विकत घेता येत नाहीत. तुझे खरेदी केलेले मेंबर काय दणका देतात ना, तो बघच आता.... आमचं घराणं हे या भागातल राजघराणं मानते इथली रयत..... विरोध आमच्या माघारी.... कुरबुरीच्या स्वरुपात.....

आमच्या तोंडावर आम्हाला विरोध करणारा अजून जन्माला यायचा आहे.... बघाच तुम्ही....! संस्थेच्या जीवावर तुम्ही

बांडगूळासारखे वाढलात ! आता झाड वठायला लागलं.... म्हणून आम्ही पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरलो आहोत. तुमच्या धमक्यांना घाबरणारी ही डरपोक अवलाद नाही. भले झाडाची फांदी छाटावी लागली तरी बेहेत्तर..... पण लक्षात ठेवा बांडगूळ फक्त वाढतं..... फोफावतं..... तसे फार माजलेत तुम्ही आमच्या जीवावर पण बांडगूळ रुजत नाही.... ही पांढर आमची आहे ! तुमची पाळंमुळं रुजलीयत् फक्त शाळेच्या फांदीवर, गाठ वाढावी तशी ! या भूमीत रुजायला तुमच्या पिढ्या जाव्या लागतील पिढ्या....!! "अन् पाठ फिरवून दिमाखात पावलं टाकीत आबा बाहेर पडले.

ठीक दहा वाजता निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाली. आबांचे दोन्ही मुलगे आणि सुना.... हो ! क्येवाय् ने किडनॅप करण्याचा प्रयत्न केलेली डॉक्टरीण सूनसुध्दा.....! सभासद असल्यामुळे मतदान करायला सगळी जातीनिशी आलेली. डॉक्टरीण ट्रॅक्समध्ये चढली एवढंच झिप्रे मास्तरने बघितलं अन् अर्ध्या हळकुडांने पिवळा होत तो शाळेकडे रवाना झाला. ट्रॅक्स सुटली अन् गडमठ फाट्यावरुन मुंबई गोवा रस्त्यावर वळणार नेमक्या त्याच जागी आबांच्या डी.एस.पी. मुलाने ट्रॅक्स थांबवली. डॉक्टरणी सोबतच्या बाईला खाली उतरुन तिच्या कानाखाली पोलिशी पंजा वाजताच सगळा प्लॅन तिने भडा भडा सांगितला.

इलेक्शन पार पडली. ज्ये.वाय्. क्येवाय् किंवा त्यांचा एकही पित्त्या निवडून आला नाही. गडमठ पंचक्रोशी शिक्षण प्रसारण मंडळ (चौदा वर्षाच्या) प्रदीर्घ काळानंतर पुनःश्च आबा दळवींच्या छत्रछायेखाली आलं.... ज्ये.वाय्. क्येवाय् पर्व इतिहास जमा झालं... अध्यक्षीय भाषणात आबा दळवी आत्मविश्वासाने म्हणाले. "ही पांढर अनीती खपवून घेणारी नाही....कुणाच्या ताटाखालचं मार्जर होऊन रहाणं इथल्या मंडळींना फार काळ जमणारं नाही.... ज्ये.वाय्. धूर्त खरा पण ही नस त्याला नाही ओळखता आली.... वाढणं सोपं.... रुजणं कठिण !"

# ४. “ स्वर आले जुळुनी ”.

अहमदाबाद हायवेवरुन बिऱ्हाडाकडे परतताना बुवांचे शब्द ईश्वराच्या देवळातील धडाम्ss धुडूम् ss वाजणाऱ्या नगाऱ्या सारखे माझ्या कानात घुमत राहिलेले....! “कलेची साधना म्हणजे मोठं दिव्य असतं.... खर्डेघाशी करण्याइतकी सवंग-सोपी गोष्ट नाही ती. एकवेळ गायकी जमेल. ईश्वराने गोड नरडं दिलेल असेल तर थोड्याफार प्रयत्नाने गायक बनण फारसं अवघड नाही.... पण संवादिनीवर कब्जा मिळवणं भलतं जटिल... सगळ्या संवेदना कर्णपटलात केंद्रित करुन गायकाचा नेमका सूर अचूक पकडायचा आणि तो मनात साठवित बोटांच्या माध्यमातून संवादिनीच्या स्वरमंडलातून उमटवायचा

म्हणजे बजवैया अष्टावधानी, सावधचित्त असावा लागतो. स्वराची दीर्घत्रोटक लांबी, तीव्रता बोटांच्या कसबाने नियंत्रित करायची असते. एककल्ली सराव करुन रागदारीची मांडणी अवगत होते. तालाची समज ही प्रयत्नाने साध्य होते चट्कनशी.... पण साथ करणं भारी अवघड गायकी स्वैर-बेबंद असते. स्वराचे अनंत असंख्य भेद, छाननी नरड्यातून उमटेल त्याप्रमाणे संवादिनीच्या सुरावटीत पकडणं दुस्तर.... अती दुस्तर... ती साधना आहे. ईश्वराचा साक्षात्कार जसा व्यक्तीगत पातळीवर जाणीवेच्या तरलतेनुरुप होतो तद्वत संवादिनीचे स्वर गायकाच्या नरड्यातून उमटणाऱ्या ध्वनींशी जुळवणं हा सुरांचा साक्षात्कार असतो... तो व्यक्तिगत पातळीवर ज्याला त्यालाच व्हायला हवा...."

अशोक ! तुला कदाचित कटू वाटतील माझे बोल.... पण मी सांगतोय ते सत्य आहे. गेली चाळीस वर्ष मी पेटी वाजवतोय् पण अजूनही एखाद्या नवख्या गायकाला सूर साथ द्यायला संवादिनी उघडतो ना मी तेव्हा मनावर खूप मोठं दडपण येतं. न जाणो मिंड चुकेल.... एखादा बारकावा-हरकत चकवा देईल अन् कुणीही दीड दमडीचा गवैय्या भर सभेत माझी साधना कवडी मोल ठरवील, मला ते भर सभेत जाहिररित्या मान्यच कराव लागेल. कारण गायक स्वतंत्र असतो... तो आपल्या मस्तीत स्वरमंडल उलगडीत जाईल तसं त्याच्याशी बरोबरीनं पळायच असत

पेटीवाल्याला... भुकेल्या वाघानं मत्त सांबराची पाठशिवणी करावी तव्दत... सांबराला जणु चहुदिशा मोकळ्या... पण वाघाला मात्र सांबरावर कब्जा करीपर्यंत त्याच्यातल आणि आपल्यातल अंतर कमी करीत पाठलाग करायचा असतो. जाऊ दे... खूप बोललो मी...

अशोक, कलेची साधना ज्याची त्यानेच करायची असते.... ही वाटचाल एकाकी असते, ज्याचा मार्ग त्याने शोधायचा बस्स ! संगमरवर तोच पण प्रत्येकाची मूर्ती वेगळी... तुझा सराव म्हणजे खडी फोडणाऱ्या बेलदारासारखा बिनडोक... मूर्ती घडवणं दूरच, संगमरवर आणि साधा पत्थर यातला भेदही अजून तुला नीटसा उमगलेला नाही...." अन् बुवा उठून आत गेले. मी घड्याळाकडे नजर टाकली.... साडेनऊ म्हणजे शिकवणीची वेळ संपली. मी पेटी मिटून अस्तर चढवलं. तबलजीनेही हत्यारांवर आच्छादनं घालून आवरा आवरी सुरु केली. पाच मिनिटात सगळं आवरुन मी बाहेर पडलो. पायात चपला अडकवीत बिऱ्हाडाच्या दिशेने पायपीट सुरु झाली.

इतकी वर्ष केलेली माझी मेहनत आज कवडीमोल ठरली. जो पैलू पाडील अशी अपेक्षा केली त्यानेच आज फटकारलं.... मला प्रकर्षाने आठवण आली ती भाऊंची... कामतेकरबुवा रंगात येऊन गाताहेत.... आज कीर्तनाचा दुसरा दिवस. आजूबाजूच्या तीनचार गावची मंडळी जमलेली. मंदिराचा

सभामंडप गच्च भरला म्हणून काही माणसं दोन्ही बाजूच्या मंडपात बसलेली. श्रोतृवृंद भरगच्च असला की मग बुवांना अधिकच हुरुप यायचा. दोन अडीच तास नाना ढंगांची, नाना रागांची स्वरमालाच कामतेकरबुवा उलगडीत जायचे. भाऊ तल्लीन होऊन पेटीची साथ द्यायचे. भाऊंचे कान तल्लख, एका स्वराचा फरक व्हायचा नाही.

कामतेकरबुवा गाण्यातले दर्दी. कीर्तनकाराकडे हटकून असणारा हजरजबाबीपणा आणि तिरकस खडूसपणा तर त्यांच्याकडे ठासून भरलेला. तबलजी, पेटीवाला याना अजमावणं, चकवा देणं, उघडं पाडणं बुवा हमखास करणार ! एखादं प्रसिद्ध पद बुवा प्रचलित चालीमध्ये गायला लागायचे... अर्धी ओळ गाऊन बुवा थोडा विराम घ्यायचे आणि ते पद मूळची चाल आणि ताल दोन्ही बदलून, पट्टी बदलून बुवा गायला लागायचे. साथीदार बेसावध असेल तर हटकून गडबडायचा. मग गायन खंडीत करुन टाळीवर ठेका धरीत धाऽधिन् तिरकिट ऽऽ तिरकीट ऽऽ धिन् धा तिरकीट असे बोल बुवा तबलजीला समजून सांगायचे. पेटीवाला चुकला तर स्वरावली तोंडाने उच्चारुन दाखवायचे. क्वचित पेटीवाल्याची बोटं उचलून नेमक्या स्वरावर ठेवीत 'इथून वाजवा' असं म्हणायचे. हे इथेच थांबत नसे. साथीदाराना थांबायची खूण करुन बुवा म्हणायचे, “चूक दाखवून दिली म्हणून रागावू नका

बरं का ss ! साथ जमली तर कीर्तन.... नाहीतर बुवा साथीत गावले... म्हणजे दोन प्रकार आहेत श्रोते हो. साथ चुकली तर बुवा साथीत गावला आणि साथ जमली तर बुवा साथीतून बचावला बोला सीताकांत स्मरण ss जय जयराम ss "

साथीदार बिचारे शरमेन अर्धमेले व्हायचे. श्रोतृवृंद हेटाळणीच्या सूरात हसायचा. एखादा किंचित कानसेन शेजाऱ्याला म्हणायचा, "किर्तनाला साथ करण भारी अवघड ! कामतेकर बुवा म्हणजे भारी तयारीचे.... आंडू-पांडूला त्यांची साथ करण जमायचं नाही." एकदा साथीदाराचा कच्चा दुवा मिळाला की मग बुवा हमखास किर्तन संपेपर्यंत तीन चार वेळा तरी त्याला धोपटून काढायचे. अर्थात भाऊंचा व्यासंग दांडगा....! असे कित्येक कामतेकर बुवा त्यांनी कडोसरीला खोचलेले! बुवांच्या चकव्यात ते सापडत नसत. भाऊ शास्त्र शुद्ध शिकलेले नव्हते. पण गवयाच्या तोंडून जे स्वर उमटतील ते बिनचूक पेटीतून उमटवायच हे कसब त्यांनी आत्मसात केलेलं.

मी कीर्तन ऐकायला बसायचो.... माझ्र सगळ लक्ष भाऊंच्या पेटीकडेच असायच. बुवा गात असताना कुठच्या शब्दाला पेटीतले कुठले सूर भाऊ वाजवतात इकडे माझं बारकाईने लक्ष असायचं हवेतल्या हवेत काल्पनिक स्वरांवर बोट फिरवीत भाऊंची गत मी मनात साठवून ठेवायचो. विशेष करुन जय जय रामकृष्ण हरी आणि बालकृष्ण चरणी लक्ष

लागोरे ही दोन्ही पद प्रत्येक कीर्तनात हमखास गायली जायची. मला ती मुखोद्गतच झालेली. उत्सवाच्या काळात पेटी-तबला सगळं साहित्य पाच-सहा दिवस देवळातच ठेवलेलं असायचं. दिवसा देऊळ रिकामंच... मी संधी साधून देऊळ गाठायचो आणि पेटी उघडून मनात साठवलेली स्वरावली पेटीवर वाजवून बघायचो. अशी तुकड्या तुकड्यांनी साठवून दोन्ही पद मी वाजवायला शिकलो.

उत्सवात मला पेटीवर चांगलाच हात मोकळा करायची संधी मिळायची. अधून मधून भाऊ कामासाठी बाहेर गेले की, पेटी वागवायचा चान्स मिळे. एरवी पेटी म्हणजे भाऊंचा प्राण.... हत्यार ते प्राणापलिकडे जपायचे. आजूबाजूच्या गावात भजन, कीर्तन, नाटक असल्या कार्यक्रमांना कुणीना कुणी पेटी मागायला यायचं. वाजवणारा कोण-कुठचा.... चौकशी करुन भाऊ पेटी न्यायला द्यायचे. पण कुणी नवशिका, येरा गबाळा असेल तर सरळ नाही म्हणायचे. काही भजनीबुवा तर मृदंग वाजवावा अशा आवेशात पेटीच्या सुरांवर खडा-खडा बोट मारायचे असल्या वाजप्यांच्या हाती सोन्यासारखं हत्यार सोपवायला भाऊ राजी नसत. आम्हा पोराबाळांची तर पेटीला हात लावायची बिशादच नव्हती.

सातवीला पी.एस्सी – केंद्राची परीक्षा व्हायची. त्यावेळी या परीक्षेला मोठी प्रतिष्ठा. चार-पाच शाळांसाठी एक केंद्र

असायचं. पी.एस्सीला ६८% गुण मिळवून मी केंद्रात पहिला आलो. हेडमास्तर पडवळ रिझल्ट घेऊन आल्यावर मुद्दाम आमच्या घरी माझं कौतुक करायला येऊन गेले. पेळप केंद्रात पावणे दोनशे मुलांमध्ये मी पहिला आलो. गुणांच्या टक्केवारीत तालुका स्तरावर माझ्यापेक्षा चार गुण अधिक मिळविणारी देवगडची कुणीतरी मुलगी पहिली आणि माझा नंबर दुसरा आला. पडवळ गुरुजी चहा पिऊन उठून गेले अन् भाऊनी मला हाक मारली. बहुतेक माझा पहिला नंबर हुकला म्हणून तासडम्पट्टी होणार या भीतीनच मी मान खाली घालून भाऊंसमोर उभा राहीलो.

माझ्या पाठीवरुन मायेने हात फिरवीत भाऊ म्हणाले, “अशोक ss तुझ्या यशामुळे माझ्या अंगावर मूठभर मांस चढलं. माझंच नव्हे तर घराण्याच नाव तू उज्वल केलस. मी खूश झालो बघ तुझ्यावर. मी तुला एक बक्षिस देणारेय्” भाऊ काय बक्षिस देतात हे ऐकायला माझे प्राण कानात गोळा झाले. “तू चोरुन पेटी वाजवतोस हे समजल मला. मी लहान असताना नारायण सुताराकडे चोरुन पेटी वाजवायला जायचो उठसूट तोच नाद. इथे शास्त्रशुद्ध शिकवणारा कोणी नाही. रागदारी म्हणशील तर मला शब्द सुद्धा कळत नाय पण माझा हात साफ आहे. मी कीर्तन, नाटक वाजवतो. आचरेकर, बापट, पटवर्धन ही गवई मंडळी मला त्यांच्या साथीला बोलावतात. उत्सवाला

पेटीवाल्यासाठी अडत नाही. माझी ऐपत नसताना व्याजाने पैसे काढून मी पायपेटी घेतली. ते असो... मुलांपैकी कुणीतरी ही कला घ्यावी असं मलाही वाटतं म्हणून तू चोरुन पेटी वाजवतोस हे कळल तरी मी कानाडोळा केला. दुसर म्हणजे हा फंद तू अभ्यास सोडून करीत नाहीस म्हणूनही मी ओरडलो नाही कधी तुला...."

"आज पासून हा अरगण तुझा ! ही पेटी म्हणजे आमच्या घराण्याची दौलत आहे. तू शीक पेटी. तुला शिकवण्याएवढं कसब माझ्याकडे नाही. मुळात माझाच कोण गुरु नाही. मी दुसऱ्याला काय शिकवणार ? फक्त बोट कशी फिरवायची त्याची गत दाखवीन तुला. तुझं वाजवणं चुकल तर बरोबर काय हवं तेवढ वाजवून दाखविन बाकी तुला आवड आहे... तुझा मार्ग तू शोधून काढ. पण एक लक्षात ठेव... हा फंद भिकेला लावणारा आहे. पेटी वाजवून पोट भरायच नाही. चरितार्थासाठी काही लौकिक ज्ञान, विद्या, पदवी मिळवायला हवी. मी हे अनुभवातून सांगतोय्... नाटक-किर्तन वाजवायला, गायकीच्या बैठकींना साथ द्यायला आठ- दहा दहा कोस तंगड तोड मी करतो. पण प्राप्ती म्हणशील तर शून्य ! मंदिरात मानाचं श्रीफळ तरी मिळतं.... नाटकवाले ते सुध्दा देत नाहीत. जनलोकात वाहवा मिळते.... चार जाणकार माणंस मान देतात.... बस्स !

माझा संसार निभावून मी ही हौस केली. पेटीच्या नादात

धड सातवी नाही पूर्ण झाली माझी ! त्यावेळी मी पी.एस्सी. पास झालो असतो तर सहज कुठे तरी शाळा मास्तर म्हणून लागलो असतो. दरमहा हुकमी पगार घेतला असता.... तू मात्र एक पथ्य पाळ! चरितार्थासाठी भक्कम साधन मिळवायच हे ध्येय ठेऊन खूप शीक... पेटीचा व्यासंग विद्या सांभाळून जोपास ! केवळ पेटीचा नाद धरुन आयुष्याची माती करुन घेऊ नकोस एवढंच पथ्य पाळ....!!" मग भाऊनी पेटी उघडली आणि मला म्हणाले, "बस.... मी तुला प्रारंभिक माहिती देतो." मी भीत भीतच पेटीवर बसलो आणि मला हातखंडा असणार 'बाळकृष्ण चरणी लक्ष लागोरे' हे पद वाजवून दाखवलं.

"छान.... हात हलका आहे तुझा.... सुरांची समज सुद्धा बरी आहे." भाऊंनी दाद दिली. त्यांनी मला पेटीतली सप्तकं, काळ्या पांढऱ्या पट्ट्या सुरांवरुन चपरवल बोटं फिरवायच कसब त्यासाठी कोणत्या बोटांचा कोणत्या सुरांवर वापर करायचा, आंगठा कसा वापरायचा गाणाऱ्याची पट्टी कशी ओळखायची, डाव्या हाताने वाजवायचा सराव कसा करायचा अशा पेटी वादनातल्या मरब्रव्या दाखवल्या. पुढचे पंधरावीस दिवस नित्यनेमाने सराव व्हायचा. खर्जापासून तो तारसप्तका पर्यंत दोन्ही हातानी सुरावली घोटून घेतली. पेटीतल्या साडेतीन सप्तकांमधल्या काळ्या पांढऱ्या पट्टीतल्या प्रत्येक सुराची स्वतंत्र ओळख, बोटाचा दाब कमी जास्त करून सुराची तीव्रता कशी

नियंत्रित करायची हे कसब मला भाऊनी दाखवलं. त्यानंतर मात्र दैनंदिन व्यापात मला शिकवण सराव करुन घेणं भाऊना कधीच जमल नाही.

आमच्या गावात हायस्कूलची सोय नाही. त्यासाठी रोज तीन-साडेतीन मैल तंगडतोड करीत मला शेजार गावी हास्कूलला जाव लागायचं. येती जाती चाल, होमवर्क हे झेपवून पेटीसाठी वेळ देणं, नियमित सराव करणं मलाही जमायचं नाही. रविवार आणि मोठ्या सुट्ट्या.... मोकळीक मिळेल तेव्हा जमेल तसा सराव मी करायचो. भाऊनी मला अगोदरच बजावलेलं असल्यामुळे अभ्यास चुकवून पेटीचा नाद करायचा नाही. हे पथ्थ मी ही सांभाळलं. मी दहावीला असताना मुंबईच्या काकानी कांदिवलीला बिऱ्हाडाची जागा घेतली. त्यावर्षीच्या मे महिन्यात काका गावी आल्यावर मला अकरावी साठी मुंबईला नेण्याचा विषय त्यानी काढला.

काका दामू नगर मध्ये रहायचे. तिथुन एक तासाच्या अंतरावर डोंगरी मध्ये अहमदाबाद हायवे लगतच पंडित शर्माचा पेटीचा क्लास असायचा. शिक्षण सुरु ठेऊन पेटी वाजवण शास्त्र शुद्ध शिकता याव, घराण्याचा लौकिक, भाऊंचा वसा मी सांभाळावा अशी काकांची इच्छा... काका तबला वाजवायचे. अर्थात त्यांच वाजवणं सुद्धा भाऊं सारखं स्वतः सराव करून जोपासलेलं..... रागदारीचा पाया

नसल्यामुळे इच्छा असूनही त्यांना लौकिक कमावता आला नाही. काकांचा प्रस्ताव भाऊंनी उचलून धरला. काढ ओढ करुन अगदी जीव जीव म्हणून पै-पैसा जोडून साठवलेली ऐंशी रुपयांची पुंजी भाऊंनी काकांच्या हवाली केली. "माझी धाव एवढीच... तू त्यात भर घालून एक उत्तम पेटी अशोकला घेऊन दे. सराव करायला स्वतःच हत्यार हवं..."

आम्ही मुंबईला गेल्यावर दोन दिवसांनी काकांनी दादरच्या हरीभाऊ विश्वनाथ कंपनीतून माझ्यासाठी हातपेटी खरेदी करुन आणली. पंडित शर्माकडे क्लास लावून दिला. पेटी आणि शिक्षण असा दिनक्रम सुरु झाला. अकरावी नंतर माझा कल बघून जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये काकांनी मला प्रवेश मिळवून दिला. परिस्थितीची जाणीव मला स्वस्थ बसु देईना. कोर्स आणि पेटी सांभाळून अर्थार्जनासाटी सटर फटर जॉब करायला मी सुरुवात केली. सकाळी सात ते रात्री अकरा वाजे पर्यंत माझा माझा दिनक्रम. पंडित शर्माकडे मला रागदारींच ज्ञान मिळत गेलं. तीन-साडेतीन वर्ष निर्वेध पार पडली अन् अकस्मात अडचण आली.

पंडितजींचं आणि जागा मालकाच भाड्यावरुन काही बिनसलं आणि अकस्मितपणे क्लास बंद करुन त्यांनी गाशा गुंडाळला आता मी सुद्धा मुंबईत बऱ्या पैकी रुळलेला. शोध चौकशा करुन बोरीवलीत आपटेबुवांची शिकवणी मी धरली.

त्यांची फी थोडी जास्तच.... माझ्या आवाक्या बाहेरची. मग पहाटे ५ ते ७ असा दोन तासांचा आणखी एक जॉब मिळवला. आता दिवसभर नुसती त्रेधा तिरपट व्हायची पण माझ्या पेटीच्या छंदात व्यत्यय आला नाही हा आनंद कष्टापेक्षाही मोठा वाटायचा मला. आपटे बुवा नामांकित गवई आणि वादक. गायनाच्या जोडीला पेटी, तबला, सारंगी वादनातही त्यांनी व्यासंग. अगदी नेमस्त मोजक्याच शिकवण्या त्यांनी घेतलेल्या.

बुवांचा संपर्क मोठा आणि संपन्न विश्वनाथ बागूल, रामदास कामत, प्रभाकर कारेकर, बकुल पंडित, वासुदेव चंद्रचुड, प्रसाद घांग्रेकर अशा दिग्गज मंडळींची बुवांकडे उठबस. मुंबई आकाशवाणी केंद्रावर बुवांचे शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम नियमीत व्हायचे. बुवांच्या मार्गदर्शनाखाली पेटी वादनात मला प्रभुत्व मिळणार याची खूण गाठ मी बांधली. रोज आठ ते साडे दहा अडीज तास शिकवणी चालायची. बुवा गळ्यानं सुरांची छाननी करायचे अन् ते स्वरमंडल मी गिरवून घोटून घोटून आत्मसात करायच अशी शिकवणी चालायची. बुवांची शिकवणी सुरु झाली आणि माझं रागदारीच ज्ञान किती तोकडं आहे हे माझ्या लक्षात आलं. कितीही तल्लख तत्पर राहिलं तरी बुवांनी गायिलेला तुकडा पेटीच्या सुरांमध्ये चपखल पकडताना खूप गल्लत व्हायची. स्वरांची तीव्रता त्यांच आवर्तन आखूड लांब टप्पा... श्रवणातून त्याची जाण होणं आणि त्या

बारकाव्यांसह एका मात्रेचाही फरक न करता संवादिनीच्या सुरांमधुन व्यक्त करण हे मोठं दिव्यच वाटायच मला.

केदार रागाची स्वरमाला मला मुखोद्गत. पण बुवांनी मारलेली तान पेटीतून उमटवताना माझी फें ss फें उडाली. बुवांनी सलग चार-पाच वेळा संशलयीत बारकावे उलगडून दाखवले पण माझी बोटं काही वळेनात; दरवेळी नवीन चुका व्हायच्या तेव्हा मात्र बुवा उखडले आणि मला खडीफोड्याची, शालजोडीतली चपराक देत बुवांनी शिकवणी थांबवली. नाराज झालेल्या अवस्थेतच मी कांदिवलीकडे चालत सुटलो. विचारांच्या तंद्रीत, भग्न विमनस्क अवस्थेत दामू नगरला जाणारा फाटा मागे पडला याच भानच राहिल नाही. पूर्वीच्या रिवाजाप्रमाणे मी डोंगरीत शर्माजींच्या क्लासच्या ठिकाणापर्यंत पोहोचल्यावर माझी तंद्री भंग पावली.

मी रोज बोरीवलीचा क्लास संपवून बिऱ्हाडी येईपर्यंत निजानीज झालेली असायची. आजतर तंद्रीत डोंगरी पर्यंतचा हेलपाटा झाल्यामुळे आणखीनच उशीर झालेला. पण काकांच्या बिऱ्हाडाचं दार उघडं दिसलं. जरा पुढे गेल्यावर बघितलं तर दारातच खुर्च्या टाकून काका आणि भाऊ गप्पा मारीत बसलेले. मी नाराजी दाबून टाकीत तोंडावर उसनी खुशी आणायचा प्रयत्न केला... "भाऊ SS आज मध्येच अकस्मात कसे काय आलात?" पानाची पिंक टाकीत भाऊ म्हणाले, "तसा कालच

मुंबईत आलो मी. आमच्याकडे किर्तनाला ते जानशीचे पटवर्धन बुवा येतात ना.... त्यांच्या धाकट्या मुलाच लग्न झाल काल. कार्यातच पडेलचे शंकरराव बोडस भेटले. जेवणावळ उरकल्यावर त्यांनी आग्रह करुन गिरगावला नेलं. काल कांदेवाडीत त्यांच्या बिऱ्हाडी ऱ्हायलो. सकाळी रेल्वेला कोण गर्दी ... म्हणून जेऊन खाऊन दुपारनंतर कमी गर्दीचा टाईम धरुन आलो कांदिवलीत...."

मी पाय धुवून जेवायला बसलो. भाऊ भेटल्यामुळे माझी विषण्णता खूप कमी झालेली. जेवण झाल आणि मी बाहेर जाऊन भाऊंच्या कडेला बसलो. कातरलेली सुपारी मला देण्यासाठी हात पुढे करीत भाऊ बोलले, "अशोक ss तुझी तब्बेत बरी आहे ना? तुझा चेहरा जरा उतरलेला दिसतो म्हणून म्हणतो...." त्यांनी एकदम असं कां विचारलं या विचाराने मी सटपटलो... "नाही बा.... दिवसभर जरा दगदग होते... क्लास सुटल्यावर तासाभराची चालं.... त्यामुळे...." माझं बोलण तोडीत माझ्याकडे रोखून बघीत भाऊ म्हणाले, "अशोक रे ss मी बाप आहे तुझा ! तू सैरभैर झालेला दिसतोहेस. नेमक काय झाल ते सांग. माझ्याकडे लपवू नकोस." आता माझा नाईलाज झाला. कसलाही आडपडदा न ठेवता बुवांनी माझा केलेला पाणउतारा सगळं काही एक शब्दही न गाळता त्यांना सांगून यापुढे पेटी शिकवण्याचा फंद पूर्णपणे बंद करण्याचा माझा

विचार असल्याचं मी त्यांना सांगितलं.

माझं बोलण संपल्यावर खोल सुस्कारा टाकीत भाऊ म्हणाले, "हात्तिच्या... एवढंच ना? त्यात काय एवढ मनाला लावून घ्यायचं....? या दिव्यातुन मी सुद्धा गेलोय एकेकाळी. नशीब समज... माझ्यापुढे दिशाच नव्हती. विद्येचा फंद या नादापायी मी सोडलेला आणि दाखणारा- समजावणारा कोणी नसल्यामुळे पेटीच ज्ञानही अर्धवट... भरीसभर म्हणजे संसाराची चिंता.... एक एक सोन्यासारखा जमिनीचा तुकडा कुळकायद्यात कुळानी गिळंकृत केला.... विद्या नाही मधली रास देणारी जमिनही गेली... त्यात देवस्थानच्या वार्षिकाचा फास... एवढी सोंग सांभाळताना उधारी-उसनवारी करायची म्हटलं तर खानदान आणि स्वाभिमान आडवा यायचा. पण डरलो नाही रहाटाचा बैल सोडून जोताला जुंपायचा, जोत ओढून झाल्यावर त्याच बैलाला पुन्हा घाणा ओढायला बांधायचा तव्दत कष्ट उपसले... पेटी अवगत केली नी संसारही सांभाळला...."

डोळे मिटून आवंढा घोटून भाऊ पुढे बोलले, "अरे ss अडीजशे रुपयात मुंबईसारख्या महागाईच्या खाईत सुद्धा चार पाच माणसांच्या महिना चैनीत जातो. माझा मुलगा पेटीच्या छंदासाठी एवढी रक्कम शिकवणीसाठी मोजतो याने माझा उर भरुन येतो. केवढी तुझी हिंमत... पेटी शिकण्यावरच तुझं मन उडाल असेल तर सोडून दे तो फंद ! माझं काही म्हणणं नाही.

पण प्रयत्नाला घाबरुन कच खाल्लीस तर तू वाघापोटी कोल्हा आलास जन्माला असं म्हणेनं मी...! साक्षात हिमालयासारखा गुरु लाभलाय् तुला ! झालचं तर साक्षात श्री दत्तगुरुच कृपा छत्र माझ्यावर आपल्या घराण्याच्या तुझी तपश्चर्या कमी पडतेय् ... प्रतिमेच्या परीस स्पर्श व्हायचा क्षण अजून यायचा आहे तुझ्या आयुष्यात.... अष्टसात्विक भावाने गुरुला शरण जा.... मग पहा.... तुझं श्रवण थिट पडतय.... एखाद्या गायकाचा सूर हृदयाला भिडतो तेव्हा आपोआप वीज उतरते बोटात.... तसा क्षण येईल तुझ्या आयुष्यात मग सगळ सोप होईल आपोआपच... त्या विजयाच्या क्षणापर्यंत चिकाटी सोडू नकोस...."

भाऊंच बोलणं ऐकून मला चांगलाच हुरुप आला. कलेची साधना माणसात काय परिवर्तन करु शकते याचा साक्षात्कारच भाऊंच बोलणं ऐकल्यावर मला झाला. एरवी भाऊ म्हणजे मोजकं बोलणारे.... इतक गहन तत्वज्ञान त्यांनी पचवल असेल अस यापुर्वी कधी प्रत्ययाला आलं नव्हतं माझ्या ! त्यांच्या शब्दांनी जादू झाली, चैतन्याची जणु लाटच माझ्या शरीरभर खेळली प्रभुत्व मिळेपर्यंत हा फंद न सोडण्याच वचन भाऊना त्याच क्षणी मी दिलं. दुसऱ्या दिवशी पासुन शिकवणीला बसताना स्वत्व, अभिमान, अहम् ची कवच कुंडल बाजूला ठेऊन एकलव्यासारखी साधना करायच्या निश्चयाने मी

सतर्कता वाढवायला लागलो. माझ्यातल परिवर्तन, माझ्यात जागृत झालेली विनम्रता बुवांनाही जाणवली असावी. कारण त्यानंतर एखाद्या वेळी दहा दहा खेपाना मी पुन्हा पुन्हा तीच चुक करायचो पण बुवा माझ्यावर नाराज झाले नाहीत.

"अरे अशोक भैय्या...." बुवा खुशीत आले की इंदुरी ढंगात मला अशोक भैय्या संबोधायचे. "माझे एकस्नेही आहेत... त्यांची मुलगी नंदा... ती संगीत शिकायला येतेय् माझ्याकडे तिची प्री-डिग्री झालेली आहे. इथे डालमिया कॉलेजमध्ये एफ. वाय्. साठी तिला अॅडमिशन मिळवून द्यायच काम माझ्यासाठी तू करायचं... ती पदवी शिक्षण आणि संगीत दोन्ही शिकणारेयू जरा कॉलेज मध्ये जाऊन सगळी चौकशी कर... कागदपत्र फी.... काय काय लागेल ते विचारुन घे..." मी दुसऱ्याच दिवशी कॉलेजवर गेलो. क्लेरिकल स्टॉफमध्ये कुंब्रलचा मनु पुजारी दिसल्यावर मला हायसं वाटलं. त्याच्या पदरची कॉफी पिऊन अॅडमिशन फार्म घेतला. चार दिवसांनी नंदा आली. तिची कागदपत्र घेऊन मी पुजारीकडे दिली. त्याने १५ मिनीटात सगळे सोपस्कार पूर्ण करुन रसिट आणि आय कार्ड माझ्या हातात सुपुर्द केलं. बुवांनी विश्वासाने सोपवलेलं अवघड काम आपल्या हातून पूर्ण झाल्याच्या आनंदात त्या संध्याकाळी मी शिकवणीला गेलो.

नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मी पेटी उघडून बुवांनी काल

दिलेली चीज वाजवायला सुरुवात केली. पेटीचे सूर ऐकून बुबा बाहेर आले. मी फी रसीट, आयकार्ड बुवांकडे देत ॲडमिशन झाल्याच बोललो. बुवा आत गेले. मी रियाझ सुरु केला. चार-पाच मिनीटात बुवा बाहेर आले. शिकवणीला सुरुवात झाली. साधारण अर्ध्यातासाने ट्रे मध्ये चहाचे कप घेऊन सुनंदा बैठकीत आली. बुवांना चहाचा कप देऊन एक तबलजी समोर ठेऊन सुनंदा माझ्यासमोर उभी राहिली. पेटी थांबवून मी चहाचा कप घेतला, “अरे अशोक भैया... मोठंच काम केलसं बर माझं... मुंबईत अशी मध्येच ॲडमिशन मिळणं भलतं कठिण... आमचा दोस्ताना मोठा पण तो संगीताच्या प्रांतात.... त्यातला कोणी ॲडमिशनच्या कामाचा नाही. ठीक आहे, आज पासून सुनंदाची शिकवणीही सुरु करुया. मी गाऊन दाखवीन, सुनंदा गळ्याने सराव करील तू पेटीवर सराव करायचा. गायन आणि वादनाची जुगलबंदी सुरु करुया आपण.” घसा खाकरुन, डोळे मिटीत बुवा म्हणाले, “आज सुनंदाच्या शिकवणीचा शुभारंभ! तुम्हाला आवडेल अशी उडत्या चालीतली राजस्थानी ढंगाची ही चीज घेऊया...”

छेल छवैली ss छुन छुन घुंगरु
छुम छुम छन् छन् करके आवत

बुवांनी उच्चारलेली ती पंक्ती ऐकताच त्यातली नजाकत, चालीतला गोडवा आणि लटक.... नेमक्या त्याच क्षणी नंदाने

माझ्याकडे साभिप्राय फेकलेला नेत्र कटाक्ष... मी अंर्तबाह्य मोहरुन गेलो... केतकी सारखा गौरवर्ण, कुरळे केस, झटकन् छाप पडावी असं व्यक्तिमत्व अन् त्याहीपेक्षा मला भावले तिचे निळसर झाक असलेले टपोरे डोळे.... तिच्या निळसर डोळ्यातून चमकलेली प्रकाश शलका माझ्या रोमरोमात थिरकली... बुवांनी गायिलेली स्वरमाला नंदाच्या मधूर कंठातून उमटताच मृगाच्या पहिल्या पर्जन्य धारेसारखी शीतल शिडकावा करुन केली आणि माझ्या शरीरावर रोमांच फुलला ! तिचे स्वर माझ्या कानातून आत शिरताच संवादिनीच्या नेमक्या सुरांवर बोटं टेकण्यापुर्वी माझ्या शरीराला कंप सुटला आणि थरथरणारी बोटं सुरांवर प्रयत्न करुन टेकताच मान वेळवीत मयुराने छेडलेल्या म्याँ ss ओ अशा आर्त केकावली प्रमाणे संवादिनीचे सुर अशा नजाकतीने उमटले की सर्व सामर्थ्यानिशी पिसारा फुलवून पदन्यासाला सज्ज झालेल्या मयुरांचा साक्षात्कारी प्रत्यय यावा.... प्रतिभेच्या परिस स्पर्शाचा माझ्या कौशल्यात आमुलग्र परिवर्तन करणारा टर्निंग पॉईंटचा तो क्षण...

खणाच्या कुंचीत वेष्टीलेल्या श्रीफळरुपी बालदत्तात्रेयाला स्वरांच मांगल्य स्नान घालणारा कामतेकर बुवांचा मधूर आवाज आणि त्या आवाजाला तेवढ्याच ताकदीने सुरांच आभूषण चढवणारी भाऊंची बोटं... त्याक्षणी भाऊंच्या बोटातून

जणू ध्वनी पाझरतात आणि संवांदीनीतून ते उमटतात असा भास मला व्हायचा.... त्याच पूर्णत्वाचा आविष्कार त्या विशिष्ट क्षणी माझ्या बोटांनी केलेल्या किमयेतून साधल्याचा साक्षात्कार मला झाला....! सलामीलाच शिष्यव्दयानी केलेला स्वर-सुरांचा अविष्कार ऐकून प्रसन्न चित्र होत बुवांनी 'बहोत अच्छे' अशी दिलखुलास दाद दिली. त्यानंतर पुढचा अर्धापाऊण तास कृष्ण वेड्या गोपींचा भक्ती आणि प्रीती रसात न्हाऊन निघालेला पदन्यास बुवांच्या दिवाणखान्यात थिरकत राहिला. बुवा तल्लीन होऊन एक एक बारकावा रेशमी लडी सारखा उलगडीत निघाले. हळू हळू एक एक अवघड टप्पा सुरु झाला. नंदाचा आवाका बुवांच्या तुलनेत थिटा पडू लागला. चुकीच्या स्वरमालांची पुन्हाःपुन्हा आवर्तनं व्हायला लागली. अर्थात मी कुठेच उणा पडलो नाही. उलट नंदाला सांभाळून घेण्यासाठी तिच्या कडून दुर्लक्षित झालेले बारकावे चुकलेल्या मात्रा मी पेटीवर थोड्या अधिक स्पष्ट करुन दाखवायचो.

रियाझ पुर्ण झाला अन् बुवा उठून आत गेले. तबलजीने हत्यारांच्या मुखावर गिरद्या टाकून नाड्या बांधायला सुरुवात केली. मी पायपेटी मिटण्यासाठी लाकडी झडपा पाडायला वाकलो. "तुमच्या बोटात खरंच जादू आहे जादू ! तुम्ही एवढे पट्टीचे बजवय्ये असाल याची कल्पनाही नव्हती मला....!" नंदाची प्रतिक्रिया एकून मी अक्षरशः उडालोच. "छे ss छे!

तुमचा काही तरी गैरसमज होतोय्... आताकुठे माझी शागिर्दी सुरु होतेय् ...! तुम्ही उगीच माझी तारीफ केलीत तर मला पंख फुटतील अन् न जाणो त्या भ्रमात मी उडायचा प्रयत्न केला तर धाड् दिशी जमिनीवर आदळेन... इथे सरावासाठी यायला लागून जेमतेम दीड दोन वर्ष होतायत् मला." मी उत्तरलो.

"एक मात्र खरं....!" पेटीवर आच्छादन घालता घालता मी पुढे म्हणालो, "आज बुवांनी पेश केलेली चीज.... शब्दांची नजाकत, सुरांची लटक आणि थिरक एवढी प्रभावी की अगदी मात्रान् मात्रा माझ्या हृदयापर्यंत खोल जाऊन भिडली खरी....! खरंच परमेश्वराने तुम्हाला गोड गळा दिलाय् ... मी हा असा भणंग.... तुम्ही कमाल करताय् ती किमया माझी नसून संवादिनीच्या सुरांची आहे.... या पेटीवर किती जाणकार बुजुर्गांनी स्वरांचे ताज उभे केलेयत्... खर श्रेय या खानदानी अरगणाला द्यायला हवं... माझी कर्तबगारी अगदी नगण्य.... नुसती हवेत बोटं फिरवून मधूर स्वर थोडाच उमटणारेय् ...."

मानेला नापसंती दर्शक झटका देत नंदा म्हणाली, "तुमचं हे बोलणं म्हणजे निव्वळ विनय आहे... किंवा माझ्या सारख्या नवशिक्याची प्रतिक्रिया तुम्हाला तुच्छ वाटत असेल... ते जाऊ द्या.... माझी एक विनंती आहे तुम्हाला.... तुम्ही मला अहो जाहो म्हणू नका प्लीज.... माझं नाव फार गोड, रेअर वगैरे नाही की कुणालाही ते उच्चारावसं वाटेल पण भीमा, राम, काशी इतक

टाकावू नक्कीच नाही.. अन् अहो जाहो म्हणण्याएवढी काही मी पोक्ती पुरवती दिसतं नाही.... मी शिष्या म्हणून मैफिलीत बसले तेव्हा तुम्ही तरी मला फक्त नंदा असंच म्हणा... अन् हो.... ॲडमिशनचं मोठं काम तुम्ही केलंत् आभार वगैरे मानणं तुम्हाला रुचणार नाही पण तुमच्या सद्भावनांची दखल मी घेतलीय् एवढंच लक्षात ठेवा...."

खुशीच्या हिंदोळ्यावर झुलतच मी घराकडे निघालो. घंटेच्या मंजूळ किणकिणी सारखे नंदाचे शब्द माझ्या कानात घुमत राहिले. माझ्या साधनेतला परिवर्तनाचा क्षण... प्रतिमेचा-प्रेरणेचा स्पर्श, शब्द कर्ण रंध्रात शिरुन बोटातून झिरपत झिरपत सुरु होऊन संवादिनीतून उमटणं काय असतं याचा थरार मी आज अनुभवला होता...! विचारांच्या तंद्रित वाटचाल करीत असताना अकस्मात लाऊड स्पीकर वरुन तलत मेहमूदच गीत कानावर आलं... 'ऐ प्यार तेरा शुक्रिया ss शुक्रिया ss शुक्रिया ss...' माझं आवडतं... माझ्या मनात रुतलेल गीत... खरंतर रेडिओ सिलोनवर खूप वर्षापुर्वी फक्त एवढीच ओळ मी ऐकलेली.... मी पुढे ऐकण्यासाठी सरसावणार तोच गाणं संपल अन् "अभी आपने तलत के स्वर में..." असा निवेदकाचा आवाज आला. या गण्याचा अर्धवट मुखडा मात्र अंतरात खोलवर रुतुन राहिला तो राहिलाच... पुढच्या काळात ते गीत

मला इच्छा असूनही पुन्हा ऐकण्याची संधी कधीच मिळाली नव्हती...

मी रस्त्याच्या कडेला थांबवून तलतचे मधुर आर्त स्वर कानात साठवीत राहीलो. त्यांच्या सुरातला कंप, थरथर आणि आर्तता हृदयाचा ठाव घेणारी.... गाण्याचा मुखडा ऐकून मी केलेला अंदाजही पुढची ओळ ऐकल्यावर साफ चुकलेला. ते गीत प्रेमांच साफल्य सुचीत करणारं नव्हतचं मुळी कारण पुढच्याच ओळीत कवी म्हणतो, "बदलेमें हमको गम दिया ss शुक्रियाss" वैफल्यातही आनंद असतो.... मला नंदाची प्राप्ती नक्कीच होणार नाही पण तिच्या संगतीत सुरांचा साक्षात्कार होऊन माझ्या कौशल्यात पूर्णत्व येईल हे नक्कीच नाहीतर आयुष्यात समोर दिसणारी प्रत्येक चांगली वस्तू तुमच्या उपभोगासाठी विधात्यानं निर्मिली आहे असं थोडचं असणार आहे?

नकळत तलतचा आणि त्या गीतकाराचा शुक्र गुजार होत मी गुणगुणायला लागलो... ए प्यार तेरा शुक्रिया ss योग्य वळणावर योग्य दिशा मिळावी हा सुद्धा शुभ संकेतच म्हणायला हवा.... बेट्या अशोक सावध हो.... तेरा मक्सद सिर्फ प्यार नहीं है.... सम्हल बेटा... सम्हल गिर गया तो प्यार नहीं और सुर भी नही....नसत्या भूलभुलैयात सापडलास तर फक्त दगडफोड्याच राहशील... तुला संगमरवरातुन सुंदर मुर्ती

घडवायची आहे. भाऊंच स्वप्न पुर करायचं आहे. शीतल छाया देऊन उष्मा निवारण्यासाठी आम्रवृक्षाची फळ चाखायचा किंवा त्यांच्या ढलप्या जाळून अन्न शिजवायची इच्छा करण हा अतिरेक आहे.

बुवांकडे क्लासला जाताना रोज न चुकता तलतचं ते गीत मला हमखास आठवायचं. त्या गीतामुळे माझी साधना निर्वेध झालीच पण मी अलिप्त वागल्यामुळे नंदाची साधनाही भंगली नाही. दिवस जात राहिले. जे. जे. मधला कोर्स करुन ॲडव्हर्टाईज ब्युरोत मला चांगला जॉब मिळालेला. चांगल स्केल, मनाजोगतं आणि ठराविक तास काम... माझ्या आयुष्यातलं सुखमय पर्व सुरु झालेल, पहाटे चारला उठून रात्री अकरा वाजेपर्यंत उरी फुटेतो जीव घेणे कष्ट करायचा परखड काळ संपला. बुवांकडच्या शिकवणीमुळे संवादीनीच्या सुरांवर माझी बोटं वीजेच्या चपखलतेन फिरु लागली... श्रवण तल्लख झालं... बुवांच्या परिवारात कुठे कुठे साथ संगत करायाची पर्वणी ही मिळायला लागली.

खरंतर शिक्षणाला पूर्ण विराम द्यायचाच माझा विचार ! पण आठ दहा महिने गेले अन् काकांनी धोशा लावला. पोस्ट ग्रॅज्युएशन करच असा त्यांचा आग्रह मला मोडता आला नाही. जे.जे. मध्ये तशी व्हेकेशन बॅचची सोय असल्यामुळे कोणतच कारण पुढे करता येणारं नव्हतं. आता आठवड्यातुन दोन दिवस

पोस्ट ग्रॅज्युएशनच्या क्लाससाठी पेटीच्या शिकवणीत खाडे व्हायचे. पण उरलेल्या पाच दिवसात मात्र एक दिवसही क्लासला दांडी मारायची नाही असा दंडक मी ठेवला. रियाझ केल्याशिवाय, नंदाचे सुर कानात पडल्याशिवाय दिवस सार्थकी लागल्या सारख मला वाटायचंच नाही. आतातर बुवांकडे माझ्या अस्तित्वाला प्रतिष्ठा प्राप्त झालेली. संगीत क्षेत्रातला कुणी जाणकार बुजुर्ग आलातर बुवा त्याला माझी ओळख अभिमानाने करुन द्यायचे.

बुवांच्या आणि नंदाच्या प्रयत्नामुळे, त्यांच्या आग्रहाखातर मुंबई रेडिओ केंद्रावरुन माझे सोलो वादनाचे २/३ कार्यक्रम प्रसारीत झाले. हुकमी प्रसिध्दीसाठी आकाशवाणी ही मोठी पर्वणी खरी पण मला मात्र तिथे गुदमरायला व्हायचं. एकतर रेकॉर्डिंग होईपर्यंत तासंतास तिष्ठंती... आपण संधी दिल्यामुळे या माणसाला प्रसिद्धी मिळतेय् असं सूचित करणाऱ्या संबंधितांच्या नजरा.... कितीही जीव तोडून सादरीकरण झालं तरी 'असे किती बजवैय्ये आम्ही पाहिलेत' असं तुच्छता दर्शक नजरेने सूचित करुन मानधनाच्या व्हावचरवर सही घेणारी चाबरट कारकूनी होती... मला ते नकोसं व्हायचं.... माझ्या कार्यक्रमात साथीदार तालरक्षक स्टाफ आर्टिस्ट तो तर केवढ्या तोऱ्यात.... मी कोण आहे काय आहे हे त्याला एकदा सुनवाव... "मी जे.जे.चा डिप्लेमा होल्डर आहे.... गळ्यात पेटी बांधून पैसे

गोळा करणारा बहुरुपी नाही." अस खूपदा वाटायच. झालच तर मला मिळालेला अरगण.... अरगण कसला सूरांची पेटीच ती.... सूर मिळवायला झालेले भाता मारताना तर चढणीला सायकल मारल्यासारखे पोटरीत गोळे यायचे.... मी बुवांच्या तालमीत तयार झालेला म्हणूनच निभावून नेलं... इतकच.

रेडिओ केंद्रावरुन प्रसारीत झालेला कार्यक्रम ऐकल्यावर भाऊंचं पत्र आलं. पत्र कसल मानपत्रच ते .... भाऊंनी मला दत्तजयंतीच्या उत्सवात कीर्तनाला पेटीची आय द्यायला येण्यासाठी दिलेल ते आवतणच जणु ! मी मग शिस्तीत प्रोग्रॅम चॅर्टर केला. मित्राची स्पेशल गाडी (जातं येतं फक्त पेट्रोल टाकायच.... चालक म्हणून दुसरा एक मित्र फुकट कोकण बघण्यासाठी यायचा होता.) करुन बुवा, नंदा, तबलजी प्रदीप बर्वे आणि माझ्या कमाईतून घेतलेला ऑर्गन असा सगळा लवाजमा घेऊन मी कुंब्रलला गेलो. कामतेकर बुवा वृद्धापकाळामुळे हल्ली बाहेर जाणं बंद केलेलं. त्यामुळे देशपांडे नावाचे दुसरे कुणी बुवा आलेले. कामतेकर बुवांची उणीव असती तरी देशपांडे बुवा सुद्धा कामतेकर बुवां एवढेच तरबेज असल्याच मला जाणवलं. मुंबई आकाशवाणीवरुन कार्यक्रम सादर झालेला (?) अन् त्याही पेक्षा भाऊंचा मुलगा अशा ग्लॅमर मुळे दशक्रोशीतली झाडून सगळी मंडळी जमलेली.

भाऊ समोर असताना वाजवायचं म्हणून माझ्यावर भलतं

दडपण आलेलं. भाऊ डोळे मिटून माझं वाजवणं (की मी काय चुका करतो त्या टिपणं) ऐकत बसलेले. कीर्तन पूर्ण होईपर्यंत भाऊ निर्विकार. कीर्तन संपलं... घरगुती घसण असलेल्या नेमक्या माणसांच्या वर्तुळात गप्पांच्या ओघात भाऊ म्हणाले, “आज माझं स्वप्न साकार झालं.... दत्तात्रेयाच्या सेवला ऑर्गन आला आणि माझ्या माघारी बिनचूक वाजवणारा हक्काचा पेटीवालाही मिळाला.” मला प्रेरणा देऊन पेटी शिकायचा व्यासंग सुरु ठेवण्यासाठी भाऊनी केलेलं वक्तव्य आठवून मला हसू आल. त्यावेळेसारखा एकतरी धारदार शब्द भाऊनी माझं कौतुक करण्यासाठी उच्चारायला हवा होता असं मला उगीचच वाटून गेल.... अन् दुसऱ्या क्षणीच माझी चूक मला उमगली. बिनचूक वाजवतो यावरती आणखी काय तारीफ कोणता प्रतिभावंत करील?

त्या दत्तजन्मोत्सवात बुवांचं, नंदाचं गायन हे खास आकर्षण ठरलं. त्याना साथ केल्यामुळे माझ्या ऑर्गन वादनाला मध्यंतरात माझ्या कसबाला खरा सोन्याचा मुलामा चढला. बुवांशी बोलताना भाऊ म्हणाले, “तुमचं गायन ऐकलं आणि माझे कान तृप्त झाले.” त्यावर बुवा म्हणाले, “आता आमचे कान तुम्ही तृप्त करा... नंदाची दोन तीन पदं झाल्यावर मी एक चीज पेश करणार आहे, त्यावेळी मला तुम्ही साथ द्यायची.” बुवाना साथ देताना भाऊनी स्वतःची पेटी उघडली. हल्ली खरंतर

भाऊंची बोटं कापायची.... पण पेटीवर बसल्यावर ते कापणं बंद झालं.... भाऊंनी अशी बहारदार साथ दिली, त्यांच्या बोटांच लाघव पाडून मी पुरता खजिल झालो. गाणं संपल्यावर बुवानी भाऊंच्या चरणाला स्पर्श केला... "प्रतिमेचा आविष्कार उत्स्फूर्त असतो.... त्यासाठी कुणी गुरु लागत नाही.... देऊन असा कलाकार घडत नाही अन् मार्गदर्शक नाही म्हणून प्रतिभेचा आविष्कार खुंटत नाही... तुमच्या साथ देण्यात कलेचा स्वयंभू प्रत्यय मला आला." बुवांचे शब्द ऐकून भाऊंच्या नेत्रात आनंदाश्रू आले. त्यांच्या आयुष्यातला तो सर्वश्रेष्ठ सन्मान होता. मी सुद्धा न राहवून दत्तात्रेयांच्या साक्षीनं त्या स्वयंभू कलाकाराच्या चरणावर मस्तक ठेवलं.

उत्सव करुन मुंबईला गेल्यानंतर एक दिवशी बुवा म्हणाले, "अशोकजी आता तुमचं शिकण संपल. तू इथे ये.... आता शिकायला नव्हे साथ करायला म्हणून ये." त्यानंतर दरमहा प्रमाणे मी शिकवणीचे पैसे द्यायला लागल्यावर तेही बुवानी नाकारले. मला कस सुचल कोण जाणे... मी म्हणालो, "बुवा ss ही शिकवणी नव्हे... ही कृतज्ञता भेट आहे. इतकी वर्ष तुम्ही ज्ञान भांडार खुलं केलंत माझ्यासमोर.... मला चांगला पगार मिळतो. आता काही कमी नाही. तुमच्या कडून जे मिळालं त्याच मोल शिकवणी दाखल दिलेल्या पैशात नाही होणार." एवढं बोलून पैसे त्यांच्या पायाशी ठेऊन मी उठलो.

जे.जे. मधून मला मास्टर्स डिप्लेमा मिळाला त्याच दरम्याने जे.जे. ची एक बँच गोव्यात पणजीला सुरु झाली. मी कान्व्होकेशन फॉर्म भरायला गेलो तेव्हा एच.ओ.डी. आंदुळेकर सरांनी मला बोलावून घेतलं. मी त्यांच्या केबिनमध्ये प्रवेश केला. मला बसायला सांगून कसलीही प्रस्तावना न करता सरांनी थेट मुद्याला हात घातला. “अशोक, जे.जे.ची ब्रँच गोव्याला सुरु झालीय् तुला कळलं असेलच. त्या माणसाना चांगला स्टाफ हवाय.... चांगला हँड देण्यासाठी त्यांनी मला गळ घातलीय्... तुझं गाव तिकडे कोकणातचं आहे ना? इथे कंपनीच्या जॉबमध्ये तुझं स्केल आहे त्यापेक्षा जादा पेमेंट मिळेल, रहायला क्वार्टर मिळेल. पर्मनण्ट पेन्शनेबल जॉब आहे हा. ही संधी तू घेच. गोव्यात तुला संगीताचा छंदही जोपासता येईल. पणजी नभोवाणीवर माझे मित्र शिरोडकर आहेत. मी कालच फोनवर बोललो त्यांच्याशी ते कॉण्टॅक्ट करतील तुझ्याशी. उद्याच कंपनीत रिझायनिंग लेटर दे. नोटीस पे नवीन मॅनेजमेंट कॉम्पेनसेट करील.... मी त्याना शब्द दिलाय्... आठवडाभराने तू येशील अस मी कळवतो त्याना.... ओके ॲण्ड गुडबाय्....

मी हो नाही म्हणण्याचा प्रश्नच उरला नाही. संधी सोन्यासारखी.... काकानी माझी पाठ थोपटली. दुसऱ्या दिवशी रिझायनिंगलेटर आणि नोटीस पे अकौण्ट सेक्शन मध्ये देऊन

हाफ डे लिव्ह घेऊन जरा लौकरच मी बुवांकडे बोरिवलीला गेलो. मी नेहमीप्रमाणे पेटी उघडून सुरांवर हात मारला. पेटीचे स्वर ऐकून नंदा धावतच दिवाणखान्यात आली. "अय्या ss कमाल आहे हं... एवढ्यातच तुमची आठवण काढली होती मी; आज लौकर कसे काय? ऑफिसला दांडी वाटतं?" मी गंभीर चेहरा करीत म्हटल... "दांडीच पण मी नाही... ऑफिसनं मला दिली.... मला काढून टाकलंय कंपनीनं... आय् एम् जॉबलेस ॲट दीस मोमेंट!" माझं बोलणं ऐकून नंदाच्या डोळ्यात पाणी तरळलं. ती ओशाळून म्हणाली, "आय् एम् व्हेरी सॉरी ss प्लीज डोंट गेट अपसेट...." डोळ्यातल पाणी थोपवून हसरा चेहेरा करीत ती म्हणाली, "मुंबईत ढिगानी जॉब पडलेयत्.... मी सांगते तुम्हाला... आठवडाभरात याच्यापेक्षाही प्रेशस जॉब मिळेल तुम्हाला. बघा तर खरं... माझी बत्तीशी खोटी होणार नाही...!"

मी डोळे मिचकावीत म्हटलं, "यू आर ग्रेट नंदा ? तुझी बत्तीशी म्हणजे आकाशवाणी....! तू म्हटलस म्हणजे जॉब मिळालाच मला... आय् एम् शुअर.... !" आता मात्र नंदाचे डोळे भरुन आले, ओढणीच्या टोकाने डोळे टिपत ती म्हणाली, "मी प्रार्थना करीन देवाला.... माझं सगळ पुण्य कामी येऊदे पण तुम्हाला चांगला जॉब...." मी पेटीवरुन उठून तिच्या तोंडावर हात ठेऊन तिचं बोलणं थांबवलं अन् खरी गोष्ट तिला सांगून टाकली. त्यावर उत्साहाने खळखळत नंदा म्हणाली. "नाऊ वी

वील सेलिब्रेट.... आज आपण थ्रीस्टारला जाऊया... मी तुम्हाला वेलकम् पार्टी देते..." मी हसून म्हटल, "यू आर मिस्टेकिंग... वेलकम पार्टी नव्हे.... फेअरवेल पार्टी म्हण.."



त्यावर माझ्या नजरेत रोखून पहात निश्चयी सूरीत नंदा म्हणाली, "एवढं इंग्रजी कळतं मला. मी अर्थ लक्षात घेऊनच बोलले. मी देणारेय, ती निरोपाची पार्टी नाही... स्वागताची पार्टी.... वेलकम पार्टीच देणारेय्...." मी म्हटल, "थांब.... तू पार्टी देणारेयस् ना मला? मग मी सांगेन ती पार्टी दे.... मी मागेन ते देशिल मला?" क्षणाचाही विलंब न लावता नंदा उत्तरली, "हो हो ss! देईन... तुम्ही मागाल ते द्यायच वचन देते मी तुम्हाला असं समजा....! " त्यावर नजरेत बेरकीपणा आणून डोळे मिचकावीत मी म्हटलं, "मागतो तर...! माझी मागणी कदाचित अन् एक्स्पेक्टेड वाटेल तुला..."

मध्येच थांबून मी मोठा पॉज घेतला... "जे तुला अभिप्रेत आहे त्या पेक्षा वेगळ काही मी मागितल तर....?" माझा प्रश्न ऐकताच नंदाच्या गालावर उठलेला रक्तिमा किंचित झाकोळला.... माझ्याकडे एक आर्त दृष्टीक्षेप टाकीत अधोवदन होत ती म्हणाली, “वचन तर दिलय्... आता अपेक्षाभंग होवो की अपेक्षा पूर्ती होवो... मागा काय ते....!” एक एक शब्द शांतपणे उच्चारीत मी म्हणालो, “एक छानसं भावगीत म्हण माझ्यासाठी... आजपर्यंत गायलीस तो रियाज होता... अर्थशून्य रियाझ.... मला तुझं गाण ऐकायचय् माझ्यासाठी म्हटलेलं...”

अन् मी स्केल धरलं. नंदाने नेत्र मिटून घेतले ... एक छान आलाप घेऊन तीने गीत सुरु केलं...

सूर तुझे शब्द इथे झाले ss गीत बनूनी ओठावर आले ss
कृष्ण कृष्ण आर्तसाद कधी तू नच ऐकिली
पण अबोध प्रीतीची खूण मला उमगली
लपविलेस अंतरात गुपित आज उलगडले ss
मदनबाण अंतरात अवचित हा रुतला
स्वरमय ही सप्तपदी अर्थ आज आकळला
शतजन्मी उरणाऱ्या बंधनात गुरफटले ss
आज तुझी झाले मी आज तुझी झाले ss

# ५. तेरी चुनरिया दिल ले गयी

रोहन आणि छबुमावशी पनवेलला पोहोचली तेव्हा सकाळचे सात वाजत आलेले होते. सी.बी.एस्. समोर कर पार्क करून मावशी खाली उतरली. रिक्षावाल्याकडे चौकशी करता तिथून पाच मिनिटाच्या अंतरावर बी.एड्. कॉलेज असल्याचं समजलं. मग समोरच्या वृंदावन लॉज समोर कार पार्क करून मावशी रोहनला उठवायला लागली. रोहन डोळे चोळीत आळोखे पिळोखे देऊ लागला. “उठ रे आता, आलं पनवेल”मावशी खाली उतरून काउंटर कडे जाऊ लागली. मॅनेजरने सुहास्य मुद्रेने स्वागत करून,“काय सेवा पाहिजे?” अशी चौकशी केल्यावर मावशीने डिल क्स रूम बुक केली. मॅनेजरने रजिस्टर मधल्या नोंदी केल्यावर मावशीने गिचमिड अक्षरात सही केली. लॉजवरच्या पोऱ्याला घेवून ती कार जवळ आली. ड्रायव्हरने डिकी उघडून आतल्या चार - पाच भल्यामोठ्या सुटकेसीस बाहेर काढल्या.

मावशी नी रोहन फ्रेश होईपर्यंत लॉजच्या पोऱ्याला घेवून ड्रायव्हर कॉलेजकडे चक्कर मारून आला. आंघोळी उरकून , चहा ब्रेकफास्ट घेतल्यावर ठीक दहा वाजता मावशी रोहनला घेवून कॉलेजकडे निघाली. बरोबर पाच मिनिटात कार

कॉलेजच्या ग़ेट्मधून आत शिरली. कॉलेज नुकतंच नॅकच्या पर्वातून गेलेलं.... दुरूनच बी. एड्. कॉलेजचा मोठ्ठा बोर्ड दिसला. एरव्ही आर्टस्, कॉमर्स ,सायन्स कॉलेज, कॉम्प्युटर इन्स्टीट्युट , जुनियर कॉलेज , बी फॉर्मा- डी फॉर्मा डी.एड्. कॉलेज या सगळ्या जंजाळातून बी. एड्. कॉलेजचं ऑफिस शोधून काढणं चक्रव्यूह भेदण्याइतकं जिकीरीचं असायचं. पण नॅक मुळे अवर मोटो पासून ते स्टोअर रूम, कॅंटीन पर्यंत सगळीकडे चकचकीत बोर्ड लावलेले असल्यामुळे कॉलेजचा .वरलिया रंग' तरी भुलण्यासारखा झालेला होता. बी.एड्. चं ऑफिस उघडं होतं . पण आत सगळं सुनसान! अर्धा तास ताटकळत बसल्यावर रुबाबदार वेषातला एक गृहस्थ ॲटॅची सावरीत प्रवेश करता झाला. काउंटरच्या साईडचा दरवाजा उघडून आत गेला, खडखड आवाज झाला नी पाच मिनिटात भलामोठा किल्ल्यांचा जुडगा घेवून तो केबिन बाहेर आला.

“एक्स्क्युज मी हं...... आम्ही बी.एड्. ला ॲडमिशन घ्यायला पुण्याहून आलोय.......” मावशी त्याला म्हणाली. “ते ओळखलं मी . आत्ता अर्ध्या तासात सुपरिटेंडंट, क्लार्क, प्यून्स, प्राचार्य वगैरे मंडळी येतील.क्वालेजचं टायमिंग आकरा वाजताचं आस्तय..... तोवर बसा हितंच.....” असं म्हणून तो माणूस निघून गेला.त्याच्या मागोमाग मावशीही बाहेर जावून कॅरिडॉर मध्ये थांबली.

साधारण सव्वाअकराच्या सुमारास माणसांची वर्दळ सुरू

झाली. पोरींचे घोळके मोठमोठ्या ब्रीफकेसिस नी काव्या सुरनळ्या, पॉईंटर, नकाशांच्या गुंडाळ्या, पुठ्ठ्या चे बोर्ड असा जामानिमा सावरीत येताना दिसू लागले. अशाच एका मुलींच्या घोळक्यासमोर थांबून मावशी म्हणाली, “तुम्ही बी.एड्.च्या मुली ना गं?” फिदी फिदी हासत , एकमेकींशी फिसफिसत त्या बोलल्या, “नवीन ॲडमिशन वाटतं?”मावशीने मानेनंच होकार दिला. “तरीच... अहो काकू, बी.एड्.च्या मुली ना गं ? असं तुम्ही विचारलंत तेव्हाच आम्हही ओळखलं की ही नवीन ॲडमिशन आहे. कारण गुंडाळ फळे, नकाशांची भेंडोळी , तक्ते ही बी.एड्. च्या मुलींची व्यवच्छेदक लक्षणं, पोस्ट्मन, कंडक्टर त्यांचा सरंजाम बघूनच ओळखता येतात तद्वत बी.एड्. स्टुडंटस् सुद्धा त्यांच्या सोबतच्या वस्तूंवरून ओळखता येतात. तुमची मुलगी अँडमिशन घेतेय वाटतं? ”

“नाही, म्हणजे माझी भाची,म्हणजे रसिका भोबेची ॲडमिशन झालीय् या कॉलेजमध्ये....ती आत ऑफिसमध्ये बसलीय्.... आम्ही किती वेळच्या तिष्टंती करतोय् इथं. कुणी एक चौकशी करील तर नाव नाही. नशीब ऑफीस उघडं होतं म्हणून बसायला तरी भेटलं......” नाराजीच्या सुरात मावशी बोलली. त्यावर मुली बोलल्या,“ अहो, बी.एड्. साठी एकच प्यून आहे. तो बाहेरची कामं वगैरे उरकून बारा साडेबारा वाजेतो येईल. प्रिन्सिपॉल सुद्धा त्याच वेळी येतात. आत्ता एवढ्यात सुपरिंटेंडंट आणि क्लार्क येतील. तरी बरं आज लेसन डे नाहीये,

नाहीतर अडीज वाजेतो  सगळं सुनसान असतं. ते बघा सुपरिंटेंडंट डोके येतायत... जावा आत, अन् भेटा त्यांना. ते सगळं समजावून सांगतील. ” तेवढ्यात एक मध्यम वयाचा टक्कल पडलेला मनुष्य ऑफिसमध्ये शिरताना दिसला . त्याच्या पाठोपाठ मावशी लगबगीने आत शिरली.

सुपरिटेंडंटच्या  मागोमाग  रोहनला आत चलण्याची खूण करीत काउंटरच्या आत जावून त्यांच्या टेबलसमोरच्या खुर्चीत मावशी ऐसपैस बसली. रोहनकडे पहात म्हणाली, “बस ना गं रसिका. बस इथे.....” त्यावर ह्यॅ ह्यॅ करीत सुपरिटेंडंट डोके म्हणाले,“ अहो बसाना! असं लाजताय् काय.... आता बाई होणार ना तुम्ही? मग बसा की हितं खुर्चीवर....! ” बाई होणार ना तुम्ही ... ही काय  भानगड आहे ते पटकन रोहनच्या डोक्यातच येईना. चपापून डोळे मिटीत खालचा ओठ दातानी चावल्या सारखा केल्यावर त्याच्या लक्षात आलं.डोकेना म्हणायचं होतं की तुम्ही शिक्षिका म्हणजे मॅडम म्हणजे शाळेत मुलाना शिकविणाऱ्या 'बाई' होणार..... पण वस्तुस्थिती अशी होती की , रोहन त्याची सख्खी जुळी बहिण रसिका बनून तिच्याऐवजी बी.एड्. करायला पनवेलला आलेला होता. अर्थात मुलीचा वेष करून ! म्हणजे डोक्यानी जे म्हटलं ते  लक्ष्यार्थी नव्हतं तर अक्षरश: सत्य होतं. त्याला मॅडम व्हायचं होतं नी त्यासाठी बाई म्हणूनही वावरायचं होतं. म्हणून 'बाई होणार ना तुम्ही?' असं डोक्यानी विचारल्यावर रोहन सटपटला होता.

आता हे सगळं त्रांगडं कशामुळे झालं? तर सिनेमात दाखवतात तशीच ही सगळी स्टोरी घडली होती.

रोहन अन् रसिका ही जुळी भावंडं! रसिका ही टिपिकल इंडियन मुलगी. म्हणजे खूप नट्टापट्टा करायची हौस, अभ्यासात सो-सो वगैरे..... दहावीला जेतेम मार्क्स मिळवून उद्धरल्यावर ती आर्टस् ला गेली अन् रोहन डिस्टिंक्शन मिळवून सायन्सला गेला. दोन्ही भावंडांमध्ये कमालीचं साम्य . त्यात कालमाना नुसार केशभूषा, वेशभूषा हे स्त्री पुरुषांमध्ये बाह्यभेद करता येईल म्हणजे स्त्री पुरुष असा फरक येईल असे घटक! पण बॉय कट, टाईट जीन्स, लुज टी शर्ट ही दोघांचीही एकसारखी वेषभूषा असल्यामुळे बहिण-भाऊ यातला फरक बारकाईने-नीत निरखून बघितल्या ऩंतरच करता यायचा. तो सुद्धा आईलाच. त्यांचे पप्पा तर रोहन - रसिका यांच्यात भेद करण्याच्या फंदातच पडत नसत. दोन्ही मुलं आपलीच आहेत, त्यातला कुणीतरी एक रोहन आहे म्हणजे दुसरी रसिका असणार असं त्यांचं मत. दोघांचेही वाढदिवस एकाच दिवशी. गिफ्टच्या निमित्ताने वस्तूंचे स्वरुप , प्रकार यामध्ये स्त्री पुरुष असा भेदभाव करण्याची वेळ येते. पण हल्ली मुलं साधारण ६/७ वर्षाची झाली की त्यांना स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होतं नी मतं फुटतात. त्यामुळे वाढदिवसाला काही गिफ्ट वगैरे देवून आपल्या चॉईसचे वाभाडे कशाला काढून घ्या? असा भावरथी विचार करून सरळ काय ती अमाऊंट देवून ते मोकळे व्हायचे.

दोघांची कॉलेजिस वेगवेग़ळ नी दोन टोकाना . रसिका एस्.पी. ला नी रोहन गरवारेला . त्यामुळे तोही घोळ कधी उद्भवला नाही. दोघंही थ्रिल म्हणून दोन-चार वेळा अदलून बदलून एकमेकांच्या कॉलेजात जावून मित्रमैत्रिणी नी प्राध्यापकाना चकमा देवून आलेली..... रोहन प्रथमच एस्.पी कॉलेजला जावून रसिकाच्या मैत्रिणींमध्ये बिनधास्त वावरून दोन लेक्चर्स अटेण्ड करून आला. पण कुणालाही जराही संशय आला नाही. पण वरचेवर चिमटे घे, गळ्यात हात टाक , गालावरून हात फिरव असली थेरं रोहन करायला लागला तेंव्हा त्याच्याकडे जरा चमत्कारिक नजरेने पहात रसिकाची मैत्रिण बरखा जैन म्हणाली, “काय गं रसिका, आज अगदी लाडात काम आलेलं दिसतय्.... कोई खास बात है क्या? अजूबा मिल गया क्या? ” तेव्हा मात्र रोहन सावध झाला. रसिकाला मात्र जरा वेगळा अनुभव आला. तिने रोहनच्या मित्रांच्या पाठीत वारंवार धपाटे घातले, उगाच हासत गळ्यात पडून बघितलं पण कुणीच काही प्रतिसाद दिला नाही. परत आल्यावर रसिका मात्र फुरंगटून म्हणाली, “रोहन, तुझे मित्र अगदीच 'हे' आहेत हं.... एकाने तरी माझ्या पाठीत धपाटा घालायचा होता.... निदान मांडीवर चापट तरी.... कमसे कम खांद्याने हलकासा धक्का तरी द्यावा होता......छे ऽऽछे ! तुझे मित्र अगदी रिजीड नी बुद्दू निघाले यार. ” त्यावर रोहन बोलला, “अगं त्या बिचाऱ्याना तरी काय कल्पना की तू मी नसून तू आय् मीन रसिका आहेस.

अन् खरी बात अशी की असली थेरं  कुणाशी करायची? समोरची व्यक्ति तशीच चार्मिंग असावी लागते. तू मुलगी आहेस हे कळलं असतं तरीही तुला बघून  असलं आचरट डेरिंग कोण कशाला करील? ”

काहीवेळा रस्त्यात फिरताना कधितरी मित्र मैत्रिणी गल्लत करायचे. रोहनचे मित्र रसिकाला रोहन समजून खेचायचे. तर रसिकाची मैत्रिण 'हाय रसिका ' म्हणत रोहनच्या गळ्यात पडायची. कारण दाढी  मिशांच्या बाबतीत  निसर्गाने रोहनला बराच सॉफ़्ट कॉर्नर दाखवलेला. एस्. वाय्. ला असताना त्याच्या मिशा नजरेत भरण्या इतक्या वाढलेल्या . पण हनुवटी वगळता गालफडांवर दाढीचे राठ केस नव्हते आणि दाढी मिशांचा रंगही भुरकट. त्यात भर म्हणजे त्यावेळी हिंदी फिल्मी दुनियेत दाढी मिशा सफाचट करण्याचा ट्रेण्ड आलेला. त्यामुळे वरकरणी  पहाणाऱ्याला रसिका नी रोहन यांच्यात भेद करणं अशक्य होतं. रसिका बी.ए. झाली नी रोहन कॉम्प्युटर घेवून बी.एस्सी. झाला. तो सॉफ्ट्र वेअर आणि हार्डवेअर दोन्ही मध्ये काहीतरी शॉर्ट टर्म कोर्सेस पूर्ण करून पप्पांच्या स्वामीकृपा ईलेक्टॉनिक्स मध्ये सेटल होणार  हे जवळ जवळ पक्कं झालेलं. रसिकाचं मात्र काहीच ठरत नव्हतं. बी. ए.चा रिझल्ट लागला नेमक्या त्याच वेळी पप्पांचे एक मित्र रमणबाग हायस्कूलचे हेडमास्तर नाडकर्णी सर घरी आलेले. गप्पांच्या ओघात ते सहजावारी बोलून गेले. “अगं रसिका, तू असं का करीत नाहिस?

सरळ बी.एड्. कर नी टिचर हो. तू बी.एड्. झालीस तर माझ्या हायस्कूल मध्ये तुझा जॉब शुअर आहे असं समज. ”

“शीऽऽ मला नाही टीचर व्हायचं......” नाक मुरडित रसिका फिस्कारली. पण नाडकर्णी सरांचे ती टीप रसिकाच्या मम्मीने मात्र चांगलीच मनावर घेतली.

एन.सी.टी.ई. ने मलिदा खावून खैरात केल्यासारखी बी.एड्./ डी.एड्. आणि नर्सिंग कोर्सेसना परमिशन दिल्यामुळे त्यावेळी महाराष्ट्रात बी.एड्. /डी.एड्. आणि नर्सिंग कॉलेजिसचं जणु पेवच फुटलेलं. गावोगावी नी गल्लोगल्ली पावसाळ्यात उगवणाऱ्या कुत्र्याच्या छत्र्यांसारखी विना अनुदानित कॉलेजिस सुरु झालेली. मम्मीने आठवडाभरात बी. एड्. ची मोहिम सर केली. त्यावेळी नुकतच बी.एड्. प्रवेशासाठी गव्हर्नमेंट सी.ई.टी. चं खेकटं सुरू झालेलं अन् सी.ई.टी. च्या लास्ट डेट कधीच उलटून गेलेल्या. पण विना अनुदान वाल्यांचं रीटपिटिशन कोर्टाने मान्य करून त्यांना स्वतंत्र सी.ई.टी. घेवून प्रवेश करायला अनुमती दिली. त्यामुळे विना अनुदानित महाविद्यालयां मध्ये बी.एड्. प्रवेश मिळवायचा मार्ग मोकळा होता. मम्मीने सगळा विषय तिची बहीण छबू मावशी हिच्या कानावर घातला. छबू मावशी भलतीच चटपटीत. तिने दोन दिवसात सगळे सोपस्कार पूर्ण करून रसिकाला सी.ई.टी. ला बसवलं. रसिकाला बी.एड्. करायचंच नव्हतं म्हणून ती चक्क पेपेर कोरा टाकून उठली. पण मावशीने जिद्दीला पेटून

पाण्यासारखा पैसा ओतून आणि लिटरावारी पदरचं पेट्रोल जाळून अशी काय टाईट फिल्डिंग लावलेली कि, आठ दिवसानी रसिका ५६ % मार्क्स मिळवून पास झाल्याचं पत्र फडकावीत गड सर करून आली.

अर्थात अजून दिल्ली दूरच होती. पुणे परिसरातल्या विना अनुदानित महाविद्यालयां मधल्या सगळ्या सीट जानेवारीतच पॅक झालेल्या. "आता कॅन्सलेशन मध्ये काही जमतं का बघुया " असं पुण्यातल्या एक दोन संस्थानी मधाचं बोट लावलेलं. मम्मी नी छबु मावशी अ‍ॅडमिशन लिस्ट च्या झेरॉक्स घेवून अक्षरशः पायाना भिंगरी लावून फिरल्या. पत्ते वाचून त्यातल्या मध्यम वर्गीय पंधरा वीस मुलांच्या घरी जावून त्याना फी आणि डोनेशन च्या दुप्पट पैसे देण्याचं आमिष दाखवून अ‍ॅडमिशन कॅन्सल करायची ऑफर दिली. हा आकडा दुपटीपर्यंत वाढवून देखिल एखादा मासाही गळाला लागला नाही. पैशाच्या जोरावर काहीही विकत घेता येतं हा त्यांचा आजवरचा भ्रम चांगलाच दूर झाला. नाराज झालेली छबु मावशी त्राग्याने म्हणाली सुद्धा, "काय बाई ही मिडल क्लासवाली माणस कर्मदरिद्री..... आयती लक्ष्मी आपल्या पायाने चालत उंबऱ्या पर्यंत आलेली ! पण याना मुळी भिकेचे डोहाळे लागलेले..... तीन - चार लाखांची ऑफर सरळ धुडकावून लावलेनी की मेल्यानी.... हयातभर पै पै करून साटःअवलेली पुंजी बी.एड्. मध्येच रिकमी होईल की . त्या नंतर

नोकरीसाठी ट्राय करणार. पर्मनंट जॉब साठी हल्ली रिझर्व्हेशन कॅटेगिरी वाल्यांकडूनच तीन तीन लाख नी ओपनवाल्यांकडून आठ -दहा लाख घेतात घेतात संस्थेवाले..... एवढा खर्च झेपणार आहे का मिडलक्लास वाल्याना..... दैव देतं नी कर्म नेतं त्यातली ह्यांची गत. आमच्या कडून तीन- चार लाख घेवून पुढच्या वर्षी बी.एड्. केलं असतं तर असं काय वाया गेलं असतं यांचं..... पण खायची ही अक्कल लागते माणसाला..... ”

मग मम्मी नी छबु मावशीचा खल सुरू झाला. बराच काथ्याकूट केल्यावर अकस्मात छबु मावशीची ट्यूब पेटली. तिच्या चुलत नणंदेच्या भाचे जावयाचा साडू चा मावसभाऊ डायरेक्टर ऑफ एज्युकेशनच्या ऑफिसमध्ये कुणीतरी (म्हणजे कुठल्यातरी पोस्टवर) असल्याचं तिला आठवलं. मग उलट सुलट फोनाफोनी करून त्याचा पत्ता मिळाला. तशी “ आज बाहेर जावा गिळायला सगळ्यानी. आम्ही आता छबुच्या मावस नणंदेच्या चुलत साडूच्या जावयाला रसिकाच्या ॲडमिशनच्या कामा साठी भेटायला.....” मम्मीने फर्मान सोडलं. तिचं बोलणं अर्ध्यावर तोडीत छबुमावशी किंचाळली, “ ताईऽऽऽ अगं मावस नणंदेच्या नाही चुलत नणंदेच्या आणि चुलत साडूच्या नव्हे भाचे जावयाच्या साडूचा मावस भाऊ . एवढं सोप्पं नातं सुद्धा कसं लक्षात रहात नाही तुझ्या? ” त्यावर खो खो हसत मम्मी बोलली, “जाउ दे गं छब्ये.... एकून काय एकच. आऊचा

काऊ नी मावस भाऊ. स्वर्ग गाठायला सूत मिळाल्याशी कारण......"

रागाने नाक फुलवून फिस्कारत छबु मावशी म्हणाली " अस्सं काय...? रसिकाच्या जन्माचं कल्याण करणार तो म्हणे आऊचा काऊ काय? झक् मारीत गेलं तुझ्या पोरीचं बी.एड्. अन् तू सुद्धा. दहा दिवस मर मर हिंडल्ये मी त्याचं हे श्रेय काय? शेळी जाते जिवानिशी अन् खाणारा म्हणतो वातड. मी आपली जातेच कशी. आजची सोनू निगमच्या म्युझिकल नाईटची दीड -दीड हजाराची तिकिटं ह्यांच्या क्लायंटस् नी दिलेली आहेत. पण भाचीच्या हितासाठी मिस्टराना नाराज करून म्युझिकल नाईट बुडवायला तयार झाले मी." मग छबु मावशीच्या नाकदुऱ्या काढून थ्री स्टार मध्ये लंच आणि फर्निचर एक्झिबिशन मधलं महागडं डायनिंग टेबल नी खुर्च्यांचा सेट देण्याचं मान्य करून मम्मीने तिला मनवलं तेंव्हा कुठे, "लंच नी डायनिंग सेटच्या आशेने नव्हे बर, पण रसिकाच्या आयुष्यातली मोठी संधी हुकायला नको माझ्या दुर्लक्षामुळे...." असे भावार्थी उद्गार काढून मावशी एकदाची राजी झाली.

डायरेक्टर ऑफ एज्युकेशनच्या ऑफिसमध्ये डिस्पॅच क्लार्क म्हणून काम करणारा आऊचा काऊ परचुरे ...... तो मात्र भलताच चुरचुरित नी स्मार्ट निघाला. सोळाशे स्क्वेअर फूटांच्या त्याच्या फ्लॅटचं दार उघडलं नी आत पाउल टाकताच सॉफिस्टिकेटेड लाईफ अंगात मुरलेल्या मम्मी नी मावशी अशा

काही चमकल्या.... हॉल मध्ये घातलेल्या जाड्जूड कॉस्टली कार्पेटवर पाय टाकायचंही धैर्य त्याना होईना. तो हॉल म्हणजे साक्षात् इंद्रनग़रीच ...... मिठ्ठास हसत परचुरे पुढे आला नी मम्मी मावशींच्या पाया पडत म्हणाला,“ आज गरीबाची कशी काय आटःअवण आली मेधा आण्टी? ” छबुमावशीचं सासरचं नाव मेधा होतं) छबु मावशी हासून म्हणाली, “ ही माझी ताई. गेल्या महिन्यात आपण तुमचा पी.सी घ्यायला स्वामीकृपा ईलेक्टॉनिक्स मध्ये गेलेलो ना त्याचे मालक माझे जिजाजी... म्हणजे ताईचे मिस्टर.”

“हां हां . ते भोबे अंकल होय... म्हंजे माझ्या लक्षातच आलं नाही तुम्ही मेधा आण्टीच्या सिस्टर असाल असं इमॅजिनही करता आलं नाही मला .... ” परचुरे गडगडाटी हासत उत्तरले अन् मम्मी भलतीच खट्टू झाली. कारण छबु मावशीच्या मानाने मम्मी अंमळ श्यामल वर्णाची..... परिचयातली बुजुर्ग माणसं नेहमी हे वर्म काढायची. पण जावू दे... आपला कामाशी मतलब .... नी परचुरे देखिल अनवधानाने बोलून गेले असा विचार करून मम्मीने आपली नाराजी स्मितहास्यामध्ये बदलली.

रसिकाची बी. ए. ची आणि सी.ई.टी. ची मार्कलिस्ट, बघितल्यावर परचुरेनी फोनाफोनी सुरू केली. चार पाच ठिकाणी चौकश्या केल्यावर ट्रेस लागला. पनवेलला नव्याने सुरू झालेल्या एस्. एन्. डी. टी. च्या कॉलेजमध्ये चार सीट भरायच्या होत्या. रसिकाच्या मराठी जॉग्रफी मेथडची एक

सीट व्हेकंट होती. मग उलट सुलट चर्चा सुरू झाल्या. पुण्या बाहेर इतक्या लांब रसिकाला कसं ठेवायचं वगैरे...... पण वस्तुस्थितीची जाणीव करून देत परचुरेनी दोघींच प्रबोधन केलं की, ही शेवटची संधी गमावली तर वर्षभर पुन्हा संधी नाही. ॲडमिशन डोनेशन वगैरे सग़ळं परचुरेंवर सोपवून दोघी स्वस्ठ बसल्या. परचुरेनी दुसऱ्या दिवशी सगळ्या फॉर्मालिटीज पूर्ण करून ॲडमिशन फिक्स करायचं मान्य केलं. मम्मी मावशीच्या छातीवरचं दडपण दूर झालं. पुढचे बेत आखीत थ्री स्टारमध्ये लंच करून रात्री साडे अकराला दोघी घरी आल्या.

परचुरेनी दिला शब्द पूर्ण केला नी दुसरे दिवशी संध्याकाळी पाच वाजता सतरा हजार रुपये फी रसीट घेवून पठ्ठ्या हजर झाला. “जाळाशिवाय कढ नाही नी नी मायेशिवाय रड नाही . म्हणतात ते अगदी खरं आहे. मी तुला म्हटलं होतं की नाही गं ताई....? आस्तिक आस्तिक म्हटल्यावर साप भिऊन पळतो तद्वत् परचुरेंचं नाव घेतलं की एज्युकेशन डिपार्टमेंट मधलं कसलंही संकट असूदे..... ते दूर झालंच पाहिजे. आत्तापर्यंत दोन केजीच्या नी सहा ज्युनिअर कॉलेजच्या ॲडमिशन्स मी करून दिल्यायत् यांच्या मार्फत, नी त्याही अगदी चीप रेटमध्ये....! पदरचं पेट्रोल जाळून माझ्या शब्दाखातर कामं करून दिली हं जावई बापूनी. आत्ताचंच बघ ना..... माझ्या वरच्या विश्वासा खातर पदरचे पैसे लावून

रसिकाची फी भरून रिसिट घेवून आले माझे जावईबापू ..... ”
कौतुक मिश्रीत स्वरात छबु मावशी म्हणाली.



टर्म उशिरा सुरू झालेली असल्यामुळे दोन तीन दिवसात हजर व्हायचं होतं. हे सगळं इतक्या झटपट होईल अशी सुतराम् शक्यताही नसल्यामुळे खुशीत गाजरं खाणारी रसिका चांगलीच सटपटली. या परचुऱ्याची चामडी पोटटो स्लायशरने सोलून काढली पाहिजे आणि त्याला उकळत्या तेलाच्या कढईत घालून बटाटते वड्यासारखं तळून काढलं

पाहिजे....असले टेरर विचार तिला सुचायला लागले. पण लगेचच भानावर येत या कल्पना सृष्टित रमून आपलं अरिष्ट काही टळणार नाही. गनीम खिंड पार करून येण्यापूर्वी सुटकेचा मार्ग शोधायची मोहीम तिने मोबाईल वर सुरू केली. तिची मैत्रीण मानसी टिपुगडे कसल्या कसल्या भन्नाट आयडिया सुचवायची.रसिकाने सरळ तिला आपला प्रॉब्लेम सांगितला. मानसीने अगदी जालीम उपाय सुचवला. रात्री झोपताना कांद्याचे दोन काप करून ते काखेत धरून रसिका झोपली. सकाळी मम्मी तिला उठवायला आली..... पांघरूण बाजुला करून तिने रसिकाच्या डोक्यावरून हात फिरवला मात्र..... भीतीने तिचं अवसानच गेलं मुळी.

रसिकाला सणसणून ताप भरलेला. डॉक्टर आले. इंजेक्शन देता देता ते म्हणाले . "सॉलिड टेंपरेचर आहे. आमच्या हॉस्पिटलमध्ये." झालं! सगळ्यांच्या तोंडचं पाणी पळालं. चार स्पेशालिस्टनी वेगवेगळी निदानं केली. सगळ्यांचा सल्ला मात्र एकच ..... हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करा. सगळ्या टेस्ट करुयात..... न जाणो डेंग्यु सुद्धा असायचा..... पेशंटला महिनाभर तरी अंडर ऑब्झर्वेशन ठेवायला पाहिजे नी कंप्लीट बेड रेस्ट हवी. दोन दिवस माणसांच सतत लक्ष असल्यामुळे रसिकाचा तापही हटला .तशातच तीन दिवसानी बी.एड्. कॉलेज वरून प्राचार्यांचा फोन आला. "मी अभिनव महिला अध्यापक महाविद्यालयाचा प्राचर्य जबडे बोलतोय्......

रसिका भोबेना ताबदतोब हजर व्हायला सांगा नाहीतर आम्ही ॲडमिशन कॅन्सल करू. ”

पुन्हा परचुरेंची पायधरणी करायला मम्मी, डॅडी नी मावशी तिघंही त्याना भेटली. परचुरेनी प्राचार्याना फोन लावला. “आधीच निम्मी टर्म संपत आलिय... अटेण्डन्स कसा काय पुरा होणार? प्रॅक्तिकल्स कधिची सुरू झालीयत. मला काहीही सबस सांगू नका. ताबडतोब कॅण्डिडेट हजर करा नाहीतर मी दुसरी कॅण्डिडेट भरणार....” या खेपेला परचुरेनी ही प्राचार्यांशी झालेलं बोलणं सांगून कानावर हात ठेवले. “आधीच जून ते मार्च अखेर जेमतेम दहा महिन्यांचा कोर्स. सप्टेंबर संपत आला. त्यांच काही चुक नाही. एकतर मोठ्या मुष्किलीने प्रवेश मिळालाय. विद्यापीठ, एन. सी .टी.ई., स्टेट गव्हर्नमेंट यांचे एवढे बॅन्स असतात की या बाबतीत प्राचर्य सोडाच खुद्द व्ही.सी. किंवा शिक्षणमंत्री सुद्धा काही करू शकणार नाहीत. आता हजर व्हायचं की ॲडमिशन रद्द करून आलेली संधी हुकवायची ते तुम्हीच ठरवा.” त्यानी उपोदघात केला. डॅडीनाही विशेष गांभिर्य वाटलं नाही. “ फारतर ॲडमिशनची अमौंट नाही मिळणार...... डॉनेशन तर आपण अजून भरलेलंच नाहीय् .... ”डॅडीनी काखा वर करून विषय संपवला.

कोणत्याही प्रसंगाला धैर्याने तोंड द्यायला छबु मावशी चांगली घट्ट नी बेडर.असल्या फासक्या फुसक्या अडचणीना ती कुठली जुमानायला....! कसाटा आईसक्रीम चे लपके

गिळताना हिंदी पिक्चरमध्येच शोभेल असा एक अफलातून जर्म तिच्या सुपिक मेंदूतून निघाला. “नाहीतरी रसिकाला हे बी.एड्. कितपत झेपेल हा प्रश्नच आहे. मनाविरूद्ध डांबलं म्हणून ही पोर उंडारत राहील पनवेलभर अन् फेल्ड इन एक्झाम असा शेरा असलेलं मार्कलिस्ट आणून ॲडमिशनचे सतरा हजार डोनेशनचे एक लाख आणि वर्षभर खर्चाचे लाख दीड लाख मातीत घालवील ही बया. नी जीजाजी तिचीच बाजू घेवून तुला नी मला मूर्ख ठरवतील ते वेगळंच.... ” या सगळ्यावर तिला सुचलेला हुकमी तोडगा मग तिने मम्मीच्या कानात सांगितला.



पनवेलला राहून बी.एड्. पूर्ण होईतो वाट्टेल तेवढा पॉकेट मनी आणि बी.एड्. परीक्षा होवून मार्क लिस्ट बघितल्यावर इंपोर्टेड कार एवढा मलिदा द्यायचे कबुल करून मम्मी नी मावशीने रोहनला पटवलं. ह्या मार्गातल्या अडचणी, धोके यावर तिघानीही रात्रभर पुन्हा पुन्हा खल करून मास्टर प्लॅन तयार केला. रसिकाला छबु मावशीच्या घरी हालविण्यात आलं. तिथे मावशीची जाऊ नी नणंद तिची देखभाल करणार होत्या. त्याना आणि मावशीच्या मिस्टरना ही गुप्त कटाची माहिती देण्यात आलेली होती. मग संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी तशी रोहनची रसिका करण्या साठी टर्किश टॉवेलची पॅडिंग बनवायला घेवून तयारी 'आकाराला' येवू लागली. सामानाची यादी तयार झाली. हेअर रिमुव्हरच्या पंधरा बाटल्या. दर एक दोन दिवसानी चेहेरा गुळगुळीत व्हायला हवा. न जाणो दाढी मिशांचे खुंट दिसले तर सगळंच मुसळ केरात जायचं नी वर नाचक्की ठरलेली. ते फक्त मुलींचंच कॉलेज असल्यामुळे एक मार्ग बिनबोभाट मोकळा झालेला. खेरिज रोहन हा थोडा चाबरट असला तरी पोरींच्या घोळक्यात गेल्यावर त्याची गोगलगाय होईल. शिंग रोखून शंगावर घ्यायला जायचं धाडस त्याला कालत्रयी जमणार नाही यावर दोघींचही एकमत झालं.

त्याची मम्मी मावशींच्या समोर दिवसभर रंगित तालीम सुरु झाली. तालीम कसली म्हणा डायरेक्ट 'शो'च सुरू झाला.

पॅडिंग बांधून पंजाबी ड्रेस घालून रसिकाच्या वेषात रोहन सोफ्यावर मासिक चाळित बसलेला. घरगडी शिवा भाजीच्या पिशव्या घेवून आत आला. "आता बरं वाटतंय न्हवं ताई....?" सलामी देवून तो किचनकडे वळला न् मम्मी मावशीनी एकमेकीना टाळ्या दिल्या. संध्याकाळी डॅडी आले. "रसिका , बेटा जरा बरं वाटलं म्हणून लगेच फुशारक्या मारू नकोस. अगं अशी झटपट बरी झालीस ना तर त्या साळकाया म्हाळकाया तुला बी.एड्. च्या तोफेच्या तोंडी देतील बरं का.....चल चल, आत जावून बेडवर आडवी हो कशी...." दंड धरून ते रसिका रुपातल्या रोहनला बळे बळे उठवू लागले.

"नाही हं डॅडी, आय् हॅव मेड अप माय माईंड तू कंप्लीट बी. एड्. फॉर युवरसेक....... " रसिका उत्तरली. आता मात्र डॅडी उडालेच. रसिकाच्या विचारातलं, आवाजातलं अन् इंग्रजीतलं परिवर्तन त्याना नाही म्हटलं तरी जरा खटकलंच. ते पुढे काही बोलणार तर तेवढ्यात दारा आड लपलेल्या मम्मी नी मावशी पुढे सरसावल्या. "खबरदार.... खबरदार.... माझ्या मुलीचा बुद्धिभेद कराल तर... बी.एड्. म्हणजे तोफेच्या तोंडी काय? आं काय हो ? बरे फाजील अहात की तुम्ही. इतके आतल्या गाठीचे नी पाताळयंत्री असाल असं वाटलं नव्हतं मला. गेल्या तेवीस वर्षात माझी किती नी कशी वंचना केलीत ते मला नी परमेश्वरालाच माहिती गं बाई..... " मम्मीने सूं ऽऽसूं करीत डोळ्याना पदर लावला.

रात्री रसिकाच्या ताप येण्यामागचं बिंग छबु मावशीच्या चलाख नणंदेने पाळत राखून उघडकीला आणलं. छबुमावशीचे मिस्टर मोहनकाका, यांच्या मित्राची ग्रॅण्ट रोडला कॉम्प्युटर लॅब होती. रोहनला एक्सपिरीयन्ससाठी वर्षभर ठेवायचंय असं पप्पाना सांगून पहाटे छबु मावशी रोहनला घेवून पनवेलला रवाना झाली. दुसऱ्या दिवशी छबु मावशी रोहनला घेवून पनवेलला रवाना झाली. “ बाई होणार ना तुम्ही ? ” हा डोके सुपरिटेण्डण्ट डोकेंचा प्रश्न ऐकून रोहन सटपटला असं पाहून त्याला सावरून घेण्याच्या गडबडीत अनवधानाने छबु मावशी म्हणाली,“हो ना , झालाय् ना तो बाई.....”माणसं सहजगत्या कशी फसतात ते आपल्या तोंडून नको तो उच्चार झाल्यावर मावशीच्या लक्षात आलं. मग सारवा सारवी करीत ती म्हणाली, “म्हंजे काय आहे बघा साहेब, ही रसिका अन् तिचा जुळा भाऊ रोहन दोघांमध्ये एवढं साम्य आहे ना परकी माणसं तर फसतातच पण मी हिची मावशी असूनही माझी सुद्धा फसगत होते पहा ना..... एकदा तो एकदा ती.....! आता तुम्ही एवढ्या इन्फ्ल्युएन्शियल पोस्ट्वर काम करणारे साहेब! एवढ्या मोठ्या माणसाशी मुलाखतीची माझी ही पहिलीच वेळ अन् त्यात हे जुळ्या भावंडांचं गौडबंगाल.....”

मावशीने आदराने उल्लेख केल्यामुळे डोके जाम खुलले. वस्तुत: मावशीने बोलताना केलेली गफलत त्याना उमगलेलीच नव्हती. कॉलेजच्या व्यवहारावर आपला होल्ड रहावा म्हणून

चेअरमननी त्यांचा पित्त्या म्हणून डोकेना सुपरिटेण्डण्टच्या पोस्टवर बसवलेलं इतकच. खरंतर खर्डेघाशी करणाऱ्या कारकूनाचा तल्लख पणा रतिमात्रही नसलेला सुमार कॅलिबरचा डोके ! पण म्हणुनच संस्थेला पाणी जाळता येत होतं. हो – नाही असं नंदीबैला गत हलवण्यापुरतंच डोकं असलेला डोके केवळ या एका क्वालिफिकेशनवर सुपरिटेण्डण्ट पद सांभाळून होता. आय् कार्ड, इण्डिव्हिज्युअल इन्फॉर्मेशन फॉर्म असल्या काय काय फॉर्मॅलिटीज पुऱ्या करून घेतल्यावर डोके म्हणाले, "आता हॉस्टेलचे पाच हजार भरा अन् रिसिट घेवून हॉस्टेलवर जा. तिथे रूम मध्ये सामान ठेवून मेसमध्ये जेवण वगैरे उरकून निवांत एक वाजेतो या. तोवर प्राचार्य साहेब येतिलच."

आता आली पंचाईत..... हॉस्टेलवर रहायचं म्हणजे सगळं बिंग फुटणार की.... या भीतीपोटी धास्तावलेली मावशी बोलली, "पण काय हो, आम्ही प्रायव्हेट रुम घेवून बाहेर राहोलो तर नाही का चालणार? आमचा तसा बेत आहे."त्यावर डोके म्हणाले "छे छे.... हॉस्टेल तर कंपल्सरी आहे. अहो नॅकच्या वेळी एवढा खर्च करून इंफ्रास्ट्रक्चर उभं केलंय् संस्थेनेते . साठ रुम्सचं तीन मजली हॉस्टेल बांधलं मॅनेजमेंटने ते कशासाठी? " पण वस्तुस्थिती अशी होती कि, चेअरमनना त्यांचे चुलतभाऊ खासदार डांबरे पाटील यानी खासदार फंडातून साठ लाख रुपये मंजुर केलेले. तसेच सग़ळ्या कोर्सेस मधून मिळणारी दोन नंबरची रक्कम, अशा सगळ्या रक्कमा जिरवण्यासाठी, तसेच

चेअरमन सायबांचाच मुलगा बिल्डर असल्यामुळे बांधकामाचा नुसता सपाटा चालवलेला. संस्थेची चार हॉस्टेल्स होती पण जेमेतेम निम्म्या रुम्स भरलेल्या होत्या.

होस्टेलचा गुंता सोडवण्यासाठी मावशीने तडक परचुरेना फोन लावला. तेरेसचा कोपरा गाठून मावशीचं बोलणं सुरु असताना अकस्मात बॅलंस संपल्यामुळे मोबाईल डिसकनेक्ट झाला. परचुरेनी मी बघतो – बोलतो प्राचार्यांशी असं आश्वासन दिलेलं. प्राचार्य येई पर्यंत सहज टाईमपास म्हणून मावशी रोहनला घेवून हॉस्टेल बघायला म्हणून बाहेर पडली अन् द्रायव्हर मावशीचं रिचार्ज मारायला बाजारात गेला. हॉस्टेल बघितल्यावर मात्र मावशीचा बेत फिरला. बाहेर कुठेतरी रुम घेवून राहण्यात धोकेच अधिक. त्यापेक्षा प्रिमायसेस मध्ये एकट्यासाठी स्वतंत्र रुम घेवून रहायचा बेत रोहनलाही पटला. मग त्याच्या फोनवरून परचुरेना फोन करून मावशीने हा बेत सांगितला. “तुम्ही बिनधास्त व्हा मेधा आण्टी, तुम्ही रुम पसंत करून मला नंबर सांगा, मी डायरेक्ट चेअरमनना फोन करून ती रुम द्यायला लावतो त्याना. आपण डबल रेण्ट भरून एकटीसाठी बुककरू ती रोम, नो टेन्शन, बी रिलॅक्सड . काहीही प्रॉब्लेम आला तरी लगेच मला कॉन्टॅक्ट करा.”मग मावशीने एका बाजुची निवांत रूम नंबर हातावर लिहून घेतला.

एक वाजता प्राचार्य आले. केबिनमध्ये शिरल्या शिरल्या

त्यानी कॉलबेल दाबली. शिपाई धावतच केबिनमध्ये गेला.“ भोबे आणि तिचे पालक थांबलेत ना? त्याना घेवून ये.” मावशी नी रोहन केबिनच्या दारात दिसताच, “येस ,येस कम इन ..कम इन. हार्टिएस्ट वेलकम तुमचं. नुकताच चेअरमन साहेबांचा फोन आल्ता.म्हणून तर जरा लौकरच आलो की मी. तुम्ही उभ्या कां? बसा ना. आनी तुबी बसकी गं मुली. काय नाव तुझ? आडीच म्हैने मागं पल्ड्यावर यॅडमिशन भेटली की तुमाला. एकूण धा म्हैन्याचं ट्रेनिंग असतंय हे. म्हणजे आल्या पेट्टाला पंचवीस टक्के बी. एड्. पुरं केलय् जणु तुम्ही.” हसण्याचा गडगडात करीत जबडे बोलले. “बोलता बोलता असे जोक मारायची ह्यॅबिटच आहे की हो आपली त्या पी.यल्. देशपांडे नी अत्रे ह्यांचा सारख़ी. म्हणजे त्याचं काय हाय की आपला सेंस ऑफ जोक (इथे खरं तर सेन्स ऑफ ह्युमर हा शब्द प्रयोग अभिप्रेत होता. पण त्यांचं इंग्लिशच ज्ञान त्यांच्या पी.यच्. डी. इतकंच वादातीत होतं) म्हणजे पावरबाज काम की एकदम. प्राचार्य झालो नस्तो तर म्हैन्याला चार चार ज्योक्सची पुस्तकं पाडली असती की ह्या पठ्ठ्याने... ”

“तरऽऽ” आवाजात मार्दव आणीत मावशी म्हणाली, “सर एक रिक्वेस्ट आहे आमची. रसिकाचे जरा प्रॉब्लेम्स आहेत. नुकतीच डेंग्यूतून उठलीय् ती. शिवाय श्रीमंत आई बापाची लाडाकोडात वाढलेली एकुलती एक मुलगी आहे ती. म्हणजे तसा एक जुळा भाऊ आहे तिला, पण ही म्हणजे लाडोबाच आहे

कुटुंबात. रुम मध्ये तर हिची प्रायव्हसी जाणार , शिवाय अधे मधे मी किंवा हिची आई कधी हिला भेटायला आलोच तर तास दोन तास आम्ही हिच्या रुमवरच थांबणार. आता हिची पार्टनर असली तर ती कंप्लेण्ट करील ना आम्ही थांबलो तर.....” तिला पुढे बोलू न देता जबडे म्हणाले, “जरूर जरूर! अहो त्या संदर्भातच फोन केला होता ना साहेबानी. देऊ की तुम्हाला शेप्रेट रूम. हाय काय त्यात. आम्ही पर्हेड पाच हजार वट्ट घेतो की, पण रुम मधी दोन पार्टनर असत्यात. तुमी आसं करा पाच हजार पावतीचं नी वरचे दहा हजार द्या नी ऱ्हावा की एकट्यानी. आसं करा दहा आम्हाकड द्या नी पाच डोक्यांकड देवून पावती घ्या. बरं डोके दुसरा काय विषय बोल्ले का तुम्हाकडं..... ”

मावशीने नकारार्थी मान हालवली. “तर फी तुम्ही भरलीय. आता डोनेशनचं दीड लाख भरा चटशिरी. आनी आसं बघा की डोनेशन ह्ये दाखवायचे दात, खायचे दात आजूनी वेगळे असतात. हा ज्योक नव्हे बरं, शिरयसली सांगतोय्. ”प्राचर्य पुढे सांगू लागले, “आता मुलीना वर्षभर लेसन घ्यायचे असतात. डायरी ठेवायाची असते.कार्यानुभव राहतोय्. कोलेजचं म्याग्झिन आस्तय. डस्टर,खदू, फळे, तक्ते, नकाशे, ल्येसन नोट्स्, झालंच तर ट्रीप...टुर्नामेंट — म्हंजे खेळाची हो, एन्. सी.टी. ई.चा व्यापच हाय तसा.... आता यवढ्या फ्यासिलिटी म्यानेज्मेंट डोनेशन मधून कशाकाय बाहेर काड्णार? बघा कि तुमीच.... प्राध्यापकाना पंचवीस तीस

हजार रुपये पगार द्यायला लागतोय्. चार क्लार्क, पाच शिपाई ह्यांचे पगार... काय विचारू नका. शासन म्हणजे स्टेटचं आणि दिल्लीतलं कुणीच येक तांबडा पैसा नाय देत....मग आम्ही तरी सगळा खर्च कुठनं बाहेर काढणार हो? बघा की तुम्ही. म्हणून म्हटलं की खायचे दात नी दखवायचे दात वेगळे ऱ्हातात प्रायव्हेट कॉलेज मध्ये. तर स्टेशनरीचे वट्ट सात हजार भरा, त्याची पावती नाय मिळत, आम्ही वर्ष संपल्यावर स्टुडंटना हिशोब देतो त्याचा. आणि हां, तुम्ही मेठड कोणच्या घेणार/ फिल्ड कोणत घेणार? ”

मेथड फ़िल्ड ही काय भानगड आहे ? अशी पृच्छा मावशीने केल्यावर दबडे सरानी सगळं बैजवार समजावून सांगितलं. “म्हंजे शाळेत जे विषय ऱ्हातात त्यातले दोन स्टुडंट टीचर ना मेठड म्हणून घ्यायला लागतात नी पॉप्युलेशन, येनव्हायर्न मेंट, क्यॉम्प्युटर, आर.डी. ह्यातल एक फिल्ड निवडायचं स्टुडंटने.” रोहनने कॉम्प्युटर एज्युकेशन फिल्ड निवडलं. मग जबडे म्हणाले, “आता तुमची एक मेथड ज्यातून तुमची ॲडमिशन केली , मराठी मेथड ठरली आता हिस्टरी किंवा जॉग्रफी यातली एक मेथड तुम्हाला घ्याय मिळती बघा. ” हे ऐकल्यावर रोहन चांगलाच सटपटला. “ओ माय गॉड! मराठी...? छे छे सर मराठी नाय जमणार मला.... मी झालं तर ॲड्मिशन कॅन्सल करीन.... हं इंग्रजी जमेल मला अन् दुसरी मेथड जॉग्रफी चालेल. ”

हा म्हणजे मोठाच घोळ होवून बसला. ॲडमिशनची मेथड कशी बदलणार? मग मावशीने तिथूनच परचुरेना फोन लावून  रसिकाला मराठी ऐवजी इंग्रजी मेथड हवी हा विषय सांगितला. मग परचुरेनी चेअरमनना फोन लावून  मराठी ऐवजी इंग्रजी देण्याची गळ घातली. चेअरमननी हो म्हटलं आणि प्राचार्यांना फोन लावला. “अहो जबडे , आपली मान्सं हैत  की ती. परचुरे डायरेक्टरच्या ऑफिसमध्ये आमची कामं करतात... ही पोरगी त्यांच्या पाव्हण्यातली. द्या की त्यानला कंची मेठड हवी ती. कां तुमी आनी तानून धरताय् नी आमचं दोस्कं खाताय्? तुम्हाला प्राचार्य कशापायी केलंय् आमी? आपला मतलब डोनेशंगशी आसली पुळचट कामं आमापाशी आनाय लागलात तर रस्ता सुदरा तुमचा......स्टापवरचं दुसरं कंचबी भावलं बशिवतो की आमी प्राचार्याच्या खुर्चीवर  ” नी त्यानी फोन कट केला. जबडे सचिंत होवून विचार करू लागले. त्यानी दोघीना ऑफिसमध्ये थोडावेळ  थांबायला सांगून स्टाफ मधल्या डॉ. वळवईकर, डॉ. परांडे, डॉ. काळे  याना घोळ निस्तरण्यासाठी सल्ला मसलत करण्यासाठी पाचारण केलं.

तिन्ही सिनीयर स्टाफमेंबर्सना सगळा विषय सांगून जबडे बोलले, “आता तुम्हीच बघा. ही पोरगी ॲडमिशन केल्याली मेथडच बदलून मागू लागलीय्. तीचं बी.ए. ला तीन युनिट मराठी आनि तीन आर. डी.  हायेत. ही शीट कसंतरी मराटीत बशिवली मी. नी पोरग़ी इंग्रजी आणि  जॉग्रफी मागायलीय .

चेअरमन तर भलता नेट धरून ऱ्हायलेत इंग्रजी द्याच म्हणून. ”
मग तिघानीही रसिकाची मार्कलिस्ट पाहिली, कॉलेजच्या ॲडशनची लिस्ट पाहिली, थोडा खल केला नी काळेसरनी तोडगा सुचवला "हिची आर.डी. ची तीन युनिट आहेत . हिची मराठी ऐवजी जॉग्रफीमधून ॲडमिशन दाखवूया नी सेकंड मेथड इंग्रजी देवूया. टी. वाय्. पर्यंत कंपल्सरी इंग्रजी आहे तिचं नी सेकंड मेथड तर आपल्याच हातात असते ..... काही अडचण नाही यायची. ”तिघानाही हा तोडगा पटला नी ते निघून गेले.

मग जबडेनी दोघीना बोलावून घेतलं. “आता हे बगा, चेरमनच्या शब्दाखातर नियम बाजूला ठेवून तुम्हाला इंग्रजी नी जॉग्रफी मेथ्ड दिलिया मी. ह्ये मोठं ट्येन्शन केलंय की तुमी आमच्या डोक्याला. ” त्यावर मावशीने रोहनला बाहेर जायची खूण करीत पर्स उघडली. दहा हजाराचं बंडल काढून देत ती बोलली, “हे घ्या! चेअरमन सायबाना पोच करा . नी रसिकाच्या डॅडिंची ईलेक्ट्रॉनिक शोरूम आहे. रोज दहापंधरा कॉम्प्युटर्स जातात , पुढच्या खेपेला एक उत्तमपैकी लॅपटॉप आणून देते कॉलेजला. ” त्यावर जबडे म्हणाले, “ठीक आहे. मी बघतो पुढं कसं काय म्यानेज करायचं ते, तुम्ही बिनघोर जावा. डोनेशनची रक्कम रक्कम डोकेंकडं जमा करा . ” किंचीत दम घेत जबडे म्हणाले, “आजून एक गोस्ट आयका. आधीच ॲडमिशन लेट झालीया. सगळी प्रॅक्टिकल पुरी करायची हईत. तवर टर्मिनल येतीय की. आता या गडबडीत पोरगी अभ्यास

आणि केव्हा करणार? म्हंजे माखा काय आग्रह नाही पण चांगल्या नोटस् मिळवून देतो मी. मालिनी सिंहांच्या नोटस् वाचून सम्दे बी. एड्. स्टुडंट पास होतात. त्यांचं युनव्हर्सिटी लेव्हलला पेपर सेटर पर्यंत कनेक्श्न असतय. पाच पेपर नी दहा सेक्शन , म्हंजे दहा विषयांचे अडिजशे प्रमाणे अडिज हजार होतात. मी हिचं नाव नी मेथड फिल्ड लिहून ठेवतो. ”

हो – नाही म्हणायचा प्रश्नच नव्हता. मावशीने पैसे काढून दिले. मग डोनेशनचे पैसे डोक्यांकडे जमा करून मावशी नी रोहन बाहेर पडले. दोघानाही कमालीची भूक लागली होती. कॅन्टिनमध्ये यथेच्छ पोटपूजा करून त्यानी सामानासह होस्टेल गाठलं. रूम ची जुजबी साफसफाई करून मावशीने सगळं सामान शिस्तीत लावून दिलं. कसं वागायचं, काय काय खबरदारी घ्यायचे हे पुन्हा पुन्हा ऐकून रोहन ज्याम बोअर झालेला. पण इम्पोर्टेड कार आणि बहिणीचं हयातभरचं कल्याण यासाठी सगळं मुकाटपणे सहन करणंच भाग होतं. शिवाय नेहेमीच्या एकसूरी बेचव आयुष्यापेक्षा एक वेगळाच थ्रिलींग एक्सपिरियन्स मिळणार म्हणून एक्साईटमेंटच्या भरात तो हो म्हणून मोकळा झालेला , पण प्रत्यक्ष वेळ आल्यावर मात्र तो पुरता हडबडून गेलेला .... पण ऐन युद्ध सुरू झाल्यावर नामर्दा प्रमाणे कच खावून माघार घेणारांपैकी रोहन नव्हता. त्याने अत्यंत संयमाने धैर्य गोळा करून जीवाचा कान करून छबुमावशी देत असलेल्या सूचना हृदयात साठवून ठेवल्या.

झालंच तर मुलींच्या सहवासात रहायला मिळणार ही बाब सुद्धा दिलासा देणारी होती.

साधारण सव्वापाच वाजले आणि मुलींचा घोळका होस्टेलवर जमायला लागला. काही मुली त्यांच्या रुमवर आल्या. कोण ,कुठली, मेथड – फिल्ड कोणतं या चौकशा सुरू झाल्या. गप्पांच्या ओघात एकेक अद्भुत माहिती मिळू लागली. मालिनी सिंहांच्या नोटस् होलसेल रेट्मध्ये प्रती नग मिळतात. पण प्राचार्य त्या छापिल किंमतीला विकून प्रतीमागे शंभर रुपये कमिशन मिळवतात. दिलेली स्टेशनरी कशी थर्ड क्लास आहे...... पांढरे खडू एवढे कडक की फळ्यावर उमटतच नाहीत. उलट रंगीत खडू एवढे ठिसूळ की कॉलेज कडून दिलेल्या बॉक्समध्ये एक खडू अखंड मिळेल तर शप्पथ. लेसननोट न्यूज रोलच्या पेपरवर छापलेल्या, त्यावर पाठपोट लिहिलं की सगळी धुरकट खिचडी होते. रोहन जादा बोलायच्या फंदात न पडता केवळ मान डोलावून नी मोठ्या सायासाने हसरा चेहेरा करून मूक प्रतिसाद देत राहिहा. एक गोष्ट मात्र खरी की, त्यासोंग नि:संशयपणे बेमालुम वठलं होतं. आलेल्या मुलींपैकी एक जिशा फर्नांडिस.... तिला चक्क नजरेत भराव्या इतपत मिशा होत्या. झालंच तर सुचेता व्हटकर....तिच्या हाता पायांवर चक्क अर्धा इंच लांब काळी लव होती, नी आवाजही पुरुषा सारख़ा भसाडा होता. सुरेखा रांबाडे तरदिसायला चक्क पुरुषा सारखी राकट ...नी बाकी रेश्मा मिसाळ, विशाखा फलटणकर ,

मोहिनी साळवी या मात्र तशा बऱ्यापैकी. पण मुद्दाम्हून बोलावं असं वाटण्याइतकी चार्मिंग एकही मुलगी नव्हती.



रात्री मेसवर न जेवता रोहन छबुमावशीबरोबर बाहेर दिनर घ्यायला गेला. एक बरं होतं की पुण्यात अगदी एखाद्या खाजगी लेडिज गेस्ट हाऊसला किंवा कुटुंबात पेईंग गेस्ट म्हणून राहिलं तरी सात वाजल्यानंतर बाहेर रहायचं नाही असला काही बॅन नव्हता. गेटवर वॉचमन जुजबी चौकशी करायचा इतकच. मुलांची होस्टेल्स इथून खूप लांब प्रिमायसेसच्या दुसऱ्या टोकाला होती. त्यांची स्वतंत्र मेस कॅंटिन

ही होतं. पण कोणीही कुठल्याही कॅंटिनमध्ये जायची मुभा होती. रात्री रोहनला होस्टेलवर सोडून मावशी पुण्याला रवाना झाली. रोहनने रुम बंद करून सगळा सरंजाम उतरला आणि फोरस्वेअरचं पाकिट उघडून दोन सिगरेटींचं धुरकाट काढल्यावर तो रिलॅक्स झाला. रात्री मस्त झोप झाली. सकाळी कोणीतरी दरवाजा खटखटावला. .... आयला काय वैताग आहे सकाळी सकाळीच असं पुतपुटत दाराकडे निघताना खुर्चीत पडलेलं पॅडिंग पाहून तो एकदम भानावर आला. "थांब हं जरा मी चेंज करतेय....." प्रसंगावधान राखून तो म्हणाला.

"अगं मग त्यात काय एवढसं.... मुलींच तर हॉस्टेल आहे हे .... इथं दुसरं कोण कशाला येईल....? दार उघड लवकर...." बाहेरून आवाज आला. ठाकठिक होवून रोहनने दार उघडलं. "मी वैशाली दळवी, इथून दोन रूम सोडून पलिकडे राह्ते मी. अगं काल बाथरूमची खिडही उघडी राहिली नी उंदरानं माझा साबणच नेला की गं.... आता सोप न लावता वॉश कसा घेणार...? तू कालच आलीस म्हणताना तुझ्याकडे नक्की एक्स्ट्रा सोप मिळेल म्हणून आले मी. खरं तर मी मोती सॅण्डल शिवाय दुसरा सोप नाही वापरत. पण अडली वेळ म्हणजे कसलं काय घेवून बसलीस..." रोहन आवाक् होवून पहातच राहिला. गोरीपान, लांबसडक केस, टपोरे डोळे, चिंचोळी जिवणी , लाल चुटुक ओठ..... आयला ही चिकनी पोरगी फिल्म लाईनला जायचं सोडून मास्तरीन बनायला कशाला आली...... ही

बॉलीवूडला गेली तर माधुरी -ॲश सकट सगळ्यांची छुट्टी करून टोप्ला जाईल की... एकदम क्युट जेम..... अरे सोप तो क्या जान कुर्बान कर देंगे तुमपर ... असं मनातल्या मनात म्हणत, "देते हं.... हायक्लास इंपोर्टेड सोप आहेत माझ्याकडे ." असं म्हणत टेबलवरची एक सूट्केस कालजीपुर्वक उघडून आतले दोन तीन वेग्वेगळ्या ब्रॅण्डचे सोप त्याने वैशालीसमोर टाकले. "मला एकच ब्रॅण्ड कायम वापरायला आवडत नाही. " हे बघ वैशाली, मी चटकन ब्रश करते. तोवर तूही वॉश घे अन् मग आपण कॅंटिनला जाऊया कॉफी घ्यायला. "

वैशालीने सोप हुंगून पाहिले नी त्यातला एक सोप घेवून ती निघून गेली. ब्रश करता करता रोहन विचार करू लागला. ही पोरगी साली टॉप आहे नी इनोसंट सुद्धा. अशा पोरीला घोळात घेवून गंडवणं एथिकली बरोबर नाही. दुसरं म्हणजे पहिल्याच दिवशी इतकी सलगी करून पुढे मजल गेली तर..... ती एकसारखी इथे रूमवर येवून तासन् तास बसू लागली तर....... छे छे .... इथे रूमवर कोणालाही फार वेळ एंटरटेन करणं म्हणजे आपला खड्डा आपणच खणण्यासाखं आहे की....! कुणाशीही जेवढ्यास तेवढे संबंध ठेवायचे. कुणाला तोडायचं ही नाही नी चिकटेल इतकी अती सलगी ही होऊ द्यायची नाही. तरी बरं , आपण वेळीच सावध झालोय्.... खळख्ळून चूळ भरून तोंड पुसून रोहन बाथरूम बाहेर पडला आणि कॉट खाली पडलेली सिगारेतींची राख दिसली. ओ माय् गॉड ......वैशालीच्या

लक्षात आलं असेल का? पोरी सिगरेट ओढीत असतील का? क्वचित एखादीने मजा म्हणून असेलही ओढलेली....पण इतकी राख? आयला पोरगी म्हणून वावरायचं म्हणजे भलतंच अवघड काम आहे.

मग वैशालीला टाळून तो एकटाच कॅंटिनला गेला. चहा घेवून परत येताना वैशाली रोमच्या दारातच उभी दिसली. रोहन उर्फ रसिका कडे बघून हसतच ती म्हणाली,"अगं, मी आत्ताच सगळं आवरून तुला हाक मारायला येणार होते." त्यावर रोहन बोलला," अं ...हो म्हणजे मला चहाची तल्लफ अगदी आवरेना.... म्हटलं तुझ आवरायला नाही म्हटलं तरी अर्धातास तरी जाणार.... मग गेले एकटीच....सॉरी हं" वैशाली म्हणाली, "अगं आत तर ये ना..... " त्यावर रोहन म्हणाला," आता जाते मी...माझं अजुन सगळं आवरायचं आहे, " तशी त्याचा हात धरून आत खेचीत नेत कॉटवर बसवून वैशाली बोलली," आत्ता तर कुठे आठ वाजताहेत. दहा वाजता जेवायला जायचं. अजून अवकाश आहे."

तो बसल्यावर तिने पर्स उघडली आणि अठ्ठेचाळिस रुपये मोजून देत म्हटलं, " हे सोपचे पैसे.... मस्तच आहे गं तुझा सोप." ओशाळून रोहन म्हणाला, "तुझीही कमालच आहे हं .... सोप तो काय नी अगदी लगेच पैसे द्यायला हवे होते का? " पैसे तिथेच कॉटवर टाकीत रोहन उठला. तेंव्हा पैसे त्याच्या हातात

कोंबीत वैशाली म्हणाली,"अगं तू आयत्यावेळी दिलास हे थोडं झालं का?"

रूमवर गेल्यावर गीझर सुरु करून त्याने हनुवटीवर आणि मिशीच्या जागी हेअर रिमूव्हर चोळलं . मनसोक्त आंघोळ करून चेहेऱ्यावर निविया क्रीम लावून पावडरचा प फ मारला. ओठावर हलके लिपस्टिक फिरवली. व्यवस्थित पॅडिंग बसवून पंजाबी ड्रेस चढवला. सगळं ठाकठीक झाल्यावर चंदेरी दुनिया वाचीत बसला. बरोबर पावणे दहाला पर्स लटकावून त्याने मेस गाठली. त्याच्यासमोर मेसबॉयने ताट ठेवल तेंव्हा हळू हळू मेस भरायला लागली. जेवताना त्याचं सूक्ष्म निरीक्षण चालू होतं. त्याच्या समोरच बसलेली प्रिती .... (तिची पार्टनर सारखं प्रिती प्रिती करीत होती त्यावरून तिचं नाव रोहंला समजलं...) काय बोअर आवाज होता तिचा. आता निसर्गानेच तिला स्त्रीत्व बहाल केलं होतं म्हणून तिला पोरगी म्हणणं भाग होतं.....एरव्ही तिचा आवाज ऐकून ती स्त्रा आहे यावर कोणी विश्वासही ठेवला नसता. तसंच कॉर्नर्च्या टेबलवरची ती बॉय कट केलैली लुकडी मुलगी ... ती तर अक्षरश: मुलीचं सोंग घेऊन तर आली नसेल ना अशी त्याला शंका आली. अर्थात तसं असणं शक्य्च नव्हतं पण आपल्या इतकीच तिलाही पॅडिंगची जरुरी आहे असंच त्याला वाटून गेलं.

जेवल्यावर प्रिमायसेस मध्ये चक्कर मारून अकरा वाजता

तो कॉलेवर गेला. लेक्चर हॉल मध्ये सगळ्यात पुढच्या बेंचवर बसायचं त्याने ठरवेलळं. खरंतर असलं डेरिंग सहसा कुणी करीत नाही. ॲकॅडेमिक कॉलेजिस मध्ये वर्गात प्रत्येक रांगेतली पुढची दोन तीन बेंचिस कायम रिकामी असतात. पण आरंभीचे काही दिवसतरी त्याला कुणाशी फारसा संपर्क ठेवायच नव्हता म्हणून त्याव्ही ही युक्ती होती. पण लेक्चरहॉलमध्ये प्रवेश केल्यावर त्याला एकदम उलटं चित्र दिसलं. पुढची सगळी बेंचेस फुल झालेली. बी.एड्. कोर्स मध्ये ते एक तंत्रच असतं. आपण फार सिन्सीअर आहोत असं जो तो दाखवीत अस्तो. सरांच लेक्चर सुरू असताना ते तद्दन रटाळ असलं तरी डोळे मोठे करून मध्येच भुवया उंचावून आपण काही मौलिक ज्ञान घेत आहोत असं भासवावं लागतं. मध्येच वहीत काहीतरी टिपून घेत असल्याचं नाटक करायचं असतं. हे सगळं एवढ्याच साठी की, बी.एड्. मध्ये क्लास मिळणं इंटर्नल असेसमेंटवर अवलंबून असतं. त्यासाठी प्राध्यापकाना खुष ठेवावं लागतं. ते खुष असले तर तोंड बघून कां होईना ते हात सोडून मार्क्स देणार.... वर्षाखेरीला होणारी युनिव्हर्सिटी एक्झाम ही निव्वळ फॉरमॅलिटी असते.

रोहनला या गोष्टी अजून समजायच्या होत्या.तो रो मधून मागे निघाला. शेवटच्या बेंच वरची मुलगी त्याला बघून बाजुला सरकली तेव्हा त्याला नाइलाजाने तिच्या बाजूला बसणं भाग पडलं. बेल झाली नी मुली उठून उभ्या राहिल्या. “ एक साथ

प्रार्थना शुरू कर.....” स्पोर्टस् रिप्रिझेंटेटिव्ह ने ऑर्डर दिली. मुलीनी हात जोडून “ हंस वाहिनी सरस्वतीच्या पद कमली रमते ” प्रार्थना सुरू केली. त्यानंतर राष्ट्रगीत - प्रतिज्ञा झाली. पुन्हा एक टोल झाला नी मुली खाली बसल्या. त्यानंतर हळू आवाजात कुचकुचणं सुरू झालं. दहा मिनिटानी फडतूस चेहेऱ्याचा , जुना चुरगळलेल शर्ट पॅंटित कसातरी कोंबून इन शर्ट चा आभास केलेला , घामाने डबडबलेल्या चेहेऱ्यावरचा घाम बोटानी निपटून बाजुला छिडकावीत दुसऱ्या हातात खडू,डस्टर नी लेक्चर रेफरन्सचे कागद सांभाळीत कुणी प्राध्यापक प्रवेशते झाले. “गुड मॉर्निंग सर” मुलीनी उभं राहून सलामी दिली. . हातातलं डस्टर,खडू , कागद टेबलवर ठेवून सर म्हणाले, “सेम टू यू ...सिट डावन्” सगळ्या वर्गावर नजर फिरवीत ते टेबलच्या पुढे येवून म्हणाले..... “तर मग मागच्या तासाला आपण कुठवर आलोहोतो बरं....... हां मूल्यमापनाचे प्रकार....... ” मग त्यानी फळ्यावर एक वेडा वाकडा त्रिकोण काढला . त्यात लिहीलं मूल्यमापन. “तर फॉर्मेटिव्ह आणि समेटिव्ह मूल्यमापन हे दोन प्रकार आहेत. बरं आज न्यू कमर कोण? कालच्याला नवीन ॲडमिशन झाल्याचं वळवईकर बोलले होते” रोहन कडे अंगुली निर्देश करीत ते पुढे म्हणाले, “ हं बाळ उभी रहा बरं . काय नाव तुझं? कोलेज कोणचं? मेथड कोणच्या ? फिल्ड कोणचं घेतलं?”

नाव, कॉलेज, मेथड , फिल्ड सांगून रोहन खाली बसला.

बाजुची मुलगी रजनी भोई (वहीवर ठळक अक्षरात नाव लिहीलेलं होतं) रोहनला म्हणाली ,“ हे घाटपांडे सर. यांचे आठवड्यात दोन पिरियड होतात . आज महिना होवून गेला. दरवेळी हा असा त्रिकोण काढतात नी मग अवांतर गप्पा सुरू. मूल्यमापनाच्या दोन व्याख्या झाल्या फक्त त्यापुढे काही गाडी जात नाही सरांची.....” रसिका ने एस् . पी. कॉलेज सांगितल्या मूळे पुणे हे सूत्र धरून आपण आदर्श कॉलेजला एम्. एड्. कसं केलं त्या गप्पा सुरू केल्या. मध्येच पुण्यातल्या काही खवचट दुकानदारांचे किस्से सांगितले. त्यात तास संपला नी अटेण्डन्स घेवून सर वर्गाबाहेर गेले.

घाटपांडे बाहेर गेले नी पर्वते मॅडम आल्या. त्यानीही अटेण्डन्स घेतला नी शालेय व्यवस्थापन मधला वेळापत्रकाचे प्रकार हा टॉपिक सुरु केला. पहिल्या दोन चार वाक्यातच त्यांचा आवाज तापत तापत टिपेचपर्यंत गेला. चिडक्या कर्कश आवाजात अक्षरश: किंचाळल्या सारख़ं बेंबीच्या देठापासून जोर काढून त्या बोलत राहिल्या. मध्येच आवाज फाटला की, दोन चार वाक्यं मध्यम लयीत बोलून दम खाल्ल्यावर पुन्हा त्यांचं किंचाळणं सुरू होई. तास संपल्याची बेल होवून पाच मिनिटं झाली तरी त्या थांबण्याचं चिन्ह दिसेना. कुणीतरी हळूच म्हणालं, “मॅडम , बेल झाली , आता शॉर्ट रेसेस आहे.” त्यावर वैतागत मॅडम म्हणाल्या, “मी ऐकली बेल पण हा पॉईंट पुरा करूनच मी थांबणार आहे. हे आर्टस् कॉमर्स कॉलेज

नाही..... बी.एड्, आहे एथे रात्र थोडी सोंग फार अशी गत असते. हा मोठा पोर्शन नी आठवड्यात अवघी दोन लेक्चर्स.. उद्या पोर्शन पूर्ण नाही झाला तर तुम्हीच उलट्या तक्रारी कराल.......”

चौथ्या लेक्चर नंतर  सर्व मुली मायक्रो टिचींग साठी ग्रूप प्रमाणे आपापल्या वर्गाकडे निघाल्या. प्रत्यक्ष शिकविताना मुद्देसूद स्पष्टीकरण करणं,  फलकावर  महत्वाचे मुद्दे लिहीणं, प्रश्न विचारणं, मुलांचा प्रतिसाद  मिळवणं ,लेसनची आकर्षक सुरुवात करणं  ही काही महत्वाची कौशल्यं असतात  त्यांचा सराव मायक्रो टिचींग़ मध्ये करायचा असतो.  लेट अॅडमिशन झालेल्याना पूर्वीच्या ग्रूपमध्ये विभागून टाकले लं. रोहनला ५ नंबरचा ग्रूप मिळाला. प्रश्न कौशल्याचे पाच पाच मिनीटांचे छोटे पाठ सुरू झाले. तीन चार मुलींचे पाठ बघितल्यावर आपल्याला हे जमेल असं रोहनला वाटलं म्हणून तो खराडे मॅडमना म्हणाला, “मॅडम मी घेऊ का पाठ?” आश्चर्याने भुवया उंचावीत मॅडम म्हणाल्या, “तू? जमेल तुला? हे बघ रुपाची लेसन नोट आहे ती पहा. तसं  कच्चं टिपण करून ते मला दाखव नी मग घे लेसन.” रोहनने व्हिलेज फेअर हा घटक निवडून तेरा चौदा प्रश्नांची मालिका  तयार केली नी मॅडमना कागद दाखवला. त्यानी टाचण तपासलं. “वा छान काढलीस हं लेसन नोट. आता सुरू आहे तो लेसन झाल्यावर तुझ्या लेसन नोटप्रमाणे घे पाठ.”

रोहनचा पाठ सुरू झाला.पॉलिश्ड इंग्लिशमध्ये त्याने

सुरूवात केली. प्लॅन प्रमाणे नऊ प्रश्न पूर्ण झाले . पाच मिनीटांची निर्धारित वेळ संपली नी मॅडमनी लेसन थांबवला. मग फीडबॅक सुरू झाला. " छान झाला रसिकाचा पाठ. प्रश्न विचारताना स्ट्रेस, टोन, पॉझेस, इंटोनेशन ही कौशल्यं चांगली जमली तिला. आता पुन्हा लेसन घेताना फक्त दहा प्रश्नांचं टार्गेट ठेव. ग्रुप मधल्या सगळ्या मुलीनी हे उदाहरण घ्या. रसिका आजच जॉईन झालेली. पण तिने लक्ष पूर्वक निरीक्षण करून परफेक्ट लेसन घेतला. नाहीतर या आधी तीन तीन स्किल्स चे लेसन घेतलेल्या मुली अजून खंडीभर चुका करतात. रसिका सारख़ं अ लर्ट असलं पाहिजे."

चार दिवसानी प्रत्यक्ष शाळेत जावून मुलाना शिकवायचं 'प्रक्टिस टिचींग़चं' नियोजन जाहीर झालं. रोहनला सातवीवर भुगोलचा पाठ लागलेला होता. चार दिवस भरपूर कष्ट घेवून त्याने चांगली कसून तयारी केला. वैशालीची सुद्धा भुगोल मेथड असल्याने त्तिची ही मदत मिळाली. इतर चार पाच मुलींनी त्यांना लागलेल्या घटकांची कशी नियोजनं केलीत तीही नजरे खाली घातली. लेसन प्लॅन च्या नमुन्या प्रमाणे त्याला मिळालेल्या 'नदीचे कार्य' या घटकाचे प्लॅन त्याने बनवले. रात्री डिनरच्या वेळी, "प्लॅन प्रमाणे प्रत्यक्ष लेसन कसा घ्यायचा ते जरा मला समजून सांग" अशी वैशालीला गळ घातली.

वैशालीने त्याचा प्लॅन वाचला नी वर्गात गेल्यावर काय

करायचं, फळ्यावर काय लिहायचं, कोणती चित्रं नी तक्ते वापरायचे ते नीट समजून सांगितलं. त्याप्रमाणे रोहनने दहा मिनीटं रंगीत तालीम करून दाखवली. मग वैशाली म्हणाली, "लायब्ररीत काही चार्ट मिळतील ते बघ. नाहीतर पुस्तकात जी रेखाटणं दिलीत तशी फुल साईज ड्राईंग पेपवर वर काढून ती पुठ्ठ्यावर चिकटवून वापरली तरी चालतात. तासाच्या शेवटी जे प्रश्न विचारणार ते गुंडाळ फळ्यावर व्यवस्थित लिहून ने. म्हणजे वर्गात आयत्यावेळी गोंधळ होणार नाही. आणि हे बघ लेसनला साडी ब्लाऊज हा ड्रेसकोड आहे. कदाचित लेसनपूर्वी युनिफॉर्मची साडी मिळेल."

लेसनला साडी कंपल्सरी आहे हे ऐकताच त्याच्या काळजाचा ठोकाच चुकला. त्याचं डोकं सुन्न झालं. वैशाली गेल्यावर त्याने लगेच छबु मावशीला फोन लावला. "अग़ं मावशी , एक लफडं झालं बघ.... चार दिवसानी आमचे शाळेमध्ये पाठ लागलेत नी पाठाला साडी कंपल्सरी आहे. साडीची ही भानगड आपण विसरलोच की....." त्यावर खळखळून हसत मावशी उत्तरली, " तू घाबरू नकोस उद्या तुझ्या मम्मीला घेवून मी येते पनवेलला." ठरल्या प्रमाणे सकाळी साडे नऊलाच मम्मी नी मावशी होस्टेलवर आल्या. मग साडी नेसायचं प्रक्टिकल झालं . मावशी मम्मी यापैकी कुणाचाच ब्लाऊझ रोहनला होईना. मावशी बोलली ,"तू काळजी करू नको. आम्ही संध्याकाळ पर्यंत अर्जंट ब्लाऊज

शिवून आणतो.”

लेसन डे च्या दिवशी भरपूर मेहनत घेवूनही साफाईदार साडी नेसणं काही त्याला जमलं नाही. रूम बंद करून बाहेर पडल्यावर  इतर मुलींकडे बघितल्यावर मात्र त्याने सुटकेचा श्वास सोडला. बहुसंख्य मुलीनी साड्या कशातरी गुंडाळलेल्या होत्या. त्याच्या सोबत लेसन असलेल्या  प्रतिक्षा रानडे, अर्पिता चव्हाण याना तो म्हणाला,“ मला अजून पनवेलची फारशी माहिती नाही. आपण रिक्षा करून सोबतच जाऊया. भाडं मी भरीन, तुम्ही कॉन्ट्रिब्युट नका करू, फक्त मला कंपनी द्या.” त्यावर दोघीही खुशीने तयार झाल्या.त्या शाळेत पोचल्यावर दहा मिनीटानी प्रार्थना झाली नी तास सुरू झाले. त्याचा पाठ चौथ्या पिरीयडला होता. त्यापूर्वी इतरांचे पाठ बघितल्यावर रोहन निश्‍चित झाला. त्यांच्या पेक्षा तरी आपण नक्की चांगला पाठ घेवू याची त्याला खात्री पटली.

रोहनचा लेसन सुरू झाला. ऑब्झर्वेशनला पर्वते मॅडम आलेल्या. रोहनने प्रथम फलकावर विषय, पाठाचं शिर्षक लिहीलं आणि शिकवायला सुरुवात केली. दोन चार्टस्, नकाशा, चित्रं अशी भरपूर साधनं वापरल्या मुळे सगळ्या वर्गाने चांगला प्रतिसाद दिला. रोहनने नियोजना प्रमाणे अध्यापन केलं. फळ्यावर  महत्वाचे मुद्दे लिहिलं. ॲलर्ट राहून वेळेत पाठातल्या सगळ्या स्टेपस् कव्हर केल्या. सुरुवातीला पर्वते मॅडम आणि चार पाच सहाध्यायी ऑब्झर्वेशनला बसल्यामुळे त्याला जरा

दडपण आलेलं पण पाठ सुरू झाल्यावर ते आपोआप दूर झालं. बेल झाली आणि गृहपाठ देवून रोहन वर्गाबाहेर पडला.

कॉलेजजवळ स्टुडण्टस् बुकडेपोमध्ये चित्रं , तक्ते , नकाशे विकत मिळत. शिवाय पुस्तकात असलेली चित्रं तिथे कॉम्प्युटरवर मोठी करून प्रिंट मिळत असे. रोहनने आपल्या पाठाला लागणारी सामग्री खर्चाची काचकुच न करता जमवलेली. त्यामुळे त्याचा पाठ चांगला झाला. पर्वते मॅडमनी किरकोळ एक दोन सुचना दिल्या पण त्याचं खूप कौतुकही केलं. रोहनच्या मनावरचं मोठं ओझं उतरलं. आपल्याला बी. एड्. सहज जमेल. आपण ईझिली फर्स्ट क्लास स्कोअर करू असा कॉन्फिडन्स आला. पहिलाच लेसन सुपरटॉप झाला म्हणून बरोबरच्या सर्व मुलीनी रसिकाच्या मागे लागून कोल्ड्रिंक वसूल केलं . लेसन पूर्ण करून तो, रानडे नी चव्हाण रिक्षाने कॉलेजवर पोचली. रिक्षा थांबता क्षणीच चव्हाण खाली उतरून मागे वळूनही न पाहता चालत सुटली. पण रानडेने रिक्षाचं भाडं द्यायला पर्स उघडली. अर्थात तिच आधीच रोहनने भाडं दिलं. तरीही रानडे दोघींची कॉँन्ट्रीब्युशन घ्यायचा आग्रह करीत होती. पण रोहनने पैसे घेतले नाहीत.

कॉलेजचं रुटीन आता रोहनच्या चांगलंच अंगवळणी पडलं. सुरुवातीला आठ दहा दिवस उद्दिष्टं, स्पष्टीकरण, अपेक्षित वर्तन बदल ही बी.एड्. मधली ठरलेली 'परवचा" काही केल्या डोक्यात शिरायची नाही. ऑल रोडस् लीड तू रोम या

चालीवर प्रत्येक विषयात काही ठराविक शब्द प्रयोग कॉमन असल्यामुळे भलतीच गल्लत व्हायची. पण हळू हळू सगळं काही आपोआप उलगडत गेलं. रोहन रात्री दीड दीड वाजेतो जागून वाचन करी. त्याची चांगली तयारी झाली. वर्गातल्या हुषार मुलींच्या मालिकेत त्याची मोजदाद व्हायला लागली. त्याच्या लेसनची तर भलतीच तारीफ़ सगळेच प्राध्यापक करायचे. आता मात्र काही मुली त्याच्यावर राजरोस जळायला लागलेल्या. त्यांचं टॉण्टिंग यावरून त्यांची जेलसी लक्षात यायचे. पण बिनधास्त पुरुषी खाक्यामुळे तो फ्रेश रहायचा. उलट यामुळे बहुसंख्य मुली फटकून दूर रहात. कोणाशी फार जवळीक करायची नाही हे त्याचं उद्दिष्ट त्यामुळे आपोपाप सफल झालं. मात्र कॅंटिन मध्ये चहा नाष्टा घेताना टेबलवर ज्या कोणी सोबत बसलेल्या असत त्यांच बील मात्र तो निक्षून पेड करीत असे. रुमवर गप्पांसाठी आधी फारसं कुणी येतच नसे. तरीही कारणपरत्वे कुणी मुली आल्याच, मग भले वैशाली ही असूदे चार - पाच मिनीटांपेक्षा जास्त एंटरटेन करायचं नाही हे पथ्य तो कटाक्षाने पाळायचा.

वैशाली प्रमाणे रुबी, डायस, प्रतिक्षा, मृणालिनी देसाई, अर्चना मोहिले , विशाखा फलटणकर या होस्टेल वरच्या काही मुलींशी त्याची चांगली गट्टी जमायची, लेसन नोटस्. टिचिंग एडस प्रिपरेशन मध्ये तो सगळ्याना मदत करायचा. विशाखा, दीपा, मृणालिनी या खरंतर सायन्स फॅकल्टीच्या .... पण

मॅथॅमॅटिक्स, फिजीक्स, केमिस्ट्री या विषयातली त्याची हुषारी त्यांच्याही नजरेत भरायची. “रसिका, तू आर्टस् साईड ऐवजी सायन्सला जायला हवं होतं. तू उगाचच आर.डी. मराठी असले फालतू विषय घेवून बी. ए. केलंस. निदान इंग्लिश तरी घ्यायचं होतस..... ” त्यावर रोहन हसून बोलायचा,“ खरआहे तुमचं म्हणणं..... पण सायन्सला मानेवर खडा ठेवून तीन तीन तास प्रॅक्टिकल्स करणं आपल्याला नसतं जमलं. तसंच फार अभ्यासाचं टेन्शन न को होतं मला. म्हणून सहज जमणारे सोपे विषय घेवून मी कॉलेजचं लाईफ मस्त एन्जॉय केलं. लग्नाच्या बाजारात चांगला नवरा गटवायचा तर आजकाल ग्रॅज्युएशन हे किमान क्वालिफिकेशन आहे म्हणून मी बी.ए. केलं इतकंच. नी मम्मी - मावशीनी भलतंच स्ट्रेस केलं म्हणून मी नाईलाजाने बी.एड्.ला अडमिशन घेतली, इतकंच....”

त्या दिवशी जी गोष्ट इंग्लिश मेथडला तीच भूगोल मेथडलाही घडली. त्या पेपरमध्ये ही रोहनने ८२ पर्सेण्ट स्कोअर केले. लेक्चर सुटल्यावर भूगोल- इंग्लिशच्या मुलीनी जोर जबरदस्ती करून पार्टी वसूल केली. रोहनला ५००रुपयाची फोडणी बसली. त्या नंतर बारा दिवसानी टर्मिनलचा रिझल्ट नोटिस बोर्ड ला लागला. पहिला नंबर दीपा रावळने , दुसरा वैशाली दळवीने आणि तिसरा रसिका भोबेने पटकावला. तिघींच्याही गुणांमध्ये फार डिफ्रन्स नव्हता. रसिका लेट ॲडमिशन असूनही तिने एवढा स्कोअर घेतला त्याअर्थी

ॲन्युअल मध्ये ती सोबतच्या दोघीनाही मागे टाकणार असं खुद्द प्राचार्यांनीच वर्गात सांगितलं. आता वर्गातल्या मुलींनी त्याना तीन देवियाँ ही उपाधी दिली. त्यांचं नाव न घेता देवी नंबर वन, देवी नंबर टू, देवी नंबर थ्री असा त्यांचा उल्लेख व्हायला लागला.

आता वर्गात रोहनचा भाव भलताच वधारला. हॉस्टेल वरच्या मुली तिच्याशी घसण वाढवण्यासाठी काहीना काही निमित्त काढून वरचेवर तिच्या रुमवर हेलपाटे घालायला लागल्या. नोटस् दे, या टॉपिकवर डिस्कशन करुया......याना त्या निमित्ताने रसिकाशी सलगी करण्याची जशी स्पर्धाच सुरू झाली. रोहनची भलतीच गोची व्हायला लागली. यापूर्वी रात्री मेसवरून जेवून आल्यावर दार बंद केलं की ड्रेस काढून टाकून दुसरे दिवशी सकाळ पर्यंत नुस्त्या अंडर वेअरवर राहून त्याला जरा रिलॅक्स होता येई . पण आता कोण कधी येईल याचा भरवसाच राहिला नव्हता. मग रोहनने नवीन आयडिया काढली. रात्री जेवण झाल्यावर तो अर्धा पाऊण तास प्रिमायसेस मध्ये वेळ काढून उशिरा रूम वर जावू लागला. कोण आलं की, कपडे धुण्याचं निमित्त करून तो बाथरूम मध्ये वेळ काढायला लागला. तर कधी कोणाचा फोन आल्याचं निमित्त करून खोटं नाटक करीत टाईमपास करायला लागला. मग हळू हळू येणारांची रिघ कमी व्हायला लागली.

प्रॅक्टिस लेसन्स, इंटर्नशीप, रिसर्च प्रोजेक्ट, वन डे ट्रिप, सोशल वर्क या सगळ्या ॲक्टिव्हिज्मध्ये दिवस भरभरा संपले

नी नाताळ जवळ आला. नाताळची आठवडाभर सुटी मिळणार होती. तेवीस ला प्राचार्यांच लेक्चर सुरू झालं. ते आले नी पाठोपाठ शिपाई येवून कसल्याशा फॉर्म्सचा गठ्ठा ठेवून गेला. सर बोलायला लागले, “उद्यापासून ते एक जानेवारी पर्यंत कॉलेजला सुटी राहिल. आठ दिवस मस्त एंजॉय करा. चोवीसला मॉ र्निंग सेशनला चार लेक्चर्स घेवून कॉलेज सुटेल. ” मुलीनी बाकं वाजवून आनंद व्यक्त केला. सरानी बंडलमधले २-२फॉर्म्स वाटायला सांगून ते पुढे बोलू लागले,“आपलं दीपस्तंभ मॅग्झिन काढायचं आहे. साधारण शंभर पानी अंक छापायचा तर ४०,०००खर्च येतो. आपल्याकडे फीचे दहा हजार रुपये जमा आहेत. त्याबाहेर ३०,०००पये जादा लागणार . त्या खर्चासाठी प्रत्येकीने तीनशे रुपयांच्या जाहिराती गोळा करायच्या. फॉर्म नीट वाचा. सदिच्छा जाहिरात शंभर रुपये, हाफ पुज दोनशे, फुल पेज पाचशे, कलर पेज एक हजार,बॅक पेज पाच हजार असे दर आहेत. रसिका तुझ्या बाबांची इलेक्ट्रॉनिक फर्म आहे. तू बॅक पेज साठी पाच हजारांची ॲड घे बाबांकडून ”

डिसुजा उभी राहिली,“सर, ॲडचं कंपल्शन नको हं. तीनशे म्हणजे फार होतात. प्रत्येकीलाच तेवढे शक्य होतील असं नाही. जिला जसं जमेल तसं कलेक्शन होईल.” सर शांतपणे म्हणाले, "बाकीच्यांचं नंतर बघू....तुला काय जमेल ते सांग..... हे कंपल्शन नाही. हं बोल पट्कन.” डिसुजा अडचणीत आली. “सर, मी पाचशे रुपये कलेक्ट करेन” सर म्हणाले,“बघा, हिचं

उदाहर्ण घ्या सगळ्यानी. प्रत्येकीने किमान तीनशेचं टार्गेट ठेवा. एकतर जाहिरात मिळवा नाहीतर तुम्ही आपल्य्य कुटूंबीयांच्या नावाने द्या.....हे कॉलेजचं ऋण आहे असं मानून काम करा...."

कॉलेज सुटलं नी मुली खुषीतच हॉस्टेलवर निघाल्या. रोहनने बाहेर आल्या आल्या मम्मीला रिग करून चोवीस तारीखला दुपारी कार पाठवायला सांगितली. सगळीकडे खुषीचा महोल होता. कुणी कुणी रुमवर आल्या आल्या वह्या पुस्तकं कॉटवर टाकून त्याच पावली रुम बंद करून फिरायला बाहेर पडल्या. वैशालीच्या रुमला लॉक दिसलं. खोलीत शिरल्यावर रोहनने तात्काळ फोर स्क्वेअरचं पाकीट काढलं. सिगारेट ओढता ओढता ड्रेससह सगळा सरंजाम कॉटवर ताकून आंघोळ करायला तो बाथरूम मध्ये शिरला. खुशीत येवून "तेरी चुनरिया दिल ले गयी " ची तान सोडून धो धो नळ सोडून तो धारेखाली बसला.टॉवेलने अंग पुसता पुसता आज बाहएर जावून मस्तपैकी नॉनव्हेज खायचा बेत करून तो तयारीला लागला. ड्रेस वगैरे करून खांद्याला पर्स लटकावून तो दाराजवळ गेला, तर दाराला आतून कडीच घातलेली नव्हती . त्याने चमकून दार उघडायचा प्रयत्न केला ...... दाराला बाहेरून कडी..... आपण दाराला कडी न लावताच आंघोळीला गेलो बहुतेक. आपण आंघोळ करीत असताना कुणीतरी आत येवून गेलं बहुतेक.... त्याच्या पायाखालची वाळूच सरकली.

जी कोण आत आली असेल तिने ड्रेसजवळ पडलेलं पॅडिंग

पाहिलं असणार बहुधा...... आपलं बिंग फुटलं हे लक्षात आणून देण्यासाठी तिने मुद्दाम दाराला बाहेरून कडी घातलेली असणार बहुधा ..... पुढे नेमकं काय होणार? त्याला काहीच तर्क करता येईना! त्याचं डोकंच बधीर झालं. थोडावेळ शांत रहिल्यावर त्याने विचार केला की , आपण पॅदिंग वापरतो म्हणून माघारी थट्टा होईल फारतर..... आपण बिलकूल टेन्शन घ्यायवं नाही . कोण काय आक्षेप घेईल त्यावेळी काय ते पहायचं. बरं अगदीच प्रकरण अंगलट येतयसं वाटल तर सरळ तॅक्सी करुन पुणं गाठायचं . पक्का निर्धार करून त्याने खडखडावलं.... एकदा, दोनदा.... चारदा प्रयत्न करूनही दार उघडेना तेंव्हा त्याने खिडकीत जावून ग्राऊंडच्या दिशेने तोंड करून हाका मारल्या,“ रुबी, वैशाली ....प्रतिक्षा७७ कुणीतरी या लौकर.... कुणीतरी दाराला बाहेरून कडी घतलेय.... मी आत अडकून पडलेय.......” लागोपाठ हाका मारूनही प्रतिसाद मिळाला नाही . पण तेवढ्यात त्याला युक्ती सुचली. उघड्या खिडकीतून बाहेर उतरून स्लॅबच्या कडेवरून चालत तो व्हरांड्यातल्या कठड्यापर्यंत गेला नी तिथून आत उतरून आपल्या रुम समोर येवून दार उघडून आत गेला.पाच मिनिटात दारावर टक टक झाली नी दार उघडलं. समोर वैशाली होती.

रोहन कमालीचा हादरलेला पण कसबसं स्वत:ला सावरीत म्हणाला, “अगं, मी कॉलेजवरून आले तेंव्हा तुझ्या रुमला लॉक होतं. कुठे गेली होतीस? मी आंघोळ करून बाहेर आले नी

फिरायला जायची तयारी करून दार उघडायला गेले तर दारच उघडेना.....किती वेळ दार खडखडावलं पण छे.... कुणीच दार उघडेना. मग मी सरळ खिडकीतून उतरून स्लॅबच्या बाहेरच्या कडेवरून चालत तुझ्या रुम समोर बाल्कनीच्या कठड्यावरून उतरून आले नी दाराची कडी काढली. आता आंघोळीला गेलेली असताना कुणी आलं असेल तर जरा वाट पहायची ना.... दाराल बाहेरून कडी घालायची ही काय पद्धत झाली होय? काय तरी अघोचरी चावटपणा करतात या मुली.....मी सरळ कंप्लेंट करणार प्राचार्यांकडे..”

स्मितहास्य करीत वैशाली म्हणाली, “सॉरी हं रसिका, मीच केली ही आगळीक. मीच आले होते तुझ्याकडे. बराच वेळ टकटक करूनही तू दार उघडलं नाहीस की आतून काही प्रतिसादही दिलास नाही म्हणून म्हटलं जरा गम्मत करुया. खुप वेळ वाट पाहून कंटाळून मी ग्राउंड फ्लोअर्वर मयुरीकडे गेले. त्या नादात तुझ्या दाराला कडी घालून आले हेच विसरले की मी. तुझी बोंबाबोंब ऐकल्यावर माझी चूक लक्षात आली माझ्या. प्लीज रागावू नकोस हं....” रोहनचा जीव भांड्यात पडला. दीर्घ सुस्कारा सोडीत तो म्हणाला, “तुझीपण कमालच आहे की गं.... अगं मी दाराला आतून कडीच घातली नव्हती...... पण आज तुरुंगात डांबून ठेवलेल्या कैद्याला काय वाटत असेल याचा फील आला मला. चल आज नॉनव्हेज खायचा मूड आहे. चल तू पण.”

वैशाली कां कू करायला लागल्यावर तिचा हात धरून

ओढीत रोहन बोलला, “आता तू मुकाट्यानं येतेस की करू कंप्लेंट प्राचार्यांकडे?” रुमवर जावून पर्स लटकावून वैशाली बाहेर पडली. लंच उरकून होस्टेलवर आल्यावर वैशालीने रुमच्या दारवर टक टक केलं. पार्टनरने दार उघडल्यावर 'गुड नाईट' म्हणून रुम मध्ये जावून दार लावता लावता वैशालीने लकेर छेडली. “तेरी चुनरिया दिल ले गयी.........”रोहनचं पाउल अडखळलं. हॉटेल मध्ये जावून परत येई पर्यंत वैशालीने झाल्या प्रकाराबद्दल एक अक्षरही काढलेलं नव्हतं. आपण आंघोळ करीत असताना ती आली होती तेंव्हा ती दार उघडून आत तर येवून गेली नसेलना? तसं असतं तर तिने पॅडिंगबद्दल काहीच कसं विचारलं नाही? बरं नाही म्हणावं तर नाताळ सुटीत काय काय करणार त्या बद्दल अगडी भरभरून बोलत होती की ती...... तिला काही खटकलेलं असतं तर तिच्या वागण्या बोलण्यात कुठेच तुटकपणा दिसला असता.हॉटेलचं बील मी दिलं त्यावेळी पण तिने फार लावून धरलं नाही. पण मग रुम मध्ये जाताना ,बाथरूम मध्ये आपण जे गाणं म्हणत होतो नेमकं तेच गाणं कां बरं म्हणून दाखवलं असेल वैशालीने? तिला नेमकं काय सुचीत करायच असेल बरं? रोहनला काहीच गूढ उकलेना. आता वैशाली आपण होवून कधि हा विषय काढील तेंव्हा ती काय बोलेल ते ऐकून आपण बाजू मारून न्यायची असा सूज्ञ विचार करून त्याने तो विचार डोक्यातून काढून टाकला.

चोवीस जानेवारीला रोहनचा शेवटचा लेसन लागला. या

वेळी प्रथमच त्याला नी वैशालीला एकच शाळा मिळालेली. लेसन डिपार्टमेंटच्या परांडे सराना सांगितलं असतं तर त्याला नी वैशालीला एक्च शाळा मिळाली असती. पण रोहनने कधी तसा विचारही केला नव्हता. पहिला लेसन घेतल्यावर त्याला कधीच लेसनचं टेन्शन वाटलेलं नव्हतं. पण यावेळी वैशाली आहे... ती नक्की लेसन ऑब्झर्व करायला येणार ... या विचाराने त्याच्यावर जरासं दडपण आलं. त्याने अगदी कसून तयारी केली. चित्रं, तक्ते, फ्लश कार्डस् असं भरपूर मटेरियल जमवलं. टॉपिक पुन्हा पुन्हा वाचून अगदी मुखोद्गत केला. लेसनचा दिवस उजाडला. सकाळी आठ वाजता दारावर टक टक झाली. वैशाली आलेली होती.

"गुड मॉर्निंग वैशाली , आज सकाळी सकाळीच काय काम काढलंस? " रोहन म्हणाला. त्यावर वैशाली बोलली, "म्हटलं तुझं कुठपर्यंत आवरलंय ते पाहुया. चल मस्तपैकी कॉफी घेवूया". जिना उतरता उतरता वैशाली म्हणाली, "एक रिक्वेस्ट करू का गं रसिका? प्लीज तू माझा लेसन पहायला नको येवूस . खरंतर तू माझी फास्ट फ्रेण्ड . पण कां कोण जाणे तू समोर दिसलीस तर मी दिस्टर्ब होईन...... प्लीज गैरसमज न्को करून घेवूस हं." रोहन बोलला, "एवढंच ना , डोण वरी. तुला टेंशन येणार असेल तर मी नाही येणार. पण तू मात्र माझ्या लेसनला नक्की ये हं. तुझ्या सारखी स्कॉलर ऑब्झर्वेशनला येणार

म्हणून मी अगदी फुल्ल स्पीडमध्ये तयारी केलीय. तु बघ माझा लेसन नी तुझा रिमार्क पण नंतर मला सांग. ”

प्रिलिम झाली . यावेळी वैशालीने बाजी मारलेली. सेकण्ड रॅन्क अगदी अनपेक्षितपणे गीता धुरतने मिळवलेली. अर्थात तिला स्कोअर मिळाला त्यात तिने मॅगझिन साठी बावीस हजारांच्या ॲड मिळवून दिल्या त्याचा करिष्मा असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. रोहनला सातवा नंबर मिळाला. अर्थात टर्मिनल पेक्षा त्याचा स्कोअर दोन पर्सेण्टने वाढलेला होता. त्याने फार सिरियसली मुलींसारखी मान मोडून तयारीही केलेली नव्हती. आता सेल्फ स्टडी साठी लेक्चर्स बंद्च झालेली होती. पंधरा दिवस इथे कशाला रहा असा विचार करून रोहन सरळ पुण्याला गेला. बाकी सगळ्या मुली मात्र घरी अभ्यास होत नाही म्हणून होस्टेलवरच थांबलेल्या होत्या. पुण्यात गेल्यावर पंधरा दिवसात त्याने एकदाही नोटस् उघडून वाचायची तसदी घेतली नाही. २३ते २८मार्च ॲन्युअल व्हायची होती नी २२ ला हॉल रिसिट मिळायची होती. म्हणून रोहन रिसिट मिळनार त्या दिवशी परत आला.

रोहन रिसिट घेवून रुमवर आला तेव्हा होस्टेल वर पिनड्रॉप सायलेन्स होता. रात्री मेसवर जेवायला गेल्यावरपाहिलं तर एकेकीचा अवतार अगडी बघण्यासारखा झालेला. लाल डोळे, अस्ताव्यस्त केस, चुरगळलेले कपडे. त्यांचा सिरियसनेस पाहून रोहनला हसूच आलं. आज जेवताना हसणं खिडळणं बंद.

एकेक जण मुकाट्याने पटपटा जेवून उठून गेली. आज मेसला त्याचा आवडता टोमॅटो बटाटा रस्सा केलेला. रोहन दणकून जेवला. मग प्रिमायसेस मध्ये चक्कर मारून आरामात रोमवर गेला. सगळा सरंजाम उतरून तासभर नोटस् चाळल्या नी मस्त ताणून दिली. पेपरचं टायमिंग अडीज ते साडेपाच होतं. रोहन पावणे दोनला हॉलवर गेला. ग्रुपमधल्या फ्रेण्डसना बेस्ट विशेस दिल्या. प्पर सूटल्यावर सगळ्या मुली मुकाट्याने रुमकडे निघाल्या. एरव्ही पेपर सुटल्यावर उत्तरांची चर्चा करणं, मार्कस् टॅली करणं, प्रश्नपत्रिकेवर शेरेबाजी करणं असतं तशी काही म्हटल्या काहीही चर्चा रंगली नाही. एवढं टेन्शन घेण्यासारखं या परीक्षेत काय आहे ते गौडबंगाल रोहनला उलगडलं नाही.

शेवटचा पेपर झाला आणि वातारण एकदम बदललं. हॉल बाहेर आल्या आल्या मुलींच हसणं खिडळणं..... खेचाखेची पूर्ववत सुरू झाली. निरोपा निरोपी, सरांच्या पाया पडणं ...एकमेकींचे फोन नंबर्स पत्ते देणं घेणं सुरू झालेलं. रोहन मात्र या सग़ळ्या पासून पूर्ण अलिप्त रहात तडक रूमवर गेला. रुमला न विसरता कडी घालून तो रिलॅक्स झाला. आरामात सिगारेट ओढून झाल्यावर त्याने बी.एड्.च्या नावाने आंघोळ केली . मस्त बॉडी स्प्रे फवारला अन् ड्रेस चढवला तेवढ्यात दारावर टक टक झाली. बाहेर चाललेल्या कलकलाटा वरून त्याने ओळखलं की रुबी,वैशाली , प्रतिक्षा, मृणालिनी,अर्चना, विशाखा असा ग्रूप आलेला आहे.

मैत्रिणी धडधडा आत घुसल्या. “रसिका तू मात्र ग्रेट आहेस हं..... आम्ही कॉलेजवर किती शोधलं तुला. सगळी डिपार्टमेण्टस्, कॉमन रूम. लायब्ररी कुठेच तुझा पत्ता नाही. मग वाटलं कॅण्टिनला असशील. पण तिथेही नाही दिसलीस तू. कम्मल आहे हं तुझी. तरी नशिब लगेच रूम सोडून पुण्याला नाही गेलीस. ” रोहन सावरून घेत म्हणाला, “मी तर जाम बोअर झालेली.... कधी एकदा रूमवर येते नी बी.एड्.च्या नावाने आंघॉल करते असं झालं होतं मला. चला सुटले एकदा ..... कित्ती कित्ती मोकळं वाटतय् मला. आज सर्वांना माझ्यातर्फे फेअरवेल पार्टी. कुणीही कसलीही सबब सांगायची नाही. चला आवरा पटकन्..... नी जाऊया बाहेर. ”

एरव्ही रेंगाळणाऱ्या रुबी नी अर्चना अगदी वेळेत तयार होवून बाहेर पडल्या. हॉटेल मध्ये पावभाजी येईपर्यंत मोकळेपणी खिदळणं सुरु होतं. एकमेकीना पत्ते देणं घेणं सुरु झालं. रोहनने आजपर्यंत कटाक्षाने ही गोष्ट टाळलेली होती. आपण पुण्यावे आहोत यापलिकडे जादा तपशील त्याने कधीच दिलेला नव्हता. या वेळीही त्याने पद्धतशीर बगल दिली. आपण पुण्यात राहतो ही बाब कायमची निकाली काढण्यासाठी त्याने लोणकढी थाप मारली.“म्हंजे असं आहेनं डॅडीनी कांजूरमार्गला कुठेतरी आमच्या फर्मची ब्रॅन्च सुरू केलीय . लौकरच आम्ही बॉम्बेला शिफ्ट होतोय.रहाण्यासाठी बोरीवलीला कुठेसा फ्लॅट घेतलाय म्हणे. एक्झॅक्ट ॲड्रेस मलाच माहिती नाहीये......”

तेवढ्यात वेटरने प्लेट लावायला सुरुवात केली.

रात्री जेवण करून आल्यावर ग्रूप मधल्या सगळ्या मुली पुन्हा वैशालीच्या रूमवर जमल्या. रोहनलाही नाईलाजाने जावं लागलं. होस्टेलला आल्यापासून ते आज पर्यंत तो जेमतेम दोन ते तीन वेळा वैशालीच्या रुमवर गेला असेल. त्यावेळी दर खेपेला मुद्याचं बोलून तो दोन मिनीटात बाहेर पडायचा. यावेळी मात्र पाऊण तास त्याला थांबावच लागलं. तरीही गप्पाष्टकात त्याचा सहभाग अगदी सावध होता. त्याने फक्त श्रोत्याची भूमिका निभावली. तासभर झाल्यावर मात्र ओढून ताणून जांभया देत, आळोखे पिळोखे देऊन आपल्याला झोप येत असल्याचं नाटक करत तो बोलला,“आता मी जाते हं, मला कमालीची झोप यायला लागलीय्.” नी बाय् बाय् करीत त्याने रूम गाठली. दहा पंधरा मिनीटं सामान वगैरे आवरून तो सगळा सरंजाम उतरणार तेवढ्यात दारावर टक टक झाली. त्याने नाइलाजानेच दार उघडलं. समोर वैशालीला पाहून तोहसत म्हणाला, “ तू होय, मला वाटलं, कोण ही नकोती ब्याद आली कडमडायला.....”

रूममध्ये येवून कॉटवर टेकत वैशाली बोलली, “ उद्या पहाटे पाच वाजता मी होस्टेल सोडणार. सहाची बस आहे माझी. अगदी राहवेना म्हणून जाण्यापूर्वी तुझा निरोप घ्यायला आले. माझा पत्ता आहेनं तुझ्याकडे? बोरिवलीला आमचा फ्लॅट आहे. तुम्ही शिफ्ट झालात की मला फोन कर नी. मी येईन तुला

न्यायला. तुम्ही बोरीवलीला शिफ्ट होताय ना , म्हणून तुला स्पेशल इन्व्हिटेशन द्यायला आले मी.” जास्त वेळ न काढता वैशाली उठली. दारवाजात गेल्यावर जरा थांबून तिने मागे वळून पाहिलं. तिचे डोळे पाण्याने भरलेले होते.“ रसिका, तू खरंच खंच स्त्री आहेस की नाही याचाच संशय येतोय् मला. एवढं पॅसिव्ह राहणं नाही जमत स्त्रीला, म्हणून म्हंटलं मी. गेले गेले सहा साडेसहा महिने एकत्र राहिलो आपण...... एकमेकींशी मोकळेपणी गप्पा मारल्या, फिरलो. कितीतरी वेळा एकत्र कॉफी प्याली, लंच घेतलं..... पण आज जायची वेळ आल्यावर तरी आपण पुन्हा कधि भेटूया?

मला तुझी कायम आठवण य्रत राहिल असं निदान तोंडदेखलं तरी तू म्हणशील, नव्हे तसं म्हणावंस अशी माझी अपेक्षा होती........पण माझा भ्रमनिरास झाला....... एतके कॅज्युअल संबंध आहेत का गं आपले...? अर्थात तुला माझ्याबाद्दल ओढ - जिव्हाळा वाटावा असं फारसं काही मी केलेलं नाही म्हणा तुझ्याशी...... आपण नॉनव्हेज घ्यायचो तेंव्हाही हार्डली दोंन वेळा मी बील दिलं असेल, इतर असंख्यवेळा तूच बील पेड केलेलं आहे...... शेवटच्या क्षणी तुम्ही बोरीवलीला शिफ़्ट झाल्यावर मला कळव असं मी म्हंतल त्यावरही तू कोणतीच प्रतिक्रिया दिली नाहीस, ही गोष्ट मात्र जिव्हारी लागली माझ्या..... पण निदान फॉर्मॅलिटी म्हणून सुद्धा तू हो म्हंटलं नाहीस.....” दार ओढून घेत वैशाली निघून गेली.

आता मात्र रोहन अंतर्बाह्य ढवळून निघाला. बी.एड्. ला येताना स्त्री वेशात वावरायचं केवढं मोठं चॅलेंज स्वीकारून गेले सहा महिने थ्रिल, भीती, दडपण या खाली आपण वावरलो त्याची आठवण आल्यावर एक वेगळाच थरार त्याला जाणवला. या सगळ्यात नाही म्हटलं तरी रुबी, वैशाली , प्रतिक्षा, मृणालिनी,अर्चना, विशाखा यानी त्याला मोठा दिलासा दिलेला..... पण आपण मात्र निरोपाच्या अगदी रिझर्व्ह वागलो त्यांच्याशी. आपल्यावर एक वेगळं बंधन होतं ही गोष्ट वेगळी, पण स्त्रीत्वाचं नाटक वठवलं तसं आपण त्यांच्यात एंवॉल्व्ह झालोय् असं नाटकही करायला हवं होतं. पण ते नाही सुचलं आपल्याला, याची मोठी खंत आता वेळ गेल्यावर त्याला वाटायल लागली. आपण कितीही प्रयत्न केले तरी या ग्रूपला आणि खास करून वैशालीला विसरू शकू का? रसिका बनून रहायचं चॅलेंज आपण स्वीकारलं तेंव्हा कुठेही, कुणाच्यातही गुंतायचं नाही असं आपण ठरवलेलं, तसा शिकस्तीचा प्रयत्न्ही आपण केला पण हे जमलं का आपल्याला? या साऱ्याची श्री शिल्लक काय? आत्मवंचना....... ही मी माझीच फसवणूक केली की..... उलट सुलट विचारांचं एवढं काहूर माजलं की आज रोजच्या प्रमाणे पॅडिंग सोडून रिलॅक्स व्हायचंही सुचलं नाही त्याला.

तो रात्रभर विचार करीत चक्क जागा राहिला. आपलं रहस्य वैशालीला सांगावं का? हे भीषण सत्य ती कितपत स्वीकारील?

नी हे सगळं ऐकल्यावर तिच्या मनात आइच्या बद्दल आदर, विश्वास कितपत शिल्लक राहील? बरं न सांगावं तर तिची वंचना केल्याचा सल आपल्या हृदयात कायम खुपत राहील...... काय करायचं.....? उलट सुलट विचारांच्या आवर्तनात पाच कधी वाजले कळलंच नाही. आता वैशाली रूम बाहेर पडणार, अजून संधी आहे..... कसंबसं धैर्य गोळा करीत त्याने मोबाईल उचलून वैशालीला मेसेज केला," आय वॉण्ट टू मीट यू, आय् वॉण्ट टू डिस्क्लोज वेरि इम्पॉर्टण्ट मॅटर..... प्लीज कोम टू माय रूम. " मेसेज सेण्ड झाला नी काही सेकंदातच उत्तर आलं, " सॉरी, इटस्स टू लेट नाऊ...."

आज त्याला चहा प्यायची तल्लफ आली नाही की एकदाही सिगारेट ओढाविशी वाटली नाही. ड्रायव्हर कार घेवून रात्रीच पनवेलला येवून लॉजवर थांबलेला होता. तो आठ वाजता यायचा होता पण आता एक क्षणभरही इथे थांबण त्याला नकोसं झालेलं. त्याने ड्रायव्हरला फोन लावला. तोही उठलेला होता नी त्याचं आवरलेलंही होतं. तो लगेच येतो म्हणाला. चार सूटकेसिस नी बेडिंग एवढं सामान दोन ट्रीप मारून ग्राउंड फ्लोअरला जाता जाता त्याने वैशालीच्या रूम कडे नजर टाकली. आत लाईट दिसत होता. सामान पोर्चबाहेर ठेवताना कुणाच्या तरी दोन सुटकेसिस नी बेडिंग बाजूला ठेवलेलं दिसलं पण जवळ कोणी मुलग़ी दिसली नाही. त्याने रुमची किल्ली सिक्युरिटी कडे दिली नी तो माघारी आला. तेवढ्यात मेन गेट

मधून आपली कार आत आल्याचं त्याला दिसलं.

कार होस्टेल समोर येवून थांबली. ड्रायव्हर खाली उतरला. त्याने डिकी उघडून सामान आत टाकल. रोहन कारचा दरवाजा उघडणार तेवढ्यात वैशाली नी तिची पार्टनर येताना दिसली. त्याला हाताने थांबायची खूण करीत पुढे येवून वैशाली म्हणाली, माझा रिक्षावाला अजून आलेला नाही. मला सी.बी.एस. ला ड्रॉप कर. तिचं बेडिंग नी सूटकेस पुढी ड्रायव्हरच्या बाजूला ठेवून दोन सुटकेस मागच्या सीट वर ठेवून रोहनने वैशालीला आत बसायची खूण केली. मग स्वत: आत जावून कारचं दार ओढून घेत तो ड्रायव्हरला म्हणाला,"कार सी,बी.एस.ला घे....." कार गेटबाहेर पडता पडता रोहन अजीजीच्या सुरात म्हणाला,"मला माफ कर वैशाली, पण एक गोष्ट अगदी खरी खरी कबूल करणार आहे मी....."

त्याला पुढे बोलू न देता वैशाली वेडावत बोलली,"म्हणे म्यॅफ़ कर... मोठा सत्यवचनी हरिश्चंद्रच लागून गेलास की तू.... स्वत:ला फार शहाणा समजतोस नव्हे तू ...... तुझं सोंग मी कधीच ओळखलंय मी....... मी प्रथम रुमवर आलेले तेव्हा सिगारेट्चा वास आला मला नी कॉत जवळ राख दिसली मला....... हे काहीतरी गौड बंगाल आहे असा संशय मला त्याच वेळी आलेला. फर्स्ट टर्म संपण्या पूर्वी पंधरा दिवस ....... नेमकी तारीख नाही आठवत ... मी रात्री रूमवर आलेली तुझ्या ...... दार खडखडावूनही उघडलं नाही म्हणून जरा जोराने लोटलं तर

सताड उघडलं की दार...... नी समोर जे दृष्य दिसलं ते पाहून माझी दातखीळ बसायची वेळ आली. तू चक्क इनर वेअर घालून झोपलेलास...... गावून अन् पॅडिंग खुर्चीत टाकलेलं...... खरं तर घाबरून बोंब मारणार होते मी पण कसंतरी सावरलं स्वत:ला . दाराला आतून कडी घतली नी खिडकीतुन उतरून फुटभर रुंदीच्या स्लॅबच्या कडेवरून जीव मुठीत धरून चालत मी व्हरांड्यातल्या ओपन पॅसेज समोरच्याबाल्कनीच्या कठड्यावरून आत गेले. मोठ्या शिताफीने केवढं तरी दु:साहस मी केलं होतं.... मी असं कां केलं? तुझ्याबद्दल एवढी सहानुभूती मला कां वाटावी? दुसरी कोणीही मुलगी असती तरी तिने सग़ळं होस्टेल डोक्यावर घेवून तुझं बिंग उघडं पाडलं असतं.... त्याचे किती गंभीर परिणाम झाले असते याचा तू विचार कर, मूर्ख..... बेअक्कल.... कृतघ्न माणसा... मी कशा साठी एवढा धोका पत्करून वाचवलं तुला? ”

हे ऐकल्यावर रोहनला घाम फुटला. “वैशाली यू आर रिअली ग्रेट....पण एवढी गंभीर बाब उघडकीला आली तरी.......” त्याचं बोलॉणं अर्धवट तोडीत वैशाली म्हणाली , “मी गप्प कां बसले? असंच ना..... असा स्त्री वेष घेवून तू बी.एड्. कां करतोयस् ते तर्काने ओळखलं मी. तुला जुळा भाऊ आहे हे महिती होतं मला. तो जुळा भाऊ म्हणजे तूच आहेस नी आपल्या बहिणीचा काही प्रॉब्लेम असणार म्हणून तू तिचं सोंग घेवून बी. एड्. करतोयस् हे तर्काने ओळखलं मी. या नाटकात

तुझी आई , मावशी ही सामिल आहेत म्हणजे तसंच काही गंभीर कारण असेल असं वाटलं मला. अन् बहीणीसाठी हे प्रचण्ड मोठं धाडस तू पत्करलंस म्हणून तुझ्याबद्दल मोठा सॉफ्ट कॉर्नरही निर्माण झाला माझ्या मनात." किंचीत पॉझ घेत दीर्घ सुस्कारा सोडून ती पुढे बोलू लागली." आणख़ी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तू दाखवलेला संयम. कायम मुलींच्या सहवासात राहून मोठी संधी मिळालेली असूनही कधीच कुणाशीही लघळपणा, लगट करणं असं गैर कृत्य तुझ्या हातून घडलं नाही. चुकूनही अगदी किंचित संशय यावा अशी आगळीकही तुझ्याकडून कधी झाली नाही. माझं अगदी बारीक लक्ष असायचं. तुझं वर्म कळल्यावर तर मी भलतीच जागरूक राहून तुझ्यावर लक्ष ठेवून होते. तू अगदी बारीकसंही गैरकृत्य केलं असतंस ना तर तुला जन्मातून उठवला असता मी.... "

" नातळ सुट्टी पूर्वी बेफिकीरीने दाराला आतून कडी न घालण्याची चूक तू दुसऱ्यांदा केलीस तेव्हा तुला कायमची अद्दल घडावी नी अशी गाफिली पुन्हा होवू नये म्हणून मी मुद्दामच बाहेरून कडी घातली नी तुझ्या हाका ऐकून ही दुर्लक्ष केलं. तु झक् मारीत खिडकीतून उतरून बाल्कनीत येवून व्हरांड्यात उतरून कडी काढणार हे माहिती होतं मला. त्यावेळी मी बाहेरून कडी घातली ते बरंच झालं कारण मी बाहेर आल्यावर दोन मिनिटानी मयुरी काहीतरी कामासाठी आलेली तुझ्या रुमवर. पण बाहेरून कडी पहिल्यावर ती निघून गेली. "

रसिकाचं बोलणं संपत आलं नी दोन मिनीटानी सी.बी. एस. आलं कार थांबली. रोहन ड्रायव्हरला म्हणाला, "प्रेमभैया, कार मुंबई कडे घे. या माझ्या मैत्रिणीला बोरीवलीला सोडून मग पुण्यात जायचं आहे आपल्याला." वैशाली ओशाळून बोलली, "मी गेले असते की बसने.... तुला उगाच कशाला त्रास....." रोहन हसत म्हणाला," वैशाली एवढं सगळं ऐकल्यावरही स्वत:ची कार असताना तुला सी.बी.एस. वर सोडून निघून जाण्याएवढा 'हा' वाटलो का मी तुला? मी थोडा बेमुर्वतखोरपणे वागलो तुझ्याशी पण ते सकारण होतं, नी समर्थनीयही होतं. पण मी कृतघ्न मुळीच नाही. काल रात्री तू डोळ्यात पाणी आणून जे वाक्ताडन करून गेलीस ना, त्यानंतर मला एवढं गिल्टी वाटत होतं ना की, पहाटेपर्यंत मी टक्क जागा होतो. तू जे उपकार केलेसना माझ्यावर नी त्यापेक्षाही मला जे समजून घेतलंस ना त्याला तोड नाही. मी तुला बोरीवली पर्यंत लिफ़्ट देतोय् त्या मागचं कारण जरा वेगळं आहे......"

भुवया उंचावीत ओठांचा चंबू करून वैशाली म्हणाली, "असं कोणतं कारण आहे बुवा?" त्यावर तिच्या नजरेत नजर घालून रोहन म्हणाला, " मला तुझा ॲड्रेस माहिती करून घ्यायचा आहे. आम्ही इकडे शिफ्ट होणार ही चक्क थाप मारली होती मी. कारण मला या विषयातले सगळे धागे दोरे तोडून टाकायचे होते. आम्ही पुणं सोडून कुठेही नाही जाणार. त्यामुळे तुझी आठवण आली की मला बोरिवलीला तुला भेटायला

यायचं तर तुझं घर बघून ठेवलेलं बरं. मला मोठंच सरप्राईझ दिलंस की तू ...... बायकांच्या तोंडात तीळही भिजत नाही ही म्हण कोणा मुर्खाने कां रुढ केली समजत नाही मला. आता मीही तुला सरप्राईझ देणारेय्." प्रश्नांकित मुद्रेने अधीर होत वैशाली म्हणाली, "अजून आणि कसलं सरप्राईझ शिल्लक आहे बाबा . सांग लौकर सांग...... माझे प्राण कंठाशी आलेत आता." त्यावर वैशालीचा हात हातात घेवून कुरवाळीत रोहनने दमदार शीळ घुमवली, "तेरी चुनरिया दिल ले गयी...... "

********

# ०७. अस्मानची चाँदनी

पाणखोलातल्या मुसलमान वाडीतला पिराचा उरुस झाल्यावर तिसऱ्या दिवशी फातुची पात (मच्छिमार होडी) खाडीत लोटून मच्छिमारी करायला विजयदुर्गात रवाना झाली. हमज्या नी फातु ह्यानी खुप शिकस्तीचे प्रयत्न केले पण सगळ काम पुरं व्हायला जानेवारी महिना उजाडलाच. उरुसाच्या आधी दोन दिवस सुतारानी यच्चयावत् सगळं काम पुरं केलेनी. मग़ लगोलग करंजेलाचं चोपडाण काढून पात दर्यात लोटायला तयार झाली. फातु नी तिचा दादला इद्रूस यानी त्या वर्षि उरसाला बोलावलेल्या कव्वाल पार्टीच्या सुपारीची निम्मी रक्कम जमातीला बक्षिस केली. जवळ जवळ सव्वा वर्ष पात बांधायचं काम सुरू होतं. इद्रूस फक्त कुकवाचा धनी! खरी जिकीर केली ती फातूने आणि आपला धंदा उद्योग सोडून पडोसी हमज्या वर्षभर अक्षरश: पोटावारी राबला.

इद्रूसच्या एका डोळ्यात फुल पडलेलं, लंगडा, बुटका नी कुरडा.... छलकाटी अंगलट.एक पाय जरा आखूड नी बारीक म्हणून पाय ओढीत चालायचा. चाळीशी उलटली तरी नवेद्रात कोणी त्याला पोरगी द्यायला तयार होईना. त्याचा बापूस मुसा

अट्टल मच्छिमार. लहान डुकमं (छोटी होडी) घेवून तो खाडीतच पाग धरी. त्याच्या बहिणी नी आई शेरिफा खाडी पलिकडे तिर्लोट, पडेल पर्यंत डोकीवर फाटी घेवून मासे विकीत नी बक्कळ पैसे कमवीत.शेरिफा ला हारोहार नऊ चेडी झाल्या. पिराला नवस बोलून चादरी चढवून पिर काय पावला नाही. मुसाने बाबू कुंभाराकडून बानघाटीजवळ सडावळीला पाच एकर जमिन घेतलेली. त्यात कलमं लावली. मोठी चारही चेडवं तिकडे जावून विरडभर कलमांच शिपणं करीत. शेरिफा मासे विकायला पडेलात जाई. ती चवाठ्यावर बसे तिथून जवळच वडचाईचं उघडं देवस्थान नी समोर कौल प्रासाद घ्यायची शीळा होती. बाळु घाडी, नागु घाडी नायतर भिकू तिथे कौल प्रसाद लावीत. वडचाईचा कौल वाया जात नाय ही ख्याती ऐकल्यावर एकदा शेरिफाने वीत दीड वीत लांबीच्या दोन तांबोशा नागु घाड्याला देवून आपल्याला झील व्हावा म्हणून कौल घ्यायची गळ घातली. पन त्या दिवशी काय कौल लागला नाय. त्यानंतरही दोन तीन वेळा प्रयत्न करून झाले पण दरखेपी तीन तीन तास तिष्टंती करूनही कौल काय मिळेना. शेरिफाने मग झिलु घाड्याला गळ घातली. त्याने अमावस्येला कोंबडा द्यायचा उपाय सुचवला. शेरिफाने वीस रुपये काढून दिले. अमावास्येला कोंबडा मानवून झाला. दोन दिवसानी शेरिफा चेडवाला घेवून मासे विकायला आली तेंव्हा तिच्या सामनी

झिलुने कौल लावला. दुपार उलटून गेली चेडू मासे विकून आलं तरी कौल होईन. झिलूने उलटसुलट जाबसाली घातल्यावर एकदाचा पाषाण धरलान् नी देवीने कौल दिलान.वडचाईचे सत्व खरे. त्याच महिन्यात शेरिफा पोटुशी ऱ्हायली. लंगडा कुरडा कां होईना मुलगा झाला.

पावसाळी चतुर्थी नंतर  पाऊस कमी होई. तो सरत्या पावसाचा काळ.  तेव्हा  कुंभवडे, नाणार, चिवारी, उपळे ह्या गावानी  भादव्यात सिलिपाटवाले सागवान, आईन, किंदळ अशी इमारती लाकडाची  जोरदार तोड करून लाकडाचे ओंडके सोलून धुपायला व्हाळात डाळून त्यावर मोठमोठे दगड परतून ठेवीत. काही वेळा अवचित पणे जोराचा पाऊस सुरू होई चार चार दिवस संतत धार पाऊस कोसळत राही. व्हाळाना जोरकस पूर येई नी व्हाळात डाळलेले लाकडाचे ओंडके उपेवून व्हावणीला लागत नी खाडीच्या प्रवाहात व्हावून जात. तिथे पाण्याला एवढा वेग नी व्हावटी की वहात जाणारे ओंडके क्षणार्धात नपश्चात होत. खाडी पुढे वहात जावून विजयदुर्गात अरबी समुद्राला जावून मिळायची.  चिवारी च्या अलिकडे आंबेरकर वाडी पासून खाडीचे पात्र रुंदावत गेलेले. त्यामुळे तिथे व्हावटीचा जोर बराच कमी होई. तसेच भरती च्या पाण्याचा उलट बाजूने रेटा वाढला की पाण्याला फुग पडे नी खळालीही कमी होई. पाणी एवढे चढायचे की चार पाच दिवस

अलिकडे पलिकडे होडी वाहतुक बंद असे. तशा भीषण परिस्थितीतही मुसलमान वाडीतले काही उलट्या काळजाचे पोर नी बापये होडकी घालीत नी व्हावटीत आलेल्या लाकडाच्या गंडोऱ्या आडावून किनाऱ्यावर आणीत.

इद्रूसचा बापूस मुसा तर जब्बर पोहोणारा तो बीन उंडलीची होडी जोरगतीच्या व्हावटीच्या पाण्यात लोटून पुरात वाहून आलेला बराच सिलिपाट जमवीत असे. अलीच्या सहा नंबरच्या बहिणीचं लग्न झालं ती चिवारीतच वाडीतल्या वाडीत दिलेली. त्या वर्षी तुफान पाऊस पडला. चार दिवस संततधार पावसात पाण्याला फुग पडली व्हावटीच्या पाण्यात बरंच लाकूड सामान व्हावून आलेलं दिसायला लागलं. काळवं पडायला जेमतेम अर्धा घंटा राहिला असेल नसेल नी मुसाने डुकमं खाडीत लोटलं. या खेपी नवा जावई हसन ही बरोबर होता. दोघानी सिकस्त करून पाच सहा टवण्या पलिकडच्या थडीला दौलतराव राण्याच्या मळ्याखाली पाज्यात लोटल्या नी वर ओढून ठेवल्या. पाउस थांबून सगळ स्थिरस्थावर झाल्यावर कधीही त्या नेता येणार होत्या. अगदी झुंजरूक पडलेलं बघून "आता वापीस जावया ' असं जावई म्हणाला म्हणून मुसा नी तो परत निघाले मधली धार कापुन पुढे जात असताना व्हावटीत आलेली मोठी टवणी दिसली. मुसाने लगेच रशीचा फास टाकला नी जावई सासरा नेटाने वल्ही मारून तीराकडे जायची शिकस्त करू लागले.

त्याच दरम्याने ओहोटीचा जोर सुरु झाला. धरलेली लाकडाची टवणी आहाराबाहेर जड होती. ओहोटीच्या जोराबरोबर होडकं डगडगायला लागलं किनारा गाठणं दूरच , होडी खालच्या दिशेने वहायला लागली.

सोसाट्याची वाऱ्याची कावटी आली नी त्याबरोबर होडी उलटली. त्या गडबडीत हातातलं वल्हंही सुटलं. घाबरलेला हसन म्हणाला, " आग लागो त्या टवणीक्, रशी सोरून घे आनी तड गाठुया...." सासऱ्याची वाट न बघता तो छलांग मारीत काठाच्या दिशेने पोहत निघाला. मुसाची हाव मात्र सुटेना. उलटलेली होडी पोटाखाली घेवून हाताने पाणी कापीत काठाच्या दिशेने पाणी कापीत पुढे जायची शिकस्त केली. काळोखात आपण कुठे चाललो याचा अंदाज आला नाही. काठ गाठण्या ऐवजी टवणी मधल्या धारेत गावली नी सुकतीच्या ओढीमुळे वेगाने व्हावणीला लागली. जावई जीव वाचवून कसाबसा मुसलमान वाड्यापासून तीनेक मैल खाली नावळे वाडीच्या तडीला लागला. किनारा गाठून जरा दम खाल्ल्यावर आपण नावळ्यात कुंभार वाडीत आलो हे त्याने ओळखलं. कळोखात चाचपडत कसंबसं परम्या कुंभाराचं घर गाठलं. झाला प्रकार त्याला सांगून सासऱ्याला शोधायला खाडीवर जायची गळ घातली . पण त्या अंधारात कोण कसं शोधणार? " हंय तू बगतहस... परसाच्या उजेडात आमी बसलव.... आत

होवऱ्यालागी येक टुको (बाटलीला पत्र्याची पुंगळी बसवून केलेला रॉकेलचा ढणढणा दिवा) वाडीत एकाकडेय मसाल्याची (सेलची) बेट्री नाय की फानस दुकु (कंदील)मिळनार नाय. माडाच्या झावळेची चूड पावसात विझोन जायत्.... ह्या टायमाक वाडीतलो एकव झिलगो भार् पडाक मागनार नाय..... तू दोन खुटके भाकरी खा नी हंयच परशाच्या सामनी टकली टेक...... मुसाची काळजी नुको करू. तो कशी नाय कशी तड गाटीत. उद्या उजवाडलां काय मगे सोदूया तेका."

दुसरे दिवशी भिणभिणताना हसन बाहेर पडला. पाऊस खळलेला नव्हताच, त्याच्या सोबत नावळ्यातले चार पोर गेले. त्यानी खाडीच्या कडेने बराच शोध घेतला. कुकारे मारले पण मुसाचा काय ठीकाणा लागला. कदाचित तड गाटून तो मुसलमान वाड्यात गेलेला असण्याचीही शक्यता होती. म्हणून शेरिफ घराकडे निघाला. वाडीत जावून शोध चौकशी केल्यावर मुसा आलेला नाही हे समजलं. वाडीतल्या लोकाना विषय कळल्यावर पंचवीस तीस मुसलमान झिलगे पाच होड्या काढून मुसाचा शोध घ्यायला बाहेर पडले. शेरिफने दिलेल्या माहिती वरून ते मधली धार ओलांडून अलिकडे आल्यावर होडी उलटली म्हणजे मुसा खात्रीने ह्याच थडीला कुठेतरी लागलेला असणार असा अंदाज करून शोधकरी निघाले. संध्याकाळी उशिराने एकेक होडी यायला लागली. शोधकरानी

नावळ्याचाही खाली घोडेपोई नी त्यापुढे सागव्याच्या नस्ता पर्यंत चा किनारा पिंजून काढला होता पण मुसा किंवा त्याचं डुकमं कशाचाच मागमूस लागला नाही.

पाऊस कमी झाला पूर ओसरला नी दोन दिवसानी मुटाटच्या जेटी जवळ कोणाचा तरी मुडदा लागल्याची आवई आली. वाडीतले पोर घेवून हसन बघायला गेला. मुडदा फुगलेला, माशानी लचके तोडलेले. पण कमरेच्या लुंगी वरून तो मुसा असल्याची ओळख़ पटली. आणखी पंधरा दिवसानी विजयदुर्गाच्या नस्ताच्या अलिकडे अणपूरात मुसाचं होडकूल नी रशीचा फास टाकून बांधलेली लाकडाची टवणी कांदळाच्या गचकटीत अडकलेली उमगली. शेरिफा डगमगणारी नव्हती. घोव मेल्यावर हप्ताभरात ती डोक्यावर फाटी घेवून म्हावरं विकायला बाहेर पडली. त्याच वर्षी दोन आणि तीन नंबर दोन्ही चेडवांची लग्नं लावून दिली. चेडवाना घेवून नावळ्यातल्या रोपटी बागेतला माल काढून तीस पेट्या मुंबईत गावडे दलालाला पाठवल्या. पोरी सग़ळ्या शेरिफाच्या धाकात. पण इद्रूस मात्र आळसा नी उनाड. पण तो शेरिफाचा भलताच लाडका. आयशीची सगळी ठेवरेव इद्रूसच्या ताब्यात. दिसायला बकध्यान असला तरी तो डोक्यान भलताच हुषार. हप्त्याला एक आणा व्याजाने तो कोणा कोणाला व्याजी रकमा देई. नावं नी आकडे लिहिण्याएवढी त्याची लिखापढी झालेली.

राजापुरातल्या काजीच्या दुकानातून चमड्याचा कव्हराची डायरी त्याने आणलेली. व्याजी दिलेल्या रकमांची बिनचूक नोंद तो ठेवी नी हयगय न करता वसूली करी. त्यासाठी शेजारचा हमज्या नी फकीर हे दांडगे पोर हप्त्याने रोज ठरवून त्याने सांभाळलेले होते. हमज्या तर बारा तास त्याच्या लोट्यावरच पडलेला असे. सुरवातीला व्याजाचा हप्तादेण्यावरून वाडीतल्या एका दोघानी इद्रूसला धमक्या देवून कर्ज बुडवण्याची खेळी केली. इद्रूसने झाली गोष्ट जामातीपुढे ठेवली. जमात भक्कमपणे त्याच्या पाठीशी उभी राहिली नी त्याचा धंदा बिनघोर सुरू राहिला.

सागव्या-जंबारी कडचे पाती वाले मुसलमानही इद्रूस कडून व्याजाने पैसे नेत. व्याज बट्ट्याच्या धंद्यात त्याचा एवढा कम बसला की हप्त्यातले दोन दिवस तो सागवे, जंबारी, घोडेपोई या भागात वसूली साठी फिरे. सोबत हमज्या नी फकीर असायचे. त्यांच्या नादाने तो हातभट्टी मारायला लागला. शेरिफाच्या हे लक्षात आल्यावर तिने त्याला बजावले," तुका घेवचीच तर हातभट्टी नुको घेव. इंग्लीस घे. एक पावट् अर्दो पाईंट च्या वर घेव नुको..... मी तुका राजापुरात्सून चांग्ली इंग्लीस दारू हारून द्येन नी हंय घरात कपाडात ठेईन. पन गावली म्हनून अत्ति घेव नुको... येसन अंगाभायर् जाता नये. तुजो बापूस पन घेय.... पन तो कदी झिंगॉन पडलेलो मी बगतलेलो नाय्य....." अंदरकी बात

अशी होती की शेरिफा पण चोरून पिणारी होती. ती हागनदारी कडे गडग्यात बाटली दडवून ठेवी नी काळवं पडल्यावर गुपचूप जावून पिवून येई. तिच्या मोठ्या चेडवाना ही गोष्ट माहिती होती. आता इद्रूसच्या नावाखाली तिला घरातच स्टॉक ठेवता येणार होता. इद्रूसने आयेचा शब्द कायम पाळला. फक्त संध्याकाळी रम, व्हिस्की स्टॉक मध्ये असेल ती , अर्धी क्वार्टर तो मारी नी रेटून जेवे. बरेच वेळा वसूलीहून यायला उशिर झाला तर फकीर नी हमज्या जेवायला इद्रूसकडे असत. इद्रूसचा एक पाय जरा आखूड नी बारीक होता. जास्त चाल पडली की त्याच्या पायाला कळा फूट लागायची. मग दोघाना थांबवून इंग्लीस दारू नी झिंग्याचं कालवण नायतर तळलेली माशाची बोटी, कधि कोंबड्याचा रस्सा याचं आमिष दाखवून त्यांच्याकडून पायाला मालिश करून घेई.

इद्रूसच्या नऊही बहिणींची लग्न झाली. त्यानंतर दोन तीन वर्षानी शेरिफ़ा खटारली. इद्रूसच्या डोईवर भोवऱ्यासभोवती केस गळून हाताच्या चपक्या एवढं खरड पडलं पण त्याचं लग्न काय होईना. खरं तर व्याज बट्ट्यावर तो गबरगंड पैसेवाला झालेला. दोनशे कलमांची बाग, दुमजली स्लॅबचं घर.... पण कशाचा उपयोग झाला नाही. वाडीत चार पाच चेडवं असलेल्या बापयाना दारू पाजून. आतून वीस - पंचवीस हजार देण्याची लालूच दाखवूनही कोण बधला नाही. दारूच्या तारेत एखदा

होय म्हणे, हजारभर ईसारा (आगावू रक्कम) घेई नी दुसरे दिवशी उतरली की मग इद्रूस ला चुकवीत राही. दरम्याने हमज्याने दोन बिब्या केल्या. त्याची मोठी बिबी इद्रूसला दुवक्त रांधून घाली. धादूसपणे अन्न रांधी नी उरलेलं राजरोस घेवून जाई. वाडीतल्या काही लोकानी यावरून त्याचे कान भरायचे प्रयत्न केले पण इद्रूस बधला नाही. "आयेशा येतां ते मुळां माका दोन टायम सोन्याचो घास मेळता. मी काय तेका ठरीव पैसो द्येत नाय.... जेवाण थोडा जास्त कमी व्हवूचाच: तां ढोराक घालन्यापरास तेची पोराटारा खातत... नी मी म्हनशात तर दोपाराचा जेवान, मग तां सोना असाने, संध्याकाली खात नाय..... माकां दोन टायम् ताजा गरम आन्न आयेशा करून घालतां..... तेच्यावर शक घितलो तर अल्ला पन माला मापी करनार नाय." इद्रूस सांगे; ते खरं होतं नी दुसरी अंदरकी बात अशी की हमज्या फुल्ल टाईट होवून पडलेला असला की शे-दोनशे घेवून आयेशा इद्रूसची तहान भागवीत असे. या गोष्टीचा या कानाचा त्या कानालाही पत्ता लागणे शक्य नव्हते.

हमज्या नी आयेषा दोघानीही इद्रूसच्या लग्नासाठी त्यांच्या सग्या सोयऱ्याना सांगून कोणा कोणाला आगावू पैसे देवून शिकस्त केली. दहा रुपये भारी वाटत असा तो काळ! लग्नाला आतुर झालेल्या इद्रूसने दोन तीन हजारांची माती केली. पण अल्लातालाने रहम केली नी अवचितपणे इद्रूसला जशी लॉटरी

लागली. जुम्म्याच्या दिवशी वसूलीसाठी तो नी हमज्या जंबारीत गेलेले होते. तिथे मुसलमानांची मोठी जमात. बरेच मच्छिवाले इद्रूसकडून व्याजी पैसे घेत. तिथे वसूली करीपर्यंत दुपार टळून जाई. तेव्हा इद्रूसच्या खालाकडे ते जेवायला थांबत. नेहमीप्रमाणे ते जेवायला खालाकडे गेले असता तिच्या बाजूलाच मफतलालच्या घरात वीस पंचवीस माणसे जमलेली नी कडाक्याचे भांडण सुरु होते. दारू खावून तर्र झालेला मफतलाल त्याची पोरगी फातू, तिला शिव्यागाळी घालीत लाथा बुक्क्यानी मारीत होता. त्या मागची भानगड खालाने थोडक्यात सांगितली.

जंबारीत ठकसेन जुवाटकर म्हणजे बडे प्रस्थ. त्याचा मुलगा गजा पंचायत समितीत क्लार्क होता. त्याच्या बायकोला जुवळ झाले. सासू दमेकरीण, दोन पोरांची उस्तवार गजाच्या बायकोला, सुमाला झेपेना.म्हणताना पोराना सांभाळायला म्हणून त्यानी मफतलालाची पोरगी फातु हेला कामावर ठेवली. फातु चार यत्ता शिकलेली, गोरी,नक्षत्रासारखी नी रहाणं सवरणंही स्वच्छ. पोरं सांभाळून ती सुमा जुवाटकरणीला कपडे,भांडी धुण्यापासून ते वाटप करून देई पर्यंत मदत करी. तिलाही चांगलं चुंगलं खायला मिळे. सुरुवातीला रोज काळवं पडताना ती घरी जाई. पण नंतर घसण वाढल्यावर ती वसतीला जुवाटकरांकडेच थांबे. गजा दर शनिवारी जंबारीत येई नी

सोमवारी देवगडात परत जाई. त्याने हळू हळू फातुला घोळात घ्यायला सुरवात केली. पंधरा सोळा वर्षाची पोर....घरात , वाडीत प्रच्छन्न स्त्री - पुरुष संबंध तिने बघितलेले होते. त्यामुळे गजाच्या भुलावणीला ती बळी पडली. निसर्गाने आपले काम चोख बजावले. फातु पोटुशी राहिली. ही गोष्ट तिने गजाला सांगितली तेंव्हा," मी तुकां लग्नाच्या बायलेसारी सांबाळीन तू भिया नुको,नी आदी कोणाकव कायव सांगा नुको, जां काय प्वॉर होवचा तां होवने.... मग्ये तुजो बापूस नी जमात कायव करूक शकणार नाय."

गजाने सांगितले ते फातुला मान्य झाले, नी दोन तीन महिने तीने कोणालाच या गोष्टीची दाद लागू दिली नाही. एक दिवस तिला कोरड्या वांत्या व्हायला लागल्या नी पोटही दिसायला लागले तेंव्हा मात्र सुमा चरकली. हे नसती बिलामत नको म्हणून सासू-सुनेने खलबत करून पुरा पगार देवून तिला कामावरून काढून टाकले. घरात ही गोष्ट निदर्शनाला आली. फातु निगरगट्ट.... मरीमर मार खावूनही ती कोणाचे नाव सांगेना तेंव्हा जमातीपुढे प्रश्न गेला. त्यावेळी मात्र फातुने गजा जुवाटकराचे नाव फोडले. जुवाटकराला घोळात घेवून पाच पंचवीस हजार उकळता येतील अशी मसलत ठरवून दहा बारा मुसलमान झिलगे जुवाटकराला भेटायला गेले. झाली गोष्ट सांगितल्यावर त्यांची दमदाटी ऐकून सुमा त्याना म्हणाली,"

आदी माजो घोव येवने.... तेच्या सामनी फातू सांगाने.... नी माज्या घोवान कबूल केल्यान तर फातु माजी सवत म्हनान नांदवून घेवक् मी तयार आंसय.....तुमच्या लोकात दो-दोन बायले करतत ना? आयतवारी माजो घोव हंय असात. तवा तुमची पोर हंय घेवन् येवा. मी म्हटल्या शब्दाक मागे येनार नाय. ह्यां तुमका मान्य नसात तर फुडे जावा नी चार गावानी तुमची अब्रू तुमीच घालवा "

बाजू आपल्यावरच उलटलेली म्हणताना घरी आल्यावर. मफतलालने फातुला मरीमर तुडवले नी, " आता तुज्या गल्यात मोटों दगड बांदतय हात पाय बांदून तुका दर्यात ढिकलून देतय्..." म्हणत रशी घेवून तिचे हात मागच्या बाजूला बांधायला लागला.त्यावेळी इद्रूस पुढे झाला नी म्हणाला, " ह्येका दर्यात ढिकलून दिलस तर उद्या पोलिस तुका पकडून न्हेती..... आदीच तुजी गत काय..... तुजी पोरां उगड्यार पडती ते परीस ह्यां प्वॉर माकां दे.... तेका मी आरेखीन, तेका काय प्वॉर व्हयत् तां माजा म्हून सांबाळीन... ह्ये तुज्ये पोरीक पंचवीस तोले सोनां मी घालीन.... तेची चुकी माका भक्षिस करा. मी जमातीक स हजार जुर्मानो भरीन नी सगल्या वाडीक बकऱ्याचा जेवान घालीन." जमातीला ही मसलत पटली. बसल्या बैठकीत कमरबंदातले रुपये मोजून दीड हजार जुर्माना जमातीच्या हवाली केला. टाकोटाक पंचाना सोबत घेवून पाणखोल गाठले.

जुर्माना पुरा करून देज म्हणून सासऱ्याला नकद पाच हजार रुपये दिले. सगळे अवाक् झाले. तीन रोजानी त्याचा नेव फातूचा निका झाला. बोलल्याप्रमाणे पंचवीस तोळ्याचा ऐवज घालून फातुला घरात आणले. जंबारीत जमात मोठी तिथे पाच बकरे तुटले, नी पाणखोलकराना दोन बकरे नी तीन गावठी दारवेचे फुगे वाटले.

वाडीतले कोण कोण बुजुर्ग त्याच्याच ओट्यावर बसून त्याची तोंडावर टिंगल करायला लागले. " ह्यां बरां झालां बाबा. इद्रूसा रे तुज्या परास हातभर उच नी तुजा चेडू सोबात असा दांडगा प्वॉर मिळवलंस.... तेका तू काय पुरो पडनार म्हनान आयतां प्वॉर पन मिळाला तुका." हे ऐकल्यावर फातू चवताळून बाहेर आली. " काय रे ऊंडग्यानो तुमी खंय खंय गू खाल्लास तो जरा आठवा. माज्या घोवान धा हज्जार जुर्मानो भरून ह्यो इषय मिटवलेलो हा. शादीचा मटान खाल्लास नी दारू खालास तवां ग्वॉड वाटला ना? मी जमातीकडे ह्यो प्रश्ण मांडीन नी टिंगल खोरांच्या टकल्येवर खाताचा मडका देवन् धिंड काडीन. हयसून उटा नी चालू पडा. पुन्नारुपी कोन ह्यो शब्द काढीत तो डुकराचे गू खायत...." टिंगलखोर माना खाली घालून चालते झाले. त्या नंतर पुढे कुणीही या गोष्टीचा उच्चारही करू धजवला नाही. फातूने जमातीकडे तक्रार केली

असती तर जमातीने मिटवलेला हा विषय उकरून काढला म्हणून बोलणारांची खरेच धिंड निघाली असती.

इद्रूस फातूवर भलताच खूष असायचा. तो लाडाने तिला "अस्मानची चाँदनी " म्हणे. तिला फातू न म्हणता चांदु असा तिचा उल्लेख करी. फातु पोटूशी असल्यामुळे जेवण रांधायला नी इतर कामाला आयेषा नी ती नसेल तेव्हा तीची सवत येई. फातु सातोळी बाळंत झाली. पहाटे पोटात दुखायला लागले तेंव्हा इद्रूस, हमज्या नी आयेषा तिला सकाळच्या वस्तीच्या गाडीने राजापुरात घेवून गेले. त्यावेळी तिथे कुलकर्णी नावाजलेले डॉक्टर, त्यांच्या दवाखान्यात फातुला ॲडमिट केले. मूल पोटातच गेलेले होते. चांगल्या डॉक्टरांची ट्रीटमेंट होती म्हणूनच फातू वाचली. मोकळीक झाल्यावर तिच्या पोटात वायगोळा फिरे आणि भयानक वेदना होत. खण्यापिण्याचीही वासना होईना म्हणून आयेषाने हुकमी उपाय केला. ब्रॅण्डी आणून अर्धा कप पाजल्यावर चांगलाच आराम पडला आणि भूकही लागली. औषध फातूला एवढे मानवले की पुढे ती चांगली ठणठणीत झाली तरी रोज कपभर "इंग्लीस दवा" मारल्याशिवाय फातुला चैन पडेना.

फातु बरी होवून पाणखोलात परत आली. तरी रोजचे रांधप, कपडे- भांडी करायला आयेषा येतच राहिली. इद्रूस लाडात येवून म्हणे," चांदु, तू माजी आकाशची चान्नी. तू काय

पण काम केरू नको. तू नुस्ता बसून खा नी माला सुक दे. माला पैसा मोप मिलतो. मी तुला शहजादी सारकी सुकात ठेईन....." गोष्ट खरीच होती. इद्रूसचा व्याज बट्ट्याचा धंदा जोसात सुरु होता. शिवाय बानघटीतली बागही चांगलं उत्पन्न द्यायला लागलेली. कलमाना माशाची कुटी घातल्यामुळे कलमं दृष्ट पडेल अशी डेरेदार झालेली. उताराची मरडी जमीन, 24 तास खारी हवा आणि सूर्य उगवल्या पासून मावळे पर्यंत उन त्यामुळे फळही बचक्यासारखं नी रंगीत. माल काढणी सॉर्टिंग हमज्या अगदी निगुतीने करी. त्यामुळे कलमांची मोठी रक्कम मिळायची.

आयेषाला असलेला उपराळा बघितल्यावर हळूहळू तिची सवत इज्माही फातूला चिकटली. घरची कामं उरकून दिवसातून दोन तीन वेळेला ती फातूशी गप्पा मारीत बसे. तिची वेणी घालून देई. तिला न्हायला घाली. संध्याकाळी दोघीही पत्त्यानी खेळत बसे. त्यावेळीही इज्मा योजून फातूची सरशी व्हायला द्यायची. मटण, बिर्याणी यात आता इज्माचाही वाटा निघत असे. दोन वर्षानी फातू पोटुशी राहिली. तिला ओकाऱ्या सुरू झाल्या नी इद्रूस भलताच हरखला. पडेलच्या वडचाईच्या नवसामुळे इद्रूसचा जन्म झाला असे शेरिफा सांगायची. ते आठवून तो मुद्दाम पडेलला वडचाईच्या दर्शनाला गेला. देवीला

साडी-चोळी नी सव्वाशे रुपये झील होवंदे म्हणून सांगणं केलं. गावातल्या पीराला चादर चढवली नी झील झाला तर उरसाला कव्वाल पार्टीची पुरी बिदागी बक्षिस करीन असा नवस केला.

आता इज्मा फातूची निगुतीने वास्तपुस्त करू लागली. दर महिन्याला राजापुरात डॉकरांकडे तपासायला जाताना आता इज्मा सोबत असायची. तिला जुवळ होणार असे निदान कुलकर्णी डॉक्टरानी केले. आठ महिने भरल्यावर बाळंतपण होईतो फातुला राजापुरातच बिऱ्हाड करून रहायचा बेत तिने इद्रूसला सांगितला. तिला राजापुरात ठेवली की तो बिनघोर; म्हणताना हौसावलेल्या इद्रूसने होकार दिला. दोघीही डॉक्टरांच्या दवाखान्या नजिक गुजराळीत बिऱ्हाड करून राहिल्या. डॉक्टरानी दिलेल्या तारखे आधी दोन दिवस फातू बाळंत झाली. दोन्ही मुलगेच झालेले. बाळंतपण क्रिटीकल होते. पण त्या वेळी सरकारी दवाखान्यात डॉक्टर म्हापणकर हे गायनिक आलेले होते. कुलकर्णी डॉक्टर त्यांच्याशी चांगलं रिलेशन ठेवून होते. फातुच्या डिलीव्हरीला तेही कुलकर्णी डॉक्टरांसोबत हजर होते. मुलगे दोन्ही सुदृढ होते.

बाळंतपणात झालेली हालत लक्षात घेता आपले फॅमिली प्लॅनिंगचे ऑपरेशन करून घ्यायचा निर्णय फातूने घेतला. इद्रूस भेटायला आल्यावर आपला बेत त्याला पटवून ऑपरेशन साठीच्या फॉर्मवर त्याला सही करायला लावली. सरकारी

दवाखान्यात ऑपरेशन झाले. टाके सुकल्यावर कुलकर्णी डॉक्टरांच्या कारमधून फातू जुळे मुलगे घेवून पाणखोलात आली. इद्रूसने आख्ख्या वाडीला दारू नी मटणाचे जेवण दिले. आता आयेषा नी इज्मा दोघीही पुरा दिवस फातुच्या भोवती जरुंजी घालीत रहायच्या. त्यांच्या पोरी अहंमद - महंमदला खेळवायला यायच्या. पोरगे जुवळे असले तरी रंग रुपाने पूर्ण वेगळे दिसत. एक फातुसारखा गोरा घारा तर दुसरा काळासावळा होता.लोक माघारी टिंगलीने म्हणत, "येक इद्रूसाचो नी दुसरो हमज्याचो......"

दोन तीन वर्षानी वाडीतल्या मुजावरची पात सुरू झाली . त्याचा धंदा बरकतीला आलेला बघितल्यावर आपणही पात बांधायची असा बेत फातूने ठरवला. इद्रूस कमकुवत असला तरी आपण जातीनिशी पातीवर राहू असे वचन हमज्याने दिले; नी फातु पुढच्या तजविजीला लागली. लाकडाची जम करण्यासाठी ती हमज्याला घेवून मधल्या वाडीत बाबी आग्र्याच्या बेंडशावर गेली. बाबी बाकड्यावर पान खात बसलेला होता. फातु पुढे गेली नी बाबीला खेटून बाकद्यावर बसली. बाबी सुखावत म्हणाला, " काय ग्ये फातू आज माज्याहारी काय काम काडलंस... " अंदाजाने खडा टाकीत तो पुढे म्हणाला, " काय पात बित बांदूचो इचार हा की काय?" हसत बाबीच्या मांडीवर थाप मारीत फातू म्हणाली," इचार हा

पन कितपत जम बसता बगूया." मग पातीसाठी लाकडाची जम कशी करायची ती बाबीने खोलून सांगितली.

कण्याला आणि सांग़ाड्याच्या आडण्याना साग/ आईन किंदळ पाच सहा तरी नग आणि फळीला जुनाट उंडली ची झाडे पैदा करायला हवी होती. गावातच शिवा बामणाच्या बांधाजवळच्या पडणात व्हाळा कडेला प्रचंड मोठ्या उंडली आहेत, पण मुजावर पात बांधताना विचारायला गेला तेंव्हा शिवा राजी झाला नव्हता. कण्यासाठी लागणारा सागवानी सोटही शिवाकडे मिळणारा होता. बाकी लाकडाची जम बाबी करणार होता. त्या दिवशी संध्याकाळी हमज्या बघून झाडं आला. पाच मोठ्या उंडली, वरच्या पडणात दोन मोठे आईन नी घराकडे दोन सागवान मिळणारे होते. या आधी गेलेली गिऱ्हाईक आठशे हजार या पुढे जायला मागत नव्हती. त्या झाडांची योग्य किंमत अडीच हजारापर्यंत झाली असती. सगळा विषय समजून घेवून दुसरे दिवशी दुपार नंतर दोन हजार रुपये कडोसरीला बांधून फातु बाहेर पडली. घरात हापूसचे आंबे पिकत घातलेले होते. त्यातले दोन दझन आंबे नी दोन मोठे बिस्किटाचे पुडे तिने सोबत घेतले. स्वच्छ न्हाऊन, कोरं कापड (नेसून) कानात वाळ्याच्या अत्तराचा बोळा घालून. डोळ्यात सुरमा घालून पान खावून ओठलाल करून फातू हमज्याला घेवून शिवा बामणाला भेटायला गेली.

शिवा चहा पिवून पान जमवीत ओसरीवर खांबाला टेकून बसलेला होता. फातू गेली नी शिवाच्या मांडीवर थाप मारून त्याला खेटून बसत  हसत म्हणाली,"काय शिवादादा वलकलीव काय माला.... मी मुसलवाड्यातल्या इद्रूसाची बीबी." अर्ध्या वयाचा शिवा...पण फातूची लगट बघून तो ही चळला." न वळकूक काय झाला हाल्ली चार म्हयन्यात माजी खेप नाय तकडे पन तू लगीन न्हावन् इल्यार तुका बगलेला ह्य. तवा जरा कवळा प्वॉर हुतं , आता जुवाळ झाल्यार मागसून फुडसून चांगलां रुंद झालंस म्हनान काय माका वळकून येनार नाय. पन काय्ख म्हणा.... डोक्याक् कुकू लावलस तर तुका कोन दालदीण म्हणनार नाय...." मग फातुच्या कानातला अत्तराचा बोळा काढून  दोन्ही हातांवर चोळून तो पुन्हा फातूच्या कानाच्या पाळीत खोवला. नी स्वयंपाक घराच्या दिशेने मोहरा वळवीत त्याने हाळी घातली." ग्ये आयकलंस काय? लंगड्या इद्रूसाची बायल् नी हमजो इलोहा..... वंयच चाय पाटव. " शब्द कानात पडताच बामणी उठून बाहेर आली. तिला आयकून म्हायती होते की लंगड्या-कुरड्या इद्रूसाने अप्सरेसारखी पोर बायको करून घेतली. ती बाहेर आली. "ही होय इद्रूसाची बायको...काय गो माज्या घोवाच्या फकस मांडयेर् बसोचा ऱ्हवलस" त्यावर निगरगट्ट्पणे हसत फातू म्हणाली, "आवशी, तुका सोबता ह्या बोलणां.... शिवादादा क्येदे, मी त्येंचा प्वॉर सोबनारा, दादाक

बगल्यावर माकां माज्या बापसाची सय इली....." शिवा म्हणाला,"तू मनार घेव् नुको, तां खचोंदे........ पोराच्या मायेन बसलं ना तू? आता असले रंग करूचो माजो वय हा?"

जरा सरशी होत फातूने बिस्किटाचे पुडे नी आंबे टोपलीतून बाहेर काढले. लालबुंद रसरशीत कच्चे आंबे बघून दोघंही आवाक् झाली. बामणी भिंती लगतची परडी पुढे करीत म्हणाली, " ह्येतू आंबे भरून पायरी कागी ठ्येव, मग्ये पानी ओतून घेयन्...." नी बिस्किटाचे पुडे उचलून ती चहा कारायला आत गेली.मग जादा फराळ न लावता फातूने थेट विषयच फोडला. " शिवादादा, माज्या घोवाचो व्याज बट्याचो धंदो काय खरो नाय. मी पात बांदूची म्हनतय. आता पात म्हटली तर तेका लाकूड किती व्हया तुमका म्हायत हा. माका चार-दोन सागनान, आयन् नी फळये साटना मळ्यात तुमच्यो उंडली हत ना त्यो व्हयो. मी पाडून घेनार नाय. भरयाभरी पैशे काय व्हती ते देयन." उंडलीची कुठची झाडे काय हा तपशील हमज्याने फोडून सांगितला. हे बोलण होईतो कुळवाड्यांसाठी ठेवलेल्या पितळी पेल्यातून चहा आला. चहा पिवून आपले नी हमज्याचे भांडे आणि शिवादादाचा कप फातूने उचलला. "अशीच मागच्या दारी जा थंय दोण भरलेली हा. भांडी धोवन् थंयच उपडी घाल" शिवा म्हणाला. फातू मागिलदारी गेली. बामणी दारात होती. दोणी जवळ दुपारच्या भांड्यांचा खटाळा तसाच

टकलेला होता. फातूने काही न बोलता भांडी उचलून पाथरीवर ठेवली. " मी चोळून हंय उपडी घालून ठेवतंय , तू मग्ये पानी घालून भुतू न्ही." बामणीच्या होकाराची वाटही न बघता नेसण आवरून फातू कामाला लागली.

बामणी चाट झाली. हातात चार चार बांगड्या गोठ तोडे. गळ्यात बेंबीपर्यंत लोंबणारा चार पदरी लफ्फेदार हार घातलेली कोरी साडी नेसून आलेली फातू आपण होवून भांडी घासायला वाकली याचं मोठं अप्रूप तिला वाटलं. चुलीकर लाकडांच्या झळीने काळा मेचूट झालेवा तवा, कढई नळ्याच्या खापरीने घासून घासून सगळी झळ खरवडून काढली. रखेच्या डोणग्या जवळ दग्डीत ठेवलेली चिंचेची बोटकं घासून पितळी पातेल्या, ताटं चांगली चकचकीत उजळून काढली. बेताने पाणी वापरून भांडी धुवून उपडी घातली नी हुश्श करीत फातू उठली. तोंडावर पाण्याचा हबका मारून पदराने तोंड पुशीत ती पुढील दाराकडे निघाली. तेने इतक्या झटपट भांडी घासून दिली की, तिच्या कामाचा उरक नी नेटकेपणा बघून बामणी अक्षरशः अवाक् झाली. पूर्वीची तिची नाराजी कुठच्या कुठे नायशी झाली.

शिवाने पान पुढे केले नी स्वतः सुपारीचं अर्धं खांड कातरून फातूच्या हातवर घातलं. तंबाखूची चिमूट पुढे केली. पान खाता खाता शिवा बोलला, "चला आगरातली खयची झाडां म्हणतस ती बगूया." पडणातले दोन आईन, किंदळ नी

गोठ्यामागचे दोन सागवान त्यानी पसंत केले. मग सगळे घरी येवून ओट्यावर बसले. "मळ्यात पाच मोट्यो उंडली हत त्यो तुमी बगलासच हास. माकाव त्यो बगूसाटी मुद्दम जावची गरज नाय. आता तेच्च्या सकट तुमचो काय आकडो हा तो सांगा. मग्ये माजा काय तां मी सांगान." अगोदर योजले होते त्यात एक किंदळीचा नग वाढलेलाच होता. म्हणून फातूने बावीसशेचा आकडा फोडला.

या आधी आलेल्या गिऱ्हाईकांसारखी रड न लावता फातूने रीतीत किंमत केली हे ओळखून शिवा म्हणाला," तू रितीत मागलंस, पण सागवान मातब्बर हत, तसा म्हणशी तर ह्या झाडांवर टेळ ठेवन् ह्येच्च्या आदी दुकू लय गिरायका येवन् ग्येली. पण सगळी भडकी रडयी...... माजी झाडां काय लायकेची हत तां माका म्हायत् हा.... आज नाय उद्या तेका चांगला गेरायक् लागात नी माका चार पैशे सरए मिळॉन जाती. मी लय म्हणत नाय, अडीच हजार पुरे कर, तर मी टाळी मारीन." फातूने लगोलग कमरेच्या चंचीत बारीक बारीक घड्या करून चोंदून ठेवलेल्या नोटा बाहेर काढल्या, त्या नीट लावून मोजल्या नी म्हणाली," ह्ये दोन हजार आसत. पाचशे झाडां तोडूच्ये आदी हाडून घेयन्......" बामणीने पुन्हा चहा आणला तो पिऊन पान खावून फातु उठली. भादव्यात ताणावर झाडं तोडून टवण्या मारून झाल्या. टिपऱ्या पोर्णिमे नंतर

साईजवार चिरकाम करून आणल्यावर मळईतले सहा सुतार आले नी पात बांधायचे काम सुरु झाले.



सुतारांसोबत सोबत फकिर नी हमज्या पण कामाला लागले. खिळे-मोळे, चंद्रूस, नटबोल्ट नी काय काय सामान आणायला  हमज्याला घेवून फातू दोन दोन दिवस कोल्हापूरला

जावून यायची. कोण कोण आडून आडून इद्रूसाचे कान भरायचा प्रयत्न करीत. "ल्वॉक म्हंतत हमजो कायम तुज्या घरात रिगोन आसता. फातू तेका लागू हा..... तां हमज्यावांगडा खय खय फिरतां; आता तू काय तेच्यार पारो धरून हस " त्यावर चरचरीत शिवी हासडीत इद्रूस म्हणे, " मायझयांक ह्यां कळणां नाय, तेच्यो दोनव मागारणी दिवसाडी नी राती दुकू माज्या घरात आसतंत. आता पातीचा सामान हाडूक मी काय जान्यासारको नाय.... म्हणान तां हमज्या वांगडा जाता. माका तर हेच्यात काय शक घेन्या सारखां आशे असा वाटत नाय अल्लाच्यान..... आता मी तेचो मरद आसय ना? नी दुसरा म्हनशा तर माका अशी आकाशची चान्नी मिळाली तां लोकांक बगवत नाय. चांदू माजा माजो किती खयाल करता लोकांक काय दकल.... मी ह्यो असो..... मी काय तेका पुरो पडणार? माकां व्हया तां मिळाला ना मगे बास..... माजे नदरेआड तां कायव करीना..... माजी काय तक्रात नाय..... "

पावसापर्यंत तळ नी सांगाडा पुरा झाला. मिरगा ला काम बंद करून सुतार काम चांगलेच गतीला लागले. फातू हात सोडून खर्च करीत होती. हमज्या नी फकीर दोघेही सुतारांच्या बरोबरीने दिवसरात्र न म्हणता राबत होते, त्यामुळे कामाला पिरंग लागली नाही. मार्गशीर्षात पिराचा उरुस होण्या पूर्वी फातूची पात बांधून पुरी झाली. उरूस झाल्यावर तिसऱ्या

दिवशी अख्ख्या गावातले पाउणशे गडी जमवून पात खाडीत लोटली. दिगू भटाने पातीची पूजा केली. मग हमज्या फकीर सकट आठ खलाशी, जेवणा खाण्याची भांडी, शिधा, पाण्याचे बॅरल, मासे ठेवायच्या फाट्या नी जाळी असा सगळा सरंजाम भरल्यावर फातू  पातीवर चढली. आता गुरुवारी मध्यरात्रीला पात परत यायची होती तोपर्यंत फातु जातीनिशी  पातीवरच राहणार होती.

********

# लेखक परिचय



## प्रा . श्रीराम विनायक काळे.

एम्. ए.एम्.एड्. एम्.फील्.

- बी .एड्. कॉलेज देवगड येथे २८ वर्षे प्राध्यापक म्हणून सेवा.
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक उत्तेजनार्थ अनुदानातून प्रचार प्रकाशन कोल्हापूर तर्फे 'रुजवातीच्या गोष्टी' हा कथासंग्रह प्रकाशित.
- अणुरेणू,देवदुर्ग, आरती, वैनतेय, किरात, प्रसाद, माहेर, अपूर्व, वसुधा, प्रतिबिंब, जत्रा,साहित्य सहयोग या दिपावली विशेषांकामध्ये सुमारे ८० लघुकथा प्रसिद्ध.
- पुढारी नवांकुर कथास्पर्धा , प्रतिबिंब पुणे आयोजित

राज्यस्तर कथास्पर्धा, तरुणभारत अक्षरयात्रा कथास्पर्धा, बॅ.नाथ पै कथास्पर्धा सावंतवाडी, को.म.सा.प देवरुख आयोजित कथास्पर्धा, i pustak HUB आयोजित कथास्पर्धा, साहित्य सहयोग कोल्हापुर आयोजित कथास्पर्धा अशा विविध कथास्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त.

- कालराज प्रकाशन देवगड तर्फे 'पाखरांची भाषा' हा कथासंग्रह प्रसिद्ध.
- विघ्नेश पुस्तक भांडार, कणकवली तर्फे 'बॅडकमांड' हा कथासंग्रह प्रसिद्ध.
- ई सहित्य प्रतिष्ठान ठाणे यांच्या तर्फे ' रुजवातीच्या गोष्टी, 'पाखरांची भाषा ' बॅड कमांड' आणि ' तेरी चुनरिया दिल ले गयी ' हे कथासंग्रह प्रसिद्ध.

## ई साहित्य प्रतिष्ठान चे हे सतरावे वर्ष
## प्रा. श्रीराम काळे यांचे हे ई साहित्यवरील चौथे पुस्तक.

प्रा. श्रीराम काळे हे एक सिद्धहस्त प्रतिभाशाली लेखक आहेत. देवगड येथील बीएड विद्यालयात त्यांनी नवीन पिढ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांच्या पिढ्या घडवल्या. गेली चाळीसेक वर्षे ते लेखन करत आहेत व अनेक नामवंत नियतकालिकांतून त्यांच्या कथांना प्रसिद्धी लाभली आहे. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. ते मानतात की ई पुस्तके हे दिवसेंदिवस वाढत जाणारे भविष्यकाळाचे माध्यम आहे व ते मराठीतही वाढायला हवे.

प्रा. श्रीराम काळे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ.

मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१०), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१२), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (८), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४२), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री

पटवर्धन (५), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (५), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच मराठीचा साहित्य वृक्ष एक दिवस जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत.त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ‘इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।